# लोकलेखा समिती

## (२०१२-२०१३)

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांवरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी

# दहावा अहवाल

( हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक       डिसेंबर, २०१२ रोजी सादर करण्यात आला )

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
२०१२

\\M\c$\Website 2013\PAC Report D-1\10 Report.doc

# लोकलेखा समिती

# २०१२-२०१३

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्र शासनाच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांवरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी**

# दहावा अहवाल

# लोकलेखा समिती
# २०१२-२०१३

**समिती प्रमुख**

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

४) श्री.सुनिल केदार, वि.स.स.

५) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.

६) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.

७) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.

८) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

९) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

१०) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.

११) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.

१२) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

१३) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.

१४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

१५) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.

१६) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.

१७) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.

१८) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

१९) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.

२०) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.

२१) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

२२) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

२३) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

२४) श्री.विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

२५) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

**निमंत्रित**

* २६) श्री.दिवाकर रावते, वि.प.स. (दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी पर्यंत )

२६ अ) श्री.विनायक राऊत, वि.प.स. (दिनांक १ नोव्हेबर, २०१२ रोजी पासून )

२७) श्री. मनिष जैन, वि.प.स.

**सदरहू समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी विधानसभा व दिनांक १ जून, २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
२) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
३) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
५) श्री.दिलीप येवला, अवर सचिव (समिती).
६) श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

*** श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांची निमंत्रित म्हणून दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजी नामनियुक्ती केली.**

# लोकलेखा समिती
# २०१०-२०११

**समिती प्रमुख**

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री.कालिदास कोळंबकर - वि.स.स.
३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
४) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
५) श्री.अमित देशमुख - वि.स.स.
६) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर - वि.स.स.
७) श्री. रवि राणा - वि.स.स.
८) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स
९) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
१०) श्री.नवाब मलिक - वि.स.स.
११) श्री.विलास लांडे - वि.स.स.
१२) श्री.शिवेंद्रसिंह भोसले - वि.स.स.
१३) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
* १४) श्री.सुधीर मुनगंटीवार - वि.स.स.
१४ (अ) प्रा. राम शिंदे- वि.स.स.
१५) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.
१६) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.
१७) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
१८) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
१९) श्री.एकनाथ शिंदे - वि.स.स.
२०) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
२१) श्री. सुरेशदादा देशमुख - वि.प.स.
२२) श्री.भाई जगताप - वि.प.स.
** २३) श्री. राजेंद्र जैन - वि.प.स.
*** २४) श्री. विनोद तावडे - वि.प.स.
२४ (अ) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२५) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ फेब्रुवारी, २०१० रोजी विधानसभा व दिनांक २ मार्च, २०१० रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
४) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
५) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती).
६) श्री. सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

*** श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर प्रा. राम शिंदे, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

**** श्री.राजेंद्र जैन, वि.प.स. यांची दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपली.**

***** श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांची दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद पदी निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१२ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

## (पाच)
## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या विनियोजन लेख्यांवरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी लोकलेखा समितीचा दहावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने सन २००६-२००७ या वर्षाच्या महाराष्ट्र शासनसच्या विनियोजन लेख्यांमध्ये नमूद केलेला अतिरिक्त खर्च व बचतीच्या रक्कमांचा तसेच इतर बाबींवरील खर्चाच्या नियंत्रणाबाबत विचार केला असून त्यानुसार समितीचा हा दहावा अहवाल विधानमंडळाला सादर करण्यात येत आहे.

समितीने दिनांक १० जानेवारी, २०१२, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२, दिनांक ६ मार्च, २०१२, दिनांक २७ एप्रिल,२०१२, दिनांक ९ मे २०१२, दिनांक २३ मे, २०१२ दिनांक ३० मे, २०१२ व दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१२ रोजी अप्पर मुख्य सचिव, गृह, कृषी, सार्वजनिक आरोग्य, व प्रधान सचिव वन, नगरविकास, महिला व बालविकास विभाग यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेतली. तसेच दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ रोजी समितीने भिक्षेकरी गृह, चेंबूर व नवजीवन महिला सुधारगृह, मानखुर्द, मुंबई येथे भेट दिली व प्रधान सचिव, गृह विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग व महिला व बालविकास विभाग व सह सचिव नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक      डिसेंबर, २०१२ रोजी झालेल्या बैठकीत हा अहवाल विचारात घेतला व त्यास काही फेरफारासंह मान्यता दिली.

**विधान भवन,**
**मुंबई / नागपूर.**
**दिनांक :    डिसेंबर, २०१२**

**गिरीश बापट,**
**समिती प्रमुख,**
**लोकलेखा समिती**

# (सहा)

# अनुक्रमणिका



| अ.क्र. (१) | विभाग व तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | |
| (१) | **अतिरिक्त खर्च करणे -** | |
| | अतिरिक्त खर्च सन २००६-२००७ | |
| (२) | **गृह विभाग** | |
| | | |
| (३) | **महसूल व वन (मदत व पुर्नवसन) विभाग** | |
| | | |
| (४) | **महसूल व वन (वने) विभाग** | |
| | | |
| (५) | **कृषी विभाग** | |
| | | |
| (६) | **नगरविकास विभाग** | |
| | | |
| (७) | **जलसंपदा विभाग** | |
| | | |
| (८) | **ग्रामविकास व जलसंधारण विभाग** | |
| | | |
| (९) | **सार्वजनिक आरोग्य विभाग** | |
| | | |
| (१०) | **महिला व बालविकास विभाग** | |
| | | |

## एक (एक) अतिरिक्त खर्च नियमानुकूल करणे

## सन २००६-२००७

या अहवालामध्ये समितीने इतरत्र व्यक्त केलेल्या अभिप्रायास अधीन राहून खाली दर्शविण्यात आलेला जादा खर्च नियमानुकूल करण्यासाठी आवश्यक ते उपाय योजण्यात यावेत.

खालील प्रकरणामध्ये दत्तमत वा भारित अनुदान/ विनियोजनाच्या रक्कमेपेक्षा महसूली लेख्यावरील खर्चाची रक्कम अधिक असल्याचे सन २००६-२००७ च्या लेख्यावरुन दिसून येते.:-

| अ.क्र. | अनुदान/विनियोजनाचे नांव | एकूण अनुदान/ विनियोजनापेक्षा झालेला अधिक खर्च (दत्तमत) | एकूण अनुदान /विनियोजनापेक्षा झालेला अधिक खर्च (भारित) |
|---|---|---|---|
| **(१)** | **(२)** | **(३)** | **(४)** |
| | **गृह विभाग** | | |
| १. | बी-५ तुरुंग | | १,०८,७५६ |
| | **महसूल वन विभाग** | | |
| २. | सी-३ व्याज प्रदान | | २,५५,३२९ |
| ३. | सी-५ इतर सामाजिक सेवा | ४,६५,९६,३६० | |
| ४. | सी-६ नैसर्गिक आपत्ती | २,५१,५२,०३,५२६ | |
| ५. | सी-७ वन | | ८,३६,८०४ |
| | **कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स व्यवसाय विभाग** | | |
| ६. | डी-१ व्याजप्रदान | | १,७८,२४,८७६ |
| ७. | डी-२ए नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य | निरंक | |
| | **नगरविकास विभाग** | | |
| ८. | एफ-३ सेक्रेटरिएट व इतर सामाजिक सेवा | ९३,७१,५५२ | |
| | **वित्त विभाग** | | |
| ९. | जी-७ सामाजिक सुरक्षा व कल्याण | --- | |
| | **सार्वजनिक बांधकाम विभाग** | | |
| १०. | एच-१ व्याजप्रदान | | ३७४ |
| ११. | एच-५ मार्ग पूल | ७३,८२,७३,४२४ | |
| १२. | एच-६ सार्वजनिक बांधकामे व | | १,३५,८१८ |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रशासकीय आणि कार्यचालन इमारती | | |
| | **उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग** | | |
| १३. | के-६ ऊर्जा | २,८३,९३,५१,९६६ | |
| | **ग्रामविकास व जलसंधारण विभाग** | | |
| १४. | एल-१ व्याज प्रदान | | ३९,११,८९,४२६ |
| | **सामाजिक, न्याय, सांस्कृतिक, कार्य व विशेष सहाय्यक विभाग** | | |
| १५. | एन-३ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण | | २८,०२३ |
| | **गृहनिर्माण विभाग** | | |
| १६. | क्यू-१ व्याज प्रदान | | ७,६७,८०,१९९ |
| | **आदिवासी विकास विभाग** | | |
| १७. | टी-१ व्याज प्रदान | | १३,२७,५४८ |
| १८. | टी-२ सहकार | ३,५२,११,८५५ | |
| १९. | टी-३ सामाजिक सुरक्षा व कल्याण | २८,४११ | |
| | **पर्यावरण विभाग** | | |
| २०. | यू-१ व्याज प्रदान | | ५३,२४,४५९ |
| | **रोजगार व स्वयंरोजगार विभाग** | | |
| २१. | झेडए-२ सामाजिक सुरक्षा व कल्याण | ५९,२४२ | |
| | **एकूण ए महसूल लेख्यावरील खर्च** | ६,१८,४०,९६,३३६ | ४९,३८,११,६१२ |

**<u>बी- भांडवली लेख्यावरील खर्च</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| | **गृह विभाग** | | |
| १. | बी-१० गृहनिर्माणासाठी कर्जे | १,४२,९७,७७१ | |
| | **महसुल व वन विभाग** | | |
| २. | सी-१० आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च | | ७५,००० |
| | **कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग** | | |
| ३. | डी-१४ शासकिय कर्मचारी इत्यादींना कर्जे | ५,६०,००० | |
| | **सार्वजनिक बांधकाम विभाग** | | |
| ४. | एच-७ सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यावरील भांडवली खर्च | ५२,४७,२०,४३९ | |
| | **ग्रामविकास व जलसंधारण विभाग** | | |
| ५. | एल-८ प्रादेशिक असमतोल दूर | --- | |

| | | | |
|---|---|---|---|
| | करण्यावरील भांडवली खर्च | | |
| | **अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग** | | |
| ६. | एम-४ अन्न साठवण व वखार साठवण यावरील भांडवली खर्च | --- | |
| | **आदिवासी विकास विभाग** | | |
| ७. | टी-८ जनजाती क्षेत्रविकास उपयोजनांसाठी कर्जे | २,४३,६४२ | |
| | **पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग** | | |
| ८. | वाय-७ आर्थिक व सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च | | ४,३२,९७४ |
| | **एकूण बी महसूल लेख्यांवरील खर्च** | **५३,९८,२१,८५२** | **५,०७,९७४** |
| | **एकूण (ए)+(बी)** | **६,७२,३९,१८,१८८** | **४९,४३,१९,५८६** |

**तळटीप :** -- समितीने जेव्हा जादा खर्च नियमानुकूल करण्याविषयी शिफारस केलेली असते, अशा वेळी समितीने यापूर्वी केलेल्या शिफारशीनुसार (सन १९५३-५४ च्या विनियोजन लेख्यावरील अहवालांचा परिच्छेद १० पहा.) ज्यामुळे कोणताही जादा खर्च नियमानुकूल करणे आवश्यक ठरते किंवा टाळता येते अशा प्रकारचे लेख्यांवरील कोणतेही प्रस्थापित गैरवर्गीकरण हिशेबात घेणे आवश्यक आहे. म्हणून अशा प्रकारे गैरवर्गीकरणाच्या रकमा हिशेबात घेऊनच वर दर्शविण्यात आलेल्या रकमा काढण्यात आलेल्या आहेत.

## गृह विभाग

**पोलीस दलाचे संगणकीकरण व विशेष पोलिस दलाबाबत**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करत असताना अनुदान क्र. बी-१ "पोलीस प्रशासन" मधील प्रधान लेखा शिर्ष २०७० "इतर प्रशासनिक सेवा", प्रधान लेखा शिर्ष २०१४ "न्यायदान" व प्रधान लेखा शिर्ष २०५५ "पोलीस" या शिर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

**अनुदान क्रमांक : बी-१**
**"पोलीस प्रशासन"**

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| २०५५ पोलीस<br>१०९ जिल्हा पोलीस<br>१०९ (००) (०१) जिल्हा पोलीस | | | | |
| मूळ | १६,२४,४४.३१ | | | |
| पूरक | ७६,६८.९३ | १५,७२,३२.९९ | १६,१३,३०.७६ | +४०,९७.७७ |
| पुनर्विनियोजन | १,२८,८०.२५ | | | |

रुपये ४०९७.७७ लाखांचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता प्रत्यर्पण/पुनर्विनियोजनाव्दारे काढण्यात आलेला रुपये १२८८०.२५ लाखांचा निधी अवास्तव असल्याचे सिध्द झाले, याबाबतची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

सन २००६-०७ या वित्तीय वर्षासाठी महालेखापाल-१ व अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचेकडे चुकीच्या नोंदीच्या दुरुस्तीचे प्रस्ताव तयार करण्यात आले होते. महालेखापाल-१ यांनी त्यांचे

पत्र क्र. डीसी-३/२०५५/पोलीस/एनओई/२००६-०७/३०९ दि. २५/२/२००८ अन्वये रु. (+) ८,५२,९६५/- इतक्या व अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडील रु. (+) ९६,०१७/- इतक्या रकमांच्या चुकीच्या नोंदीच्या दुरुस्तीचे प्रस्तावास महालेखापाल-१, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.डी.सी.३/२०५५/एनओई/२००६-०७ दि.२०/२/२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तसेच सदर लेखाशीर्षाखाली १०९ (००) (०८) नक्षलग्रस्त भागातील सुरक्षा विषयक खर्च या खाली रु. ८३,५५,६०० खर्च अंतर्भूत आहे. सदर बाब खर्च मेळाच्या वेळी लक्षात न आल्यामुळे आवश्यक सुधारणा करण्यात आली नाही.

उपरोक्त दोन्ही बाबी विचारात घेता प्रत्यक्ष खर्च रु. १६,१२,५६,६९,६७६/- इतका झाला असून रु. ४०,२३,७०,६७६/- इतका अधिकचा खर्च झाला आहे.

खालील कारणामुळे अधिक खर्च दिसून येतो.

१. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना अदा करावयाची वेतन विषयक प्रदाने तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना १५ टक्के प्रोत्साहन भत्ता देण्यात आल्याने तसेच दोनशे तीन पोलीस शिपायांच्या भरतीमुळे वेतनामध्ये अधिक खर्च दिसत आहे.
२. कायदा व सुव्यवस्था राखणे कामी सतत राज्यात व राज्याबाहेर पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना प्रवास करावा लागल्यामुळे, तसेच इतर बंदोबस्तासाठी उदा. शिवजयंती/गणेशोत्सव/नवरात्रउत्सव इत्यादी बाहेर जावे लागल्यामुळे जादा प्रवास खर्च झाला आहे.
३. शासनाच्या संगणकीय धोरणानुसार अद्यावत ठेवण्यासाठी संगणकाच्या दुरुस्तीच्या कामासाठी लागणारे साहित्य खरेदी केल्यामुळे खर्चात वाढ झाली आहे.
४. पोलीस विभागातील काही कार्यालये जुन्या इमारतीत आहेत. सदर कार्यालये तसेच पोलीस चौकी यांची किरकोळ दुरुस्ती/बांधकाम इत्यादी कारणासाठी तसेच सदर दुरुस्तीकरीता आवश्यक सामग्रीचा दर वाढल्यामुळे किरकोळ बांधकाम खर्चात वाढ दिसून येत आहे.
५. वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयानुसार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना शासन निर्णयातील प्राधिकरणानुसार पोलीस अधिकारी /कर्मचारी यांना उत्तम कामगिरीबद्दल उत्तेजनार्थ बक्षिसे प्रदान करण्यात आल्यामुळे बक्षिसे या उद्दीष्टाखालील खर्चात वाढ दिसून येते.

कायदा व सुव्यवस्था राखणे कामी पोलीस दलात दाखल होणारी वाहने सुस्थितीत ठेवण्यासाठी किरकोळ दुरुस्ती/सुट्टे भाग खरेदी इत्यादी कारणामुळे तसेच बंदोबस्तासाठी वाहनांचा वापर होत

असल्याने पेट्रोल, तेल व वंगण यावरील खर्च क्रमप्राप्त असून भागविणे अत्यावश्यक ठरल्यामुळे ज्यादा खर्च दिसत आहे. काही पोलीस कार्यालये तसेच पोलीस चौकी बहुतांशी खाजगी इमारतीमध्ये असल्याने त्या पोटी अदा करावयाची भाडेपट्टी त्याचप्रमाणे संबंधित परिक्षेत्रातील महानगरपालिका, नगरपालिका यांना अनुज्ञेय असलेल्या वाढीव दरानुसार कर अदा केल्यामुळे ज्यादा खर्च दिसत आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| २०५५ पोलीस<br>१०५ सीमा सुरक्षा दल<br>१०५ (००) (०१) सीमा सुरक्षा दल | | | | |
| मूळ | १३,७३.८२ | | | |
| | | १३,६४.३९ | ११,७४.५५ | -१,८९.८४ |
| पुनर्विनियोजन | -९.४३ | | | |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

१. बऱ्याच पोलीस कर्मचारी /अधिकारी यांना बंदोबस्ताच्या कामासाठी बाहेरगावी जाण्याचे प्रसंग कमी प्रमाणात उद्‌भवल्यामुळे

२. बऱ्याच पोलीस कर्मचारी/अधिकारी साप्ताहिक सुट्टीचा उपभोग घेतल्यामुळे बचत दिसत आहे.

३. काही पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून प्रवास भत्याची मागणी विहित कालावधीत न केल्यामुळे बचत दिसत आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| २०५५ पोलीस<br>११५ पोलीस दलाचे आधुनिकीकरण<br>११५ (००)(०१) शहर पोलीस | | | | |
| मूळ | ७५,००.०० | | | |

|  |  |  |  |
|---|---|---|---|
|  | ३९,१७.०० | १४,९४.६७ | -२४,२२.३३ |
| पुनर्विनियोजन | -३५,८३.०० |  |  |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे जा.क्र.९१/पो.आ/कक्ष १४/अर्थसं/०८ दि.५.५.०८ अन्वये माहे मार्च ०७ मध्ये ( +) ०.९० लाखाचा चूकीच्या नोंदीचा प्रस्ताव अधिदान व लेखा कार्यालयास सादर केला होता. त्यास महालेखापाल कार्यालयाने डीसी-३/२०५५/पोलीस/एनओई/२००६-२००७/३५३ दि. २०.११.२००८ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

महालेखापालाच्या नोंदीनुसार खर्च रु. १४९४.६७ लाख

निव्वळ चुकीची नोंद (+) रु. ०.९० लाख

---

एकूण खर्च रु. १४९५.५७ लाख

शासन निर्णय क्र. आरईटी ०२०७/प्र.क्र.१६२/बीयुडी-१ दि. ३०.३.२००७ पोलीस ११५ पोलीस दलाचे आधुनिकीकरण (००) (०१) शहर पोलीस ५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या उद्दिष्टाखालील शिल्लक तरतूदीमधील रु. १७४९.७७ लाख एवढया रक्मेचे पुनर्विनियोजन करण्यात आले.

एकूण अनुदान रु. ३९१७.०० लाख

पुनर्विनियोजन (-) रु. १७४९.७७ लाख

अंतिम सुधारीत अनुदान २१६७.२३ लाख

---

खर्च रु.१४९५.५७ लाख

बचत रु. ६७१.६६ लाख

यंत्र व साधनसामुग्रीची खरेदी प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्याने बचत झालेली आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| २०५५ पोलीस<br>११५ पोलीस दलाचे आधुनिकीकरण<br>११५ (००)(०२) जिल्हा पोलीस |  |  |  |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मूळ | ९०,००.०० | | | |
| | | ४९,४८.८५ | २५,४९.०३ | -२३,९९.८२ |
| पुनर्विनियोजन | ४०,५१.१५ | | | |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

सदर उपलेखाशीर्षाखाली मुख्यत्वे खालील कारणांमुळे बचत झालेली आहे.

पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाच्या सन २००६-०७ च्या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या रु. ९९.९८३ कोटी रकमेच्या आराखड्यास महाराष्ट्र शासन, गृहविभाग शासन निर्णय क्र.पीएलएफ-०९०६/प्र.क्र.५९९/पोल-४ दि.१०.११.२००६ अन्वये मान्यता प्राप्त झालेली होती. सदर निधीचा विनियोग करण्यास खालील महत्वाच्या अडचणी येत असल्याने खरेदी प्रक्रिया पूर्ण करणे शक्य झाले नाही.

१. निविदा प्रसिध्दीनंतर पुरवठादारांनी सादर केलेला नमूना अपेक्षित दर्जा पूर्ण करीत नसल्याने पुन्हा पहिल्यापासून निविदा प्रक्रिया करणे भाग पडते. यामुळे खरेदी प्रक्रियेस विलंब होतो. (उदा. गॅस मास्क, बुलेट प्रुफ जॅकेट, माईन डिटेक्टर इ.)
२. काही साधनसामुग्री ही देशात बनविली जात नसल्याने त्यांच्या सुट्या भागांची आयात करणे भाग असल्याने त्याचा पुरवठा वेळेवर होत नाही. परिणामी खरेदी प्रक्रिया लांबते.
३. निविदा प्रक्रिया आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या चाचण्या यामुळे खरेदी प्रक्रिया अपूर्ण राहिल्याने निधी उपलब्ध होवूनही देयके संबंधितांस आर्थिक वर्ष संपल्यामुळे कोषागारात सादर करता येत नाहीत. परिणामी, संबंधितास रक्कम अदा करणे शक्य नाही.
४. काही वेळेला मुळ साधनसामुग्रीचा उत्पादक निविदा प्रक्रियेत सहभागी न झाल्याने अथवा निविदेस पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने खरेदी प्रक्रिया पूर्ण करणे शक्य होत नाही. (उदा. बॉडी प्रोटेक्शन किट, थर्मल इमेजर)
५. शस्त्रांच्या बाबतीत ऑर्डिनन्स फॅक्टरीकडून शस्त्रे आणि दारुगोळाबाबत वेळीच वाटप केल्याचे कळविले जात नसल्याने त्याचे देयक अदा करता येत नाही. त्यामुळे सदर निधी अखर्चित राहतो.
६. काही वेळा खरेदी प्रक्रिया पूर्णत्वास येत असताना दरकरार संपुष्टात आल्याने पुरवठा आदेश देणे शक्य होत नाही.

वरील कारणांमुळे बचत झालेली आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष | | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २०५५ पोलीस<br>११५ पोलीस दलाचे आधुनिकीकरण<br>११५ (००)(०३) न्यायसहायक विज्ञान | | | | |
| मूळ | १०,००.०० | | | |
| | | ७,७२.६२ | ४,७१.३७ | -३,०१.२५ |
| पुनर्विनियोजन | -२,३७.३८ | | | |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

रु. ७.७२ कोटी अर्थसंकल्पीत निधीमधून रु. ३.० कोटी एवढा निधी गृहमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी राज्य पोलीस दलाचे आधुनिकीकरणाच्या कार्यक्रमाअंतर्गत सन २००६-०७ मध्ये कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर, पुणे आणि महाराष्ट्र राज्य गृह निर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांच्याकडे पहिल्यादांच परस्पर निधी मंजूर करुन वितरीत केला होता. सदर कार्यपध्दती पहिल्यांदाच कार्यान्वीत झाल्यामुळे या कार्यक्रमांतर्गत अर्थसंकल्पीत निधी प्रत्यार्पित करण्याचे राहून गेले आहे. त्यामुळे महालेखापाल यांचे नोंदवहीत बचत दिसून येत आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष | | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २०७० इतर प्रशासनिक सेवा<br>१०७ होमगार्ड<br>१०७(००)(०१) होमगार्ड | | | | |
| मूळ | ३४,०३.०० | | | |
| पूरक | ५,७९.४३ | ३५,३५.२९ | ३२,६८.३७ | -२,६६.९२ |
| पुनर्विनियोजन | -४,४७.१४ | | | |

नियंत्रक अधिकाऱ्याने कळविलेल्या बचतीच्या आणि वित्त विभागाने मंजूरी दिलेल्या सुधारित अंदाजाच्या आधारे वर नमूद केलेल्या उप-शिर्षाखाली रुपये ५८५.१६ लाखांचा निधी परत करण्यात आला. रुपये २६६.९२ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

१. महालेखापाल कार्यालयाने या कार्यालयाचा दर्शविलेला खर्च रु. ३२६८.३७ लाख आहे. परंतु प्रत्यक्षात खर्चमेळाच्या आकडेवारीप्रमाणे झालेला खर्च रु. ३२५९.९१ लाख आहे. या दोन्हीचा फरक (३२६८.३७-३२५९.९१) ८.४७ लाख एवढा आहे हा फरक महालेखापाल कार्यालय मुंबई/नागपूर तसेच अधिदान व लेखा कार्यालय वांद्रे, मुंबई या कार्यालयास कळविलेल्या चुकीच्या नोंदीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव खातेबदल नोंदीचा आहे.

२. वर्ग १ ते वर्ग ४ ची १०४ पदे रिक्त राहिल्यामुळे वेतन या शिर्षाखाली बचत

३. कार्यालयीन खर्चाअंतर्गत सुधारीत अनुदान उशिरा प्राप्त झाल्याने देयके प्रलंबित राहिली.

४.अपेक्षित पोलीस बंदोबस्त न मिळाल्याने व्यावसायिक व विशेष सेवा या शिर्षाअंतर्गत बचत.

५.गणवेश शिलाईची देयके कारागृहाकडून वेळेत सादर न झाल्याने तसेच पुरवठा दाराने साहित्य पुरवठा वेळेत न केल्याने बचत झाली आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| २०७० इतर प्रशासनिक सेवा<br>१०७ होमगार्ड<br>१०७(००)(०२) पोलीस दलाच्या आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत होमगार्डाचे आधुनिकीकरण (७५ टक्के केंद्राचा हिस्सा व २५ टक्के राज्य हिस्सा) | | | | |
| मूळ | ९,२०.०० | २,८२.९६ | ४३.४९ | -२,३९.४७ |
| पुनर्विनियोजन | -६,३७.०४ | | | |

नियंत्रक अधिकाऱ्यांच्या आवश्यकतेनुसार रुपये ६३७.०४ लाखाची बचत परत करणे अपेक्षित होते रुपये २३९.४७ लाखाच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००७).

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

२००६-०७ या वित्तीय वर्षासाठी प्रत्यक्ष खर्च रु. ४३.४९ लक्ष व बचत रु. २३९.४७ लक्ष दर्शविली आहे. तथापि होमगार्ड आधुनिकीकरणाअंतर्गत जिल्हा प्रशिक्षण केंद्र इमारत बांधकामासाठी रु. १४५ लक्ष तसेच प्रशिक्षण साहित्य खरेदीसाठी रु. ६०.७७ लक्ष असा एकूण रु. २०५.७७ लक्ष इतका खर्च झालेला आहे. साहित्य खरेदीसाठी रु. ७७.१९ लक्ष इतकी रक्कम ठेवण्यात आली होती. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. तथापि निविदा प्रक्रिया विहित वेळेत तांत्रिक कारणास्तव पूर्ण होऊ न शकल्यामुळे रु. ७७.१९ लक्ष इतकी बचत झाली आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| २०७० इतर प्रशासनिक सेवा<br>१०६ नागरी संरक्षण<br>१०६(०४)(०१) राज्य फिरते नागरी आकस्मिकता पथक आस्थापना | | | | |
| मूळ | १,६५.२८ | | | |
| | | १,५१.५३ | १,५१.७२ | +०.१९ |
| पुनर्विनियोजन | -१३.७५ | | | |

कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता प्रत्यर्पण/पुनर्विनियोजनाव्दारे रुपये १३.७५ लाखांचा निधी काढण्यात आला.

टिप ३ मध्ये नमूद केलेली बचत पुढील शीर्षाखाली अधिक खर्चाव्दारे अंशतः प्रतितोलित झाली.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

सदर अधिक खर्च अत्यल्प आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष | | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २०५५ पोलीस<br>१०१ गुन्हा अन्वेषण व दक्षता<br>१०१(००)(०२) गुन्हा अन्वेषण विभाग मुफसल | | | | |
| मूळ | -- | -- | ७.२२ | +७.२२ |

अर्थ संकल्पीय तरतूद केल्याशिवाय खर्च करण्याची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचे कडील रु.(-) ७,२२,२१७/- इतक्या रकमाच्या चुकीच्या नोंदीच्या दुरुस्तीचे प्रस्तावास महालेखापाल-१, मुंबई यांनी त्याचे पत्र क्र. डीसी-३/२०५५/एनओई/२००६-०७ दि. २०.२.२००९ अन्वये मान्यता दिलेली असून त्यामुळे अंतिम खर्च निरंक आहे.

महालेखापालांनी नोंदविलेला खर्च रु. ७,२२,२१७/-

| | |
|---|---|
| एन.ओ.ई.अ.व.ले.का | रु.(-)७,२२,२१७/- |
| एकूण खर्च | रु. ०००/- |

(रुपये लाखात)

| शीर्ष | | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २०५५ पोलीस<br>००१ संचालन व प्रशासन<br>००१(००)(०१) पोलीस निरीक्षणालय | | | | |
| मूळ | १३,६०.६४ | | | |
| पूरक | ३,४६.३६ | १५,९८.२५ | १७,३०.३४ | +१,३२.०९ |
| पुनर्विनियोजन | - १,०८.७५ | | | |

रुपये १३२.०९ लाखांचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, नियंत्रण अधिकाऱ्याव्दारे कळविण्यात आल्याप्रमाणे, परत केलेला रुपये १०८.७५ लाखांचा निधी अनावश्यक असल्याची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

सदर उपलेखाशीर्षाखाली मुख्यत्वे खालील कारणामुळे अधिक खर्च दिसून येत आहे.

१. कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यावरील अपरिहार्य व आवश्यक स्वरुपाचा खर्च केल्यामुळे जादा खर्च दिसत आहे.

२. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना वारंवार राज्यामध्ये बंदोबस्तासाठी दौरे करावे लागल्यामुळे प्रवास खर्चामध्ये जादा खर्च दिसत आहे.

३. शासनाचे संगणकीय धोरण लक्षात घेता संगणकाशी संबंधित लागणाऱ्या वस्तु खरेदी करण्यासाठी अधिक खर्च झाला आहे.

४. पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना १० तासापेक्षा अधिक तास ड्युटी करावी लागल्याने शासन निर्णयानुसार अनुज्ञेय असलेल्या अल्पोपहार भत्यापोटी अधिक खर्च झाला आहे.

नक्षलग्रस्त कारवायांना पायबंद घालण्यासाठी व त्यांच्या कारवाईसंबंधी माहिती मिळविण्यासाठी वेळोवेळी राज्यातंर्गत व सीमेलगतच्या राज्यांमध्ये संपर्क साधण्यासाठी दूरध्वनी खर्चात वाढ झाली आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| २०५५ पोलीस<br>११२ बंदर पोलीस<br>११२(००)(०१) नदी, बंदर व सागरी पोलीस | | | | |
| मूळ | ११,७३.७९ | | | |
| | | १३,६६.७८ | १२,२४.४० | -१,४२.३८ |
| पुनर्विनियोजन | १,९२.९९ | | | |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

शासन निर्णय गृह विभाग क्रमांक आरईटी ०२०७/२०५५/प्रक्र ११/२००६-०७/बीयुडी-१ दिनांक ३०/३/२००७ अन्वये रु.१२५३.४८ लाख इतके अनुदान मंजूर केलेले आहे.

जाव क्र. ९१ पोआ/कक्ष१४/अर्थसं/०८/दि.५.५.०८ अन्वये माहे मार्च ०७ मध्ये (+) १९.६५ लाख चुकीच्या नोंदीच्या प्रस्तावास महालेखापाल कार्यालयाने क्रडीसी ३/२०५५/पोलीस/एनओई/२००६-०७/३५३/ दि.२०.११.०८ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. वाढीव अनुदान उशिरा म्हणजेच दिनांक ३०.३.२००७ रोजी प्राप्त झाल्याने कोषागार कार्यालयाने देयके स्विकारली नाहीत. त्यामुळे वेतन, प्रवास खर्च या उद्दिष्टाखाली बचत झालेली दिसून येते.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| २०५५ पोलीस<br>१०८ राज्य पोलीस मुख्यालय<br>१०८(०२)(०१) शहर पोलीस | | | | |
| मूळ | २०.०० | | | |
| पूरक | ५२.४० | ६७.०२ | १२.३९ | -५४.६३ |
| पुनर्विनियोजन | -५.३८ | | | |

रुपये ५४.६३ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. ((ऑगस्ट २००७) टिप ५ मध्ये नमूद केलेली बचत पुढील शीर्षाखाली अंशत प्रतितोलीत झाली.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

शासन निर्णय क्र. गृह विभाग आरईटी/२०५५/प्र.क्र.११/बीयुडी १, दि. ३०.३.०७ अन्वये अंतिम अनुदान रु. ६७.०२ लाख मंजूर झालेले आहे.

अंतिम अनुदान ६७.०२

खर्च १४.८७

हस्तांतरण नोंद + ५१.१५ (अधिदान व लेखा कार्यालयाने मान्य केलेली)

-----------------------------------------------------------------

एकूण खर्च ६६.०२

बचत १.००

त्यानुसार अनुदानातून रु. १ लाख बचत झाली आहे. सदर बचत अल्प आहे. (१.४३ %)

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| २०५५ पोलीस<br>१०९ जिल्हा पोलीस<br>१०९(०१)(०२) जिल्हा पोलीस दल | | | | |
| मूळ | ५०.०० | ७५.०० | ८४.३२ | +९.३२ |
| पुनर्विनियोजन | २५.०० | | | |

रुपये ९.३२ लाखांच्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

सन २००६-०७ या वित्तीय वर्षासाठी महालेखापाल यांचेकडे चुकीच्या नोंदीच्या दुरुस्तीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. महालेखापाल यांनी त्यांचे पत्र क्रमांक डीसी३/२००५/पोलीस/एनओई/२००६-०७/३०९ दिनांक २५/२/२००८ अन्वये (-) ८,५२,९६५ इतक्या रकमेस चूकीच्या नोंदीच्या दुरुस्तीस मान्यता

देण्यात आली असून त्यामुळे अंतिम अधिक खर्च रुपये ७९,१८८ (रु. एकोणऐंशी हजार आठशे अठयाऐंशी फक्त) इतका झाला आहे.

| | |
|---|---|
| महालेखापालांनी नोंदविलेला खर्च | रु. ८४,३२,१५३ |
| एन.ओ.ई महालेखापाल | रु.(-)८,५२,९६५ |
| एकूण अंतिम खर्च | रु. ७५,७९,१८८ |

सदर रु. ०.७९ लाखाचा अधिक खर्च अर्थसंकल्पीय अनुदानाच्या १ टक्के एवढा अत्यल्प आहे.

**साक्ष :**

दिनांक ९ मे, २०१२ रोजी लोकलेखा समितीसमोर झालेल्या विभागीय प्रतिनिधींच्या साक्षीच्या वेळी सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासंदर्भात महालेखापालांनी उपस्थित केलेल्या लेखापरिक्षण परिच्छेदासंदर्भात समितीला माहिती वेळेवर उपलब्ध होत नसल्याबाबत गृह विभागाच्या निदर्शनास आणून दिले व विभागाकडून होणाऱ्या विलंबाबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली.

पुढे समितीने असे सूचविले की, विभागीय सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कामाचा निपटारा लवकरात लवकर करावा, तसेच विभागाने महालेखापरिक्षक यांच्या कार्यालयाशी समन्वय साधून कामाचा निपटारा करावा यामुळे प्रलंबित परिच्छेदांची संख्या कमी होण्यास मदत होणार आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना १५ टक्के प्रोत्साहन भत्ता २०३ पोलीस शिपायांना देण्याचा निर्णय केव्हा घेण्यात आला. तसेच या २०३ पोलीस शिपायांची भरती केव्हा करण्यात आली? याबाबतची माहिती देण्यास समितीने सांगितले. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीला माहिती दिली की, सन २००२ पासून नक्षलग्रस्त भागातील पोलिसांना १५ टक्के प्रोत्साहन भत्ता दिला जात आहे. यामध्ये २०३ पोलिसांचा उल्लेख चंद्रपूर जिल्ह्यात केलेला आहे. पोलीस भरतीच्या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला होता. ५ वर्षात टप्प्याटप्प्याने ५५ हजार पोलिसांची भरती करण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला होता. त्यामुळे शासनाने दरवर्षी ११ हजार पोलिसांची भरती केलेली आहे. ही प्रक्रिया सन २००६ पासून सुरु झालेली आहे. शासन निर्णयानंतर मे, महिन्यापासून पोलीस भरती प्रक्रियेला सुरुवात झालेली होती. भरती प्रक्रिया तीन ते चार महिन्यात पूर्ण होणार आहे. यामध्ये ११ हजार पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची भरती केली जाणार आहे. यापैकी २०३ पोलीस हे चंद्रपूर जिल्ह्यातील आहेत. याबाबत पुढे विभागीय सचिवांनी याबाबत सविस्तर माहिती देताना असे सांगितले की, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक

६.८.२००२ अन्वये राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात काम करणारे अधिकारी/कर्मचारी यांना मूळ वेतनाच्या १५ टक्के प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. तसेच महाराष्ट्र शासन, गृह विभाग (विशेष) शासन निर्णय क्र. एएनएक्स ६०६/प्रकरण क्र.३०७/विशा-१ (ब) दि.१८.१०.२००६ अन्वये राज्यातील नक्षलग्रस्त भागातील सी-६० पथकातील जवानांना दि.१.९.२००६ पासून प्रत्येकी दरमाह रू.१५००/- इतका कमांडो भत्ता देण्याची मान्यता दिली आहे. त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील जवानांना दि.१.९.२००६ पासून कमांडो भत्ता देण्यात येतो.

सन २००५-२००६ मध्ये शासनाने ५५ हजार पोलिसांची भरती करण्याचे ठरविले होते. आता २०१२ वर्ष सुरु आहे. या सर्व पोलिसांची भरती करण्यात आलेली आहे काय ? याबाबत विचारणा केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, ५५ हजार पोलिसांची भरती करण्यात आलेली आहे. आता आणखी ६१ हजार पोलिसांची भरती करण्याचा निर्णय शासन पातळीवर सुरु आहे.

विशेष सुरक्षा दलाच्या सद्य:स्थितीबाबत लेखी टिप्पणी विभागाने सादर करावी असे निदेश समितीने दिले परंतु अद्याप विभागाकडून माहिती अप्राप्त आहे.

विशेष सुरक्षा दलासाठी मिळालेल्या एकूण मंजूर रु. २५ कोटी अनुदानापैकी फक्त २ ते ३ कोटी रुपयेच खर्च करण्यात आलेले आहेत. पोलिसांवर दिवसेंदिवस कामाचा ताण येत आहे. त्यांना दिवसागणित अनेक कामे करावी लागतात. संप झाला तर त्या ठिकाणी ८ ते १० पोलीस तैनात केले जातात. परिणामी संबधित पोलीस स्टेशनवर अधिक कामाचा ताण येतो, याकरिता विशेष सुरक्षा दलाची स्थापना करण्यात आली होती. पोलिसांना अनावश्यक कामे देण्याचे टाळण्याकरिता विशेष सुरक्षा दलाची स्थापना केलेली आहे. होमगार्ड जास्त प्रमाणात वाढविल्यामुळे पोलिसांचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. पोलिसांकडे वेगळ्या दृष्टीकोनातून पाहिले जाते. पोलिसांचे मानसिक आरोग्य चांगले राहिले पाहिजे. याकरिता त्यांना अधिकाधिक सुखसुविधा देण्याची गरज आहे. त्यांना त्यांच्या कामापेक्षा इतर कामे दिली नाही तर समाज सुरक्षित राहणार आहे. दुर्दैवाने पोलिसांना इतर कामे दिल्यामुळे त्यांच्यावर प्रचंड प्रमाणात कामाचा ताण पडत आहे. पोलिसांना गणपती, मोहरम व इतर सणांच्या दिवशी विशेष सुरक्षिततेची काळजी घ्यावी लागते. पोलिसांना गुन्ह्याचा शोध घेणे, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताळण्यास वेळ मिळत नाही. याकरिता पोलिसांना त्यांचीच कामे दिली पाहिजेत.

राज्यात होमगार्ड देखील अतिशच चांगल्या तऱ्हेने आपले कर्तव्य बजावित आहे. होमगार्डला इतर राज्यात आणि आपल्या राज्यात किती भत्ता दिला जातो, प्रत्येक जिल्ह्यात त्यांना जीप मिळते काय, त्यांच्यासाठी स्वतंत्र कार्यालय आहे काय, त्यांना वेळेवर कपडे मिळणे, आठड्यातून सुट्टी मिळते किंवा कसे, त्यांची संख्या किती आहे, होमगार्डमधील लोकांची पोलिस दलात ५ टक्के भरती केली जाते

काय, याचे प्रमाण किती आहे, या सर्व गोष्टींची इत्यंभूत माहिती समितीला ८ ते १० दिवसांच्या आत देण्यात यावी असे समितीने विभागीय सचिवांनी सांगितले परंतु याबाबतची माहिती अद्यापही समितीला प्राप्त

झालेली नाही.

कायदा व सुव्यवस्था राखणेकामी सतत राज्यात व राज्याबाहेर पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना प्रवास करावा लागल्यामुळे, तसेच इतरत्र बंदोबस्तासाठी बाहेर जावे लागल्यामुळे जादा प्रवास खर्च झ ाला आहे, ही नियमित बाब नाही आहे काय ? यासंदर्भात विभागीय सचिवांना विचारले असता त्यांनी अशी माहिती दिली की, कायदा व सुव्यवस्था कारणामुळे अनेक पोलीस अधिकाऱ्यांना अत्यंत तातडीने विमानाने प्रवास करावा लागतो. ही बाब विचारात घेऊन शासन निर्णय, गृह विभाग दि.६.११.२००६ अन्वये राज्यातील गट-अ व त्यावरील पोलीस अधिकाऱ्यांना अप्पर मुख्य सचिव (गृह) यांच्या पूर्व परवानगीने विमान प्रवास देय करण्यात आला. या कालावधीत नक्षलवाद्यांच्या कारवायामध्ये वाढ झ ाल्यामुहे कायदा व सुव्यवस्था राखणेकामी सतत राज्यात व राज्याबाहेर पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना प्रवास करावा लागत असल्यामुळे अनपेक्षितरित्या जादा प्रवास खर्च झालेला आहे असे समितीस सांगण्यात आले. त्यावर समितीने असे निदर्शनास आणून दिले की, शासनाच्या संगणकीय धोरणानुसार राज्यातील किती पोलीस स्टेशनमध्ये संगणकीकरण झाले आहे. पोलीस स्टेशनकडून माहिती मागविण्याची काय कार्यपध्दती आहे. याबाबत समितीने खुलासा करण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, राज्यातील १०५४ पोलीस स्टेशन संगणकीकृत करण्यात आलेले आहेत. यामध्ये नेटवर्किंगची कामे प्रलंबित आहेत. सदर कामे लवकरात लवकर पूर्ण केली जातील अशी अपेक्षा आहे. इंटर कम्प्युटर कनेक्टिव्हिटी सध्या नाही. यासंदर्भातील योग्य ती कार्यवाही सुरु आहे. पोलीस स्टेशनच्या माध्यमातून सध्या जिल्हा मुख्यालय ते रेंज क्वॉर्टरमध्ये दळणवळणासाठी फॅक्स मशीन, वायरलेस कम्युनिकेशन आणि वायरलेसच्या माध्यमातून फॅक्स या सुविधा देण्याचे काम सुरु आहे. गुन्हे व गुन्हेगारांचा माग काढणारी यंत्रणा ही एक केंद्र शासनाची यंत्रणा आहे. ही राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत (गुन्हे) राबविली जात आहे. जिल्हा मुख्यालयात पुरेशा प्रमाणात साधनसामग्री नाही. स्थानिक लोकप्रतिनिधींनी आपल्या विकास निधीतून संगणक दिलेले आहेत परंतु वित्त विभागाने याला मान्यता दिली नाही. अजून बऱ्याच तालुक्यातील पोलीस स्टेशनमध्ये संगणकीकरण झालेले नाही. अनेक ठिकाणी साईट अद्ययावत नाहीत. तालुक्याच्या ठिकाणातील गुन्ह्यांच्या नोंदी अद्ययावत करण्यात आलेल्या नाहीत. जिल्ह्याच्या ठिकाणी सुध्दा अशाच प्रकारची परिस्थिती आहे. इत्यंभूत माहिती मिळत नाही, ही वस्तुस्थिती समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत अधिक खुलासा करताना

विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, राज्यातील १०५४ पोलीस स्टेशन संगणकीकृत करण्यात आलेली आहेत. यामध्ये वेगवेगळे संगणक आहेत. त्यामध्ये ९-एएस सॉफ्टवेअर प्रणाली सुरु केली जाणार आहे. त्याचे काम सुरु आहे. यामध्ये व्यवस्थापन, आस्थापना, ट्रॅफिक कंट्रोल, वगैरे कामाची माहिती संगणकीकरण करुन त्याची माहिती मुख्यालयाला मिळण्यास मदत होणार आहे. ही सर्व कामे अर्ध्यापर्यंत पूर्ण झालेली आहेत. तसेच टास्क फोर्स नेमलेला आहे व त्याच्या माध्यमातून पाठपुरावा घेण्यास येत आहे असेही समितीला सांगण्यात आले.

पोलीस स्टेशनमध्ये संगणकाचा वापर सुरु झाल्याची माहिती मिळत आहे. तंत्रज्ञानाची कोणतीही प्रणाली सुरु नाही. गृह विभागाच्या संदर्भात यापूर्वी विधानसभेत चर्चा झाली होती. चर्चेनुसार माननीय गृहमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा तसेच गृह विभागाचे सचिव, आयुक्त या सर्वांची एक टीम लंडनला जाऊन त्या ठिकाणी पोलीस यंत्रणेच्या संदर्भात अभ्यास करणार होती. त्या ठिकाणी वापरले जाणारे तंत्रज्ञान आपल्या राज्यात अंमलात आणणार होते. त्यादृष्टीने कोणते तंत्रज्ञान निवडण्यात आले आहे, त्याची अंमलबजावणी कशी केली जाणार याबाबत समितीने विचारणा केली. असता त्याबाबतची माहिती मात्र समितीला मिळाली नाही.

सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पामध्ये पोलीस दलासाठी २३० कोटीची तरतूद केलेली आहे. ही तरतूद खर्च न होताच पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. जेव्हा अर्थसंकल्पीय तरतूद कमी पडते त्यावेळी पुरवणी मागणी करण्यात येते. पण २००६-०७ मध्ये मूळ तरतूद संपूर्णपणे खर्च झालेली नसताना पूरक मागणी करण्यात आलेली आहे. ही रक्कम शिल्लक राहण्याची कारणे काय आहेत ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी माहिती दिली की, सन २००६-०७मध्ये प्रशासनिक आधुनिकीकरण या शीर्षाखाली ९० कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद झाली. ६ नोव्हेंबर २००६ रोजी शासन निर्णय निर्गमित झाला. त्यानुसार रु. ९९.९८ कोटीच्या खर्चाला प्रशासनिक मान्यता देण्यात आली. त्यामध्ये पोलीस आयुक्त या शीर्षाखाली रु.२६.७० कोटीची तरतूद होती. होमगार्डस्‌साठी रु. २.४ कोटी, उर्वरित महाराष्ट्र पोलीससाठी ४७.९७ कोटी, नक्षलाईट ऑपरेशनसाठी रु. ८ कोटी, महाराष्ट्र पोलीससाठी रु. १४.६० कोटी याप्रमाणे तरतूद होती. पोलीस आयुक्त, होमगार्डस्‌ यासाठी करण्यात आलेली तरतूद खर्च होऊ शकली नाही. महाराष्ट्र पोलीस आणि नक्षलाईट ऑपरेशनसाठी जी तरतूद करण्यात आली त्याबाबतीत रु. ९९.९८ कोटी पैकी महाराष्ट्र पोलीससाठी रु. ४७.९७ कोटी आणि नक्षलाईटसाठी रु. ८ कोटी असे एकूण रु. ५५.९७ कोटी खर्च करावयाचे होते. त्यापैकी पोलीस गृहनिर्माण मंडळासाठी - रु.१९.७४ आणि ऑर्डनन्स फॅक्टरीसाठी - रु. २.२७ कोटी, असे एकूण २२.०१ कोटी केन्द्राकडून आले होते. म्हणजे रु. ३३.९६ कोटी त्या वर्षामध्ये खर्च करावयाचे होते. या रकमेतून

६५ बाबी खरेदी करावयाच्या होत्या. त्यापैकी ५१ बाबी खरेदी केलेल्या आहेत. त्यासाठी रु. ८.७८ इतका खर्च झाला आणि रु.२५.१८ कोटी इतकी रक्कम शिल्लक राहिली.

गृह विभागासाठी रु. ३३.९६ खर्च करावयाचे होते. त्यापैकी फक्त रु.८.८७ कोटी खर्च झाले. उर्वरित रु. २५.१८ कोटी खर्च न होण्याची कारणे काय आहेत ? तसेच एकदा अर्थसंकल्पात तरतूद केल्यानंतर खर्च करण्यासाठी शासन निर्णय काढण्याचा प्रश्न कुठे येतो ? अर्थसंकल्पात केलेली तरतूद ही खर्च करण्यासाठीच असते. अर्थसंकल्प विधानसभेमध्ये मंजूर झाल्यानंतर त्यामधील तरतुदीप्रमाणे खर्चाचे नियोजन विभागाने तातडीने केले पाहिजे. यासंदर्भात सविस्तर माहिती देण्यास सांगितले असता विभागाने असा खुलासा केला की, विभागाची अर्थसंकल्पात तरतूद करण्यापूर्वी कोणकोणत्या बाबीसाठी खर्च करावयाचा आहे, कोणत्या गोष्टी खरेदी करावयाच्या आहेत याचा तपशीलवार नियतव्यय केला जातो. हा नियतव्यय मंजूर होतोच असे नाही. जी रक्कम मंजूर होते त्यामधून कोणकोणत्या बाबींवर खर्च करावयाचा यासंबंधी शासन निर्णय काढला जातो. खरेदी करावयाच्या बाबीसंबंधही प्रशासकीय मंजूरी असते. त्यानंतर निविदा प्रक्रिया सुरु होते. यावर समितीने पुढे समितीने अशी विचारणा केली की, बजेट एप्रिलमध्ये मंजूर झाले. त्यानंतर विभागाने प्राथम्यता पाठविली. त्यानंतर नोव्हेंबर महिन्यामध्ये मंत्रालयस्तरावरुन शासन निर्णय काढण्यात आला. विभागाची प्राथम्यता ठरल्यानंतर मंत्रालयस्तरावर शासन निर्णय काढण्यासाठी किती विलंब झाला ? याबाबत विभागीय सचिवांना माहिती देता आली नाही. याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली.

पोलीस दलासाठी सरकार जी तरतूद करते ती सर्व तरतूद खर्च करण्यासाठी उत्तम नियोजन असले पाहिजे. ही रक्कम खर्च करण्यासाठी आपल्या विभागातील जे कोणी तज्ञ असतील त्यांनी सावध असले पाहिजे. समितीने सांगितल्याप्रमाणे एप्रिल महिन्यामध्ये बजेट मंजूर झाल्यानंतर रक्कम खर्च होत नसेल तर ती बाब गृह विभागाला भूषणावह नाही. रक्कम खर्च का होऊ शकत नाही याची कारणे शोधून त्यामध्ये काही त्रुटी असतील तर त्या दूर केल्या पाहिजेत असे मत समितीने व्यक्त केले असता त्याबाबत विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, केवळ पोलिसांना दोष देणे योग्य होणार नाही. निविदा प्रक्रिया हे एक कॅलेंडर असते. अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर केलेली तरतूद लवकरात लवकर खर्च व्हावी असा विभागाचा प्रयत्न असतो. ज्या बाबींवर खर्च करावयाचा असतो, ज्या गोष्टी खरेदी करावयाच्या असतात त्याबाबतीत शासन निर्णय काढण्यात येतो. त्यासाठी एप्रिल ते नोव्हेंबर इतका कालावधी जातो. हा कालावधी कसा कमी करता येईल हे पाहिले पाहिजे. एप्रिलमध्ये अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर विभागाचा शासन निर्णय नोव्हेंबर महिन्यामध्ये निघतो. ज्या तातडीने तरतूद करण्यात आली त्याप्रमाणे खर्च का करण्यात आला नाही ? खर्च का होऊ शकला नाही याचा अहवाल समितीला

देण्याबाबत समितीने विभागाला सांगितले होते. परंतु समितीचा अहवाल तयार होईपर्यंत देखील सदर अहवाल समितीला प्राप्त झाला नाही.

वास्तविक पहाता विधिमंडळ हे सर्वोच्च आहे. विधिमंडळामध्ये अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर त्यामध्ये केलेली तरतूद खर्च करण्यासाठी कोणतीही अडचण येता कामा नये. रक्कम खर्च होत नसेल तर ती जबाबदारी विभागाची आहे. अर्थसंकल्पीय तरतूद खर्च करण्यासंबंधातील विभागाची कार्यपद्धत योग्य आहे की नाही हे तपासले पाहिजे. शासन निर्णय काढण्यासाठी ८-८ महिने लागत असतील आणि त्यामुळे रक्कम अखर्चित राहाणार असेल तर त्याचे गांभीर्य कोणाला आहे ? ही जी काही कार्यपध्दती आहे तिची छाननी करुन समितीला १५ दिवसात अहवाल द्यावा. विभागाची खर्च करण्याच्या संदर्भात जी काही सिस्टिम आहे, कोणकोणत्या स्तरावर नस्ती प्रलंबित राहिली, त्यावेळी कोण अधिकारी होते, यासंबंधीची माहिती समितीला द्यावी. झालेल्या विलंबाबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्याबाबतची माहिती सादर करण्याबाबत समितीने निदेश देवून देखिल समितीचा अहवाल तयार होईपर्यंत सदर माहिती समितीला प्राप्त होवू शकली नाही.

सन २००८ च्या दहशतवादी हल्ल्यात चांगल्या दर्जाचे बुलेटप्रुफ जाकीट नव्हते म्हणून अनेक अधिकारी/कर्मचारी मारले गेले असे त्यावेळी बोलले जात होते. बुलेटप्रुफ जाकीटावरुन त्यावेळी खूप राजकीय स्वरुपाची चर्चा झाली होती. विभागाकडून प्रस्ताव केव्हा गेला, त्या प्रस्तावास मंजुरी केव्हा मिळाली, टेंडर केव्हा निघाले, कुणाच्या चुकीमुळे रक्कम अखर्चित राहिली, त्यावेळी कोण अधिकारी होते, याची सर्वंकष माहिती समितीला द्यावी. परंतु अद्यापही सदर माहिती समितीला प्राप्त झालेली नाही.

राज्याच्या सर्व विभागामधील गृहखाते हे अतिशय संवेदनशिल व महत्वाचे खाते मानले जाते. गृह विभागासाठी दिलेल्या निधी त्या विभागाने खर्च करावयास पाहिजे. तसेच सन २००६-०७मध्ये रक्कम अखर्चित राहाण्याची काय कारणे आहेत याबाबतची सर्वंकष माहिती घेऊन त्याबाबतीत गृह मंत्री महोदयांबरोबर समितीला चर्चा करावयाची आहे. त्यावेळी ज्या अधिका-यांवर जबाबदारी निश्चित झालेली असेल, मग ते निवृत्त झालेले असले तरी त्यांना चर्चेसाठी बोलविण्यात येईल. सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही जबाबदारी संपत नाही असाही एक संदेश अधिका-यांपर्यंत जाणे आवश्यक आहे. २३० कोटी रु. कोणाच्या अकार्यक्षमतेमुळे अखर्चित राहिले, कोणाच्या चुकीच्या निर्णयामुळे ते खर्च होऊ शकले नाहीत हे समोर येणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पात केलेली तरतूद त्या त्या वर्षात खर्च झाली पाहिजे. विभागाच्या कार्यपद्धतीमध्ये काही दोष आहे असे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. याबाबतीत संबंधित अधिका-यांनीही अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. केलेली तरतूद त्याच वर्षात खर्च कशी

होईल यादृष्टीने विभागाचे नियोजन असले पाहिजे. कोणकोणत्या गोष्टी खरेदी करावयाच्या आहेत हे एकदा ठरल्यानंतर खरेदी प्रक्रिया मे महिन्यापर्यन्त पूर्ण होऊन रक्कम त्याच वर्षात खर्ची पडली पाहिजे. इतर राज्ये केन्द्राकडून मिळणारा सर्व निधी खर्च करतात. केन्द्राचा निधी खर्च करण्याचे त्यांनी नियोजन केलेले असते. केलेल्या खर्चाचा अनुपालन अहवाल ते वेळच्या वेळी देतात. आपण केन्द्राकडून निधी कधी येतो याची वाट पहातो, त्यानंतर प्रक्रिया सुरु करतो, त्यानंतर नियोजन करतो, त्यानंतर निविदा काढतो. ही सर्व प्रक्रिया पूर्ण होईपर्यन्त वर्ष संपते. रक्कम अखर्चित रहाणे ही गोष्ट अभिमानास्पद नाही. विभागाने अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर त्यामध्ये केलेली तरतूद त्याच वर्षात कशी खर्च होईल, रक्कम अखर्चित राहाणार नाही यासाठी विभागातील तज्ज्ञांचा सल्ला घेतला पाहिजे, निवृत्त अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन घेवून याचा विचार करावा, असे समितीने विभागाला सूचविले. या प्रक्रियेमध्ये कोणी जाणूनबुजून विलंब लावत असेल तर तेही समोर आले पाहिजे. शासकीय कार्यपध्दतीमध्ये काही दोष निर्माण झालेले असतील तर ते दूर करण्यासाठी समिती शासनास शिफारस करील, असे मत समितीने व्यक्त केले. पुढे समितीने एक सूचना केली की, एखाद्या मोठ्या जिल्ह्यासाठी जेवढा निधी दिला जातो तेवढाच निधी छोट्या जिल्ह्यासाठी देखील दिला जातो. काही जिल्ह्यात १०-१२ तालुके असतात तर काही जिल्ह्यात ७-८ तालुकेच असतात. परंतु दोन्ही जिल्ह्यांसाठी सारखाच निधी दिला जातो. उदाहरणार्थ यवतमाळ जिल्ह्यात जास्त तालुके असताना यवतमाळ जिल्ह्यासाठी जर एक कोटी रुपये दिले तर वाशिम जिल्ह्यात कमी तालुके असताना सुध्दा वाशिम जिल्ह्यासाठी एक कोटी रुपयेच दिले जातात. समितीला असे वाटते की, त्या त्या जिल्ह्याची लोकसंख्या व भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन निधीचे वाटप केले पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, जिल्ह्यांची परिस्थिती बघून निधी दिला जातो.

इतर विभागामध्ये उप अभियंता यांच्यापासून वरिष्ठ पातळीपर्यंतच्या अधिकाऱ्यांना करोडो रुपयांच्या प्रस्तावास मंजुरी देण्याचे अधिकार आहेत. परंतु गृह विभागातील एखाद्या मोठ्या शहरातील पोलीस आयुक्तांना दोन-चार कोटी रुपयांच्या प्रस्तावास मंजुरी देण्याचे सुध्दा अधिकार नाहीत. पेट्रोलसाठी पैसे खर्च करावयाचे असतील तर त्या अधिकाऱ्यांना विभागाची परवानगी घ्यावी लागते. पोलीस विभागाला वाहनांसाठी लागणाऱ्या पेट्रोलचा खर्च वाढवून दिला पाहिजे. वाहनांमध्ये पेट्रोल भरण्यासाठी पोलीस विभागाकडे पैसे नसतात. अशा परवानग्या घेण्यामध्ये बराच वेळ जातो. ही बाब विभागाच्या निदर्शनास आणून दिली व यावर विभागाने उपाययोजना करावी असे सूचित केले. यावर्षी पुणे पोलिसांनी पेट्रोलच्या खर्चासाठी राज्य सरकारकडे ६६ कोटी रुपयांची मागणी केली होती. परंतु राज्य शासनाने पुणे पोलिसांना फक्त १३ कोटी रुपये दिलेले आहेत. ६६ कोटी रुपये आणि १३ कोटी

रुपये यामध्ये खूप मोठा फरक आहे. जेवढी मागणी करण्यात आली तेवढे पैसे मिळाले नाहीत तर खर्च कसा करायचा ? अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर संबंधित जिल्ह्याला ताबडतोब निधीचे वाटप केले पाहिजे. संबंधित अधिकाऱ्यांना पेट्रोलच्या खर्चासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घेण्याची काय आवश्यकता आहे ? तुमच्या विभागाच्या तुलनेत इतर विभागाच्या अधिकाऱ्यांना जास्त अधिकार आहेत. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, पुणे पोलीस, यवतमाळ पोलीस किंवा इतर जिल्ह्यातील पोलीस विभागाने जेवढी निधीची मागणी केलेली आहे ती विचारात घेता निधीच्या उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे निधी वितरीत केला जातो. पोलीस विभागातील अधिकाऱ्यांना वित्तीय अधिकार वाढवून देण्याची आवश्यकता आहे. पोलिस महासंचालकांना ५ लाख रुपयापर्यंतच्या खर्चाच्या प्रस्तावास मंजुरी देण्याचे अधिकार आहेत. अतिरिक्त मुख्य सचिव यांना ५ लाखापेक्षा जास्त व २५ लाखापेक्षा कमी खर्चाच्या प्रस्तावास मंजुरी देण्याचे अधिकार आहेत. तसेच, माननीय मंत्री महोदयांना २५ लाखापेक्षा अधिक खर्चाच्या प्रस्तावास मंजुरी देण्याचे अधिकार आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागातील उप अभियंता यांना ५ कोटी रुपयापर्यंतच्या खर्चाच्या प्रस्तावास मंजुरी देण्याचे अधिकार असतात आणि गृह विभागाच्या सचिवांना फक्त २५ लाख रुपयापर्यंतच्या खर्चाच्या प्रस्तावास मंजुरी देण्याचे अधिकार आहेत. गृह विभागातील अधिकाऱ्यांची यासंदर्भात चर्चा होत नाही काय? ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, प्रशासकीय सुधारणा आयोगाने शक्तींचे निकेंद्रीकरण करावे असे सुचविले होते. त्याशिवाय काम व्यवस्थित होणार नाही. याबाबत समिती शासनास शिफारस करु शकते असे सचिवांच्या निदर्शनास आणून दिले असता याबाबत अधिक माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, विभागाने सन २०१२-१३ या वर्षासाठी शासनाकडे पेट्रोलच्या खर्चासाठी १०० कोटी रुपयांची मागणी केली होती. शासनाने ६९ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. शासनामार्फत दोन-दोन महिन्यांनी निधी वितरीत केला जातो. एप्रिल आणि मे महिन्यासाठी ११ कोटी रुपये वितरीत करण्यात आलेले आहेत. जून आणि जुलै महिन्यासाठी वेगळा निधी मिळणार आहे. मागील दोन-तीन वर्षात त्या शीर्षाअंतर्गत किती खर्च करण्यात आलेला आहे याचा आढावा घेऊन ११ कोटी रुपये विभागून देण्यात आलेले आहेत.

यावर समितीने आपले असे मत व्यक्त केले की, निधी विभागून देण्याची जी पद्धत सांगितली ती चुकीची आहे. कारण एखाद्या विभागाची हद्द ६० किलोमीटर असते तर दुसऱ्या विभागाची हद्द ६० किलोमीटरपेक्षा जास्त असते. एखाद्या ठिकाणी डोंगरी भाग असतो. तेथील लोकसंख्या कमी असते. परंतु पोलिसांना डोंगरी भागामध्ये जाण्यासाठी फिरुन जावे लागते. त्यामुळे पेट्रोलसाठी खर्च जास्त

येतो. विभागाने त्या त्या जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन पैसे विभागून दिले पाहिजेत. ज्या अधिकाऱ्यांनी स्थानिक पातळीवर काम केलेले आहे त्या अधिका-यांना स्थनिक पातळीवर येणाऱ्या अडचणींची माहिती असते. पेट्रोलच्या खरेदीसाठी पैसे नसतील तर संबंधित अधिकारी स्वत: वाहनामध्ये पेट्रोल भरणार नाहीत. सन १९५६ साली खरेदी करण्यात आलेल्या जीप्सचा वापर आजही केला जातो. नागपूर, पुणे शहरातील पोलीस विभागासाठी नवीन वाहनांची खरेदी करण्यात आलेली आहे. ग्रामीण भागातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे वाहने नाहीत. विभागाला मिळालेला संपूर्ण निधी खर्च होत नाही व तो निधी परत जातो. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी यासंदर्भात चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. राज्यातील गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले आहे. छोट्या गावामध्ये, शहरामध्ये दरोडे पडतात. पोलीस विभागाने गस्त घालणे सुरु केलेले आहे. त्यासाठी देखील पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. यावर मागील वर्षी जेवढा निधी देण्यात आला होता त्यामध्ये १५-२० टक्के वाढ करुन पुढील वर्षी निधी उपलब्ध करुन दिला जातो. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

पोलीस अधिकाऱ्यांना नियोजनाचे व आस्थापनेचे काम सुध्दा करावे लागते. गृह विभागामध्ये एखाद्या तांत्रिक अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे काय ? कारण पोलिसांचे दैनंदिन काम या कामापेक्षा वेगळे आहे. पोलीस विभागाकडे ५०० वाहने असतील आणि त्या वाहनांच्या पेट्रोलसाठी ५० कोटी रुपये खर्च येत असेल परंतु पुढील वर्षी जर १ हजार वाहने खरेदी करण्यात आली तर पेट्रोलसाठी किती खर्च येईल अशा प्रकारचा त्या संबंधित क्षेत्रातील अधिकारी गृह विभागाकडे आहे काय ? गृह विभाग अशा परिस्थितील खाजगी तत्वावर लेखापालांची मदत घेऊ शकतो. मंत्रालयात वित्तीय सल्लागार, लेखापालाचे पद आहे. पोलीस विभागामध्ये अशा प्रकारचे पद आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सह संचालक, सहायक संचालक, लेखा अधिकारी अशा प्रकारची पदे महासंचालक कार्यालयामध्ये निर्माण करण्यात आलेली आहेत.

माहिती तंत्रज्ञानाचे काम कोणाकडे देण्यात आलेले आहे ? याबाबत समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सीएमसी कंपनीला या कामाचे कंत्राट देण्यात आलेले आहे. सदरहू कामासाठी ३ संस्थांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु ते काम सोडून गेले. त्यामुळे मागील तीन महिन्यांपासून हवालदारांचे पगार वेळेवर होत नाहीत. यासंदर्भात वित्त विभागाला पत्र पाठविले होते. वित्त विभागाचे अधिकारी सुरुवातीला ही जबाबदारी गृह विभागाकडे ढकलत होते. परंतु गृह विभागात चौकशी केली असता असे निदर्शनास आले की, वित्त विभागाचा सर्व्हर स्लो झालेला आहे. नवीन सागरी बोटींची खरेदी करण्यात आलेली आहे. एका बोटींसाठी २०० लिटर पेट्रोल लागते.

ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड या देशातून सागरी बोटींची खरेदी करण्यात आलेली आहे. त्या सागरी बोटींच्या देखभाल व दुरुस्ती कंत्राट करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्या बोटी आता पडून आहेत. त्या बोटींचे सुटे भाग मिळत नाहीत.

याबाबत गृह विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गृह विभागातील महत्वाच्या प्रश्नांच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांची भेट घेऊन त्यासंदर्भात चर्चा केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, महासंचालक कार्यालयामार्फत पोलीस विभागावर होणाऱ्या खर्चाचे नियोजन केले जाते. त्यामुळे महासंचालक कार्यालयात एक स्वतंत्र वित्तीय सल्लागार नियुक्त केला पाहिजे. वित्तीय सल्लागाराची परवानगी घेतल्याशिवाय पोलीस विभागाला पैसे खर्च करता येणार नाहीत, अशी तरतूद केली पाहिजे. प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या अंतर्गत देखरेखीच्या संदर्भात मध्यंतरी एक बैठक झाली होती. त्यावेळी अशा प्रकारची शिफारस करण्यात आली होती. सागरी बोटी तसेच संगणकीकरणाच्या बाबतीत वार्षिक देखभाल कंत्राट असणे आवश्यक आहे. तसेच, पोलीस विभागात व्यवस्थित नियोजनासाठी एक स्वतंत्र कक्ष निर्माण केला पाहिजे. अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोग विभागाला कसा व कोठे करता येईल यासंदर्भातील नियोजन करण्याचे काम त्या कक्षाकडे सोपविण्यात आले पाहिजे. खरेदीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. पोलीस विभागात योग्य प्रकारे शक्तींचे निकेंद्रीकरण झाले पाहिजे.

यावर पोलीस विभागामध्ये तांत्रिक ज्ञान असलेले आय.टी.तज्ज्ञांची देखील आज आवश्यकता असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

पुणे येथे सीआयडी ऑफिसमधील सीडीआर साठी अद्यापपर्यंत कोणालाही नियुक्त करण्यात आलेले नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली व यावर विभाग सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना नेमणार आहेत का याबाबत समितीला माहिती द्यावी अशी सूचना समितीने विभागाला केली. परंतु अद्याप समितीला माहिती प्राप्त झालेली नाही.

दुर्दैवाने म्हणा किंवा सुदैवाने म्हणा पोलीस खाते हे शासनाच्या सगळ्या खात्यांशी जोडलेले आहे. तसेच लोकप्रतिनिधींचे असते. गावात काहीही झाले व त्याचा लोकप्रतिनिधीशी संबंध नसला तरी आमचे नाव त्याच्याशी जोडले जाते. घरातील भांडण असले तरी लोक आमच्याकडे येतात. समाजामध्ये वाद

झाला तरी लोक आमच्याकडे येतात. चोरी झाली तरी लोक आमच्याकडे येतात. त्यामुळे आम्ही देखील सगळ्यांशी जोडलेले आहोत म्हणूनच आम्हाला देखील त्यात लक्ष घालावे लागते. आपल्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. या विभागाचा संबंध इमारत व रस्ते बांधण्याशी येतो. पण त्या

इमारतीला आग लागली किंवा रस्त्यावर खड्डे पडले आणि लोकांनी आंदोलन केले तर तेथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी जात नाहीत. तेथे पोलिसांनाच जावे लागते. एवढेच कशाला रस्त्यावर अपघात झाल्यानंतर लोक एकत्र जमल्यानंतर तेथे दंगा घडू नये म्हणून पोलिसांनाच जावे लागते. त्यामुळेच गृह विभाग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. या विभागामध्ये दृष्टी असणारी माणसे आहेत. आज देखील समाजामध्ये खाकी वर्दीला मान आहे म्हणूनच मी नेहमी म्हणतो की, शासनाच्या गाडीचे स्टेअरिंग हे पोलिसांच्या हातामध्ये असते. आज खाकी वर्दीतील माणूस चालक आहे, मालक आहे, प्रवर्तक आहे, पालक आहे. एवढी मोठी जबाबदारी या विभागावर आहे. दैनंदिन जीवनामध्ये आमचा पोलिसांशी संबंध येत असल्यामुळे आम्हाला पोलीसांची भीती वाटत नाही. हे मी आदरभावनने बोलत आहे. आजही समाजातील सामान्य माणूस पोलीस ठाण्यामध्ये जाण्यास घाबरतो. पोलीस ठाण्यामध्ये गेल्यानंतर लोक विचारतात की, आज काय लफडे केले. ब्रिटीश काळा पासून पोलीस आणि समाज यांच्यामध्ये दरी आहे. किंबहुना तशी दरी ब्रिटीशांनी मुद्दामहून निर्माण केलेली असावी. आज आपण सन २००६-२००७ मधील अधिक खर्च व बचती बाबतचा आढावा घेण्यासाठी एकत्र जमलो आहोत. सन २००६-२००७ मध्ये ज्या त्रुटी झाल्या किंवा नियोजना अभाव झाला हा तत्कालीन अधिकाऱ्यांमुळे झाल्या याची समितीला कल्पना आहे. तशीच चूक आपणाकडून होऊ नये अशी समितीची अपेक्षा आहे. याचे कारण पाच सहा वर्षानंतर जे कोणी अधिकारी आपल्या पदावर येतील त्यांच्यावर तत्कालीन अधिकाऱ्यांचे खरखटे आम्ही काढत बसलो आहोत असे म्हणण्याची पाळी येऊ नये, असे आम्हाला वाटते. आजही पोलिसांबद्दल भीती युक्त आदर भाव लोकांमध्ये आहे. समिती न्यायाधीशांच्या भूमिकेत आणि आपण आरोपिंच्या पिंजऱ्यात उभे आहोत अशी भावना करून घेऊ नका. गृह विभाग अप टु डेट असला पाहिजे असे आमचे मत आहे. त्यामुळे प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या शाखेच्या कामात लक्ष घातले पाहिजे. तसेच सिस्टीममध्ये चांगल्या प्रकारे सुधारणा कशी करता येईल ते पहावे. हा जो निधी आहे तो जनतेचा आहे. त्यामुळे जनतेच्या संरक्षणासाठी निधीचा विनियोग झाला पाहिजे, अशी आम्हा सर्वांची भावना आहे. आपणास समितीला काही सूचना करावयाच्या असतील त्या लेखी स्वरूपात केल्या तरी चालतील. महालेखापालांनी काढलेल्या परिच्छेदा संबंधी आम्ही प्रश्नावली तयार केली आहे. ती प्रश्नावली आपणाला देतो. त्याचे लेखी उत्तर आम्हाला द्यावे. त्यानुसार आम्हाला पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

**अभिप्राय व शिफारशी**

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी पोलीस दलामध्ये ५ वर्षात टप्प्याटप्प्याने ५५ हजार पोलिस शिपायांची भरती करण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्याची समितीस माहिती प्राप्त झाली. सदर

प्रक्रिया सन २००६ पासून सुरु झाली असून प्रतिवर्षी ११००० याप्रमाणे ५५००० पोलीसांची भरती करण्यात आली आहे याबाबत समितीने समाधान व्यक्त केले. समितीस अजून ६१००० पोलीसांची भरती करण्याचा शासन पातळीवर निर्णय घेण्यात आल्याची देखील माहिती मिळाली. **पोलीस दलाचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या पदांची भरती प्रक्रिया अत्यंत तातडीने करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल समितीस ३ महिन्यांत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

विशेष सुरक्षा दलासाठी मंजूर झालेल्या एकूण रु. २५ कोटी अनुदानापैकी फक्त रु. २ ते ३ कोटी खर्च करण्यात आल्याचे समितीस निदर्शनास आले. पोलिसांना कामाचा अत्यंत ताण असल्याने त्यांना सहकार्य करण्यासाठी व अनावश्यक कामे देण्याचे टाळण्यासाठी विशेष सुरक्षा दलाची स्थापना करण्यात आली आहे. होमगार्ड हे या कामी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. राज्यातील होमगार्ड चांगल्या तऱ्हेने आपले कर्तव्य बजावीत आहेत. परंतु ज्या सुविधा आपण पोलीस दलाला पुरवित आहोत तशाच सोयी-सुविधा होमगार्डस्ना दिल्यास त्यांच्या कर्तव्य परायणतेत वाढ होईल असे समितीचे मत झ ाले. त्या दृष्टीने समितीने होमगार्डस्विषयी अधिक माहिती समितीला देण्याच्या सूचना विभागास दिल्या होत्या. परंतु सदर माहिती प्राप्त झालेली नसल्याने समिती नापसंती व्यक्त करीत आहे.

शासनाने सर्व विभागांचे संगणकीकरण करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे व याबाबत मोठ्या प्रमाणात कामे देखील सुरु झाली आहेत. शासनाच्या या धोरणानुसार पोलीस दलाच्या संगणकीकरणाबाबत समितीने माहिती विचारली असता राज्यातील १०५४ पोलीस स्टेशनचे संगणकीकरण झाले आहे, असे सांगण्यात आले. परंतु अद्यापही नेटवर्कींगचे जाळे राज्यात पसरलेले नसल्यामुळे सर्व पोलीस स्टेशनमध्ये संगणकांची कनेक्टीव्हीटी अद्याप झालेली नाही. **पोलीस स्टेशनचे संपूर्णत: संगणकीकरण करुन ते एकमेकांना जोडून घेण्याची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण केल्यास गुन्हांच्या नोंदीची व गुन्हेगारांची माहिती तालुका व जिल्हा स्तरावर उपलब्ध होवू शकते. त्यामुळे गुन्ह्यांचा शोध व गुन्हेगारांना पकडण्यास अतिशय मोलाची कामगिरी बजावत येणे शक्य होईल असे समितीचे मत झाले. या संदर्भात अत्याधुनिक तंत्रज्ञानाची निवड करुन ते यशस्वीरित्या अंमलात आणण्याची मोठी जबाबदारी पोलीस दलाची आहे. त्यामुळे पोलीस दलाचे संगणकीकरण अत्यंत तातडीने करावे, अशी समिती आग्रहाची शिफारस करीत आहे.**

शहर व ग्रामीण पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी पुरेशा प्रमाणात तरतूद करुनही सदर रक्कम अखर्चित राहिल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या संदर्भात समितीने माहिती घेतली असता, अंदाजपत्रक मंजूर झाल्यावर आधुनिकीकरणासाठी ज्या बाबी आवश्यक होत्या त्यासंदर्भात ५-६

महिन्यानंतर कार्यवाही झाल्याचे निदर्शनास आले. वास्तविक विभागाची प्राथमिकता ठरल्यानंतर व विभागास नियतव्यय मंजूर झाल्यावर तातडीने कार्यवाही होणे अपेक्षित होते. असे म्हणता येईल की, पूर्व नियोजन करुन मगच तरतूद करण्याकरीता प्रस्तावित करणे आवश्यक होते. यासाठी विभागामध्ये उत्तम नियोजन करणारे तज्ञ असणे व त्यांना पोलीस खात्याची इत्यंभूत माहिती असणे आवश्यक आहे. **विभागास नियतव्यय मंजूर होवूनही तो योग्य ठिकाणी खर्च होत नसेल तर ते विभागास निश्चितच भूषणावह नाही. त्यामुळे नुसते कागदीघोडे नाचवण्यात वेळ घालविण्यापेक्षा पोलीस दलाचे आधुनिकीकरण कसे करता येईल याकडे जास्त लक्ष पुरविणे आवश्यक आहे. त्यामुळे पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाच्या अनुषंगाने विभागाने त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणावेत अशी समिती अपेक्षा व्यक्त करते. सदर निधी अखर्चित राहण्यामागे कोणत्या व्यवस्थेकडून विलंब झालेला आहे याची सखोल चौकशी करुन यापुढील काळात तरी अशी हलगर्जी होणार नाही यासाठी ज्या-ज्या अधिकाऱ्यांनी आधुनिकीकरणाबाबत निर्णय घेण्यास विलंब लावला व अकार्यक्षमता दाखविली, त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी, अशी शिफारस समिती करीत आहे. त्याचबरोबर तरतूद प्रस्तावित करताना त्याची अंमलबजावणी योग्यप्रकारे कशी होईल याबाबत काटेकोर नियोजन करावे व यासाठी निवृत्त तज्ञ वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घ्यावे, अशी देखील समितीची शिफारस आहे.**

**पोलीस विभागास मंजूर झालेल्या निधीचे जिल्हानिहाय वाटप केले जाते. यामध्ये हा निधी सर्व जिल्ह्यांना समान वाटण्यात येतो. परंतु सर्व जिल्हे आकाराने व लोकसंख्येने काही एकसारखे नसतात. समान निधीच्या वाटपामुळे लोकसंख्या व भौगोलिकदृष्ट्या मोठ्या असलेल्या जिल्ह्यांना निधी कमी प्राप्त होतो. त्यामुळे त्या-त्या जिल्ह्याची लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्रफळ विचारात घेवून निधीचे वाटप केले पाहिजे अशी समितीची शिफारस असून त्यादृष्टीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस कळविण्यात यावे.**

गृह विभाग व इतर विभागांच्या कार्यपद्धतीत फरक आहे. जनतेच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी पोलीस दलाची आहे. त्यामुळे त्यांना रात्रंदिवस त्यांच्या अधिकार क्षेत्रामध्ये गस्त घालणे, गुन्ह्यांच्या ठिकाणी भेट देणे याकरीता वाहनांचा वापर मोठ्या प्रमाणात करावा लागतो तसेच गुन्हा संशोधनाच्या निमित्त राज्य व देशभर प्रवास करावा लागतो. याकरीता दैनंदिन खर्च व किरकोळ स्वरुपाच्या खर्चाची आवश्यकता भासते. इतर विभागांमध्ये वित्तीय प्राधिकाराच्या शक्ती विविध अधिकारी स्तरावर प्रदान करण्यात आलेल्या आहेत तसेच त्या जास्तही आहेत. परंतु मोठ्या शहरातील पोलीस आयुक्तांना ज्या वित्तीय शक्ती प्रदान करण्यात आलेल्या आहेत त्या त्यांच्या कामाचा आढावा लक्षात घेता अतिशय कमी असून त्यांना दैनंदिन कामकाजात अडथळे येत असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली. त्यामुळे

गृह **विभागाने पोलीस अधिकाऱ्यांना वित्तीय अधिकार वाढवून देण्याबाबत व वित्तीय शक्तीचे कनिष्ठ स्तरावर प्रदान करण्याबाबत समिती अत्यंत आग्रही असून त्यादृष्टीने गृह विभागाने तातडीने कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

राज्याच्या ७२० किमी लांब असलेल्या सागरी किनाऱ्यावर गस्त घालण्यासाठी व त्याचे संरक्षण करण्यासाठी नवीन सागरी बोटींची खरेदी करण्यात आलेली आहे. या बोटी परदेशातून आयात करुन खरेदी केलेल्या असल्याने त्या अत्यंत अत्याधुनिक स्वरुपाच्या आहेत. एक-एक बोटींसाठी साधारणत: २० लिटर पेट्रोल दर दिवशी लागते. हा आवर्ती स्वरुपाचा खर्च आहे. परंतु आयुक्त दर्जापर्यंत वित्तीय शक्ती अतिशय कमी प्रदान केलेली असल्यामुळे या बोटींच्या पेट्रोल तसेच देखभाल व दुरुस्तीवर खर्च करणे शक्य होत नाही. देखभाल, दुरुस्ती करीता वार्षिक कंत्राट देखील निधी अभावी न केल्याने या बोटी आता पडून आहेत. त्यामुळे **ज्या विशिष्ट हेतूने त्यांची खरेदी करण्यात आलेली आहे तो हेतू सध्या होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे पोलीस दलामध्ये वापरात असलेल्या वाहनांच्या व बोटींच्या देखभाल व दुरुस्तीकरीता वार्षिक स्तरावर कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करावी व यामध्ये या वाहने/बोटींना दैनंदिन लागणाऱ्या पेट्रोल व डिझेल या इंधनाचा समावेश करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

पोलीस महासंचालक यांच्यामार्फत पोलीस विभागावर होणाऱ्या खर्चाचे नियोजन होत असते. या विभागाला अंदाजपत्रकातून मिळण्याची तरतूद पाहता सदर तरतूद ही अत्यंत नियोजनबद्धरित्या खर्च होणे आवश्यक आहे. समितीने अधिक माहिती घेतली असता **पोलीस विभागात वित्तीय सल्लागाराचे पद नसल्याचे समितीस निदर्शनास आल्याने समितीने आश्चर्य व्यक्त केले. विभागाचा व्याप पाहता व दलातील अधिकाऱ्यांकडील कामाचे स्वरुप पहाता त्यांच्या दलात स्वत:चा असा वित्तीय सल्लागार असणे ही अत्यंत दुर्मिळ बाब आहे. त्यामुळे महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयात स्वतंत्र वित्तीय सल्लागारांनी नियुक्ती करावी, अशी समितीस शिफारस करीत आहे.**

## महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभाग

**नैसर्गिक आपत्ती निधी :**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र. सी-६ नैसर्गिक आपत्ती मधील शीर्ष, २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अंतर्गत रूपये २,५१,५२,०४,००० इतका अधिक खर्च झाल्याप्रकरणी महालेखाकाराने आपल्या अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

### अनुदान क्र. सी-६ "नैसर्गिक आपत्ती"

**(रूपये हजारात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| २२४५ नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य | | | |
| **दत्तमत-** | | | |
| मूळ ३,८०,८३,०० | | | |
| | १७,५०,२१,०० | २०,०१,७३,०४ | (+) २,५१,५२,०४ |
| पूरक १३,६९,३८,०० | | | |
| वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २००७) | | १,१८,४९,६७ | |
| भारित- | | | |
| मूळ ७०,०० | | | |
| | ७०,०० | ११,९९ | (-) ५८,०१ |
| पूरक ---- | | | |
| वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २००७) | | ५८.०० | |

**टिपा व भाष्ये : -**

अनुदानातील रु. २५१५२.०४ लाख इतका अधिक खर्च (प्रत्यक्ष खर्च रु. २,५१,५२,५३६) नियमात बसविणे आवश्यक आहे. रु. २५१५२.०४ लाखांचा अधिक खर्च केलेला असून देखील मार्च २००७ मध्ये प्रत्यार्पित करण्यात आलेला रु. ११८४९.६७ लाखांचा निधी होता.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात मदत व पुर्नवसन विभागाने दिलेल्या

स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

या प्रधानलेखाशीर्षाखाली (दत्तमत) रुपये १७,५०,२१,००,०००/- इतके अनुदान मंजूर असल्याचे व रुपये ११८,४९,६७,१९०/- इतके अनुदान परत करण्यात आले असल्याचे नमूद आहे. तथापि, विभागाकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार. यामुळे नियंत्रक अधिकाऱ्यांना रुपये १६३१,७१,३२,८१०/- इतकी रक्कम उपलब्ध झाली. यापैकी रूपये २,०१,२०५१०/- इतकी रक्कम योजनांतर्गत (Plan) अन्वये देण्यात आली... वितरीत केलेल्या निधी पैकी रू. १,७७,४३,५४४ इतका निधी खर्च झाला..... रु. २३,८२,१९४ इतका निधी अखर्चित राहिला. रु. १६२९,३९,५५,०००/- इतकी रक्कम योजनेत्तर (Non Plan) अन्वये देण्यात आली. विभागाचा योजनेत्तर प्रत्यक्ष खर्च रुपये १६२१,९७,८३,६६७/- इतका झाला. यामुळे रुपये ७,४१,७१,४७६/- ची बचत झाली आहे. आपत्ती घटना न घडल्यामुळे काही बचत दिसून येते.

सदर शीर्षाखाली (भारित) (योजनेत्तर) रू. ७०,००,०००/- इतके अनुदान मंजूर केले होते. तथापि, रू. ५८,००,०००/- इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली. यामुळे नियंत्रक अधिकाऱ्यांना रु.१२,००,०००/- इतकी रक्कम उपलब्ध झाली. यापैकी ८०० (०२) संचालक व प्रशासन ५०-इतर खर्च (२२४५-०१२८) साठी रुपये ७७,०००/- तरतूद केली होती. तथापि, काहीही रक्कम खर्ची न पडल्याने सदर रकमेची बचत झाली. ताळमेळ घेतला आहे.

तसेच ८००-इतर खर्च (००) (०) (२२४५-०३४२) खाली विभागीय आयुक्त, औरंगाबाद व नागपूर यांचेसाठी रुपये ११,२३,०००/- ची तरतूद केली होती. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रूपये ११,२२,८५७/- इतका झाला यामुळे रुपये १४३/- ची बचत झाली. बचतीची रक्कम नगण्य आहे. ताळमेळ घेतला आहे.

**(रुपये हजारात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| ०२ पूर,चक्रवादळामुळे इ. | | | | |
| १०१ अनुग्रह सहाय्य | | | | |
| १०१ (०३) (०१) रोख बेकारी भत्ता | | | | |
| मूळ | ५,००.०० | | | |
| पूरक | ५५,५८.०० | ९६,८६.६८ | ९६,०३.४७ | - ८३.१८ |
| पुनर्विनियोजन | ३६,२८.६५ | | | |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात मदत व पुर्नवसन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी रु. ९६,८६,६५,०००/- इतकी तरतूद केली होती. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रूपये ९८,३३,२१,०८३/- इतका झाला. त्यामुळे रूपये १,४६,५६,०८३/- चा अधिक खर्च झाला आहे. नाशिक, अमरावती व पुणे विभागात आपत्ती घटना घडल्यामुळे जादा खर्च झाला.

**(रुपये हजारात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| ०२ पूर चक्रीवादळे इत्यादी<br>१०१ अनुग्रह सहाय्य<br>१०१ (०३) (०४) पुरामुळे नुकसान पोहोचलेल्या व्यक्तींच्या पुनवसनाकरिता रस्ते पाणीपुरवठा, शाळा, चावडी, विद्युतपुरवठा इ. नागरीसुविधांवरील खर्च<br>मूळ ५,००.००<br>पूरक १,११,३५.००<br>पुनर्विनियोजन ११,९२.१४ | १,२८,२७.१४ | १,२८,००.९७ | - २६.१७ |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात मदत व पुर्नवसन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी रू. १२८,२७,१४,०००/- इतके अनुदान उपलब्ध झाले. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रूपये १२३,२९,६४,५३६/- इतका झाला. यापैकी विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडील बचत रू.१.९५ कोटी तर विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडील बचत रू.२.३५ कोटी इतके आहे.

**साक्ष :**

समितीने ७ नोव्हेंबर, २०१२ रोजीवरील ज्ञापनांच्या संदर्भात कृषि, अन्न, नागरी पुरवठा, पाणीपुरवठा व स्वच्छता आणि महसूल व वन विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली त्यावेळी समितीने विभागीय सचिवांना लेखापरिक्षण परिच्छेदासंदर्भात खुलासा करावा, असे सांगितले असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, अनुदान क्रमांक सी-६ - २२४५ - नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सर्व विभागीय आयुक्तांना आणि सर्व जिल्हाधिकाऱ्यांना अनुदान देण्यात येते. समितीसमोर सन २००६-२००७ पर्यंत विनियोजन लेखे संदर्भातील माहिती पूर्ण करण्यात आली आहे. त्यानंतरचे विनियोजन लेखे संदर्भातील माहिती मंत्रालयाला लागलेल्या आगीत नष्ट झालेले आहेत. तरी देखील काही प्रकरणे विभागाने पडताळणी करुन घेतलेली आहेत. काही प्रकरणांमध्ये कमी अधिक खर्च झालेला आहे. आग लागल्यानंतर संबंधितांना मदत दिली जाते. पूरग्रस्तांना देखील मदत केली जाते. तसेच पुनर्वसनाकरिता देखील निधी ठेवला जातो. असे जवळजवळ ७-८ प्रकार असतील. जी व्यक्ती या प्रकारामध्ये सापडते त्यांना मदत करतो, असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, नैसर्गिक आपत्ती हा शीर्ष आहे. या शीर्ष अंतर्गत विविध बाबी येतात. पूरामुळे नुकसान पोहोचलेल्यांना घर बांधून देण्यासाठी देखील तरतूद आहे. समजा एखाद्या जिल्ह्यात किंवा ठिकाणी पूर आला नाही तर सदर रक्कम शिल्लक राहते. सदर रक्कम शिल्लक का राहिली आहे, असे मुद्दे काही ठिकाणी महालेखाकार यांनी काढले आहेत. दरवर्षी एकाच ठिकाणी पूर येतोच असे नाही. प्रत्येक वर्षीची नैसर्गिक आपत्ती ही वेगवेगळी असते. समितीने महालेखाकारचे म्हणणे ओव्हर रुल्ड केले याचे कारण असे की, यावर्षी मुंबईत पूर आला म्हणजे तो पुढच्या वर्षी येईलच असे नाही.

सन २००६-२००७ मध्ये गोदावरी नदीला मोठ्या प्रमाणावर पूर आला होता. या नैसर्गिक आपत्तीमुळे मोठे नुकसान झालेले आहे. यात अनेकांची घरे उद्ध्वस्त झाली. ज्या नागरिकांचे या पुरात नुकसान झाले त्यांच्यासाठी घरे बांधून देण्याचा प्रश्न शासकीय पातळीवर निर्माण झाला. माननीय मुख्यमंत्र्यापर्यंत सदर नस्ती गेली. पण त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. गोदावरी नदीचे पाणी पैठण, गंगापूर, वैजापूर येथील लोकांच्या घरात घुसले होते. परंतु, या लोकांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. बाधित लोकांना मदत मिळायला पाहिजे, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. विभागाकडून सर्व कार्यवाही करुन फाईल मान्यतेसाठी मा.मुख्यमंत्र्यांकडे जाते. या विषयाची फाईल मा.मुख्यमंत्र्यांकडे गेली होती. परंतु, त्यास मान्यता मिळाली नाही. यात ज्या लोकांचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई का देण्यात आली नाही? अंदाजपत्रकामध्ये निधीची तरतूद असून देखील ज्या लोकांचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई देण्यास शासकीय

प्रक्रियेमध्ये विलंब लागत आहे व त्यामुळे निधी देखील शिल्लक राहतो. त्यामुळे बाधित व्यक्तींना निधी मिळण्यासंबंधातील शिफारस समिती करेल. ज्या वर्षी नैसर्गिक आपत्ती येईल त्या-त्या वर्षी निधी खर्च होण्याकरिता देखील शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. अशा प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखला पाहिजे. तसेच मराठवाडा विभागातील काही भागांमध्ये ज्यावेळी पूर आला होता त्यावेळी पुनर्वसन करायचे असा देखील मुद्दा आला होता. पण नंतर कोणतीही कार्यवाही झाली नाही, असे समितीने सुचविले. यासंदर्भात अधिक माहिती देताना विभागीय सचिवांनी अधिक माहिती दिली की, सदर प्रकरण पडताळून पहावे लागेल. राज्य आपत्ती व्यवस्थापनासाठी केंद्र शासनाकडून ७५ टक्के आणि राज्य शासनाकडून २५ टक्के निधी मिळतो. या वर्षी रु. ४६८ कोटी इतका निधी आला आहे. प्रत्यक्ष खर्च रु. ३०००.०० कोटीच्या वर गेला आहे. अशी परिस्थिती प्रत्येक वेळी असते. सन २००६ मध्ये एकूण अंदाज रु. २६०० कोटी रुपयांचा होता. त्यामुळे यासंबंधी धोरणात्मक निर्णय घेतला तर काही तरी करता येऊ शकेल. आपत्ती निवारण संदर्भातील प्रकरणात मदत करतांना ४५० कोटी रुपयांची आवश्यकता असताना २०० कोटी रुपये मिळाल्यामुळे काही प्रकरणे मा.मुख्यमंत्री स्तरावर प्रलंबित राहिले असे विभागाला म्हणावयाचे आहे काय? नैसर्गिक आपत्तीच्या वेळी लाभार्थ्यांना पैसा मिळाला असता तर लोकप्रतिनिधींनी तक्रार केली नसती. नैसर्गिक आपत्तीची प्रकरणे प्रलंबित कशी राहिली आहेत, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, २२४५ शीर्षानुसार नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी सहाय्य करण्यात येते. त्यानुसार सहाय्य करण्यात आले आहे. नैसर्गिक आपत्तीबाबत सविस्तर माहिती द्यावी असे समितीने सांगितले. परंतु अद्याप माहिती अप्राप्त आहे.

याच संदर्भात महालेखाकार यांनी असेही समितीस सांगितले की, यह अकाउंट्स का मामला है. डिपार्टमेंट ने जो फीगर्स पहले दी थीं, वे फीगर्स कुछ अलग थीं. रिपोर्ट तैयार करने से पहले भी डिपार्टमेंट को पत्र लिखते हैं की यदि आपको अपनी फीगर्स में कुछ सुधार करना है तो विभाग कर सकते है. लेकिन डिपार्टमेंट ने नयी फीगर्स नहीं भेजी है. इस पर्टिकुलर वर्ष के बारे में बताया की, सिर्फ ४२ परसेंट रेकन्सिलिएशन ही अभी तक हो पाया है. ५८ परसेंट रिकन्सिलिएशन होना अभी बाकी है. रिकन्सिलिएशन न हो पाने की वजह से ही समिति में इतने प्रश्न पूछे जा रहे हैं.

इसलिए डिपार्टमेंटने एक एम.ओ.ई. तैयार कर के हालांकि वह एम.ओ.ई. अब मान्य तो नहीं हो सकता लेकिन कम से कम यह तो पता चलेगा कि कहां पर क्या गलती हुई है. हमें पता चलेगा कि कहां पर ज्यादा खर्च हुआ है और कहां पर सेविंग हुई है. गलती का यदि पता चल जाए तो मा.समिति उन फीगर्स को मान्य कर सकती है, असे महालेखापालांनी आपले अभिप्राय नोंदविले. महालेखाकार

यांनी सांगितल्याप्रमाणे सन २००७-२००८ पर्यंत खर्चमेळ करण्याचे काम झाले आहे. यापुढील किती वर्षाचे खर्चमेळ करण्याचे काम बाकी आहे, असे समितीने विचारले. यावर सचिवांनी अशी माहिती दिली की, २००७-२००८ पर्यंत विभागाने खर्चमेळ करण्याचे काम पूर्ण केले आहे. त्यापुढील वर्षाचे खर्चमळ करण्याचे काम ८० टक्के कामे झाली आहे. जी कामे अपूर्ण आहेत ती लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील. सन २००६ का पट खर्चमेळ करण्याचे काम होना बाकी है और सन २०११-१२ का ३५ परसेंट खर्चमेळाचे काम होना अभी बाकी है, असे महालेखापालांनी सांगितले. आता नव्याने खर्चमेळ करण्याचे काम करण्यात येत आहे, असे विभागाने समितीला सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**सचिवांनी समितीला साक्षीच्या वेळी दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, महसूल व वन विभागाच्या नैसर्गिक आपत्ती या शीर्षा अंतर्गत विविध बाबी येतात. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या व्यक्तींना तातडीने नुकसान भरपाई देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्यामुळे या बाधित व्यक्तींना योग्य वेळी व अल्पावधीत शासनाची मदत मिळण्यासाठी शासन पातळीवर त्वरित निर्णय घेण्यात यावेत व अशा प्रकरणी कोणती कार्यवाही करणे अपेक्षित आहे. याबाबत निश्चित अशा मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात यावीत, जेणेकरुन नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी करण्यात आलेली तरतूद ही अखर्चित न राहता त्याचा योग्य विनियोग करण्यात येईल, अशी समितीची शिफारस आहे.**

**सन २००६-२००७ मध्ये गोदावरी नदीला मोठ्या प्रमाणावर पूर आला होता. या नैसर्गिक आपत्तीमुळे मोठे नुकसान झालेले आहे. यात अनेकांची घरे उद्ध्वस्त झाली. ज्या नागरिकांचे या पुरात नुकसान झाले त्यांच्यासाठी घरे बांधून देण्याचा प्रश्न शासकीय पातळीवर निर्माण झाला. पण त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. गोदावरी नदीचे पाणी पैठण, गंगापूर, वैजापूर येथील लोकांच्या घरात घुसले होते. परंतु, या लोकांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. त्यामुळे पैठण, गंगापूर व वैजापूर येथील पूरबाधित व्यक्तींना तातडीने मदत कशी मिळेल याबाबत कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## महसूल व वन (वने) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करत असताना अनुदान क्र. सी-७ मधील प्रधान लेखा शिर्ष २४०६ "वनीकरण व वन्यजीवन" व प्रधान शिर्ष २४१५ "कृषि संशोधन व शिक्षण" या शिर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

### अनुदान क्र. सी -७

**(रुपये हजारात)**

| **प्रधानशीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च रुपये** | **अधिक खर्च (+) बचत (-) रुपये** |
|---|---|---|---|---|
| **२४०६- वनकरण व वन्यजीवन**<br>**२४१५- कृषी संशोधन व शिक्षण**<br>दत्तमत-- | | | | |
| मूळ | ३,३७,२८.६७ | | | |
| | | ४,०७,१२,८८ | ३,६५,८८,९६ | (-) ४१,२३,९२ |
| पूरक | ६९,८४.२१ | | | |
| वर्षभरात परत केलेली रक्कम | (मार्च, २००७) | | | ५६,७५,५९ |

**ज्ञापन**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात महसूल व वन (वने) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी मूळ रुपये ३,३७,२८,६७,०००/- इतके अनुदान मंजूर केले होते. तसेच पुरक अनुदान रु.६९,८४,२१,०००/- प्राप्त झाल्याने नियंत्रक अधिका-यांना एकून अनुदान रु. ४,०७,१२,८८,०००/- प्राप्त झाले. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये ३,६५,८८,९६,०००/- इतका झाला. यामुळे रुपये ४१,२३,९२,०००/- ची बचत झाली आहे. प्रत्यक्ष खर्च व महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात तफावत असल्याने चुक नोंद दुरुस्त प्रस्ताव पाठविला आहे. बचतीची कारणे उपशिर्षनिहाय दिलेली आहेत. ताळमेळ घेतला आहे.

| शीर्ष | | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च रुपये | रुपये हजारात अधिक खर्च (+) बचत (-) रुपये |
|---|---|---|---|---|
| **भारित** | | | | |
| मूळ-- | ५० | | | |
| | | १,२०,५६ | १,२८,९३ | (+) ८,३७ |
| पूरक-- | १,२०,०६ | | | |
| वर्षभरात परत | | | | ५० |
| करण्यात आलेली रक्कम | (मार्च, २००७) | | | |

वर दर्शविल्या दत्तमत खर्चामध्ये आकस्मिकता निधितून काढण्यात आलेल्या आगाऊ रकमेतून भागविलेल्या रुपये ३,१६.७९ हजार एवढया रकमेचा समावेश केलेला नाही. पण या वर्षाअखेरपर्यंत निधीमध्ये भरपाई करण्यात आलेली नाही.

टीपा व भाष्ये :-

१. अनुदानाखालील रुपये ४१,२३.९२ लाखांची बचत विचारात घेता, या वर्षात करण्यात आलेली रुपये ६९,८४.२१ लाखांची पूरक तरतूद (डिसेंबर २००६ मध्ये रुपये ४७,२८.८१ लाख आणि मार्च २००७ मध्ये रुपये २२,५५.४० लाख) अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.

२. रुपये ४१,२३.९२ लाखांच्या प्रत्यक्ष बचतीनुसार रुपये ५६,७५.५९ लाखांचा निधी प्रत्यर्पित केल्याने उपलब्ध निधिच्या तुलनेत अनुदानाखाली रुपये १५,५१.६७ लाख अधिक खर्च झाला.

३. अनुदानातील बचत पुढील शीर्षाखाली झाली :-

**ज्ञापन**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात महसूल व वन (वने) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी मूळ रुपये ५०,०००/- ची तरतूद केली होती. पुरक अनुदान रुपये १,२०,०६,०००/- इतके प्राप्त झाल्याने नियंत्रक अधिका-यांना रुपये १,२०,५६,०००/- इतके अनुदान प्राप्त झाले. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये १,२८,९३,०००/- इतका झाला आहे. त्यामुळे रुपये ८,३७,०००/- चा अधिक खर्च झाला आहे. विभागाच्या माहितीनुसार प्रत्यक्ष खर्च रुपये १,२०,०६,०००/- इतका झ ालेला आहे. त्यामुळे रुपये ११,३७/- इतकी बचत झालेली आहे. याबाबतचा चुक नोंद दुरुस्ती प्रस्ताव सादर केला आहे. ताळमेळ घेतला आहे.

| शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये लाखात<br>अधिक खर्च (+)<br>बचत (-) |
|---|---|---|---|---|
| **२४०६ वनीकरण व वन्यजीवन** | | | | |
| ०१ वनीकरण | | | | |
| १०१ वन संधारण व विकास | | | | |
| (०७) (०१) व (११) (०७) वनेत्तर वापरासाठी उपयोगात आणण्याकरिता प्रस्तावित केलेल्या वन जमिनीच्या जागी पूरक वनरोपण | | | | |
| मूळ | ८,८०.३३ | | | |
| | | ८,७९.८९ | ८,२७.९३ | (-) ५१.९६ |
| पुनर्विनियोजन | (-)०.४४ | | | |

**ज्ञापन**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात महसूल व वन (वने) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी मूळ रुपये ८,८०,३३,०००/- इतके अनुदान मंजूर केले होते. तथापि, पुनर्विनियोजनाने रुपये ४४,०००/- इतके अनुदान प्रत्यार्पित केले. यामुळे नियंत्रक अधिका-यांना रु. ८,७९,८९,०००/- इतके अनुदान उपलब्ध झाले. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.८,७१,२९,८४५/- इतका झाला. यामुळे रुपये ८,५९,१५५/- ची बचत झाली आहे. अंतिम सुधारित मंजूर अनुदानाच्या तुलनेतझ ालेली बचत १ % पेक्षा कमी असल्याने क्षमापित करण्यात यावेत. चुक नोंद दुरुस्ती प्रस्ताव सादर केला आहे. ताळमेळ घेतला आहे.

| शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये लाखात<br>अधिक खर्च (+)<br>बचत (-) |
|---|---|---|---|---|
| **०१ वनीकरण** | | | | |
| १०१ (११) वन संधारण व विकास | | | | |
| पंचवार्षिक योजनांतर्गतयोजना | | | | |
| (११) (१०) ग्राम पर्यावरण विकास जनजाती विकास | | | | |
| मूळ | ८,०५.०० | | | |
| पूरक | ५३.८२ | ८,४९.६४ | ८,४५.५५ | (-) ४.०९ |
| पुनर्विनियोजन | (-)९.१८ | | | |

**ज्ञापन**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात महसूल व वन (वने) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी मूळ रुपये ८,४९,६४,०००/- इतके अनुदान मंजूर केले होते. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये ८,४५,५५,३७६/- इतका झाला. यामुळे रुपये ४,०८,६२४/- इतकी बचत झाली आहे. अंतिम सुधारित मंजूर अनुदानाच्या तुलनेत झालेली बचत १ % पेक्षा कमी असल्याने क्षमापित करण्यात यावेत. ताळमेळ घेतला आहे.

**रुपये लाखात**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च रुपये** | **अधिक खर्च (+) बचत (-) रुपये** |
|---|---|---|---|
| **२४०६ वनीकरण व वन्यजीवन** | | | |
| ०१ वनीकरण | | | |
| १०१ वन संधारण व विकास | | | |
| (१२) (०१) वन मजुरांच्या अधिसंख्य पदांची निर्मिती | | | |
| मूळ ... ५४,२७.२५ | | | |
| | ४९,९२.८३ | ४६,५७.९९ | (-) ३,३४.८४ |
| पुनर्विनियोजन ... (-) ४,३४.४२ | | | |

**ज्ञापन**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात महसूल व वन (वने) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी मूळ रुपये ४९,९२,८३,०००/- इतकी तरतूद मंजूर केली होती. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये ४४,३३,६६,३०१/- इतका झाला. यामुळे रुपये ५,५९,१६,६९९/- इतकी बचत झाली आहे. सेवानिवृत्ती, पदोन्नती / निधन या कारणामुळे एकुन २५० पदे कमी झालो. तसेच सन २००६ या वर्षात एकुन ६९८३ इतक्या वन मजूरांची अधिसंख्य पदे असल्याने तेवढयाच पदावर खर्च करण्यात असल्यामुळे उपरोक्त बचत झाली आहे. चुक दुरुस्ती प्रस्ताव सादर केला आहे. ताळमेळ घेतला आहे.

**रूपये लाखात**

| **शीर्ष** | **एकूण क्रमांक** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| **०१ वर्गीकरण** | | | |
| ०७० दळणवळण व इमारती | | | |
| (००) (०१) रस्ते व पूल यांची दुरुस्ती | | | |
| मूळ .... १,९५.५० | | | |
| | १,४२.८२ | १,४६.४९ | (+) ३.६७ |

पुनर्विपियोजन ... (-)५२.६८

**ज्ञापन**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात महसूल व वन (वने) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी मूळ रुपये १,९५,५०,०००/- इतके अनुदान मंजूर केले होते. तथापि, पुनर्विनियोजनाने रुपये ५२.६८,०००/- इतके अनुदान प्रत्यापित केले. यामुळे नियंत्रक अध्कि-यांना रुपये १,४२,८२,०००/- इतके अनुदान करुन उपलब्ध झाले. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये १,४४,२३,५८०/- इतका झाला. यामुळे रुपये १,४१,५८०/- इतका अधिक खर्च झाला आहे. चुक नोंद दुरुस्ती प्रस्ताव सादर केला आहे. ताळमेळ घेतला आहे.

| शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये लाखात<br>अधिक खर्च (+)<br>बचत (-) |
|---|---|---|---|---|
| **०१ वनीकरण** | | | | |
| १०१ वन संधारण व विकास | | | | |
| १०१ (०१) प्रशासन व संरक्षण | | | | |
| ०१ (०१) प्रशासन व संरक्षण | | | | |
| मूळ | १,०२,२०.२६ | | | |
| पूरक --- | ४१,७९.१३ | १,२१,९९.१८ | १,३१,७९.६५ | (+) ९,८०.४७ |
| पुनर्विनियोजन | (-) २२,००.२१ | | | |

**ज्ञापन**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात महसूल व वन (वने) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी मूळ रुपये १,०२,२०,२६,०००/- इतके अनुदान मंजूर केले होते. तथापि, पुनर्विनियोजनाने व अंतिम सुधारित अनुदानाने रुपये १,२१,९९,१८,०००/- इतके अनुदान नियंत्रक अधिका-यांना उनलब्ध झाले. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये १,३८,१५,८०,५४३/- इतका झाला. यामुळे रुपये १६,१७,०७,५४३/- चा अधिक खर्च झाला आहे. अंतिम सुधारित मंजूर अनुदानाच्या तुलनेत खर्च विभागाने केला असल्याने अभिप्राय नाहीत. सदर खर्चात महालेखापाल यांचे स्तरावरील नसलेला खर्च समाविष्ट असल्याने अधिकचा खर्च झालेला आहे. चुक नोंद दुरुस्ती प्रस्ताव सादर केला आहे. ताळमेळ घेतला आहे.

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रूपये लाखात<br>अधिक खर्च (+) |
|---|---|---|---|

| | | | बचत (-) |
|---|---|---|---|
| **०१ वनीकरण**<br>१०१ वन संधारण व विकास<br>(०४) (०१) कार्यकारी योजनेची पुनरीक्षण व योजना तयार करणे<br>मूळ --- ५,६०.६० | | | |
| पूरक १,८५.५२ | ६,२२५.१६ | ६,३१.९८ | (+) ९.८२ |
| पुनर्विनियोजन --- (-) १,२३.९६ | | | |

**ज्ञापन**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात महसूल व वन (वने) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी मूळ रुपये ५,६०,६०,०००/- इतके अनुदान मंजूर केले होते. तथापि, पुनर्विनियोजनाने व अंतिम सुधारित अनुदानाने रुपये ६,२२,१६,०००/- इतके अनुदान नियंत्रक अधिका-यांना उपलब्ध झाले. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये ६,३५,२३,७७०/- इतका झाला. यामुळे रुपये १३,०७,७७०/- चा अधिक खर्च झाला आहे. अनुदानाच्या तुलनेत झालेला अधिकचा खर्च अत्यल्प आहे. चुक नोंद दुरुस्ती प्रस्ताव सादर केला आहे. ताळमेळ घेतला आहे.

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खच | रुपये लाखात<br>अधिक खर्च (+)<br>बचत (-) |
|---|---|---|---|
| **०१ वनीकरण**<br>१०२ सामाजिक व क्षेत्र वनीकरण<br>(०४) (०१) नेहमीच्या वापरातील इमारती लाकंडांची झाडे लावणे<br>मूळ ---- ५१.८९ | | | |
| | ३९.२१ | ३९.५९ | (+) ०.३८ |
| पुनर्विनियोजन --- १२.६८ | | | |

**ज्ञापन**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात महसूल व वन (वने) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी मूळ रुपये ५१,८९,०००/- इतके अनुदान मंजूर केले होते. तथापि, पुनर्विनियोजनाने व अंतिम सुधारित अनुदानाने रुपये ३९,२१,०००/- इतके अनुदान नियंत्रक अधिकाऱ्यांना उपलब्ध झाले. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये ३९,५१,१९८/- इतका झाला. यामुळे रुपये ३०,१९८/- चा

अधिक खर्च झाला आहे. अनुदानाच्या तुलनेत झालेला अधिकचा खर्च अत्यल्प आहे. चुक नोंद दुरुस्ती प्रस्ताव सादर केला आहे. ताळमेळ घेतला आहे.

| शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये लाखात अधिक (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| **०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन** | | | | |
| ११०वन्यजीवन | | | | |
| (००) (०१) निसर्ग संवर्धन व पशू संरक्षण | | | | |
| (००) (०२) निसर्ग संरक्षण व वन्यजीवन व्यवस्थापन (वन्य पशू व निसर्ग संरक्षण योजना) | | | | |
| मूळ ---- | १६,५३.०४ | | | |
| पूरक --- | १,९३.५३ | १६,२२.३६ | १७,८९.०३ | (+) १,६६.६७ |
| पुनर्विनियोजन --- | (-)२,२४.२१ | | | |

कोणतीही कारणे न देता, मार्च २००७ मध्ये प्रत्यर्पणाव्दारे / पुनर्विनियोजनाव्दारे वरील उपशीर्षाखाली काढण्यात आलेला रुपये ११७३.२२ लाख इतका अधिक खर्च विचारात घेता, अत्याधिक असल्याचे सिध्द झाले. रुपये २९.३७.६० काढण्यात आलेला रुपये ११,७३.२२ लाख इतक्या अतिंम अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात महसूल व वन (वने) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी मूळ रुपये १६,५३,०४,०००/- इतके अनुदान मंजूर केले होते. तथापि, पुनर्विनियोजनाने व अंतिम सुधारित अनुदानाने रुपये १६,२२,३६,०००/- इतके अनुदान नियंत्रक अधिकाऱ्यांना उपलब्ध झाले. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये १६,१२,७५,१२७/- इतका झाला. यामुळे रुपये ९,६०,८७३/- इतकी बचत झाली आहे. चुक नोंद दुरुस्ती प्रस्ताव सादर केला आहे. ताळमेळ घेतला आहे.

| शीर्ष | | एकून अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये लाखात अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| **२४०६ वनीकरण व वन्यजीवन** | | | | |
| ०१ वनीकरण | | | | |
| १०१ (०२) पुनर्निर्मिती | | | | |
| (०२) (०१) नैसर्गिक पुनर्निर्मिती व | | | | |
| (०२) (०२) कृत्रिम पुनर्निर्मिती | | | | |
| मूळ --- | १०,४३.७२ | | | |
| पूरक | ३,६४.८८ | २५,३८.३३ | २४,८६.२२ | (-) ५२.११ |
| पुनर्विनियोजन ... | (+)११,२९.७३ | | | |

**ज्ञापन**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात महसूल व वन (वने) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर शीर्षासाठी मूळ रुपये १०,४३,७२,०००/- इतके अनुदान मंजूर केले होते. पुनर्विनियोजनानें सुधारित अनुदानाने रुपये १४,९४,६१,०००/- इतके अनुदान प्राप्त झाल्यामुळे नियंत्रक अधिकाऱ्यांना रुपये २५,३८,३३,०००/- उपलब्ध झाले. विभागाचा प्रत्यक्ष खर्च २४,९३,६४,६५८/- इतका झाला. त्यामुळे रुपये ४४,६८,३४२/- ची बचत झालेली आहे. २% पेंक्षा कमी बचत असल्याने अभिप्राय नाहीत. चुक नोंद प्रस्ताव सादर केला आहे. ताळमेळ घेतला आहे.

**साक्ष :**

दिनांक ६ मार्च, २०१२ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी समितीने महालेखापरिक्षकांनी उपरोक्त परिच्छेदामध्ये दिलेल्या अभिप्रायांबाबत सन २००६-२००७ मध्ये खर्चमेळ करण्यासाठी वन विभागाला विलंब का झालेला आहे. याबाबत विचारणा केली असता विभागीय सचिवांनी महालेखापाल कार्यालयासोबत खर्चमेळ केलेले आहे. खर्चमेळ वर्षाच्या शेवटी न करता दर तीन महिन्यानी करण्याची पध्दत सुरु केलेली आहे. यापूर्वी खर्चमेळाचे काम वेळेत झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. वेतनावर बचत झालेली आहे. महालेखापालांच्या आकडेवारीमध्ये फरक होता म्हणून वन विभागामार्फत चुकीचा दुरूस्तीचा प्रस्ताव देण्यात आला होता. महालेखापाल कार्यालयाच्या म्हणण्यानुसार सदरहू लेखाशीर्ष आदिवासी विकास विभागाशी संबंधित असल्यामुळे या प्रस्तावास आदिवासी विकास विभागाची मान्यता हवी होती. त्यानुसार आदिवासी विकास विभागाने मान्यता दिलेली आहे.

वेतनात बचत झालेली आहे आणि हाच मुख्य आक्षेप आहे. यामध्ये बरीच पदे वनमजूरांची होती. पदाच्या संदर्भात शासनाने नियम केलेले आहेत. या पदांमध्ये मयत झालेले, पदोन्नती झालेले, निवृत्त झालेली पदे भरली जात नाहीत. परिगणना करताना या पदांचे पगार सरसकट धरले गेल्यामुळे ही बचत दिसून येते. कामामध्ये कोणाचाही अपघात होऊ शकतो, पदोन्नती होऊ शकते, काही लोक नोकरी सोडून दुसरीकडे गेल्यामुळे पदे रिक्त होतात व अशी पदे भरली जात नसल्याने बचत झालेली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

या संदर्भात समितीने अर्थसंकल्प तयार करण्याचे नियोजन असते यासाठी विभागाकडे कर्मचारी आहे, त्यामुळे अर्थसंकल्पची आकडेवारी कोणताही अंदाज न घेता काम केले तर प्रश्न निर्माण होतील. बचत होणे ही चांगली बाब नाही. एक वेळ खर्च अधिक झाला तरी ठीक आहे. अग्रीम घ्यायचा व ते

खर्च करावयाचे नाही हे काही योग्य नाही. वन विभागाला आर्थिक शिस्त दिसून येत नाही ही वस्तुस्थिती आहे. बचत करणारे व खर्च करणारे यांचे त्यावर नियंत्रण आवश्यक आहे. गरज नसतांना आपण पैशांची मागणी केली व ते पैसे विभागाने खर्च केले नाही तर ते योग्य नाही. विभागाने जी बचत केलेली आहे त्या ऐवजी ज्या विभागाला पैशांची गरज होती त्या विभागाला पैसे मिळाले असते तर ते त्यांनी त्या पैशाचा उपयोग चांगल्या प्रकारे केला असता. समितीने जर विभागाला हिशोब विचारला नाही तर विभागाला हिशोब कोणीच विचारणार नाही. वन खात्यामध्ये अनागोंदी असून पदाचा अभ्यास न करता पैशांची मागणी केली जाते. अधिकचे पैसे मागवावयाचे व ते पैसे दुस-याच कामासाठी खर्च करावयाचे असे प्रकार हल्ली सर्रास होतांना दिसत आहेत. पैसे शिल्लक राहिले की, अनावश्यक खर्च केला जातो. खरे म्हणजे पैसे बचत ठेवण्याची सवय झालेली आहे. विभागातील अशा संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केली पाहिजे. वन विभागाच्या कामाचे नियोजन कमी पडते असा त्याचा अर्थ निघतो. अशा शब्दात समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली. त्यावर या आक्षेपामुळे वन विभागाला धडा मिळालेला आहे. या पुढील काळात अशा प्रकारचा आक्षेप येणार नाही याची काळजी घेतली जाईल. याची ग्वाही देण्यात आली. तसेच पदांचा ताळमेळ घातला जाईल. या वर्षी पद भरतीवर मोठया प्रमाणात बंदी होती. परंतु आम्ही वित्त विभागाशी चर्चा करुन काही पदावरील बंदी उठवली. त्यामुळे मागील चुकीची दक्षता विभागाने विद्यमान वर्षी घेतलेली आहे.

विभागाने विहित कालावधीत चुकीच्या नोंदीचा दुरूस्ती प्रस्ताव देणे आवश्यक होते. वन विभागाचे कर्मचारी दक्षतेने काम करीत नसतील तर संबंधित कर्मचा-यांच्या गोपनीय अहवालात तशा प्रकारची नोंद करणे, त्यांची वेतनवाढ रोखणे अशा प्रकारची कारवाई करावी असे समितीने विभागाला सूचविले. या प्रकरणामध्ये जी चूक झालेली आहे त्यांसदर्भात विभागाने संबंधितांना जाणीव करुन त्यांच्या संदर्भात दखल घेण्यात यावी त्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी असे समितीने विभागीय सचिवांना सांगितले. यावर विभागीय सचिवांनी योग्य कारवाई करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले. अद्याप विभागाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

विभागाच्या प्रलंबित आक्षेपाबाबत व खर्चमेळाचे काम विहित मुदतीत न करण्यासंदर्भात महालेखापालांनी अधिक माहिती देताना सांगितले की, महालेखाकार की ओर से रिकंसीलेशन के लिए मंथली समय दिया जाता है, क्वार्टरली समय दिया जाता है और साल के अंत में अप्रैल-मई-जून में समय दिया जाता है एवं डिपार्टमेंटवाईज टाईम भी फिक्स किया जाता है. अगर डिपार्टमेंट के लिए दो दिन फिक्स किये थे तो उन दो दिनों में डिपार्टमेंट की ओर से किसी न किसी को तो आना चाहिए. इसमें बाद में नोट ऑफ एरर सब्मिट किया गया है. आदिवासी विभाग की कन्सेंट वर्ष २०१० में आयी

है. आदिवासी विभाग की ओर से जो पत्र लिखा गया है वह उपसचिव (पीएसी) को एड्रेस किया गया है और उसके नीचे महसूल व वन विभाग लिखा गया है. यह पत्र पी.ए.सी. को एड्रेस किया है या वन विभाग को एड्रेस किया है ? इसके साथ ही इसमें खर्च की गई रकम आदि के डिटेल का भी उल्लेख नहीं किया गया है. ए.जी. की ओर से जब डिपार्टमेंट के लिए टाईम फिक्स किया गया था तभी ये सारे डिटेल दे दिये जाते तो नोट ऑफ एरर का मामला वहीं खत्म हो जाता, ऐसा न करने के कारण इसमें काफी डिले हो गया. यह मामला वर्ष २००६-०७ का है और अब २०१२ में हम इस पर चर्चा कर रहे हैं. महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास सदर बाब आणली असता. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र समितीच्या निदर्शनास आणण्यात आले. या पत्रामध्ये "महिनानिहाय/विभागनिहाय माहिती राज्य स्तरावर संकलित केली जात नाही व तसे करणे वेळ व कर्मचा-यांची उपलब्धता विचारात घेता अशक्यप्रायच नव्हे तर अव्यवहार्य देखील आहे. त्यामुळे महालेखापालांनी मागविलेली माहिती उपलब्ध करणे शक्य नाही". अशा प्रकारे अत्यंत गंभीर विधाने केल्याचे समितीसमोर आले, त्यामुळे या विषयी कारवाई करण्याची मागणी समितीमध्ये करण्यात आली. समितीने तीव्र शब्दात केलेली नापसंती विचारात घेवून तसेच समितीचे महत्व विचारात घेता, विभागीय सचिवांनी दिलगीरी व्यक्त केली व सदर पत्र पुन्हा घेण्यात येत आहे असे समितीस सांगितले. या विषयाच्या संदर्भात महालेखाकारांना माफीचे पत्र पाठविण्यात यावे अन्यथा समितीला संबंधितांवर कारवाई करावी लागेल, असे समितीने सांगितले. यावर महालेखाकारांना माफीचे पत्र पाठविण्यात येईल, असे विभागाच्या प्रधान सचिवांनी समितीस सांगितले.परंतु याप्रकरणी पत्र पाठविण्याची माहिती अद्याप विभागाकडून प्राप्त झाली नाही.

महालेखापालांनी घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने, वन विभागाचे एकूण अंदाजपत्रकाबाबत माहिती देताना रक्कम वन विभागाला दिली पाहिजे, असे समितीने मत मांडले असता यावर वन विभागाच्या प्रधान सचिवांनी खुलासा करताना, वन विभागाला एकूण बजेटच्या तुलनेमध्ये ०.५ वा ०.७ टक्के इतकाच नियतव्यय मिळतो. यावर समितीने राष्ट्रीय वन आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार विभागाला २.५ टक्के इतकी रक्कम मिळाली पाहिजे असा आग्रही मुद्दा उपस्थित केला. या अनुषंगाने शासनाकडून विभागाला एकूण बजेटच्या ०.८९ टक्के रक्कम देण्यात आली होती. यावर्षी अशी मागणी केली की, २०१२-२०१३ च्या बजेटमध्ये दीड टक्क्यापर्यंत निधी द्यावा आणि प्रामुख्याने यादृष्टीने योजनाही सादर केलेल्या आहेत. धडक वनीकरणाअंतर्गत १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट साध्य करावयाचे आहे.निकृष्ट दर्जाच्या वनांसाठी संयुक्त व्यवस्थापन समिती तसेच गावातील लोकांचा सहभाग असणे आवश्यक

आहे.ज्याठिकाणी अभयारण्य आहे, वन्य प्राणी आहेत तेथील लोकांना त्याचा त्रास होत असतो. अशा वेळी त्या भागातील जी शेती आहे, त्याचे देखील चांगल्याप्रकारे नियोजन करावयाचे आहे.

यावर्षी १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे. परंतु ही योजना प्रत्यक्षात अंमलात आली पाहिजे आणि सदरहू योजनेची समितीला माहिती सादर करण्यात यावी, असे निदेश समितीने दिले.

१०० कोटी झाडे लावण्यासाठी किती बजेट आहे, याकरीता लागणाऱ्या पायाभूत सुविधा कशा आहेत. १०० कोटी झाडे लावण्यासाठी त्याची रोपे मार्केटमध्ये किंवा सरकारी रोपवाटिकेमध्ये उपलब्ध होणार काय अशी माहिती समितीने विचारली असता विभागाने असा खुलासा केला की, समितीने उपस्थित केलेले सर्व मुद्दे अतिशय महत्वाचे असून त्यानुसार सदरहू योजना सुधारण्याच्या दृष्टीने मदत होईल. मागच्या वर्षी महाराष्ट्र राज्यात फक्त १३ कोटी झाडे लावण्यात आली होती. आता याबाबतीत मोठी झेप घेण्यात येणार असून १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट साध्य करावयाचे आहे आणि यासाठी दोन वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार उल्लेख केल्याप्रमाणे गेल्या वर्षी १३ कोटी झाडे, यावर्षी ५० कोटी आणि बाकीची झाडे पुढील वर्षी लावण्यात येणार आहेत.यासाठी कडक निकष लावण्यात आले असून जिल्हानिहाय आणि विभाग निहाय उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.त्याठिकाणी ३५ से.मी. पेक्षा कमी ऊंची असलेली रोपे लावावयाची नाहीत. फक्त साग किंवा फेन्सिंग एरिया असेल तेथे छोटी-छोटी झाडे लावावीत परंतु सार्वजनिक जमिनीवर ३५ से.मी. पेक्षा कमी ऊंची असलेली रोपे लावण्यात येणार नाही. यासाठी जमीन खोदण्याची कामे सुरु झालेली असून ३० एप्रिल नंतर कोणत्याही खड्डयावरील खर्च अनुज्ञेय रहाणार नाही. जर ही कामे एप्रिलपर्यंत पूर्ण झाली तर मे महिन्यामध्ये तेथे झाडे लावता येतील आणि यामध्ये वड, उंबर, जांभूळ, आवळा इत्यादीचा समावेश आहे.

१०० कोटी वृक्ष लागवडीबाबतीत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली असून सदरहू उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने अगोदरच ५० कोटी रुपयांची ७५ टक्के रोपे लावण्याच्या दृष्टीने तयारी झालेली आहे. राजस्थान व छत्तीसगढ सारख्या राज्यांमध्ये वृक्ष लागवडीचे काम राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनामार्फत करीत असून त्यांना केंद्र शासनाकडून चांगल्या प्रकारे निधी उपलब्ध होत आहे. परंतु महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत अशी स्थिती नाही. पूर्वी आपल्या राज्यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनामध्ये पाझर तलाव, रस्ते इ. कामे होत होती. आता राज्यामध्ये वृक्ष लागवडीचे काम देखील राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमार्फत करण्याचे ठरविले आहे. १०० टक्के नर्सरी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून सुरु केल्या. तसेच ऑक्टोबरमध्ये शासन निर्णय काढण्यात आला

होता. नोव्हेंबर-डिसेंबर आणि जानेवारी या महिन्यामध्ये कोणत्याही रोपवाटिकेतील झाडे जगतात. जूनमध्ये तसे करता येत नाही. ही झाडे १२ किंवा १५ महिन्याची झाली असतील तरच त्यांचा पुढच्या जून महिन्यामध्ये लावण्यासाठी वापर करता येईल. कारण केवळ झ ाडे लावून ती लगेच जगणार नाहीत. यासाठी त्यांची लागवड जुलै महिन्यामध्ये व्हावयास पाहिजे. ऑगस्टमध्ये पाऊस पडल्यावर रब्बीचे पीक घेतले जाते. सोलापूर व सांगली जिल्ह्यामध्ये सप्टेंबरमध्ये पाऊस पडतो, त्यावेळी झाडे लावता येतील. जेणेकरुन या झाडांना पूर्ण वर्षभरामध्ये पडणारा पाऊस उपयोगी ठरु शकेल. विभागाने योजनेप्रमाणे काम करण्याचे निश्चित केले असून त्यास मान्यता मिळालेली आहे.

म्हणजे इंधनाच्या बाबत विभागाने असा खुलासा केला की, ९० ते ९५ टक्के लाकूड उपलब्ध आहे. म्हणून या बाबत नाविन्यपूर्वक योजना मंजूर केली असून ज्याठिकाणी ५० हेक्टर वन आहे त्या भागातील गावांना ७५ टक्के अनुदान तत्वावर बायोगॅस, कुकींग गॅस देण्यात येतील. अशा प्रकारे दरवर्षी १०० गावांमध्ये हे काम हाती घ्यावयाचे आहे. १०० कोटी झाडांच्या लागवडीचे उद्दिष्ट असून याबाबत जिल्हाधिकाऱ्यांबरोबर चर्चा करण्यात आली आहे व त्याप्रमाणे झाडे लावण्यात येणार आहेत.यावर्षी ५० कोटी झाडे लावण्यासाठी ५० कोटी रोपे तयार व्हावयास पाहिजेत आणि तेवढी रोपे तयार झाल्यानंतर पुढच्या वर्षभरामध्ये अजून ५० कोटी रोपे लावता येतील. यामध्ये लोकांनी सहभागी होण्याची गरज आहे. जुन्नर, सिंहगड येथे १२ हजार रोपे लावण्यात आली असून तेथे संयुक्त वन समिती देखील स्थापन करण्यात आली आहे.

ही रोपे कुठे लावण्यात येणार आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता विभागाने खुलासा केला की, या अनुषंगाने जो शासन निर्णय काढण्यात आला आहे. त्यात महाराष्ट्रामध्ये वन क्षेत्राचा जो भाग आहे. त्यामध्ये काही भागामध्ये मुबलक संख्येने झाडे असून काही ठिकाणी जे डोंगर आहेत तेथे झ ाडेच नाहीत हा पहिला मुद्दा आहे. यासाठी २०१२-२०१३ मध्ये अडीच लाख हेक्टर जमिनीवर १६ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. तसेच निकृष्ट भागामध्ये एकूण १६ टक्के झाडे लावण्याचे उद्दिष्ट घेण्यात येणार आहे. यानंतर खाजगी क्षेत्राबाबत परिगणनेप्रमाणे बांधावरील लागवड करणे आणि आदिवासींना जे वनपट्टे दिलेले आहेत, तेथे खूप कमी पीक येते. तेथे असलेल्या वन्य प्राण्यांमुळे पीक नष्ट होते. अशा वेळी खाजगी जमिनीवर वनातील झाडे, सागाची झाडे लावण्याच्या दृष्टीने मदत करावयाची आहे. अशा प्रकारे प्रयत्न केले तर खाजगी क्षेत्रामध्ये वृक्ष लागवडीबाबत ३० ते ४० टक्क्यापर्यंत उद्दिष्ट गाठता येईल. रस्त्यांची जी लांबी आहे, त्याठिकाणी निकष ठरवावयाचे की, येथे

जेवढी झाडे लावलेली आहेत, त्यापेक्षा अधिक किती झाडे लावता येतील. तसेच कालव्याची जी लांबी आहे, त्याच्या बाजूला देखील झाडे लावता येतील.

राज्यातील नद्यांच्या बाजूचा जो परिसर आहे म्हणजे इंद्रायणी, पवना, मुळामूठा इत्यादी नद्यांच्या बाजूला देखील चांगल्या प्रकारची झाडे लावता येतील. त्यामुळे सदरहू योजनेमध्ये नद्यांच्या बाजूच्या परिसराचा देखील समावेश करावा अशी सूचना समितीने विभागाला केली असता सदरहू योजनेमध्ये कालव्याच्या बाजूचा परिसर आणि गायरान भाग याचा समावेश केलेला आहे. त्याठिकाणी जमीन शिल्लक रहाणार नाही एवढया मोठया प्रमाणात प्रत्येक ग्राम पंचायत वृक्ष लागवड करणार आहे, अशी समितीस माहिती दिली.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून ३०० कोटी रुपयांची उचल घेण्यात येत होती. मात्र आता जवळजवळ हजार कोटी रुपयांपर्यंत उचल घेण्यात येणार आहे. पूर्वी मजुरीचा खर्च एक ते दीड टक्के होता, आता तो २०-२५ टक्क्यापर्यंत गेलेला आहे. आपण केंद्र शासनाच्या निधीप्रमाणे काम करीत आहोत. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये केंद्र शासनाकडे पैसे नसले तरी मात्र ही झाडे लावली जातील. वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी खरोखरच एक जन चळवळ तयार करुन झाडे लावली पाहिजेत. यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समिती स्थापन केली पाहिजे. कारण या भागांमधील जंगल वन विभागाचे नाही तर तेथील ग्रामसभेच्या अखत्यारित आहे. पण त्यांना सांगून काही होत नाही. याबाबतीत भरपूर घोषणा केल्या जातात परंतु यासाठी नियमामध्ये बदल केला पाहिजे. सागाची झाडे ३ कि.मी.परिसरापर्यंत असेल तर त्याबाबत गावाचा हक्क राहील. ज्या गावांमध्ये अशा प्रकारे झाडांची लागवड करण्यात आलेली आहे त्या भागातील ३ कि.मी. च्या परिसराचा हक्क संबंधित गावाकडे राहणार असल्यामुळे झाडे चांगल्या प्रकारे जगू शकतील. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामसभेवर काही अटी घालण्यात आलेल्या आहेत. ग्रामसभेने त्यांच्या कार्यक्षेत्रात चराई बंदी, कु-हाड बंदी व अतिक्रमण थांबवणे व त्यासंबधीचे ठराव ग्राम सभेत पास केले तरच या ग्रामसभांना अनुदान दिले जाणार आहे.  या परिसरात गुरे चराईचा अधिकार संबंधित गावाकडे राहणार आहे.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून १०० कोटी वृक्ष लागवड केली जाणार आहे त्यामुळे यामध्ये वन विभागाचे बजेट कितीचे राहणार आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता विभागाने खुलासा केला की, वन विभाग जवळपास १६-१७ कोटी वृक्षांची लागवड करणार असून बाकीचे झाडे शासनाचे विभिन्न विभाग, कृषी विभाग, जलसंधारण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्रामीण विकास विभाग, उद्योग विभाग, जलसंपदा विभाग, सार्वजनिक

बांधकाम विभाग तसे खाजगी उद्योजक, शैक्षिणिक संस्था, सहकारी संस्था व स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून केली जाणार आहे.

शासनाच्या योजना खूप चांगल्या असतात परंतु त्या योजना शेवटपर्यंत तडीस जात नाहीत. शासनाच्या योजनेतून झाडे लावली जातात परंतु २-४ वर्षानंतर त्या ठिकाणी झाडाचे नामोनिषाण सुध्दा राहत नाही. शासनाकडून झाडे लावली जातात परंतु त्याचे संरक्षण न करणे, पाण्याची सोय न करणे किंवा जनावरांमुळे झाडे मरतात. शासनाच्या योजनेतून झाडे लावल्यानंतर एक दोन वर्षात त्या ठिकाणी झाडांचे नामोनिषाण राहत नाही ही वस्तुस्थिती आहे. या समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयांवर विभागाने खुलासा केला की, ज्या गावाच्या परिसरात झाडांची लागवड केली जाईल त्या गावांकडे मालकी दिली तर झाडे जगण्याचे प्रमाण वाढेल. यासंदर्भात ग्रामसमिती देखील स्थापन करण्यात आली असून यासाठी प्रोत्साहनपर निधी दिला जाणार आहे. राज्यामध्ये २७,९९३ ग्राम पंचायती असून, प्रत्येक गाम पंचायतीला किमान २० हजार वृक्ष लागवड करावयाचे उद्दिष्ट देण्यात येणार आहे. ही वृक्ष लागवड ग्राम पंचायतीकडे उपलब्ध असलेला विकास निधी व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम यामधून करावयाची आहेत आणि तसा वेगळा शासन निर्णय जलसंधारण विभागामार्फत निर्गमित करण्यात येत आहे. या लागडीकरिता रोपांची उपलब्धता ग्राम पंचायती जवळ असलेल्या रोपवाटिका, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, सामाजिक वनीकरण विभाग व इतर सार्वजनिक व खाजगी स्त्रोतामधून करण्यात येईल.

रोजगार हमी योजनेखाली घेतलेल्या वृक्ष लागवडीची देखभाल व पुढील विकास करण्यासाठी आदिवासी कुटुंब निहाय क्षेत्रावर वृक्ष लागवड संवर्धनाच्या लाभार्थ्यांची संमती घेवून जबाबदारी ठेवण्यात येणार आहे. ज्या आदिवासी गावांमध्ये मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे अशा गावांमध्ये आदिवासी कुटुंबाना बायोगॅस किंवा स्वयंपाकाचा गॅस ३/४ अनुदान तत्वावर दिला जाणार आहे. शेतीसाठी सुधारित हत्यारे व संकरित जनावरांसाठी चारा उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था पशुसंवर्धन विभागाकडून आदिवासी उप योजनेमधून आदिवासी कुटुंबासाठी तयार करण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी कु-हाड बंदी केली जाईल अशा ठिकाणी बायोगॅस उपलब्ध करुन दिला जाणार आहे. ज्यांच्याकडे भाकड जनावरे असतील त्यांना दुधाळ जनावरे दिली जातील अशी योजना आहे.

आपल्याकडे मोठया प्रमाणात पशू धन आहे परंतु त्यासाठी चा-याचे प्रमाण मात्र खूप अल्प आहे. जनावरे काही २४ तास गोठयात बांधून ठेवली जात नाहीत तर त्यांना चारण्यासाठी काही काळ का होईना बाहेर सोडावेच लागते. जनावरांच्या चा-याकरिता शासनाच्या काहीही योजना दिसत नाहीत. अमरावती विभागात गुरे चारण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. एका खाजगी उद्योजकाने

जनावरांच्या चा-यासाठी १००-२०० एकरात चा-याची लागवड केलेली आहे. यामध्ये त्यांना खूप मोठया प्रमाणात चारा उपलब्ध होतो. जर खाजगी उद्योजक चा-याची सोय करु शकतो तर शासन जनावरांच्या चा-यासाठी सोय का करु शकत नाही असा समितीने उपस्थित केलेल्या प्रश्नावर विभागाने खुलासा केला की, हिवरे बाजार, राळेगणसिध्दी तसेच पुणे जिल्हयातील धोंदे गाव येथे चांगल्या प्रकारे काम झ ाालेले आहे.

विदर्भात हरिणांमुळे शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. बुलढाणा जिल्हयात रानडुक्कर आणि अस्वलांनी उच्छाद मांडलेला आहे. रानडुक्कर शेतीचे नुकसान करते तर अस्वल माणसांना फाडून काढते त्यामुळे यासंदर्भात अधिवेशनात प्रश्न उपस्थित केलेले आहेत, यावर वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांना १०० टक्के नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. तरी सुध्दा अधिक माहिती असेल तर त्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही केली जाईल. एकंदरीत किती मदत देण्यात आलेली आहे याची माहिती समितीला सादर करण्यात येईल असे सांगितले. परंतु अद्याप माहिती सादर झालेली नाही.

अमरावती जिल्हयात रानडुक्कर आणि रानगाईंनी थैमान घातल्यामुळे शेतकरी हैराण झालेले आहेत. जुन्नर तालुक्यात वन विभागाने नाविन्य पूर्ण योजनेतून पिंजरे उपलब्ध केलेले आहेत परंतु त्याचा काही एक उपयोग झालेला नाही. वन खाते कार्यक्षम नाही असा त्याचा अर्थ निघतो जुन्नर तसेच सोमाटणे फाटा येथे मोठया प्रमाणात जंगल तोड होत आहे. औषधी वनस्पतीच्या लागवडीच्या संदर्भात वन विभागाने सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. श्री. दादा खडीवाले वन औषधीच्या संदर्भात खूप जागरुक आहेत. त्यांना आपल्या विभागाकडून पैशाची नाही तर सहकार्याची आवश्यकता आहे. वन औषधाची लागवड करण्यास अनेक शेतकरी इच्छूक आहेत. वन विभागाने सहकार्य केले तर महाराष्ट्रात औषधी वनस्पतींची मोठया प्रमाणात लागवड होऊ शकेल. वन औषधीच्या संदर्भात तज्ज्ञ मंडळी काम करण्यास इच्छूक आहेत. वन औषधी मोठया प्रमाणात निर्यात सुध्दा करता येईल अशी परिस्थिती आहे त्यामुळे यासंदर्भात वन विभागाने सहकार्य करण्याची तसेच समन्वय साधून लक्ष घालण्याची नितांत आवश्यकता असल्याचे समितीने सुचविले असता जुन्नरमध्ये औषधी वनस्पतीची रोपवाटिका आहे. नाशिक, कोल्हापूर या ठिकाणीही वन औषधी रोपवाटिका निर्माण करण्यात आलेली आहे. याबाबतीत दुर्लक्ष होत असल्याचा खुलासा विभागाने केला.

वन विभागात एकंदर कर्मचा-यांची संख्या किती आहे ? वन रक्षकांची पदे आपल्याकडे बरीच कमी आहेत. वन रक्षक नसल्यामुळे जंगलाला आगी लागतात, जंगल तोड होते. झाडे तोडल्यामुळे

पर्यावरणाचे नुकसान होते त्यामुळे यासंदर्भात समितीला टिपणी सादर करण्यात यावी असे समितीने सूचित केले. असता अद्याप समितीला माहिती प्राप्त झालेली नाही.

**अभिप्राय व शिफारशी :**

विभागीय सचिवांनी साक्षीचे वेळी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये असे निदर्शनास आले की, वेतनामध्ये मोठ्या प्रमाणात बचत झालेली आहे. वन मजूरांची एकूण पदे विचारात घेवून अर्थसंकल्पात तरतूद केली होती. सचिवांनी साक्षीचेवेळी खुलासा करताना कर्मचाऱ्यांची पदोन्नती, सेवानिवृत्ती व कर्मचाऱ्यांचा मृत्यू इत्यादी बाबी विचारात न घेता संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी अनुदानाची मागणी विभागाकडे केल्याने मंजूर अनुदानामध्ये बचत दिसून येत असली तरी समितीला ते मान्य होऊ शकत नाही. वास्तविक या पदांमध्ये निवृत्त झालेले, पदोन्नती मिळाल्यामुळे रिक्त राहिलेली व निधन झाल्यामुळे रिक्त राहिलेली पदे सुद्धा वेतनाची परिगणना करताना विचारात घेण्यात आली. त्यामुळे वेतनाची तरतूद जास्त झाली. **विभागाने तरतूद करताना तपशीलवार माहिती घेवून अंदाजपत्रकात तरतूद केली असती तर अशा बचतीचा प्रश्न उद्‌भवला नसता. सदर बचत अखर्चित राहिल्याने परिणामी ती शासनास परत करावी लागली आहे हे लक्षात घेता सदर निधीची रक्कम विभागाने वेळीच शासनाला परत केली असती तर अन्य एखाद्या योजनेकरिता वापरता आली असती ते देखील शक्य होवू शकले नाही. या संदर्भात समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत असून या पुढील काळात विभागीय अधिकाऱ्यांनी शासनाकडे अनुदानाची मागणी करताना सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत असून अंदाज अतिशय काळजीपूर्वक तयार केले पाहिजेत आणि ते फाजील फुगवलेले किंवा अगदीच कमी असणार नाही याची काळजी घेण्यासाठी ते सादर करणाऱ्या अधिकाऱ्याने काळजीपूर्वक लक्ष द्यावे व आगामी कालावधीत याची पुनरावृत्ती होणार नाही या दृष्टीने खबरदारी घ्यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

विभागाने वार्षिक लेख्यांचा खर्चमेळ देखील न केल्यामुळे काही आक्षेप महालेखापालांनी घेतले आहेत. महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम १५७ मध्ये शासकीय खर्चाचा एकूण मेळ महालेखापालांच्या पुस्तिकेत नोंदविलेल्या खर्चाशी घालण्याबाबत सविस्तर कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. असे असले तरी विभागाने करण्यात आलेल्या खर्चाचा मेळ महालेखापालांच्या पुस्तिकेत नोंदविलेल्या खर्चाशी वेळच्या वेळी, बिनचूकपणे व योग्यरित्या घालत नसल्याचे समितीच्या वेळोवेळी निदर्शनास आले आहे. याचा परिणाम एकूण विभागाच्या नोंदवहीप्रमाणे होणारा खर्च व महालेखापालांच्या पुस्तिकेप्रमाणे नोंदविलेला खर्च यात तफावत आढळते. त्यामुळे विभागाने कामचुकारपणा केल्यामुळे महालेखापालांना त्यांच्या लेखापरिक्षणात आक्षेप घ्यावे लागतात. याप्रकरणी देखील खर्चमेळ न केल्यामुळे खर्चात तफावत

आढळली आहे. परंतु चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव विहित मुदतीत महालेखापाल कार्यालयास सादर केलेला नाही. **त्यामुळे ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी खर्चाचा ताळमेळ तसेच चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव विहित मुदतीत केलेला नाही. त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये नोंद घेण्यात यावी तसेच त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

सन २००६-२००७ मध्ये वन विभागाला शासनाच्या एकूण अंदाजपत्रकाच्या ०.८९% एवढी रक्कम देण्यात आली होती. राज्याचे वनक्षेत्र दिवसागणिक कमी होत आहे. राज्याचा नियतव्याय वाढत आहे. परंतु वन विभागाकरीता या नियतव्ययामध्ये फारच तुटपुंजी तरतूद होत आहे. पर्यावरणाचे ढासळत चाललेले संतुलन रोखण्यासाठी वनक्षेत्र वाढविणे आवश्यक आहे. वन विभागाने राज्याचे वनक्षेत्र वाढविण्याच्या योजनांमध्ये १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी लोकांचा सहभाग असणे देखील महत्त्वाचे आहे. परंतु याकरीता रोपांची उपलब्धता, लागवड करुन त्यांचे संवर्धन करणे, त्यांची निगा राखणे याकरीता मनुष्यबळाबरोबर निधीची देखिल आवश्यकता आहे. परंतु विभागास निधीची कमतरता असल्यामुळे या योजनांचा योग्यरितीने पाठपुरावा करणे शक्य होत नाही. त्यावर मर्यादा येतात. **त्यामुळे राज्याचे वनक्षेत्र वाढविण्यास व पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होईल. या दृष्टीने शासनाने राज्याच्या एकूण अंदाजपत्रकाच्या किमान २.५% निधी वन विभागास द्यावा अशी समितीची शिफारस आहे.**

वन विभागाने देखील १०० कोटी वृक्षांच्या लागवडीच्या योजनेमध्ये महाराष्ट्राच्या नकाशाचा भौगोलिकदृष्ट्या अभ्यास करुन नद्यांचा परिसर असलेल्या क्षेत्रामध्ये पाण्याची मुबलकता असल्यामुळे त्या परिसरात वृक्ष लागवड केल्यास फायदा होवू शकतो. **त्यामुळे नद्यांच्या परिसराचा वृक्ष लागवडीच्या योजनेमध्ये समावेश करण्याबाबत विचार करण्यात यावा. वन विभागाने सामाईक वनिकरणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी जन चळवळ तयार करण्याची आवश्यकता असून याकरीता ग्रामपंचायतीचा सहभाग अत्यंत मोलाचा राहणार आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक ग्रामसभेमधून वनिकरणाच्या योजनेची माहिती देवून त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी कशी होईल याबाबत विभागाने देखील आवश्यक ती पावले उचलावीत व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

## कृषि विभाग

## नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय्य

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र. डी-२ ए मधील प्रधान शीर्ष "२२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय्य." व अनुदान क्र. डी-३ मधील प्रधान शीर्ष २४०१ "पिक संवर्धन" या शिर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

### अनुदान क्रमांक : डी-२ ए (सर्व दत्तमत)
### नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय्य

**(रुपये लाखात)**

| प्रधान लेखाशीर्ष | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय्य | | | |
| मूळ | -- | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | १,००,५५,६३ | १,४५,५५,१२ | (+) ४४,९९,४९ |
| पूरक | १,००,५५,६३ | | |

वर्षभरात परत केलेली रक्कम

**<u>टीपा व भाष्ये :-</u>**

अनुदानापेक्षा रुपये ४४,९९.४९ लाख (प्रत्यक्ष अधिक खर्च ४४,९९,४९,०४०) एवढा अधिक खर्च नियमात बसविणे आवश्यक आहे.

अनुदानातील अधिक खर्च पुढील शिर्षाखाली झाला.

**ज्ञापन :**

महालेखाकारांच्या या परिच्छेदाबाबत विभागाने पुढील शीर्षाखाली माहिती दिली आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष | | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २२४५ समाजिक सुरक्षा व कल्याण<br>०२ चक्रीवादळे इत्यादी<br>१०१ अनुग्रह सहाय्य<br>१०१ (००) (०२) इतर बाबी | | | | |
| मूळ | -- | | | |
| | | १,००,५५,६३ | १,४५,५५,१२ | (+) ४४,९९,४९ |
| पूरक | १,००,५५,६३ | | | |

रुपये ४४,९९.४९ लाखांच्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७).

सदरहू लेखाशिर्षाखाली अंतिम सुधारित अनुदान रुपये १००५५.६३ लक्ष मंजूर करण्यात आले. त्यापैकी विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये १,४५,५५.१२ लक्ष इतका झाला. म्हणजेच अंतिम अनुदानापेक्षा रुपये ४४,९९.४९ इतका अधिक झाला.

**ज्ञापन :**

महालेखाकारांनी या परिच्छेदाबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहे.

हा अधिकचा खर्च प्रामुख्याने मार्च ०७ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या आकस्मिकता निधीमधील असून सदरचा आकस्मिता निधी सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पामध्ये समायोजित करुन घेण्यात आला आहे. तरी सदरचा अधिक खर्च कृपया नियमानुकुल करण्यात यावा.

**अनुदान क्रमांक** - डी – ३

| प्रधान लेखाशीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | (रुपये लाखात) अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २४०१ - 'पीक संवर्धन ११९ फलोत्पादन व भाजीपाला पीके ११९ (०३)(२३) अवशेष चाचणी प्रयोगशाळा स्थापना करणे (कें.पु.यो.) | | | | |
| मूळ तरतूद | ३,००.०० | | | |
| | | २५.६७ | २५.६७ | ..... |
| पुनर्वियोजन | -२,७४.३३ | | | |

कोणत्याही विनिर्दिष्ट कारणांशिवाय वर नमूद केलेल्या उपशिर्षाखाली निधी काढण्यात आला. वरील शीर्षाखाली अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखाकारांनी या परिच्छेदाबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहे.

सदरहू योजनेकरिता अंतिम अनुदान रु.२५.६७ लाख मंजूर करणेत आले. पैकी विभागाचा खर्च रु.२५.६७ लाख झाला म्हणजेच अंतिम अनुदानाइतकाच झाला. त्यामुळे अधिक खर्च अथवा बचत नाही.

**साक्ष**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासदंर्भात लोकलेखा समितीने दिनांक ३० मे २०१२ रोजी परिच्छेद क्रमांक डी-२ (अ) व डी-३ संदर्भात कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने कृषी विभागाकडून प्रलंबित असलेल्या माहितीची विचारणा केली. त्यावेळी कृषी विभागाकडे कोणतीही माहिती प्रलंबित नसल्याची माहिती समितीला प्राप्त झाली.

या संदर्भात महालेखापालांनी अधिक भाष्य करताना, एग्रीकल्चर डिपार्टमेंट के वर्ष २००६-२००७ के ७१ यू.आर. पेंडिंग हैं. वर्ष २००७-२००८ के १२ यू.आर. पेंडिंग हैं. वर्ष २००८-२००९ के १० यू.आर. पेंडिंग हैं. वर्ष २००९-२०१० के १०७ यू.आर. पेंडिंग हैं और वर्ष २०१०-२०११ के सारे ही यू.आर. पेंडिंग असल्याचे तसेच वर्ष २०१०-२०११ के पैरा अभी प्रजेंट हुए हैं इसलिए इस साल के यू.आर. को छोड़कर इससे पहले के कुल २०० यू.आर. पेंडिंग हैं अशी माहिती दिली.

विभाग महालेखापरिक्षक कार्यालयाशी समन्वय साधत नाही व त्यांना माहिती देत नाही. लेख्यांची माहिती महालेखापाल कार्यालयाला सादर करणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले. यावर विभागीय सचिवानी असे सांगितले की, महालेखापाल यांच्या टीममार्फत हाफ मार्जिन पॅरा तयार केला जातो. त्या नुसार कृषी विभागाचे अधिकारी माहिती देतात. महालेखापालांच्या टीमला खुलासा समाधानकारक वाटला तर तो आक्षेप काढला जातो. हाफ मार्जिन पॅरा शक्यतो खूप मोठे असतात. ९० टक्के आक्षेप मान्य करण्यात येतात. १० टक्के आक्षेपांमध्ये विभाग व महालेखापाल कार्यालय यांच्यामध्ये फरक येतो. त्याचे स्पष्टीकरण विभागाकडून सादर केले जाते.

मुख्य सचिवांनी गेल्या पाच वर्षापासून सर्व विभागांच्या सचिवांना पाच टार्गेट दिलेले आहे. मुख्य सचिव स्वत: प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन महालेखापालांच्या आक्षेपांची पूर्तता सचिवांनी केली आहे किंवा नाही यांची पडताळणी करतात. तसेच याबाबत ते स्वत: वेळोवेळी बैठका देखील घेतात. तसेच सचिव स्तरावर बैठक होते तेव्हा चालू वर्षाचा आढावा घेण्यात येतो काय? अशी विचारणा समितीने केली त्यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, महालेखापालांची टीम विभागाकडे येते. शेवटच्या दिवशी महालेखापालांचे अधिकारी आणि सचिव यांची संयुक्त बैठक होते. त्यामध्ये कोणकोणते आक्षेप घेतले आहेत यावर चर्चा होते. त्यातील कोणते आक्षेप काढले पाहिजेत याबाबत चर्चा होते. त्याचे मिनिटस देखील तयार केले जातात. महालेखापालांची तपासणी १५ ते २० दिवस चालते. त्यांना विभागीय अधिकाऱ्यांकडून प्रतिसाद मिळत नसेल तर महालेखापालांचे अधिकारी ही बाब विभागाच्या निदर्शनास आणून देतात. तपासणीच्या शेवटच्या दिवशी मसुदा आक्षेप तयार होतो. संयुक्त बैठकीमध्ये

तो सादर केला जातो.  त्यावेळी काही आक्षेपांबाबत विभागातर्फे खुलासा केल्यानंतर ते वगळण्यात येतात.  पण ज्या आक्षेपांसंबंधी विभाग महालेखापालांचे समाधान करू शकत नाही ते आक्षेप तसेच ठेवून समाधानकारक स्पष्टीकरण सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात येते. तीन महिन्यामध्ये अशा आक्षेपांवर प्राथमिक अहवाल सादर करावा लागतो. त्याबाबत महालेखापाल कार्यालयाचे समाधान झाले तर ते आक्षेप त्यांच्या पातळीवर वगळले जातात.

विभागाने दिलेल्या माहितीवर समितीने अभिप्राय देताना विभागाला तीन महिन्यांची मुदत महालेखापाल कार्यालयाकडून दिलेली असल्यामुळे आपण त्यांना सर्व कागदपत्र उपलब्ध करून विभागाने स्वतःच्या स्तरावरच हा विषय संपविला पाहिजे. तेवढ्यासाठी विभागाने समिती पुढे येऊ नये असे मत व्यक्त केले.

समितीच्या मताशी सहमत होताना विभागीय प्रतिनिधींनी मूळ आक्षेपांची संख्या शेकडोमध्ये असते. त्यापैकी ५-६ आक्षेप राहतात. महालेखापाल कार्यालयाची टीम जाईपर्यंत काही वेळा कागदपत्रे सापडत नाहीत. काही प्रकरणांमध्ये प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नसल्याची बाब उघडकीस येते. अशा प्रकरणांमध्ये प्रशासकीय मान्यता घ्यावी असे सुचविले जाते. सदर कार्यवाही ही तीन महिन्यांमध्ये पूर्ण होऊ शकत नाही. अशा काही प्रकरणांमध्ये काही वेळा अधिकचा विलंब लागतो.

विभागाने खुलासा केल्या नंतर आक्षेप क्षमापित करायचा किंवा नाही हा अधिकार महालेखापालांना आहे. व्यावहारिक पातळीवरील काही कारणे असू शकतात. त्याबाबतचा खुलासा विभाग समिती पुढे करते. तेव्हा तो आक्षेप क्षमापित करण्याचा अधिकार समितीला असतो. कधी कधी समिती संबंधितांविरूद्ध कारवाई करण्याची शिफारस देखील शासनाला करते. तेव्हा या बाबत अभ्यास करून योग्य तो मार्ग काढावा, असे समितीने विभागास सुचविले.

विनियोजन लेख्यातील आक्षेपाच्या अनुषंगाने समितीने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी ठिबक सिंचन व तुषार सिंचन योजनेसंबंधांत शासनाचे धोरण काय आहे. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात येतात. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन योजना व तुषार सिंचन योजना राबविली आहे. शेतकऱ्यांना मात्र मागच्या वर्षाचा हिशोब दिला जातो. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांना शासन निर्णयानुसार लाभ मिळत नाही अशी विचारणा समितीने केली. यावर विभागीय सचिवांनी महाराष्ट्रामध्ये दरवर्षी दोन लाख हेक्टर ठिबक सिंचनाखाली आणण्याचे काम करण्यात येते. त्यास शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. केंद्र शासनाकडून एक लाख हेक्टरपर्यंत २५० कोटी रूपये सबसिडी मिळते. खरे म्हणजे ५०० कोटी रूपयांची सबसिडी दिली पाहिजे.  सन २०११-२०१२ मध्ये जवळपास ५०० कोटी रूपये अनुदान देणे बाकी आहे.  राष्ट्रीय कृषी विकास योजनेद्वारे केंद्र शासनाच्या

मदतीने सन २००९-२०१०, २०१०-२०११ मध्ये सर्व शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप केले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये हा विषय चर्चेला आला होता. त्यावेळी त्यांनी केंद्र सरकारसारखी एखादी स्वतंत्र योजना राज्य शासनाने तयार करावी अशी सूचना केली. सदर विषय मंत्रिमंडळापुढे आहे. आता दरवर्षी राज्य शासनाने रूपये २५० कोटी व केंद्र शासनाने रूपये २५० कोटी द्यावेत अशा प्रकारचा प्रस्ताव तयार केला आहे. त्यास मान्यता मिळाली तर निधी मिळेल व सदर अडचण कायमची निघून जाईल, अशी माहिती दिली.

तीन वर्षापूर्वी ज्या शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन किंवा तुषार सिंचन केले आहे त्यांचे पैसे केव्हा मिळणार व केंद्र शासनाची ठिबक व तुषार सिंचनाची यांत्रिकीकरणाचा योजना आहे. तसा कार्यक्रम राज्य शासनाचा हाती घेण्याचा विचार आहे का ? अशी समितीने विचारणा केली. यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सन २००९-२०१० व सन २०१०-२०११ मधील शेतकऱ्यांना पैसे देण्यात आले आहेत. सन २०११-२०१२ मधील शेतकऱ्यांना या वर्षी पैसे देण्यात येतील.

मागील वर्षी राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत १.२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. या योजनेंतर्गत वैयक्तिक योजना घेतल्यास त्यास चांगली सबसिडी मिळते. ५०-६० शेतकऱ्यांनी एकत्र येऊन संगणकीकरण कार्यपध्दती बसविली तर वैयक्तिक योजनेपेक्षा जास्त खर्च येतो. राष्ट्रीय कृषी विकास योजना या वर्षी सुरु ठेवण्यात आली आहे, अशी अधिक माहिती विभागीय सचिवांनी दिली असता त्यावर विभागाकडून कमी हॉर्सपॉवरच्या ट्रॅक्टरला सबसिडी देतो. भारत हा कृषी प्रधान देश आहे. तेव्हा जास्त हॉर्सपॉवरच्या ट्रॅक्टरलासुध्दा सबसिडी दिली पाहिजे. स्मॉल, मार्जिनल असा भेदभाव ठेवू नये. राज्याच्या इतर भागात मोठे शेतकरी कमी असतील परंतु विदर्भ मराठवाड्यामध्ये मोठे शेतकरी जास्त आहेत. त्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. दुसरे म्हणजे आपण विभागनिहाय योजना केल्यास त्या त्या भागातील शेतकऱ्यांना चांगला फायदा होईल. कृषी विभागामार्फत तसेच जलसंपदा विभागामार्फत अनेक योजना राबवील्या जातात परंतु त्या योजनांचा लाभ खऱ्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचत नाही. त्या योजनांमध्ये गैरप्रकार होतात. तेव्हा अशा गोष्टींवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने एक यंत्रणा निर्माण केली पाहिजे जेणेकरुन लाभार्थ्यांपर्यंत योजना प्रत्यक्षात पोहोचतील. शासनाच्या बऱ्याचशा योजना कागदावरच राहतात. एकेका तालुक्यामध्ये १०० ते १२५ गावे असतात. तेव्हा प्रत्येक गावापर्यंत योजना पोहोचली पाहिजे. शासनाच्या सर्व योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, असे मत समितीने व्यक्त केले. त्यावर विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, ही केंद्र सरकारची योजना आहे. ३५ हॉर्सपॉवरपेक्षा जास्त क्षमतेच्या ट्रॅक्टरसाठी केंद्र सरकारकडून निधी मिळत नाही. ३५ पेक्षा जास्त हॉर्सपॉवरच्या ट्रॅक्टरला सबसिडी देण्याबाबत विभागामार्फत केंद्र सरकारला विनंती करण्यात

आली होती. परंतु केंद्र सरकारने विभागाची विनंती अमान्य केली. या संदर्भात एक वेगळी योजना आली होती. केंद्र सरकारमार्फत ५ लाख रुपये आणि स्वत:चे २.५ लाख रुपये अशी ती योजना होती. त्या योजनेमध्ये जास्त हॉर्सपॉवरच्या ट्रॅक्टरचा समावेश करण्यात आला होता. दुर्देवाने ती योजना बंद झाली. त्या योजनेअंतर्गत केंद्र सरकारकडून ५१ कोटी रुपये मिळाले होते. परंतु या वर्षी निधी मिळाला नाही. राष्ट्रीय कृर्षी विकास योजना समितीचे अध्यक्ष मुख्य सचिव आहेत. त्या समितीसमोर ऑटोमेशन आणि जास्तीच्या हॉर्सपॉवरच्या ट्रॅक्टरला सबसिडी देण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यास या वर्षी जास्त हॉर्सपॉवरसाठी पैसे देणे शक्य आहे.

केंद्र सरकारचे २५० कोटी रुपये आणि राज्य शासनाचे २५० कोटी रुपये असे एकूण ५०० कोटी रुपये तुषार सिंचनासाठी दिले. केंद्र शासनाच्या मदतीवर अवलंबून न राहता राज्याने जास्त हॉर्सपॉवरच्या ट्रॅक्टरला सबसिडी देऊन शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. भारत हा कृषी प्रधान देश आहे. तेव्हा शेती उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने विभागाने जास्त प्रयत्न केले पाहिजेत. राज्याचे बजेट ४१ हजार कोटींपेक्षा जास्त आहे. शासनाने कृषीसाठी आणखी पाच-सहा हजार कोटी रुपयांची तरतूद केल्यास शेतीचे उत्पादन वाढू शकेल. जलसपंदा विभागाला छोट्या छोट्या योजना आखून शेतीचे उत्पादन वाढविता येऊ शकेल. व्हीआयडीसीने नवीन स्कीम आणली आहे त्याचा राज्यास उपयोग करुन घेता येईल. शासनाने प्रॅक्टीकल विचार केला पाहिजे. इस्त्राईलमध्ये पाण्याचा प्रश्न बिकट असताना देखील त्यांनी निसर्गावर मात करुन विकास घडवून आणला आहे. राज्यात सर्व सुविधा असताना देखील आपण पाहिजे त्या प्रमाणात विकास करु शकलो नाही, असे अभिप्राय समितीने दिले. यास अनुसरुन केंद्र सरकारच्या योजना येतात परंतु त्या योजनांची माहिति सर्व शेतकऱ्यांपर्यंत किंवा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही आणि जेव्हा माहिती पोहोचते तोपर्यंत ती योजना बंद झालेली असते. कृषी विभागास ६ हजार कोटी रुपयांची मागणी करावी म्हणजे थोडीफार जास्त रक्कम मिळू शकेल. समितीने असे मत व्यक्त केले. त्यावर विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सन २०१२-२०१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये कृषी विभागाने ३ हजार कोटी रुपयांची मागणी केली होती. परंतु अर्थसंकल्पामध्ये कृषी विभागासाठी फक्त २८८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये कृषी विभागासाठी २८८ कोटीं रुपयांची तरतूद करण्यात आली तर केंद्र सरकारकडून १७५० कोटी रुपये मिळाले. मागील वर्षी कमी पाऊस झाला म्हणून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पोटी मदत व पुनर्वसन विभागामार्फत १ हजार ९० कोटी रुपयांची मदत देण्यात आली होती.

या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये कृषी विभागासाठी २८८ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. भारत हा कृषी प्रधान देश आहे. तेव्हा शेतीचे उत्पादन अधिक वाढण्यासाठी कृषी विभागाला एक हजार कोटी रुपयांचे बजेट द्यावे असे समितीने सांगितले.

योजनांची नावे व त्याची सविस्तर माहिती समितीने विचारली असता विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, लाल्या रोगाच्या प्रार्दूभावामुळे कापूस पिकाचे नुकसान झाले होते म्हणून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना शासनामार्फत मदत करण्यात आली. त्याचा हा खर्च आहे. लाल्या हा रोग नसून झ ााडाची पाने लाल होतात. सन २००५-०६ आणि सन २००६-०७मध्ये लाल्या रोग आला होता. शेतकऱ्यांना मदतीपोटी प्रति हेक्टरी एक हजार रुपये आणि जास्तीत जास्त दोन हेक्टरपर्यंत मदत करण्यात आली होती. त्यावेळी तरतूद संपल्यामुळे राज्य शासनातर्फे कापूस खरेदी योजना बंद करण्यात आली होती. तेव्हा शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याच्या दृष्टीने ही मदत देण्यात आली होती. सन २००५-०६ मध्ये शेतकऱ्यांना हेक्टरी एक हजार रुपये व जास्तीत जास्त दोन हेक्टरपर्यंत मदत देण्यात आली. तर सन २००६-०७ मध्ये प्रति हेक्टरी दीड हजार रुपये आणि जास्तीत जास्त दोन हेक्टरपर्यंत ३ हजार रुपये मदत देण्यात आली होती. शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये रक्कम जमा करावी अशी अट शासनाने घातलेली आहे. प्रत्येक शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर किती क्षेत्र नोंदविले होते त्या प्रमाणे मदत देऊन शेतकऱ्यांचे ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेचे नाव व अकाऊंट नंबर घेऊन त्या बँकेत रक्कम जमा करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांना जी मदत करावयाची आहे ती रक्कम कमी पडणार आहे. तेव्हा पुरवणी मागण्यांद्वारे ही रक्कम उपलब्ध करुन घ्यावी लागणार आहे.

शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत अशा प्रकारच्या तक्रारी कृषी विभागाकडे आलेल्या नाहीत. सोयाबीन व धान पिकांमध्ये २५ टक्क्यापेक्षा जास्त घट असलेले तालुके अधिसूचित करण्यात आले होते. सर्वच तालुके अधिसूचित करण्यात आले नव्हते. महसूल विभागामार्फत त्या रकमेचे वाटप करण्यात आले होते. जर एखाद्या शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये रक्कम जमा झाली नसेल किंवा दुसऱ्या कोणाच्या खात्यामध्ये रक्कम जमा झाली असेल तर त्याची शहानिशा करता येईल. कोणाच्या खात्यात केव्हा रक्कम जमा झाली हे बँकेत केव्हाही जाऊन पाहता येऊ शकते, अशी समितीस माहिती देण्यात आली.

शेतकऱ्यांना दिलेल्या मदतीच्या रकमेचे लेखापरिक्षण होते का ? सोयाबीनची शेती असताना कापसाची शेती केली असे सांगूनही मदत घेता येऊ शकते, असे समितीने मत मांडले असता यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, ७/१२ उताऱ्यावर ज्या पिकाची नोंद केलेली असते त्याप्रमाणे मदतीचे वाटप करण्यात येते. सोयाबीनचे पीक घेतले परंतु ७/१२ उताऱ्यावर त्याची नोंद

दाखविण्यात आली नाही किंवा कापसाचे पीक घेतले परंतु ७/१२ उताऱ्यावर त्याची नोंद दाखविण्यात आली नाही अशा प्रकारच्या तक्रारी आलेल्या आहेत. यवतमाळ जिल्ह्यात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही. महाराष्ट्रात सोयाबीनचा पेरा मोठा आहे अशी समितीने माहिती दिली असता आपल्याकडे धान पिकासाठी २० टक्के तालुके तर सोयाबीन पिकासाठी ४० टक्के तालुके मदतीसाठी पात्र ठरले आहेत. त्यामुळे ६० टक्के तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी मदतीसाठी पात्र ठरणार नाहीत. सर्वच जिल्ह्यातील सोयाबीन आणि धान उत्पादक शेतकऱ्यांचा मदतीमध्ये समावेश आहे असे नाही, असे प्रतिपादन विभागीय सचिवांनी केले.

पिकांच्या संदर्भात सेटलाईटद्वारे फोटोग्राफ्स घेऊन कार्यवाही करता येणार नाही का अशी विचारणा समितीने केली. यावर या संदर्भात शासनाकडून प्रयत्न सुरु आहेत. नागपूरमध्ये एमआरसॅक नावाची संस्था कार्यरत आहे. सेटलाईटद्वारे फोटोग्राफ्स घेताना किमान क्षेत्रापर्यंत पोहचू शकत नाही. उदाहरण म्हणून सांगावयाचे झाल्यास राज्यात किंवा जिल्ह्यात कपाशीचे क्षेत्र साधारणपणे किती आहे, ही बाब समजू शकते. परंतु ठराविक क्षेत्रात कपाशी किंवा सोयाबीनचे क्षेत्र किती याची निश्चित माहिती मिळू शकत नाही असा खुलासा विभागीय सचिव यांनी केला.

जगात मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञान उपलब्ध आहे. त्या तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यावश्यक आहे. तसेच पॅकेजअंतर्गत मिळणारी रक्कम लाभार्थ्यांच्या बँकेच्या खात्यात जमा होते. ही बाब खरी आहे. परंतु अशा प्रकारचा लाभ घेत असताना संयुक्त खातेदार असले तरी फायदा मात्र एकाच लाभार्थ्याला होतो. या बाबीचा विचार करता सर्वांना लाभ मिळण्यासाठी वेगळी व्यवस्था केली आहे का ? यावर विभागीय सचिवांनी अशा प्रकरणांमध्ये मिळणारी रक्कम कोणाच्या खात्यात जमा करावयाची या संबंधी तलाठ्यामार्फत संयुक्त खातेदारांचे जबाब नोंदवून घेतले जातात व त्यानुसार कार्यवाही केली जाते असा खुलासा केला. लेखी स्पष्टीकरणात मागणी क्रमांक डी-३, कृषी विषयक सेवा, मुख्य लेखाशीर्ष २४०१ अंतर्गत एकुण अनुदान १०,०६,३६,५१ हजार रुपये असताना प्रत्यक्ष खर्च ८,९८,८८,३४ हजार रुपये इतका झाला व १,०७,४८,१७ हजार रुपयांची बचत झाली असताना पुरवणी मागणी मध्ये ६९,५४.७३ लाख रुपयांची पूरक मागणी केल्याचे नमूद केलेले आहे. या बाबतची कारणे काय आहेत ? तसेच एखाद्या खात्याला मूळ अर्थसंकल्पामधून निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर त्यातील काही निधी संबंधित खात्यांकडून शासनाकडे प्रत्यार्पित केला जातो. पुन्हा त्याच खात्यांकडून पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून शासनाकडे निधीची मागणी केली जाते, याची कारणे काय, अशी समितीने पृच्छा केली असता उपशीर्षा संदर्भात विभागाच्या सचिवांना पुनर्विनियोजनाचे अधिकार असतात. परंतु प्रधान शीर्षाच्या बाबतीत शासन स्तरावर निर्णय घेतले जातात. निर्णय घेण्यासाठी वित्त विभागाची मान्यता घेणे जरुरीचे असते अशी

समितीस माहिती मिळाली यावर तांत्रिकदृष्ट्या काही अडचणी आल्यास खात्याअंतर्गत पुनर्विनियोजन केले जात असल्यामुळे अर्थसंकल्पाची रक्कम फुगवल्यासारखी दिसते. अशा सर्व बाबींमुळे विभागाकडून शासनाकडे निधी प्रत्यार्पित केल्यानंतर सुध्दा पूरक मागणीद्वारे निधीची मागणी केली जाते. या संदर्भात विभागांनी चांगले नियोजन करणे अत्यावश्यक आहे.

नवीन योजना आल्यानंतर त्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी पूरवणी मागणीच्या माध्यमातून शासनाकडे मागणी केली जाते. तसेच शासनाकडे प्रत्यार्पित करावयाच्या निधीचे पुनर्विनियोजन करता येत नसल्यामुळे तेवढी रक्कम बीडीएसमध्ये शिल्लक राहते. पूर्वीच्या काळात बीडीएस नसल्यामुळे अशा प्रकारची अडचण येत नव्हती. परंतु आता बीडीएस सुरु झाल्यामुळे या बाबी निदर्शनास येत आहेत, असे स्पष्ट मत समितीने नोंदविले. ४४,९९.४९ लक्ष रुपयांचा अधिक खर्च झाला, सदर निधी कोणत्या कारणांसाठी खर्च झाला? यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, ही रक्कम एकत्रित निधी अग्रिमामधील आहे. अर्थसंकल्पामध्ये अधिकची तरतूद असते. मागील तीन वर्षांच्या कालावधीत कृषी विभागाला अर्थसंकल्पामधून १०० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. त्यात ५० कोटी रुपयांचा एकत्रित निधी अग्रिम आहे. पावसाळी अधिवेशनात ही रक्कम नियमित केली आहे. एकत्रित निधी अग्रिमामधून काढलेली रक्कम विभागाला खर्च करता येऊ शकते. एकत्रित निधी अग्रिमाची पूर्तता जुलै महिन्यात झाली असल्यामुळे अधिकचा खर्च दिसत आहे.

सेटलाईटच्या संदर्भात भविष्यात कार्यवाही करणे आवश्यक आहे. टेक्निकल अडचणी विचारात घेता विभागाने त्या संबंधी तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे असे समितीने मत मांडले. त्यावर हैद्राबाद येथे एनआरसीई रिसर्च सेंटर आहे. कृषी विभागाने त्यांच्याशी संपर्क साधला होता. पीक विमा योजनेतंर्गत प्रत्येक क्षेत्रामध्ये ५० गावांचा गट तयार केला जातो. प्रत्येक क्षेत्रासाठी पीक विमा योजना तयार करता येऊ शकेल. या संदर्भात एनआरसीईकडून माहिती आलेली आहे. या संस्थेने सन २००७-०८ या वर्षात कोणत्या क्षेत्रात किती गारपीट झाली, या संबंधी सर्व्हेनिहाय यादी सादर केली होती. परंतु गारपिटीमुळे ५० आणेवारीपेक्षा कमी किंवा जास्त नुकसानभरपाई झाली याची माहिती सदर केंद्रातून मिळत नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले. राज्यात कपाशीचे हजारो हेक्टर क्षेत्र आहे. अशा परिस्थितीत सदर संस्थेकडून ढोबळ स्वरुपात माहिती दिली जात आहे. या संदर्भात एकाच वेळी १०० टक्के सुधारणा होणे शक्य नाही. परंतु यासंबंधी लवकरात लवकर मोठ्या प्रमाणात सुधारणा होणे आवश्यक आहे. याबाबत केंद्र शासनाच्या अखत्यारित "फसल" नावाची संस्था कार्यरत आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने खाजगीकरणाच्या माध्यमातून सेटलाईटद्वारे आपल्याला माहिती मिळू शकेल किंवा कसे, या संबंधी अभ्यास सुरु केलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. या संबंधी लवकरच

निकाल अपेक्षित आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास आपल्याला या संबंधी कार्यवाही करता येऊ शकेल, अशी माहिती समितीस प्राप्त झाली.

गारपिटीमुळे होणाऱ्या नुकसानीसंबंधी सांगावयाचे झाल्यास गारपीट झालेल्या एका परिसराचा विचार करीत असताना त्याच्याच बाजूला असलेल्या दुसऱ्या परिसराचा विचार केला जात नाही. तालुक्यांचा विचार केल्यास वेगवेगळ्या ठिकाणी पर्जन्यमान मोजण्याची यंत्रणा लावलेली आहे. एखाद्या ठिकाणी खूप पाऊस पडतो, गारपीट होते परंतु तेथून १-२ कि.मी. अंतरावर पाऊस पडत नाही. अशा परिस्थितीत पर्जन्यमान यंत्रणेमार्फत पावसाची मोजणी केली जात असताना सर्व क्षेत्रांचा विचार होणे गरजेचे आहे. यासाठी सविस्तर अभ्यास करणे आवश्यक आहे. जेणेकरुन कोणावरही अन्याय होणार नाही, अशी समितीने पृच्छा केली असता यासाठी राज्य शासनाने सार्वजनिक व खाजगी भागिदारीतून ॲटो वेदर स्टेशन्स उभारण्यासाठी १५० कोटी रुपयांची एक योजना तयार केली आहे. त्यात ५० कोटी रुपये खाजगी कंपनी घेणार आहे. प्रत्येक महसूली मंडळाच्या ठिकाणी ॲटो वेदर स्टेशन बसविले जाणार आहे. या स्टेशन्समध्ये संगणकाच्या माध्यमातून सहा पॅरामीटर ठरविण्यात आले आहेत. त्यामध्ये रेनफॉल, मॉईस्चर, सूर्यप्रकाश, टेप्रेंचर, वाऱ्याचा वेग इत्यादी बाबींची नोंद केली जाणार आहे. ही सर्व माहिती कृषी विद्यापीठाच्या ठिकाणी उपलब्ध होणार आहे. यावर्षी ५०० ते ६०० स्टेशन बसविणार आहोत. या संदर्भात तीन वर्षांचा कार्यक्रम तयार केलेला आहे. पुढील तीन वर्षांच्या कालावधीत राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमातंर्गत २ हजार ॲटो वेदर स्टेशन बसविण्याचा कार्यक्रम हाती घेतला जाणार आहे. अशा प्रकारे प्रत्येक महसूली मंडळामध्ये ॲटो वेदर स्टेशन बसविले जाणार आहेत. तामिलनाडू राज्यात अशा प्रकारे ११०० स्टेशन्स बसविण्यात आली आहेत. खाजगी कंपन्यांच्या हवामानाच्या अहवालाच्या आधारावर आता पीक विमा योजना कार्यरत आहेत. या खाजगी कंपन्या पीक विमा योजनेसाठी अशा प्रकारचा डेटा विक्री करीत आहेत असे समितीला सांगण्यात आले.

या वर्षी राज्यात बहुतांश भागात दुष्काळ पडलेला आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी शासनाने पीक विमा योजना सुरु केली आहे. शेतकऱ्यांचे प्रत्यक्षात झालेले नुकसान व त्या अनुषंगाने मिळणारी नुकसान भरपाईची रक्कम यात खूप फरक असतो. या संदर्भात परिगणन पध्दतीत काही बदल केला आहे का? पीक विमा योजनेच्या संदर्भात शेतकऱ्यांचा फायदा होण्याच्या दृष्टीने काही सुधारणा केली आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता त्यावर ऐरिया ॲव्हरेज प्रॉडक्टीव्हीटी आणि हवामानाच्या आधारावर ॲटो वेदर स्टेशन बसविण्यासाठी काही खाजगी कंपन्या पुढे आल्या आहेत. यावर्षी फलोत्पादन, फळबागांच्या संदर्भात जो विमा काढला होता, त्यात शेतकऱ्यांना २४ कोटी रुपयांचा मोबदला मिळणार आहे. यावर्षी रब्बी पिकांसाठी शेतकऱ्यांना २३५ कोटी रुपयांचा मोबदला

दिला जात आहे. महसूली मंडळाच्या कार्यक्षेत्रात एका गावात चांगला पाऊस पडला आणि त्याच्या शेजारी असलेल्या दुसऱ्या गावात पाऊस पडला नाही तरी, साधारणपणे तेथे चांगला पाऊस पडला आहे असे गृहित धरले जाते, त्यामुळे एखाद्या गावात पाऊस पडला नाही तरी, तेथील शेतकऱ्यांना फायदा मिळू शकत नाही, यामुळे शेतकरी वर्ग नाराज आहे. सेटलाईटच्या माध्यमातून फोटोग्राफ्स घेता आल्यास सदर योजनेत सुधारणा होऊ शकेल, असे विभागीय सचिवांनी स्पष्टीकरण दिले.

जो खर्च झालेला आहे, त्या अंतर्गत कोणत्या जिल्ह्यामध्ये व कोणत्या कारणांसाठी किती रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे याबाबतची माहिती समितीने विचारली असता त्यावर ५० कोटी रुपये एकत्रित निधी अग्रिम म्हणून देण्यात आला होता. परंतु ती रक्कम त्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये दिसत नसल्याने प्राप्त निधीची रक्कम १०० कोटी रुपये एवढीच दिसली. परंतु, प्रत्यक्षात १५० कोटी रुपये प्राप्त झाले होते. त्यामुळे हा खर्च अधिकचा झालेला नाही तर तो या ५० कोटी रुपयांमधून झालेला आहे.

जिल्हानिहाय देण्यात आलेल्या रक्कमेबाबत सांगावयाचे झाले तर, नाशिक जिल्ह्याला १९३ कोटी रुपये, धुळे शहर येथे १४९ कोटी रुपये, नंदूरबार येथे ७० कोटी रुपये, जळगाव येथे ७ कोटी १ लाख रुपये, औरंगाबाद येथे ४ कोटी ५१ लाख रुपये, जालना येथे ४ कोटी ३४ लाख रुपये देण्यात आलेले आहेत. अशा प्रकारे १५०० रुपये प्रति हेक्टरप्रमाणे रक्कम जाहीर झालेली आहे असे विभागीय सचिवांनी स्पष्टीकरण दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

विभागाकडून सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे निदर्शनास आले की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी ठिबंक सिंचन व तुषार सिंचन योजना राबविण्यात येत असून या योजने अंतर्गत दरवर्षी दोन लाख हेक्टर क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणण्याचे काम करण्यात येते. या योजनेस केंद्र शासनाकडून एक लाख हेक्टर क्षेत्रापर्यंत २५० कोटी रुपयाची सबसिडी मिळते. **ठिबक सिंचन योजनेस शेतकऱ्यांकडून मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याने केंद्रशासनाच्या राष्ट्रीय कृषी विकास योजनेसारखी विचाराधीन असलेली योजना राज्यात लवकरात लवकर सुरु करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी असी समितीची शिफारस आहे.**

केंद्र शासनाच्या मदतीवर अवलंबून न राहता राज्याने जास्त हॉर्सपॉवरच्या ट्रॅक्टरला सबसिडी देऊन शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. भारत हा कृषी प्रधान देश आहे. तेव्हा शेती उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने जास्त प्रयत्न केले पाहिजेत. राज्याचे बजेट ४१ हजार कोटींपेक्षा जास्त आहे.

कृषीसाठी आणखी पाच-सहा हजार कोटी रुपयांची तरतूद केल्यास शेतीचे उत्पादन वाढू शकेल. जलसपंदाच्या छोट्या छोट्या योजना आखून शेतीचे उत्पादन वाढविता येऊ शकेल. व्हीआयडीसीने नवीन स्कीम आणली आहे त्याचा राज्यास उपयोग करुन घेता येईल. शासनाने प्रॅक्टीकल विचार केला पाहिजे. इस्त्राईलमध्ये पाण्याचा प्रश्न बिकट असताना देखील त्यांनी निसर्गावर मात करुन विकास घडवून आणला आहे. राज्याकडे सर्व सुविधा असताना देखील आपण पाहिजे त्या प्रमाणात विकास करु शकलो नाही ही दुर्देवाची बाब आहे. याबाबत समितीने खंत व्यक्त केली. केंद्र सरकारच्या योजना येतात परंतु त्या योजनांची माहिती सर्व शेतकऱ्यांपर्यंत किंवा लाभार्थ्यापर्यंत पोहोचत नाही आणि जेव्हा माहिती पोहोचते तोपर्यंत ती योजना बंद झालेली असते. **राज्यातील कृषी विभागास ६ हजार कोटी रुपयांची आवश्यकता असताना सन २०१२-२०१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये कृषी विभागासाठी फक्त हजार कोटी रुपयांची आवश्यकता असताना सन अर्थसंकल्पामध्ये कृषी विभागासाठी फक्त २८८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ती एकूण अर्थसंकल्पाच्या एक टक्काही होत नाही ही खेदाची बाब असून इतक्या कमी प्रमाणात शासनाने कृषी विभागासाठी तरतूद केल्यास राज्यातील शेतीच्या उत्पादनात वाढ होणे शक्य नाही. त्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ करावयाची असल्यास शासनाने कृषी विभागासाठी किमान एकूण अर्थसंकल्पाच्या ५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त तरतूद करण्यात यावी असे समितीची शिफारस आहे.**

सेटलाईटच्या संदर्भात भविष्यात कार्यवाही करणे आवश्यक आहे. तांत्रिक अडचणी विचारात घेता विभागाने त्या संबंधी तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. हैद्राबाद येथे एनआरसीई रिसर्च सेंटर आहे. या रिसर्च सेंटरशी कृषी विभागाने संपर्क साधला होता. पीक विमा योजनेतंर्गत प्रत्येक क्षेत्रामध्ये ५० गावांचा गट तयार केला जातो. प्रत्येक क्षेत्रासाठी पीक विमा योजना तयार करता येऊ शकेल. परंतु गारपिटीमुळे ५० आणेवारीपेक्षा कमी किंवा जास्त नुकसानभरपाई झाली याची माहिती सदर केंद्रातून मिळत नाही. राज्यात कपाशीचे हजारो हेक्टर क्षेत्र आहे. अशा परिस्थितीत सदर संस्थेकडून ढोबळ स्वरुपात माहिती दिली जात आहे. या संदर्भात एकाच वेळी १०० टक्के सुधारणा होणे शक्य नाही. परंतु यासंबंधी लवकरात लवकर मोठ्या प्रमाणात सुधारणा होणे आवश्यक आहे. याबाबत केंद्र शासनाच्या अखत्यारित "फसल" नावाची संस्था कार्यरत आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने खाजगीकरणाच्या माध्यमातून सेटलाईटद्वारे आपल्याला माहिती मिळू शकेल किंवा कसे, या संबंधी अभ्यास सुरु केलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**गारपिटीमुळे होणाऱ्या नुकसानीसंबंधी एका परिसराचा विचार करीत असताना त्याच्याच बाजूला असलेल्या दुसऱ्या परिसराचा विचार केला जात नाही. तालुक्यांचा विचार केल्यास वेगवेगळ्या ठिकाणी**

**पर्जन्यमान मोजण्याची यंत्रणा लावलेली आहे. एखाद्या ठिकाणी खूप पाऊस पडतो, गारपीट होते परंतु तेथून १-२ कि.मी. अंतरावर पाऊस पडत नाही. अशा परिस्थितीत पर्जन्यमान यंत्रणेमार्फत पावसाची मोजणी केली जात असताना सर्व क्षेत्रांचा विचार होणे गरजेचे आहे. यासाठी सविस्तर अभ्यास करणे आवश्यक आहे. जेणेकरुन कोणावरही अन्याय होणार नाही, यासाठी राज्य शासनाने सार्वजनिक व खाजगी भागिदारीतून ॲटो वेदर स्टेशन्स उभारण्यासाठी १५० कोटी रुपयांची एक योजना तयार केली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी असी समितीची शिफारस आहे.**

राज्यात बहुतांश भागात दुष्काळ पडलेला आहे. **शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी शासनाने पीक विमा योजना सुरु केली आहे. परंतु त्यामध्ये अनेक उणिवा दिसून येत आहेत. महसूली मंडळाच्या कार्यक्षेत्रात एका गावात चांगला पाऊस पडला आणि त्याच्या शेजारी असलेल्या दुसऱ्या गावात पाऊस पडला नाही तरी, साधारणपणे तेथे चांगला पाऊस पडला आहे असे गृहित धरले जाते, त्यामुळे एखाद्या गावात पाऊस पडला नाही तरी, तेथील शेतकऱ्यांना फायदा मिळू शकत नाही, यामुळे शेतकरी वर्ग नाराज आहे. सॅटलाईटच्या माध्यमातून फोटोग्राफ्स घेता आल्यास सदर योजना प्रभाविपणे राबवता येईल. शेतकऱ्यांचे प्रत्यक्षात झालेले नुकसान व त्या अनुषंगाने मिळणारी नुकसान भरपाईची रक्कम यात खूप फरक असतो. या संदर्भात परिगणन पध्दतीत बदल करुन शेतकऱ्यांना निश्चित होणाऱ्या नुकसानी प्रमाणे शासनाची मदत कशी मिळेल त्याप्रमाणे सुधारणा करण्यात यावी असी समितीची शिफारस आहे.**

## नगरविकास विभाग

**खर्चमेळ व प्रशासकीय सेवाबाबत :-**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करत असताना अनुदान क्र.एफ-२ "नगरविकास व इतर प्रशासकीय सेवा "मधील प्रधान लेखा शिर्ष २०५३ "जिल्हा प्रशासन " अंतर्गत अधिक खर्च व प्रधान लेखा शिर्ष २२१७ "नगरविकास" या शिर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

**अनुदान क्र.एफ-२**
**"नगरविकास व इतर प्रशासकीय"**

**(रु.लाखात)**

| शीर्ष | एकूण विनियोजन किंवा अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| २०५३, जिल्हा प्रशासन | | | |
| ०९४ इतर आस्थापना | | | |
| ०९४ (०१)(०१) नागरी जमीन | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ यासाठी कर्मचारी वर्ग | | | |
| मूळ ३,९८.९९<br>पुनर्विनियोजन -३६.८६ | ३,६२.१३ | ३,६५.९४ | +३.८१ |

मुख्यत्वेकरुन वित्त विभागाने मान्य केलेल्या आठमाही सुधारित अंदाजामुळे आणि अधिकारी/कर्मचारी यांची पदे रिक्त असल्यामुळे रूपये ३६.८६ लाखाचा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक

ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, सन २००६-०७ या आर्थिक वर्षात या लेखाशिर्षाखाली मूळ तरतूद रु. ३,९८.९९ लाख इतकी होती. अंतिम तरतूद रु. ३,६२.१३ लाख इतकी होती. प्रत्यक्ष खर्च रु. ३,६२.१३ लाख एवढा झाला असला तरी महालेखापाल कार्यालयाने दर्शविल्याप्रमाणे रु. ३,६५.९४ लाख इतका आहे तथापि, सदर खर्चाचा खर्चमेळ झाला नसल्याने हा खर्च रु. ३.८१ लाख अधिक झालेला दिसतो. भविष्यात खर्चमेळ करण्याची दक्षता घेण्यात येईल. तरी कृपया सदर बाब क्षमापित करावी.

**(रु.लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण विनियोजन किंवा अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| २२१७ नगरविकास<br>८०- सर्वसाधारण<br>००१ संचालन व प्रशासन<br>००१(००)(०२) संचालक, नगररचना | | | |
| मूळ १,९३.६१<br>पुनर्विनियोजन - १६.२८ | १,७७.३३ | १,७३.१० | -४.२३ |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक

ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. प्रत्यार्पि १००७/प्र.क्र.१७/नवि-४,

दि. ३० मार्च, २००७ नुसार या प्रयोजनासाठी रु. १७७.३३ लाख इतकी अंतीम सुधारीत तरतुद करुन देण्यात आली होती. सदर तरतुदीतून या कार्यालयाचा खर्च रु. १७३.१० लाख इतका झाला असून याबाबत महालेखापाल यांच्या कार्यालयातील लेख्यांशी खर्चमेळही घालण्यात आला असून रु. ४.२३ लाख इतकी बचत झालेली आहे. या बचतीची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१) बहुतांशी विभागीय/शाखा कार्यालयाची देयके वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ देऊन कोषागार कार्यालयाने स्विकारली नाहीत.

२) विभागातील काही राजपत्रित/अराजपत्रित अधिकाऱ्यांची पदे रिक्त राहील्याने.

३) शासनाच्या प्रचलित काटकसरीच्या धोरणाचा अवलंब केल्याने.

**(रु.लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण विनियोजन किंवा अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| ८०- सर्वसाधारण<br>००१ संचालन व प्रशासन<br>००१ (००) (०४) महानगरपालिका/नगरपरिषदा यांसाठी नगर रचना आस्थापना | | | | |
| मूळ | २,२९.९५ | | | |
| पुनर्विनियोजन | -५९.९५ | १,७०.०० | १,६५.०३ | -४.९७ |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक
ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. प्रत्यार्पि १००७/प्र.क्र.१७/नवि-४, दि.३० मार्च, २००७ नुसार या प्रयोजनासाठी रु. १,७०.०० लाख इतकी अंतीम सुधारीत तरतूद करुन देण्यात आली होती. सदर तरतूदीतून या कार्यालयाचा खर्च रु. १,६५.०३ लाख इतका झाला असून याबाबत महालेखापाल यांच्या कार्यालयातील लेख्यांशी खर्चमेळही घालण्यात आला असून रु. ४.९७ लाख इतकी बचत
झालेली आहे. या बचतीची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. बहुतांशी विभागीय/शाखा कार्यालयाची देयके वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ देऊन कोषागार कार्यालयाने स्विकारली नाहीत.

२. विभागातील काही राजपत्रित /अराजपत्रित अधिकाऱ्यांची पदे रिक्त राहिले.

३. शासनाच्या प्रचलित काटकसरीच्या धोरणाचा अवलंब केले.

**(रु.लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण विनियोजन किंवा अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण<br>००१ संचालन व प्रशासन<br>००१(००)(०६) प्रादेशिक योजना तयार करणे | | | | |
| मूळ | १,६२.३९ | | | |
| पुनर्विनियोजन | -३५.५२ | १,२६.७८ | १,२१.३८ | -५.४९ |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक

ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. प्रत्यार्पि १००७/प्र.क्र.१७/नवि-४ दि.३० मार्च, २००७ नुसार या प्रयोजनासाठी रु. १,२६.७८ लाख इतकी अंतिम सुधारित तरतूद करुन देण्यात आली होती. सदर तरतूदीतून या कार्यालयाचा खर्च रु. १,२१.३८ लाख इतका झाला असून याबाबत महालेखापाल यांच्या कार्यालयातील लेख्यांशी खर्चमेळही घालण्यात आला असून रु. ५.४९ लाख इतकी बचत झालेली आहे. या बाबतची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१. बहुतांशी विभागीय/शाखा कार्यालयाची देयके वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ देऊन कोषागार कार्यालयाने स्विकारली नाहीत.

२. विभागातील काही राजपत्रित /अराजपत्रित अधिकाऱ्यांची पदे रिक्त राहिल्याने.

३. शासनाच्या प्रचलित काटकसरीच्या धोरणाचा अवलंब केल्याने.

**(रु.लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण विनियोजन किंवा अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण<br>००१ संचालन व प्रशासन<br>००१ (००)(०७) महानगर क्षेत्रे व इतर शहरे/नगरे यांतील वाहतुक सर्वेक्षणे | | | | |
| मूळ | ५६.९१ | | | |

| | | ३९.९० | ३८.८४ | -१.०६ |
|---|---|---|---|---|
| पुनर्विनियोजन | -१७.०१ | | | |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक

ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. प्रत्यार्पि १००७/प्र.क्र.१७/नवि-४, दि.३० मार्च, २००७ नुसार याप्रयोजनासाठी रु. ३९.९० लाख इतकी अंतीम सुधारीत तरतूद करुन देण्यात आली होती. सदर तरतूदीतून या कार्यालयाचा खर्च रु. ३८.८४ लाख इतका झाला असून याबाबत महालेखापाल यांच्या कार्यालयातील लेख्यांशी खर्चमेळही घालण्यात आला असून रु. १.०६ लाख इतकी बचत झालेली आहे. या बचतीची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. बहुतांशी विभागीय/शाखा कार्यालयाची देयके वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ देऊन कोषागार कार्यालयाने स्विकारली नाहीत.
२. विभागातील काही राजपत्रित /अराजपत्रित अधिकाऱ्यांची पदे रिक्त राहिल्याने.
३. शासनाच्या प्रचलित काटकसरीच्या धोरणाचा अवलंब केल्याने.

(रु.लाखात)

| शीर्ष | | एकूण विनियोजन किंवा अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २२१७-नगर विकास<br>८०- सर्वसाधारण<br>००१ संचालन व प्रशासन<br>००१ (००) (०३) संचालक, नगररचना | | | | |
| मूळ | ११,७०.२७ | | | |
| | | ११,०६.८८ | १०,८६.०० | -२३.८८ |
| पुनर्विनियोजन | -६३.४० | | | |

पदे रिक्त राहिल्यामुळे आणि वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या मागण्या उशीराने मिळाल्यामूळे वित्त विभागाने मान्य केलेल्या सुधारित अंदाजाच्या आधारे वरील नमुद केलेल्या शीर्षाखाली रु.१९२.१६ लाखाचा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक

ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. प्रत्यार्पि १००७/प्र.क्र.१७/नवि-४ दि.३० मार्च, २००७ नुसार याप्रयोजनासाठी रु. १,१०६.८८ लाख इतकी अंतीम सुधारीत तरतूद करुन देण्यात आली होती. सदर तरतूदीतून या कार्यालयाचा खर्च रु. १,०८६.००लाख इतका झाला असून याबाबत महालेखापाल यांच्या कार्यालयातील लेख्यांशी खर्चमेळही घालण्यात आला असून रु. २३.८८लाख इतकी बचत झालेली आहे. या बचतीची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. बहुतांशी विभागीय/शाखा कार्यालयाची देयके वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ देऊन कोषागार कार्यालयाने स्विकारली नाहीत.
२. विभागातील काही राजपत्रित /अराजपत्रित अधिकाऱ्यांची पदे रिक्त राहिले.
३. शासनाच्या प्रचलित काटकसरीच्या धोरणाचा अवलंब केले.

(रु.लाखात)

| शीर्ष | | एकूण विनियोजन किंवा अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| १९१(००)(०३) लहान व मध्यम शहरांच्या एकात्मिक विकासासाठी<br>१९१ स्थानिक संस्था महानगरपालिका, नगरविकास प्राधिकरणे, नगर सुधार मंडळे इत्यादींना सहाय्य-नगरपरिषदांना अनुरुप अंशदान | | | | |
| मूळ | ११,४१.८५ | ८,५८.५६ | ८,५८.५६ | --- |
| पुनर्विनियोजन | -२,८३.२९ | | | |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, मंजूर अनुदानाइतकाच खर्च झाल्याने अधिकचा खर्च वा बचत नाही.

(रु.लाखात)

| शीर्ष | | एकूण विनियोजन किंवा अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण<br>१९१ स्थानिक संस्था महानगरपालिका, नगरविकास प्राधिकरणे, नगर सुधार मंडळे इत्यादींना सहाय्य-<br>१९१ (००)(०१) महागाई भत्यांकरिता नगर परिषदांना सहाय्यक अनुदाने | | | | |
| मूळ | २,१८,५९.०० | १,७६,१४.९८ | १,७३,८३.१२ | -२,३१.८६ |
| पुनर्विनियोजन | -४२,४४.०२ | | | |

**टीपा व भाष्ये-**

मुख्यत्वेकरुन या योजने अंतर्गत २००३-२००४ व २००४-२००५ करिता प्रस्ताव न आल्यामुळे प्रत्यर्पणाव्दारे/पुनर्विनियोजनाव्दारे रु. ४२४४.०२ लाखाचा निधी काढण्यात आला.

रु. २३१.८६ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक

ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, या प्रयोजनासाठी मूळ तरतूद रुपये २,१८,५९.०० लाख इतकी होती. त्यानंतर तरतूदीमधेन रु. ३,००.०० लाख इतकी तरतूद पुनर्विनियोजन आदेशाव्दारे वळती करण्यात आली. त्यामुळे मूळ तरतूद रु. २,१५,५९.०० लाख इतकी झाली वित्त विभागाने मान्य केलेल्या सुधारित अंदाजानुसार रु. ३१,०६.५२ लाख इतकी रक्कम पुनर्विनियोजनाव्दारे कपात करण्यात आली. त्यामुळे अंतिम तरतूद रु. १८४,५१.४८ लाख इतकी होती. तथापि, खर्चमेळाची कार्यवाही वेळीच न झाल्याने बचत दिसून येत आहे. तरी कृपया सदर बाब क्षमापित करावी.

**(रु.लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण विनियोजन किंवा अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण<br>१९१ स्थानिक संस्था महानगरपालिका, नगरविकास प्राधिकरणे, नगर सुधार मंडळे इत्यादींना सहाय्य-<br>१९१(००)(३७) मंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी अतिरिक्त केंद्रिय सहाय्य | | | | |
| मूळ | ४,००,००.०० | १,९८,६५.३७ | १,२३,८३.१७ | -७४,८२.२० |
| पुनर्विनियोजन | -२,०१,३४.६३ | | | |

कोणतेही विशिष्ट कारण न देता (रु. १०३५६.४५ लाख) आणि नियोजन व वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारीत अंदाजाच्या आधारे (रु. ९७७८.१८ लाख) रु. २०१३४.६३ लाखाचा निधी परत केला./पुनर्विनियोजन केला. रु. ७४८२.२० लाखाच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाही. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक

ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने रु. ४५२६ कोटीच्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत प्रथम अंमलबजावणी करण्यात संस्थानी

प्रकल्पावर खर्च करुन केलेल्या खर्चाचे प्रतिपूर्ती दावे जागतिक बँकेस सादर केल्यानंतर जागतिक बँक तेवढीच रक्कम प्रतिपूर्तीच्या स्वरुपात केंद्र शासनास वितरीत करते व केंद्र शासन जागतिक बँकेकडून प्राप्त झालेली सदर रक्कम अतिरिक्त केद्रीय सहाय्याच्या स्वरुपात राज्य शासनास वितरीत करते. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेली अतिरिक्त केंद्रीय सहाय्याची रक्कम राज्य शासनाच्या कोषागारात प्राप्त झाल्यानंतर व वित्त विभागाने तसे प्रमाणित केल्यानंतर सदर रक्कम प्रकल्पाची नोडल एजन्सी असलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात वितरीत केली जाते. केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त होणारी अतिरिक्त केंद्रीय सहाय्याची रक्कम वितरीत करण्याकरीता नोशनल स्वरुपाची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येते व केंद्र शासनाकडून प्रत्यक्षात जितकी रक्कम प्राप्त होईल तितकीच रक्कम वितरीत करण्यात येते. त्यामुळे उर्वरित रक्कम प्रत्यार्पित करण्यात येते किंवा आवश्यकतेनुसार पुनर्नियोजन करण्यात येते. या प्रयोजनासाठी सन २००६-०७ मध्ये मूळ अर्थसंकल्पीय तरतूद रु. ४००,००,००,०००/- उपलब्ध होती. सदरहू तरतूदीमधून शासन निर्णय दि. २३/३/२००७ अन्वये पुनर्विनियोजनाव्दारे रु. ९७,७८,१८,०००/- एवढी रक्कम कपात केली तसेच शासन निर्णय दि. ३०/३/०७ अन्वये रु. ४८,३२,३७,०००/- अशी एकूण रु. १४६,१०,५५,०००/- पुनर्विनियोजनाव्दारे अन्य योजनांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे उपलब्ध तरतूद रु. २५३,८९,४५,०००/- मधून रु. १२३,८३,१७,०००/- एवढा प्रत्यक्ष खर्च झाला असून उर्वरित रु. १५०,०६,२८,०००/- प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

**(रु.लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण विनियोजन किंवा अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण<br>१९१ स्थानिक संस्था, महानगरपालिका, नगरविकास प्राधिकरणे, नगर सुधार मंडळे इत्यादीना सहाय्य-<br>१९१ (००)(४१) अमरावती, अबानाला विकास कार्यक्रमासाठी सहाय्यक अनुदान | | | | |
| मूळ | १,००.०० | | | |
| | | ७७.४१ | ७७.४१ | --- |
| पुनर्विनियोजन | -२२.५९ | | | |

कोणतेही विशिष्ट कारण न देता रक्कम २२.५९ लाखाचा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक

ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, अमरावती शहरातील अंबानाले व उपनाले यांचे बांधकामाकरिता रु. १२.७१ कोटी खर्चाच्या कामास १९९५ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदरचे काम प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाल्याने व डिझाईनमध्ये बदल झाल्याने रु. १२.७१ कोटी इतक्या रकमेत पूर्ण होणार नसल्याने अमरावती महानगरपालिकेच्या रु. ७.८४ कोटी अतिरिक्त मागणीनुसार २००६-०७ च्या अर्थसंकल्पात अमरावती महानगरपालिकेस देय असणाऱ्या रु. ७७.४१ लक्ष रकमेव्यतिरिक्त अतिरिक्त मागणी मंजूर होईल हे गृहीत धरुन एकूण रु. १०० लक्षाची तरतूद करण्यात आली होती. तथापि, अतिरिक्त तरतूदीची मागणी नियोजन विभगाने अमान्य केल्याने अमरावती महानगरपालिका रु. ७७.४१ लक्ष वितरीत करुन उर्वरित रु. २२.५९ लक्ष झालेली बचत दि. ३० मार्च, २००७ च्या आदेशान्वये प्रत्यार्पित करण्यात आली.

**(रु.लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण विनियोजन किंवा अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण<br>१९१ स्थानिक संस्था महानगरपालिका, नगरविकास प्राधिकरणे, नगर सुधार मंडळे इत्यादींना सहाय्य-<br>१९१ (००)(४७) १२ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार नागरी स्थानिक संस्थांना अनुदान | | | | |
| मूळ | १,५८,२०.०० | | | |
| पूरक | १,५५,००.०० | २,३४,१०.०० | २,३४,१०.०० | --- |
| पुनर्विनियोजन | -७९,१०.०० | | | |

केंद्र सरकारकडून दुसरा हप्ता न मिळाल्यामुळे रु. ७९१० लाखांचा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक

ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, सदर योजनेकरिता मूळ तरतूद रु. १५८,२०.०० लाख इतकी होती.

सन २००५-०६ मधील केंद्र शासनाकडून देय असलेली रु. १५५,००.०० लाख इतकी तरतूद जुलै, २००६ मध्ये पुरक मागणीव्दारे उपलब्ध करण्यात आली. त्यामुळे सदर योजनेकरिता रु. ३१३,२०.०० लाख इतकी तरतूद उपलब्ध झाली. सदर तरतूदीपैकी रु. २३४,१०.०० एवढी तरतूद खर्च झाली असून उर्वरित रु. ७९.१०.०० केंद्र शासनाकडून अनुदानाचा दुसरा हप्ता प्राप्त न झाल्याने प्रत्यार्पित करण्यात आली आहे. त्यामुळे सदर योजनेखाली कमी अथवा जादा खर्च झालेला नाही.

(रु.लाखात)

| शीर्ष | | एकूण विनियोजन किंवा अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण<br>१९१ स्थानिक संस्था महानगरपालिका, नगरविकास प्राधिकरणे, नगर सुधार मडळ इत्यादींना सहाय्य<br>१९१(००) (४८) पंचवार्षिक योजनातंर्गत योजना जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान | | | | |
| मूळ | ७,००,००.०० | | | |
| पूरक | २३,३०.७८ | ४,६९,४७.१९ | ४,४३,२२.३१ | -२६,२४.८८ |
| पूनर्विनियोजन | -२,५३,८३.५९ | | | |

केंद्र सरकारने सी.डी.पी.मंजुर न केल्यामुळे रु.२५३८३.५९ लाखांचा निधी परत करण्यात आला रु.२६२४.८८ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक

ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, सन २००६-०७ मध्ये या आर्थिक वर्षामध्ये या प्रयोजनासाठी मुळ अर्थ संकल्पीय तरतूद रु. ७००,००.०० लक्ष उपलब्ध होती. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात दि. ३१ मार्च, २००६ रोजी आकस्मिकता निधीतून घेतलेला रु. २३,३०.७८ लक्ष अग्रीमाची प्रतिपूर्ती जुलै, २००६ च्या अधिवेशनामध्ये शासन निर्णय दि.६ डिसेंबर, २००६ अन्वये पुरक मागणीद्वारे करण्यात आली. त्यामुळे सदर तरतुद रु. ७२३,३०.७८ लक्ष इतकी झाली आहे. त्यापैकी रु. २५३,८३.५९ लक्ष इतकी रक्कम अभियानाखाली केंद्र शासनाकडून काही प्रकल्पांचे सविस्तर आराखडे अनुदानासाठी आर्थिक वर्षात मंजूर न झाल्याने सदर तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली. त्यामुळे अंतिम सुधारित तरतूद रु. ४६९,४७.१८ लक्ष इतकी होती.

महालेखापाल कार्यालयाने जरी रु.४४३,२२.३१ लक्ष इतका खर्च नोंदविला असला तरीही विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. ४६९,४७.१८ लक्ष इतकाच म्हणजेच अंतिम तरतूदी इतका झाला आहे. त्यामुळे या अभियानाखाली अधिकचा खर्च वा बचत नाही. महालेखापाल कार्यालयाने दर्शविलेली बचत ही खर्चमेळाची कार्यवाही ही वेळीच न झाल्याने दिसून येत आहे. यापुढे खर्चमेळाची कार्यवाही वेळीच होईल याची दक्षता घेण्यात येईल. सबब, सदर बाब कृपया क्षमापित करावी.

(रु.लाखात)

| शीर्ष | | एकूण विनियोजन किंवा अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण<br>१९१ स्थानिक संस्था महानगरपालिका, नगरविकास प्राधिकरणे, नगर सुधार मडळ इत्यादींना सहाय्य<br>१९१(००) (२५) नागरी क्षेत्रातील दलित वस्त्यांना सुविधा पुरविणे (विशेष घटक योजना) | | | | |
| मूळ | १,१३,०६.१८ | | | |
| | | १,२१,१७.३६ | १,७३,११.०६ | +५१,९३.७० |
| पूनर्विनियोजन | ८,११.१८ | | | |

वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारीत अंदाजाच्या आधारे विनियोजनाव्दारे तरतूद केलेल्या रु. ८११.१८ लाखाचा निधी रु. ५१९३.७० लाखाचा अंतिम खर्च विचारात घेता अपर्याप्त असल्याचे सिध्द झाले आहे, त्याची कारणे कळविण्यात आलेली नाही .(ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक

ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, सन २००६-०७ मध्ये या योजनेकरिता मूळ तरतूद रु. ११३,०६.१८ लाख इतकी होती. जिल्हा वार्षिक योजनेच्या पुनर्विनियोजनाव्दारे रु. ८,११.१८ लाख इतकी तरतूद वित्त विभागाने सुधारीत अदाजात मंजूर केली. तसेच दिनांक २३.०३.०७ च्या पुनर्विनियोजन आदेशान्वये मुंबई नागरी परिवहन प्रकल्प योजनेखाली उपलब्ध असलेली बचत रक्कम रु. १५१,८८.८२ लाख मधून रु. ४८,३२.३७ लाख इतकी तरतूद नागरी दलित वस्ती योजनेकरिता उपलब्ध करण्यास विशेष बाब म्हणून वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सदर योजनेखाली एकूण रु. १६९,४९.७३ लाख इतकी तरतूद उपलब्ध झाली असून ती सर्व तरतूद खर्च झालेली असल्याने सदर योजनेअंतर्गत अधिकचा खर्च वा बचत नाही.

**साक्ष :**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील नगर विकास विभागाच्या मागणी क्रमांक एफ-२ संदर्भात समितीने दिनांक १० जानेवारी,

२०१२ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी लेखाशिर्ष एफ-२, जिल्हा प्रशासन अंतर्गत रु ३.८१ लाख अधिक खर्च कसा झाला असे कारणमिमांसा समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी खुलासा करतांना, रु. ३.८१ लक्ष रुपयांचा अधिकचा खर्च झाल्याचे मान्य केले. सदर खर्चाचा खर्चमेळ झाला नसल्यामुळे अधिक खर्च झालेला असल्याने भविष्यात खर्चमेळ करण्याची दक्षता घेतली जाईल व सदर बाब क्षमापित करावी अशी विनंती विभागीय सचिवांनी केली. विभागाने खर्चमेळाचे काम विहित मुदतीत करावे व त्याचा अहवाल वेळच्यावेळी महालेखापाल कार्यालयास सादर करावा व यापुढील काळात ही सबब खपवून घेतली जाणार नाही असे सूचित केले. आता विभागाकडून वेळेवर खर्चमेळ करण्यात येते काय? असे समितीने विचारले असता सन २००८-०९ पासून महालेखाकारांच्या स्तरावर नियमितपणे बैठका घेतल्या जातात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विनियोजन लेखे, अनुदानासंबंधी प्रमाणित खर्चाच्या संदर्भात काही ठिकाणी बचत व काही ठिकाणी अधिकचा खर्च कोणत्या कारणामुळे झाला तसेच राजपत्रित व अराजपत्रित अधिकाऱ्यांची पदे रिक्त राहिल्यामुळे बचत झाल्याचे स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केलेले आहे. सदरहू पदे भरण्यासंबंधी स्थगिती दिली आहे काय? याबाबत स्पष्टीकरण करण्यास सांगण्यात आले. यावर माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जी बचत झाली आहे, ती किरकोळ आहे. ४.२३ लक्ष रुपये, ४.९७ लक्ष रुपये व ५.४९ लक्ष रुपयांची बचत झाली आहे. त्याची विविध कारणे आहेत. त्यात बहुतांशी विभागीय / शाखा कार्यालयाची देयके वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ देऊन कोषागार कार्यालयाने स्वीकारली नाहीत. शासनाने काटकसरीच्या धोरणाचा अवलंब करणे, त्याचप्रमाणे विभागातील राजपत्रित / अराजपत्रित अधिकाऱ्यांची पदे रिक्त राहणे इत्यादी कारणे आहेत. ज्या ज्या ठिकाणी डीपी युनिट सुरु झालेले आहेत तेथील चौकांचे डिझाईन करुन ते महानगरपालिकांकडे मंजुरीसाठी पाठविले जातात. त्यात ट्रॅफिक व ट्रान्सपोर्टेशनचा समावेश आहे. त्याचे पुणे येथे मध्यवर्ती कार्यालय असून येथे उपसंचालक दर्जाचा अधिकारी काम करीत आहे. त्यांच्या अखत्यारीत नगर रचनाकारांकडून कामे केली जातात. त्यांच्याकडून जवळजवळ ५० चौकांचे डिझाईन करुन घेतले होते. त्यांच्याकडे तांत्रिक स्वरुपाचे अधिकारी कार्यरत नाहीत. त्यावेळी आर्थिक काटकसरीच्या धोरणाचे बंधन असल्यामुळे त्या काळात पदे भरता आली नाहीत. आता सदरहू पदे भरण्यासाठी कोणतेही बंधन नाही. यासंबंधी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रक्रिया सुरु केली आहे अशी माहिती समितीस देण्यात आली.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येणाऱ्या पदांमध्ये कोणती पदे समाविष्ट होती याची माहिती देताना सहाय्यक संचालक नगर रचना स्तरावरील जवळपास ६० पदे रिक्त होती. तसेच नगर

रचना अधिकाऱ्याची ११४ पदे भरावयाची आहेत. ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. परंतु हा विषय तांत्रिक असल्यामुळे विशेष बाब म्हणून सदरहू पदे भरली पाहिजेत. नगर रचना हा विकासाचा मुख्य पाया आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पदे भरल्यास त्यातून नव्याने उमेदवार प्राप्त होतील. या सर्व बाबींचा विचार करता सेवाप्रवेश नियमाध्ये बदल करणे अत्यावश्यक आहे. अशी सूचना समितीने केली. तथापि, या संदर्भात बदल करण्यात आलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नगर रचना अधिकाऱ्यांच्या रिक्त असलेल्या ११४ पदांसंबंधी समितीस टिप्पणी सादर करण्यासंदर्भात समितीने विभागास निदेश दिले असता सदरहू माहिती समितीस सादर करण्यात येईल असे आश्वासन समितीस देण्यात आले होते परंतु अद्यापपर्यंत समितीस सदर माहिती प्राप्त झाली नाही.

कायद्यानुसार शासनाने मर्यादित कालावधीत विकास आराखडे मंजूर करणे अत्यावश्यक आहे. सध्याच्या परिस्थितीत शासनाकडे राज्यातील वेगवेगळ्या शहरांचे विकास आराखडे मंजुरीसाठी प्रलंबित आहेत. नगर रचना अधिकाऱ्यांकडूनच या संदर्भातील कामे करुन घ्यावी लागणार आहेत, असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी विषद केले की, इमारतीच्या बांधकामाची परवानगी देणे, ले-आऊट यांची तपासणी करणे, ही सर्व कामे नगर रचना अधिकाऱ्यांकडूनच होणे आवश्यक आहे. नगर रचना कार्यालयात पदे रिक्त असल्यामुळे तेथे महानगरपालिकांच्या कनिष्ठ अभियंता व उप अभियंत्यांकडे सदरहू कामे दिली जातात. इमारतीच्या बांधकामाच्या परवानगीच्या छाननीची कामे महानगरपालिकांच्या अधिकाऱ्यांकडून करुन घेणे, ही बाब योग्य नाही. एका वर्षाच्या कालावधीत रिक्त असलेल्या पदांपैकी ५० टक्के पदे भरण्यासाठी विभाग प्रयत्न करीत आहे. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागाने प्राधान्याने करावी. सदरहू प्रक्रियेसाठी वेळ लागणार असल्यास आवश्यक असलेली पदे विभाग तातडीने भरु शकतो त्यानंतर उर्वरित भरतीची प्रक्रिया सुरु राहू शकते. विभागाकडे कर्मचारी नसल्यामुळे खर्च होऊ शकला नाही त्यामुळे बचत झाली आहे. या संदर्भात विभागाने योग्य ती कार्यवाही तातडीने करावी अशीही सूचना समितीने विभागास केली.

महागाई भत्यांकरीता नगर परिषदांकरिता सहाय्यक अनुदाने या अंतर्गत बचत झाल्यासंदर्भात दिलेल्या सुधारित अंदाजानुसार ३१,०७.५२ लक्ष रुपयांची रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे कपात करण्यात आली. असे सांगितले या संदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सागितले की, महागाई भत्त्यांच्या संदर्भात रु. २१८,५९.०० लक्ष मूळ तरतूद होती. दि. ७.१२.२००६ च्या पुनर्विनियोजन आदेशान्वये ३ कोटी रुपयांची कपात केली. त्यानंतर वित्त विभागाने सुधारित अंदाजात ३१.०७ कोटी रुपयांची रक्कम

कपात केली होती. तसेच दि. ३०.३.२००७ रोजीच्या आदेशान्वये वित्तीय वर्षाखेर रु.३९.४४ कोटी रुपयांची रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली. त्यामुळे अंतिम तरतूद रु.१८४,५१.४८ लक्ष इतकी होती.

रु.१८४,५१.४८ लक्ष तरतूद असताना २१८ कोटी रुपयांच्या आधारावर तरतूद का करण्यात आली ? असे समितीने विचारले असता, मागील वर्षीची आकडेवारी गृहित धरुन महानगरपालिकांना अनुदान दिले जाते. त्यात सुरुवातीला दि. ७.१२.२००६ च्या पुनर्विनियोजन आदेशान्वये ३ कोटी रुपयांची कपात करण्यात आली व त्यानंतर वित्त विभागाने सुधारित अंदाजात रु.३१.०७ कोटी रुपयांची कपात केली होती. त्यात विभागाकडून प्रत्यक्षात काही चुका झाल्या होत्या. असे विभागीय सचिवांनी सांगीतले. यावर स्पष्टीकरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००६-०७ मध्ये २१८ कोटी रुपयांच्या मूळ तरतुदीमधून उक्त तिन्ही कपातीच्या रकमा वजा केल्यानंतर प्रत्यक्ष उपलब्ध तरतूद रु.१४५.०७ कोटी एवढी राहिली. तथापि, प्रत्यक्षात १७६.१४ कोटी रुपयांचा निधी वितरित झाला. त्यामुळे ३१.०७ कोटी रुपयांचा वाढीव खर्च झाल्याचे दिसून येते. मात्र दि.३०.३.२००७ रोजी ८.३६ कोटी रुपयांच्या वाढीव खर्चाची रक्कम प्रत्यार्पित करणे आवश्यक असताना अनावधनाने रु.३९.४४ कोटी रुपयांच्या प्रत्यार्पणाचा आदेश काढण्यात आला.

पंचवार्षिक योजनेंअतर्गत योजना जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियान यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, डिसेंबर, २००५ मध्ये राष्ट्रीय पातळीवर जेएनएनयुआरएम सुरु करण्यात आले. या प्रयोजनासाठी सन २००६-०७ या आर्थिक वर्षात ७२३,३०.७८ लक्ष रुपयांची मूळ तरतूद करण्यात आली होती. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात दि. ३१ मार्च, २००६ रोजी आकस्मिकता निधीतून २३,३०.७८ लक्ष रुपयांचा अग्रीम घ्यावा लागला होता. डिसेंबर, २००६ मध्ये पूरक मागणीद्वारे त्या अग्रीमाची प्रतिपूर्ती करण्यात आली. त्यामुळे ७२३,३०.७८ लक्ष रुपयांची एकूण तरतूद झाली. परंतु आर्थिक वर्षांत केंद्र शासनाकडून काही प्रकल्पांचे आराखडे अनुदानासाठी मंजूर न झाल्यामुळे सदरहू रकमेपैकी २५३,८३.५९ लक्ष रुपयांची तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली. त्यामुळे अंतिम सुधारित तरतूद ४६९,४७.१८ लक्ष रुपयांची इतकी होती. या संदर्भात महालेखाकार कार्यालयाने ४४३,२२.३१ लक्ष रुपयांचा खर्च नोंदविला असला तरी, प्रत्यक्षात विभागाकडून ४६९,४७.१८ लक्ष रुपयांचा खर्च झाला आहे.

जवाहरजलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुररुत्थान अभियानासाठी तरतूद असताना वेळेवर खर्च का होत नाही? याबाबत माहिती विचारली असता विभागीय सचिवांनी सागितले की, डिसेंबर, २००५ मध्ये राष्ट्रीय पातळीवर जेएनएनयुआरएम सुरु झाल्यानंतर सन २००६-०७ मध्ये सविस्तर प्रकल्प अहवालमध्ये

तरतूद करण्यासाठी शहर विकास आराखडा तयार करुन केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावे लागतात. त्याचप्रमाणे प्रकल्पांसंबंधी केंद्र शासनाकडे सामज्यस करार सादर करावे लागतात. त्यानंतर प्रकल्प घ्यावयाचे असतात. सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झाल्यानंतर प्रकल्पासाठी मंजूर झालेल्या अनुदानाचा हफ्ता राज्य शासनाकडे प्राप्त होतो. प्राप्त झालेल्या पहिल्या हफ्त्याच्या रकमेचा विनियोग झाल्यानंतर त्या बाबतची सविस्तर माहिती केंद्र शासनाकडे सादर करावी लागते. त्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून राज्य शासनाला प्रकल्पासाठी पुढील हफ्त्यांची रक्कम प्राप्त होत असते. त्यामुळे सुरुवातीला ७०० कोटी रुपयांची तरतूद होती. परंतु सदरच्या आर्थिक वर्षात केंद्र शासनाने शहर विकास आराखडा मंजूर न केल्यामुळे ७२३,३०.७८ लक्ष रुपयांपैकी रु.२५३,८३.५९ लक्ष रुपयांची रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली. उर्वरित ४६९,४७.१९ लक्ष रुपयांचा निधी खर्च झाला आहे.

निधी वेळेवर खर्च न झाल्यामुळे केंद्र शासनाकडून जो निधी मिळतो त्यावर परिणाम होतो, असे मत समितीने व्यक्त केले असता. सन २००५ ते २०१२ पर्यंतचा कालावधी जेएनएनयुआरएमचा कालावधी आहे. जे प्रकल्प मंजूर होतात त्या प्रकल्पांचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर पुढील हप्ता वितरित केला जातो. केंद्र शासनाकडून नागरी पायाभूत सुविधा व प्रशासन अंतर्गत ८० प्रकल्पांना मंजुरी मिळालेली आहे. केंद्र शासनाने राज्य शासनाकरिता जे वाटप ठेवले होते ते विभागाने पूर्णपणे प्राप्त केलेले आहे. असे विभागीय सचिवांनी सागितले.

केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्यापेक्षा इतर राज्यांना जास्त निधी मिळालेला आहे हे खरे आहे काय ? अशी समितीने पृच्छा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्याला इतर राज्यांपेक्षा जास्त अनुदान मिळालेले आहे. इतर राज्यांपेक्षा जास्त अनुदान महाराष्ट्र राज्याला मिळाले तर ते अनुदान पूर्णपणे खर्च करु का शकले नाही. याबाबत कारण मिमासा देताना या आर्थिक वर्षाची तरतूद मिळविण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. प्रकल्पाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर केंद्र शासनाकडून पुढील हप्ता वितरित केला जातो. देशात महाराष्ट्र राज्याचे कार्य इतर राज्यांपेक्षा चांगले आहे, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

समितीने पुणे शहराचे उदाहरण देताना विभागास सांगितले की, पुणे शहरात नाल्याच्या बाजूला झोपड्या उभारल्या जातात. पावसाळ्यात नाल्याला पूर येऊन झोपड्यांमध्ये पाणी शिरते. त्यामुळे बऱ्याच अडचणी निर्माण होतात. नाल्यांची सफाई करण्यासाठी निधी प्राप्त झाला होता. परंतु आता ते नालेच अस्तित्वात नाहीत. नाले सफाईचे ५० टक्के सुध्दा काम पूर्ण झालेले नाही. मग उपयोगिता प्रमाणपत्र कसे काय देणार ? नाल्यांच्या सफाईसाठी प्राप्त झालेला संपूर्ण निधी खर्च करु शकलो नाही.शहराच्या विकासासाठी निधीची आवश्यकता असते. अर्थसंकल्पात ग्रामीण भागाच्या विकासासाठी जास्त निधी

देण्यात आलेला आहे. ५१ टक्के नागरिकीरण झाल्यानंतर शहराचा बकालपणा वाढलेला आहे. त्यामुळे शहराच्या विकासासाठी निधी मिळाला पाहिजे. महाराष्ट्र राज्याला केंद्र शासनाकडून इतर राज्यांपेक्षा जास्त निधी मिळालेला आहे. परंतु विभाग तो निधी पूर्णपणे खर्च करु शकला नाही. नदी सुधार प्रकल्प असेल किंवा नाल्यांचे काम असेल यामध्ये फारशी प्रगती झालेली दिसत नाही. जव्हारलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत पुणे शहरातील नाले सफाईच्या कामावर किती निधी खर्च झालेला आहे याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात यावी. असे निदेश समितीने विभागास दिले यासंदर्भात माहिती देताना जव्हारलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत पुणे शहरासाठी आणि पिंपरी-चिंचवड शहरासाठी केंद्र शासनाने जो प्रकल्प मंजूर केलेला आहे त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल. तसेच पुणे शहरासाठी पर्जन्य व्यवस्थापनाचा प्रकल्प मंजूर करण्यात आला होता. परंतु महाराष्ट्र राज्याचे वाटप पूर्णपणे खर्च झाल्यामुळे नंतर त्या प्रकल्पाची व्याप्ती कमी करण्यात आली. सुधारीत प्रस्ताव पाठवून मंजूर करुन घेतलेला असून चार बेसिन्समध्ये काम सुरु आहे. त्याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात येईल. असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले परंतु अद्यापपर्यंत विभागाकडून सदर माहिती अप्राप्त आहे.

पुणे शहरासाठी पर्जन्य व्यवस्थापनाचा प्रकल्प मंजूर करण्याचा प्रस्ताव केव्हा पाठविला याबाबत समितीने विचारले असता जव्हारलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अधियान कार्यक्रम डिसेंबर, २००५ मध्ये राष्ट्रीय पातळीवर सुरु झाला होता. सन २००६-०७ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडे जेवढे प्रस्ताव पाठविण्यात आले होते त्यापैकी जे प्रस्ताव मंजूर झाले त्यासाठी केंद्र शासनाकडून निधी मंजूर करण्यात आला होता. सन २००६-०७ मध्ये जे प्रस्ताव मंजूर होऊ शकले नाहीत ते प्रस्ताव पुढील वर्षी मंजूर झालेले आहेत. केंद्र शासनाकडे जेवढ्या प्रकल्पांचे प्रस्ताव पाठविण्यात आले होते तेवढे प्रस्ताव मंजूर करुन घेतलेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कोणतेही विशिष्ट कारण न देता आणि नियोजन व वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारीत अंदाजाच्या आधारे रु २०,१३४.६३ लाख रुपये निधी परत केल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. सदर निधी खर्च न होण्याच्या कारणांची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाअंतर्गत उपनगरीय लोकल ट्रेनची वाहतूक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने नवीन रेल्वे लाईन टाकण्याचे काम सन २००३ पासून हाती घेण्यात आले होते. सन २००६-०७ साली या कार्यक्रमामध्ये ७४ कोटी रुपयांची बचत झालेली आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामध्ये रस्ते, रेल्वे आणि पुनर्वसन असे तीन घटक आहेत. रेल्वे लाईनच्या बाजूला असलेल्या झोपड्यांच्या पुनर्वसनाचे

काम पूर्ण झालेले आहे. परंतु त्यावेळी उपनगरीय लोकल ट्रेनची वाहतूक क्षमता वाढविण्याचे काम व इतर कामे वेळेवर पूर्ण न झाल्यामुळे ७४ कोटी रुपयांची बचत झालेली आहे.

रेल्वे या घटकासाठी ४५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु ४५ कोटी रुपयांपैकी त्यावर्षी फक्त १२ कोटी रुपये खर्च झाले होते. ईएमयू रेक्सची डिझाईन वेळेवर मंजूर न झ ााल्यामुळे संपूर्ण रक्कम खर्च होऊ शकली नाही. भारतीय रेल्वेची रेक्स बनविण्याची फॅक्टरी चेन्नई येथे आहे. या रेक्ससाठी लागणाऱ्या ट्रॅक्शन मोटर्स बनविण्याचे काम जर्मनी येथील सिमेन्स कंपनीकडे देण्यात आले होते. डिझाईन मंजूर करण्याच्या कामामध्ये ६ महिन्यांचा विलंब झाल्यामुळे रेक्स बनविण्याचे काम उशिरा सुरु झाले. त्यामुळे आपण त्यावर्षी ४५ कोटी रुपयांपैकी फक्त १२ कोटी रुपये खर्च करु शकलो आणि उर्वरित रकमेची बचत झालेली आहे. आपण आता हे काम पूर्ण केलेले आहे. एका रेकमध्ये १२ डबे असून १२ डब्यांच्या १०१ नवीन रेक्स आलेल्या आहेत. पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वेच्या लाईनवर या नवीन लोकल ट्रेन्स धावत आहेत आणि यामुळे रेल्वेतील प्रवाशांची धक्काबुक्की १४ टक्क्याने कमी झालेली आहे.

रस्ते या घटकासाठी ३०४ कोटी रुपयांची तरतूद केलेली असताना त्यापैकी फक्त ९५ कोटी रुपये त्यावर्षी खर्च झालेले आहेत. बचत होण्याची मुख्य कारणे अशी आहेत की, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड आणि सांताक्रुज-चेंबूर लिंक रोड या रस्त्यांचे बांधकाम करीत असताना पाईप लाईन व गटार लाईनच्या स्थलांतरासाठी अपेक्षेपेक्षा जास्त कालावधी लागलेला आहे. तसेच, रेल्वे ओव्हर ब्रिजसाठी रेल्वेकडून उशिरा परवानगी मिळाली होती. महानगरपालिकेकडून देखील वृक्ष तोडण्यासाठी उशिरा परवानगी मिळाली होती. या कारणांमुळे या कामासाठी विलंब झालेला आहे. त्यामुळे खर्च कमी होऊन बचत झालेली आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या फेज-१ चे काम आता जवळ जवळ पूर्ण झालेले आहे. सांताक्रुज-चेंबूर लिंक रोडचे थोडेसे काम बाकी आहे. हे काम लवकरच पूर्ण होईल. ३९ हजार झ ाोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन मानखुर्द येथे करण्यात आलेले आहे. जागतिक बँकेने सुध्दा या कामाची प्रशंसा केलेली आहे. आपण या कामावर आतापर्यंत ५,१२३ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सन २००६-०७ मध्ये ७४ कोटी रुपयांची बचत झालेली आहे.

अमरावती शहरातील अंबानाले व उपनाले बांधकाम प्रकल्पातील २२.५९ लाख रुपयांचा निधी परत करण्यात आलेला आहे. या प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे यासंदर्भातील माहिती समितीला देताना विभागीय सचिवांनी सांगितले अमरावती शहरातील अंबानाले व उपनाले यांच्या बांधकामासाठी १२.७१ कोटी रुपये इतक्या खर्चाच्या कामास सन १९९५ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यावेळी १२.७१ लाख रुपये इतक्या रकमेचे काम करण्यात आले होते. अंबानाले व उपनाले यांची लांबी

९ किलोमीटर आहे. त्यापैकी ६.५ किलोमीटर लांबीचे काम पूर्ण झालेले आहे. त्यावेळी अर्थसंकल्पात तरतूद न झाल्यामुळे २.५ किलोमीटर लांबीचे काम पूर्ण होऊ शकले नाही. शासनाने सन २००९ मध्ये त्याला सुधारीत मंजुरी दिलेली आहे. आता त्यासाठी अर्थसहाय्य करण्यात येत आहे. त्यावेळी अमरावती महानगरपालिकेने ७.८४ कोटी रुपयांच्या अतिरिक्त मागणीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला होता. परंतु राज्याची आर्थिक परिस्थिती बघता त्यावर्षी अतिरिक्त मागणी मंजूर होऊ शकली नाही. तथापि, अतिरिक्त तरतुदीची मागणी नियोजन विभागाने अमान्य केल्यामुळे अमरावती महानगरपालिकेला ७७.४१ लाख रुपये वितरित करुन उर्वरित २२.५९ लाख रुपयांची झालेली बचत प्रत्यार्पित करण्यात आलेली आहे. एप्रिल, २००९ मध्ये २३.१८ कोटी रुपयांची सुधारीत मंजुरी देण्यात आलेली आहे. आता नगरविकास विभाग या कामासाठी अर्थसहाय्य देत आहे. विभागाने ३.२५ कोटी रुपये अनुदान वितरित केलेले आहे. या प्रकल्पासाठी दिनांक ३ फेब्रुवारी, २०१० रोजी ३.२५ कोटी रुपये अनुदान देण्यात आलेले आहे. पहिला हप्ता वितरीत केलेला आहे. दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी ४.५० कोटी रुपये पुन्हा वितरीत करण्यात आलेले आहेत. या कामासाठी २ वर्षात ७.७५ कोटी रुपये वितरित करण्यात आलेले आहेत.

सदर प्रकल्पामध्ये केंद्र सरकार, राज्य सरकार आणि महानगरपालिका यांच्या टक्केवारीबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जव्हारलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान अभियान अंतर्गत लहान व मध्यम शहरासाठी पायाभूत सोयीसुविधांचा विकास कार्यक्रमामध्ये ३ प्रकारचे आकृतीबंध आहेत. ग्रेटर मुंबई अर्बन ॲग्लोमोरेशनकरिता केंद्र शासनाचा ३५ टक्के, राज्य शासनाचा १५ टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचा ५० टक्के हिस्सा असतो. पुणे, नागपूर या सारख्या मिनी ॲग्लोमोरेशनकरिता केंद्र शासनाचा ५० टक्के, राज्य शासनाचा २० टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचा ३० टक्के हिस्सा असतो. नांदेड-वाघाळा शहरासाठी केंद्र शासनाचा ८० टक्के, राज्य शासनाचा १० टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचा १० टक्के हिस्सा असतो. लहान व मध्यम शहरासाठी पायाभूत सायीसुविधांचा विकास कार्यक्रम याकरिता केंद्र शासनाचा ८० टक्के, राज्य शासनाचा १० टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचा १० टक्के हिस्सा असतो. अंबानाले प्रकल्प जव्हारलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत घेण्यात आलेला नव्हता. या प्रकल्पासाठी राज्य शासनाकडून शंभर टक्के अनुदान देण्यात आले होते. एप्रिल, २००९ मध्ये त्याला २३.१८ कोटी रुपयांची सुधारीत मंजुरी देण्यात आलेली आहे. दिनांक ३ फेब्रुवारी, २०१० रोजी ३ कोटी २५ लाख रुपये आणि दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी ४ कोटी ५० लाख रुपये असे एकूण ७ कोटी ७५ लाख रुपये वितरित करण्यात आलेले आहेत. पुढील अनुदान देण्यासंदर्भात विचार केला जाईल.

अंबेनाले प्रकल्पाचे काम फार संथगतीने सुरु असल्याची माहिती समितीने दिली असता जव्हारलाल नेहरु राष्ट्रय शहरी पुनरुत्थान अभियान  अंतर्गत स्वतंत्र आढावा घेणारी व देखरेख करणारी Independ Reniw and monitoring नावाची एक एजन्सी आहे. या एजन्सीमध्ये कंत्राटी तत्वावर तज्ज्ञ अभियंत्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. अर्बन इन्फ्रास्ट्रकचर मिशनमधील जे प्रकल्प असतात त्याकरिता Independ Reniw and monitoring या एजन्सीचा अहवाल केंद्र शासनाने अनिवार्य केलेला आहे. Independ Reniw and monitoring ही एजन्सी वेळोवेळी कामांची पाहणी करुन केंद्र व राज्य सरकारला अहवाल सादर करते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Independ Reniw and monitoring एजन्सीकडून वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या अहवालाची प्रत समितीला देण्यात यावी. असे निदेश समितीने दिले असता  या एजन्सीचा अहवाल आणि एजन्सीबरोबर केलेल्या कराराची प्रत समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन समितीला दिले होते परंतु अद्यापर्यत सदरहु माहिती समितीस प्राप्त झाली नाही.

एखाद्या कामासाठी जेवढ्या निधीची तरतूद करण्यात आली तेवढा निधी त्या कामावर खर्च होतो काय ? अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, Independ Reniw and monitoring एजन्सीमार्फत प्रकल्प स्थळांना भेटी दिल्या जातात. त्या नंतर त्या कामाच्या संदर्भातील अहवाल तयार करण्यात येतो, व तो केंद्र सरकार व राज्य सरकारला पाठविण्यात येत असून त्यावर विचारविनिमय करुन पुढील निधी देण्याचा निर्णय घेण्यात येतो. परंतु राज्य शासनाकडून प्रकल्पाच्या पाहणीच्या संदर्भात कोणतीच दखल घेतली जात नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, केंद्र व राज्य सरकारकडून येणारा निधी एकाच प्रकल्पावर खर्च होत असल्यामुळे Independ Reniw and monitoring एजन्सीकडून पाहणी करुन आलेल्या अहवालावर राज्य व केंद्र सरकार विचारविनियम केल्यानंतर  पुढील कार्यवाही करण्यात येते.

अशा प्रकल्पातील कामांच्या संदर्भात विभागीय आयुक्त स्तरावर जिल्हाधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांसोबत केव्हा बैठका घेण्यात येतात, एखाद्या प्रकल्पाला अंदाजपत्रकातून निधी दिल्यानंतर त्या संदर्भातील कशा प्रकारे आढावा घेण्यात येतो, ज्या कामांसाठी महानगरपालिका, राज्य सरकार व केंद्र सरकारकडून निधी दिला जातो, त्या कामांच्या संदर्भात विभागीय स्तरावर किंवा सचिव पातळीवर Independ Reniw and monitoring एजन्सीच्या व्यतिरिक्त कोणत्या पध्दतीने आढावा घेण्यात येतो. याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगीतले की, संबंधित कामांच्या संदर्भात आयुक्त स्तरावर आढावा घेतला जातो. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व लहान व माध्यम शहरासांठी पायाभूत सोयीसुविधांचा कार्यक्रम योजनेअंतर्गत आढावा घेत असताना या संस्थाकडून कामाच्या प्रगतीचा अहवाल

घेतला जातो. इरमा एजन्सीचा अहवाल राज्य शासनाकडे येत असतो. नोडल एजन्सी म्हणून राज्य शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नियुक्त केले आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यासाठी एक स्वतंत्र कक्षा निर्माण केला आहे. त्या कक्षामार्फत शासनाकडे अहवाल सादर केला जातो.

बऱ्याचवेळा असे म्हटले जाते की, या भागाचा निधी त्या भागाकडे वळविला गेला आहे. अमुक अमुक कामाच्या संदर्भात भ्रष्टाचार झालेला आहे. हा सर्व निधी बजेटमधून देत असताना संबंधित कामावर निधी खर्च होतो किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी विभागाच्या सचिवांची आहे. काही एजन्सी विभागाने स्थापन केल्या आहेत. परंतु सर्व कामे वेळेवर होतात किंवा नाही. प्रकल्पासाठी दिलेला निधी खर्च होतो किंवा नाही, या बाबी वेळच्या वेळी तपासल्या जात नसल्यामुळे अनेक प्रकल्पांची कामे रखडली आहेत. प्रकल्पांच्या कामासाठी निधी दिल्यानंतर ती कामे होतात किंवा नाही हे पाहण्यासाठी विभागाकडे कोणती पध्दत आहे. या कामांवर लक्ष ठेवण्यासाठी आपण एखाद्या उप अभियंत्याची नियुक्ती केली आहे काय ? अंदाजपत्रकात नगर विकास विभागासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी दिला. हा निधी संबंधित कामांना वाटतांना काही कामांना एक कोटी किंवा पाच कोटी रुपयांचा निधी दिला जातो. परंतु हा निधी त्याच कामावर वेळेत खर्च होतो किंवा नाही हे पाहिले जात नाही. या कामांवर फक्त ४० ते ५० टक्के निधी खर्च केला जातो. रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी जमीन संपादन करण्यास विलंब होत असेल किंवा एखाद्या प्रकल्पाच्या संदर्भात काही नैसर्गिक अडचणी असतील तर त्या ठिकाणी निधी पूर्ण खर्च झाला नाही ही बाब समजू शकतो. परंतु अशा कारणांमुळे एकूण कामांचा विचार केला तर फक्त पाच ते सात टक्के कामे अपूर्ण राहू शकतात. त्यामुळे ९३ ते ९५ टक्के कामांवर वेळेत निधी खर्च होणे आवश्यक आहे. असे मत समितीने व्यक्त केले. ही कामे वेळेवर होत नसल्यामुळे या कामांसाठी जे अधिकारी जबाबदार आहेत, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, अशी सूचना समितीने विभागास केली.

अमरावती जिल्ह्यातील दहा ग्रामपंचायतीची फक्त ४० टक्के कामे झाली आहेत. या बाबत तेथील ग्रामसेवकाकडून कामे अपूर्ण असल्याची माहिती मिळते. ग्रामीण लोक काहीच बोलत नाहीत. अपूर्ण कामांच्या संदर्भात राज्य पातळीपासून ग्रामपंचायतीपर्यंत जाब विचारणारे कोणी नाहीत. यासाठी जे जबाबदार अधिकारी असतील त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे, अशीही सूचना समितीने विभागास केली.

समितीने व्यक्त केलेल्या वरील अभिप्रायाबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण संदर्भात प्रकल्पनिहाय माहिती घेतली जाते. तसेच सचिव स्तरावर देखिल माहिती घेतली जाते. मी माझ्या स्तरावर माहिती घेत असतो. त्याचा परिणाम असा होतो की, नेमून दिलेल्या कालावधीत कामे केल्यामुळे मोठ्या प्रमाणात निधी वितरीत करण्यात आलेला आहे. काही

प्रकल्प अपूर्ण आहेत काही प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. शासनाकडून जे अर्थसंकल्प मंजूर झाला तो वेळेत खर्च झाला पाहिजे. या संदर्भातील आढावा. इरमा एजन्सीच्या माध्यमातून वेळोवेळी घेतला जातो. त्याचप्रमाणे त्रयस्थ लेखापरिक्षण अनिवार्य केले आहे. विभागीय स्तरावर कामांची पाहणी केली जाते. केंद्र सरकारच्या निधीच्या संदर्भात वेळोवेळी आढावा घेतला जात असून केंद्र सरकारकडून निधीचे वितरण सुरळीत होईल याकडे जातीने लक्ष दिले जाते.

नागरी क्षेत्रातील दलित वस्ती योजनेखाली एकूण रु.१६९,४९.७३ लाख इतकी तरतूद उपलब्ध झाली असून ती सर्व तरतूद खर्च झालेली असल्याने सदर योजनेअंतर्गत अधिकचा खर्च वा बचत नाही. ही बाब महालेखाकारांच्या वेळीच लक्षात अनेक आवश्यक होते असे समितीचे मत झाले. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००६-२००७ मध्ये या योजनेकरिता मूळ तरतूद रुपये ११३,०६.१८ लाख इतकी होती. जिल्हा वार्षिक योजनेच्या पुनर्विनियोजनाद्वारे रुपये ८११.१८ लक्ष इतकी तरतूद वित्त विभागाने सुधारीत अंदाजात मंजूर केली होती. त्यानंतर ही तरतूद रु.१२१,१७.३६ लक्ष इतकी झालेली आहे. त्यानंतर वित्त विभागाने नागरी दलित वस्ती योजनेकरिता विशेष बाब म्हणून रु. ४८,३२.३७ लक्ष इतक्या तरतूदीस मान्यता दिली व ती तरतूद मंजूर करण्यात आली. त्यामुळे सदर योजनेखाली एकूण रु.१६९,४९.७३ लाख इतकी तरतूद उपलब्ध झाली. त्यामुळे ५१ कोटी रुपयांचा अंतिम खर्च जास्त झालेला नसल्यामुळे त्याची दखल घेतली नाही, त्यामुळे तसे कळविण्यात आले नाही.

महालेखाकार कार्यालयास ही बाब कळविण्यात आली होती काय ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, महालेखाकार कार्यालयास ही बाब दाखविण्याची राहून गेली. या संदर्भातील नोंद ताबडतोब घेण्यात येईल व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

खर्चाचा ताळमेळ वेळच्यावेळी करण्यात येत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, २००६-२००७ चे खर्चमेळ सादर करण्यात आले असून सन २००८-२००९ पासून खर्चमेळ नियमीतपणे करण्यात येत आहे.

या संदर्भात महालेखाकारांनी समितीस अवगत केले की, जून, २००७ में जब फायनल रिकन्सिलिएशन हुआ था, उसमें यह बात सामने आयी थी. इस बारे में हमने दिनांक १९ सितम्बर, २००७ को भी लिखा है कि आप रिकन्सिलिएशन कीजिए और डिफरन्स पॉइन्ट आऊट कीजिए. लेकिन यह नहीं हुआ है. याबाबत विभागीय सचिवांनी या संदर्भातील सर्व माहिती घेऊन. खर्चमेळ का करण्यात आले नाही याचा आढावा घेऊन त्यानंतर कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन समितीस दिले.

सन २००९-२०१० में हुए कुल खर्च का ५.७९ प्रतिशत भाग अभी तक रिकन्सिलिएशन नहीं हुआ है. इसी प्रकार सन् २०१०-२०११ में हुए कुल खर्च् का १०.५१ प्रतिशत भाग रिकन्सिलिएशन होना अभी

बाकी है तथा सन् २०११-२०१२ में हुए खर्च  का ६१ प्रतिशत हिस्सा  अभी तक रिकन्सिलिएशन नहीं हुआ है. सन २०१०-२०११ में यह राशि  ५५,७८,०४,३९९ है. तथा उपरोक्त तीन वर्षों के लिए मुंबई रीजन में यह राशि १४० करोड़, ३ लाख, ४२ हजार रुपए है अशी माहिती महालेखाकारांनी समितीस दिली दिली.

सन २००८-२००९ पासून नियमित खर्चमेळ केले आहे. असे विभागाने सांगितले परंतु महालेखाकारांनी दिलेल्या माहितीप्रमाणे सन २०११-२०१२ मधील ६१ टक्के खर्चाचे रिकन्सिलिएशन झालेले नाही. या संदर्भातील जबाबदारी कोणावर आहे.  ही रक्कम किती आहे. अशी विचारणा समितीने केली असता  सन २०१०-११ में यह राशी ५५,७८,०४,३९९ है. तथा उपरोक्त तीन वर्षोंकेलिए मुंबई रिजनमें यह राशी १४० करोड, ३ लाख, ४२ हजार रुपये है असे महालेखाकारांनी सांगीतले म्हणजेच १४० कोटी रुपयांचे खर्चमेळ बाकी आहे. तसेच ही व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. मागील दोन वर्षापासून खर्चमेळचे काम कोण पाहत आहे. अशी विचारणा समितीने विभागास केली असता हे काम सह सचिव पाहत होते. त्यांची आता बदली झालेली आहे. या ठिकाणी आता नवीन सह सचिव नियुक्त करण्यात आले आहेत. सन २०११-२०१२ मध्ये ६१ टक्के खर्चमेळ करावयाचे राहिले असेल तर या संदर्भातील सर्व कागदपत्रे तपासून महालेखाकार कार्यालयास ती सादर करुन खर्चमेळ पूर्ण करुन घेण्यात येईल. असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

६१ टक्के काम शिल्लक आहे हे बरोबर नाही. वेळच्या वेळी संबंधित अधिकारी खर्चमेळाची कामे करीत नसल्यामुळे समितीचा तसेच विभागाचा सुध्दा वेळ येथे वाया जातो. त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांनी वेळेत खर्चमेळ केले नाही त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. तसेच सन २००८-२००९, २००९-२०१०,२०१०-२०११ या तीन वर्षाचे रिकन्सिलिएशन वेळेत न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ? अशी विचारणा समितीने केली असता सन २००८-२००९,२००९-२०१० व २०१०-२०११ या तीन वर्षातील खर्चमेळाची जबाबदारी उप सचिव यांच्यावर टाकण्यात आलेली आहे. या संदर्भातील सर्व कागदपत्रे महालेखाकार कार्यालयास सादर करण्यात येतील. आता सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाच्या खर्चमेळाचे काम सुरु आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

खर्चमेळ वेळेत न करणाऱ्या फक्त संबंधित अधिकाऱ्यांना ज्ञापन काढून त्याचा खुलासा मागविता किंवा त्यांच्या गोपनीय अहवाल मध्ये नोंद घेतली जाते. या व्यतिरिक्त कोणतीच कारवाई होत नाही, हे बरोबर नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर काय कारवाई करण्यात येईल, याची माहिती देण्यात यावी. व सन २०११-२०१२ चे खर्चमेळ १०० टक्के पूर्ण करण्यात यावे. असे निदेश समितीने विभागास दिले असता. ज्या अधिकाऱ्यांनी खर्चमेळ उशिराने केले, किंवा केले नाही त्यांच्याकडून स्पष्टीकरण घेण्यात

येईल, त्यामध्ये ते दोषी आढळले तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. असे आश्वासन विभागाने समितीस दिले.

खर्चमेळ झाल्यानंतर त्यासंदर्भातील अहवाल महालेखाकार्यालयाकडून समितीस सादर करण्यात यावा. असे निदेश समितीने महालेखाकारांना दिले असता महालेखाकारांनी अहवाल सादर करण्यात येईल असे आश्वासन समितीस दिले परंतु अद्यापपर्यंत महालेखाकार्यालयाकडून माहिती अप्राप्त आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

विभागाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात केलेला खुलासा व सचिवांनी साक्षीच्या वेळी केलेले प्रतिपादन याचा विचार करता समितीच्या निदर्शनास आले की, विभागाने काही लेखा शीर्षाखाली बचत व काही ठिकाणी अधिक खर्च केला आहे. विभागाने महानगरपालिका, नगरपरिषदा यांसाठी नगररचना आस्थापना, प्रादेशिक योजना तयार करणे, महानगर क्षेत्रे व इतर शहरे/नगरे यातील वाहतूक सर्वेक्षणे इ. आस्थापनांमध्ये विभागातील काही राजपत्रित/अराजपत्रित पदे रिक्त राहिल्याने बचत झाल्याचे समितीस माहिती देताना अवगत केले. नगर रचनाकारांकडून नगरविकास संदर्भातील कामे प्रामुख्याने करुन घेण्यात येतात. **समितीस साक्षीमध्ये सहायक संचालक, नगर रचना स्तरावरील ६० व नगर रचना अधिकाऱ्यांची ११४ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरावयाची आहेत अशी माहिती प्राप्त झाली. नगर रचना विभाग हा शहर विकासाचा मुख्य पाया असून इमारतीच्या बांधकामांना परवानगी देणे, ले आऊट तपासणी करणे, इत्यादी स्वरुपाची कामे ही नगर रचना अधिकारी यांचेकडूनच होणे आवश्यक असल्याने सदरहू पदे बऱ्याच कालावधीकरीता रिक्त ठेवणे योग्य नाही. त्यामुळे अत्यंत आवश्यक असलेली रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागाने प्राधान्याने करावी व उर्वरित पदे भरण्याबाबत देखील कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

अमरावती, अंबानाले विकास प्रकल्पाची कामे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान योजनेंतर्गत होत आहे. या योजनेंतर्गत स्वतंत्र आढावा घेणारी व देखरेख ठेवणारी इरमा एजन्सी आहे. युआयजी योजनेतील प्रकल्पांकरीता इरमा या एजन्सीचा अहवाल केंद्र शासनाने अनिवार्य केलेला आहे.

नगरविकासाच्या राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता केंद्र शासनाकडून राज्य शासनास निधी उपलब्ध होत असतो. या योजनेद्वारे करावयाच्या कामांसंदर्भात कामावर केलेल्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे ही केंद्र शासनास सादर केल्याशिवाय उर्वरित निधी प्राप्त होत नाही. सदर प्रमाणपत्रे ही विहित मुदतीत पाठविण्याचे बंधन असते. परंतु बऱ्याच प्रकरणी उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न केल्यामुळे केंद्र शासन निधी मुक्त करीत नाही. त्यामुळे प्रकल्पांचा खोळंबा होतो व खर्चात वाढ होते. त्यामुळे केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या निधीच्या संदर्भात खर्चाच्या वापराचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित कालावधीत केंद्र शासनास सादर करण्याची दक्षता नगरविकास विभागाने घ्यावी, जेणेकरुन प्रकल्प विहित मुदतीत पूर्ण करणे शक्य होईल. प्रकल्पासाठी दिलेला निधी हा त्या प्रकल्पावरच खर्च होतो किंवा नाही यावर नियंत्रण ठेवण्याची विभागाची जबाबदारी आहे. या कामांकरीता काही एजन्सी नियुक्त केलेल्या असतात व ते आपला अहवाल शासनास सादर करीत असतात. परंतु एजन्सीने दिलेल्या अहवालाप्रमाणे कामे होतात काय हे शासकीय यंत्रणेकडून तपासणी होणे आवश्यक आहे. यासाठी **उप अभियंता वा दर्जाच्या अधिकाऱ्यांची प्रकल्पावर नियुक्ती करुन त्यांचेकडून संबंधित एजन्सीने दिलेल्या अहवालाची छाननी होणे आवश्यक आहे. यामुळे प्रकल्प न रखडता खर्चावर देखील नियंत्रण राहू शकते. त्यामुळे केंद्र शासनाच्या**

**मदतीने राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांवर कामाची देखरेख करण्याकरीता उप अभियंता वा त्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती शासनाने करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

सन २००६-२००७ या विनियोजन लेख्यांमधील काही शीर्षाखाली खर्चमेळ न केल्यामुळे विभागाच्या लेख्यात तफावत असल्याचे समितीस निदर्शनास आले. यासंबंधी महालेखापालांचे अभिप्राय विचारात घेतले असता त्यांची देखील विभागाचे खर्चमेळाचे काम प्रलंबित असल्याचा दुजोरा दिला. **महालेखापालांनी सन २०११-२०१२ या वर्षाकरीता विभागाने फक्त ४०% खर्चमेळ्याचे काम केले असल्याने विभागाचा याबाबत निष्काळजीपणा आहे, असे समितीचे स्पष्ट मत झाले. ही बाब अतिशय गंभीर असून याप्रकरणी जबाबदार संबंधित अधिकारी यांनी विभागीय चौकशी करुन कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात पाठविण्यात यावी, तसेच आगामी कालावधीत खर्चमेळाचे काम विहित कालावधीत पूर्ण होण्यासाठी एखाद्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## जलसंपदा विभाग

### राज्यातील जलसंपदा प्रकल्पांचा आराखडा व धरणाचे संरक्षण

७.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करत असताना अनुदान क्र. आय-३ मधील प्रधान लेखा शिर्ष प्रधान शिर्ष २४०२- "मृद व जलसंधारण", २७०१-"मोठे व मध्यम पाटबंधारे", २७०२-"लहान पाटबंधारे", २७०५- "लाभक्षेत्र विकास", २७११- "पूर नियंत्रण व जलनि:सारण", २७०१-" बीज" ३४०२- "अंतराळ संशोधन" व ३६०६- सह्यकारी साहित्य व साध्नसामुग्री" या शिर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेला आहे.

**अनुदान क्र - आय -३ "पाटबंधारे, वीज व इतर आर्थिक सेवा"**

**(रु. हजारात)**

| **शिर्ष** | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| २४०२-मृद व जलसंधारण | | | |
| २७०१-मोठे व मध्यम पाटबंधारे | | | |
| २७०२-लहान पाटबंधारे | | | |
| २७०५- लाभक्षेत्र विकास | | | |
| २७११- पूर नियंत्रण व जलनि:सारण | | | |
| २७०१- बीज | | | |
| ३४०२- अंतराळ संशोधन | | | |
| ३६०६- सह्यकारी साहित्य व साध्नसामुग्री | | | |
| दत्तमत ... | १७,६५,२६,८५ | १३,५५,०७,४८ | -४,१०,१९,३७ |
| मूळ १५,६१,९८,५३ | | | |
| पूरक २,०३,२८,३२ | | | |
| वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २००७) ४,२४,५१,४४ | | | |
| भारित... | १५ | .... | -१५ |
| मूळ .... | | | |
| पूरक १५ | | | |
| वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २००७) | | | |

**टीप व भाष्ये :**

रु. १५,६१,९८.५३ लाख इतकी मूळ तरतूद मंजूर करण्यात आली असून रु. १३,५५,०७.४८ लाख इतकी कमी रक्कम प्रत्यक्ष खर्च झाली असताना चालू वर्षात रु. २,०३,२८.३९ लाख (जुलै २००६ मध्ये रु. ५११३७.९१ लाख आणि डिसेंबर, २००६ मध्ये रु. १५११९०.४१ लाख) इतकी प्राप्त करण्यात आलेली पूरक तरतूद अनावश्यक असल्याचे सिध्द झाले.

**ज्ञापन :**

७.२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, अनुदान क्रमांक आय-३ खालील मुख्य लेखाशीर्षातंर्गत एकूण अनुदान व एकूण खर्चाबाबतची सद्यःस्थिती सोबत दर्शविण्यात आलेली आहे. मागणी क्रमांक आय-३ अंतर्गत एकूण दत्तमत अनुदान रुपये १७६९२१.१४ लाख मंजूर करण्यात आले असून सदर अनुदानातून रुपये ४२४५१.४४ लाख इतकी बचत समर्पित करुन विशेष गौणशीर्ष राखीव दत्तमत खाली वर्ग करण्यात आली आहे. त्यामुळे रुपये १३४४६९.७० लाख इतके अंतिम सुधारीत अनुदान प्राप्त झाले आहे. या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये १३३७९७.९२ लाख (३६०६ या मुख्य लेखाशीर्षाचा खर्च समाविष्ट नाही.) इतका झाला परिणामी रु. ६७१.७८ लाख इतकी बचत झाली आहे. त्याबाबतची कारणे लेखाशिर्षानिहाय स्पष्टीकरण ज्ञापनात नमूद करण्यात आली आहेत.

अनुदान क्रमांक आय-३ खाली महालेखापालांनी दत्तमत खर्च रु. १३५५०७.४८ लाख इतका नोंदविला असून त्यामध्ये ३६०६ या मुख्य लेखाशीर्षाचा रु. ३५८६ लाख इतक्या खर्चाचा समावेश आहे. (३६०६ या दत्तमत मुख्य लेखाशीर्षाखाली जलसंपदा विभागास यंत्रसामुग्री व उपकरणे यासाठी केंद्र शासनाकडून मदत दिली जाते.) त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रुपये १७०९.५६ लाख इतकी तफावत असून त्याबाबतची कारणे लेखाशिर्षानिहाय स्पष्टीकरण ज्ञापनात नमूद करण्यात आली आहेत.

मागणी क्रमांक आय-३ अंतर्गत एकूण भारती अनुदान रुपये ०.१५ लाख मंजूर करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये ०.१५ लाख इतका झाला आहे. महालेखापालांनी मागणी क्रमांक आय-३ खाली भारीत खर्च निरंक नोंदविला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रुपये ०.१५ लाख इतकी तफावत असून त्याबाबतची कारणे लेखाशीर्षनिहाय स्पष्टीकरण ज्ञापनात नमूद करण्यात आली आहेत.

मुख्य लेखाशिर्ष २४०२ मृद व जलसंधारण खाली एकूण दत्तमत अनुदान रु. १९०६.३५ लक्षच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. २०८२.४५ लक्ष इतका झाला आहे. त्यामुळे रु. १७६.१० लक्ष इतके अधिक्य झाले आहे जुलै २००५ मधील अतिवृष्टी पूर व समुद्राचे उधाण यामुळे खारभूमी योजनांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले होते त्यांच्या दुरुस्तीवर मोठया प्रमाणावर खर्च झ ाल्याने सदर अधिक्य दिसून येते.

महालेखापालांनी प्रारुप विनियाजन लेखा अहवालात सदर मुख्य लेखाशीर्षाखाली दत्तमत खर्च रु. २०८२.६१ लक्ष इतका नोंदविला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रु. ०.१६ लक्ष इतकी तफावत आहे. सदर तफावत अल्प आहे.

| ७.३ | **शिर्ष** | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| | २७०१ मोठे व मध्यम प्रकल्प<br>८० सर्वसाधारण<br>८०० इतर खर्च<br>(०१) (०१) व्याज<br>मूळ ४,५७,२४,४४ | ४,५७,२४.४४ | ४,३४,०६.२४ | -२३,१८.२० |

**ज्ञापन :**

७.४ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रुपये ४५७२४.४४ लक्षच्या तरतूदीपोटी विभागाने रु. ४५७२४.४४ लक्ष इतका खर्च केला आहे. त्यामुळे अधिक्य किंवा बचत दिसून येत नाही. महालेखापालांनी रु. ४३७०६.२४ लक्ष खर्च नोंदविला आहे. त्यामुळे विभागाच्या खर्चामध्ये व महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये रु. २३१८.२० लक्षाची तफावत दिसून येते.

या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, निलंबन शीर्षाखाली अग्रीमासाठी संकीर्ण सार्वजनिक बांधकाम अग्रीम रकमाखाली तरतूद केली जाते. अग्रीमाखाली कमी किंवा अधिक खर्च लेख्यात प्रतिबिंबित होतो. मागील वर्षाच्या येणे असलेल्या अग्रीमाच्या वसुलीमुळे सदर अधिकय दिसून येते.

| ७.५ | शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण | | | | |
| (००१) संचालन व प्रशासन | | | | |
| (०१) तांत्रिक नियंत्रण व पर्यवेक्षण | | | | |
| मूळ | ६,६४.८० | ६,०७.८५ | ३,६९.५८ | -२३८.२७ |
| पूरक | -५६.९५ | | | |

**ज्ञापन :**

७.६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की,एकूण अनुदान रुपये ६०७.८५ लक्षच्या अनुषंगाने विभागाचा रु. ६०७.७८ लक्ष इतका खर्च झाला आहे. परिणामी रु. ०.०७ लक्षची बचत दिसून येते. सदर बचत नगण्य आहे.

महालेखापालांनी रु. ३६९.५८ लक्ष इतका खर्च नोंदविला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रु. २३८.२० लक्षची तफावत दिसून येते. (रु. ६०७.७८- रु. ३६९.५८= रु.२३८.२०)

याबाबत असे नमूद करण्यात येते की, ४० टक्के खर्च (रु. २३५.९१ लक्ष) आंतरलेखा हस्तांतरणाव्दारे मुख्य लेखाशीर्ष ३४५१ सचिवालयीन आर्थिक सेवा कडून मुख्य लेख शिर्ष २७०१- मोठे व मध्यम पाटबंधारे याकडे हस्तांतरीत केला जातो. तथापि, सदर आंतरलेखा हस्तांतरणाची नोंद लेखा व अनुज्ञेयता या कार्यालयाकडून झालेली नाही. सदर तफावतीचे निराकरण करण्यासाठी चुकीची दुरुस्ती नोंद प्रस्ताव शासन पत्र क्र. विनियो ३४५१/२००६-०७/(२५/२००८) लेखा, दिनांक ३०/८/२००८ अन्वये महालेखापाल कार्यालयास पाठविला आहे.

| ७.७ | शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण | | | | |
| (००१) संचालन व प्रशासन | | | | |
| (०३) सामाईक आस्थापना - कार्यकारी | | | | |
| मूळ | ३९,४४.६४ | | | |
| पूरक | -१,५३.८६ | ३७,९०.७८ | ३७,५१.८६ | -३८.९२ |

**ज्ञापन :**

७.८ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रू.३७९०..७८ लक्ष तरतुदीच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. ३८.३६.३३ लक्ष झाला आहे. परिणामी रु. ४५.५५ लक्षाचे अधिक्य दिसून येते. सदर अधिक्य हे प्रामुख्याने वेतन व प्रवास भत्ता देयके अदा केल्यामुळे दिसून येते.

महालेखाकारांनी सदर उपशिर्षाखालील रु. ३७.५१८६ लक्ष खर्च नोंदविला आहे व विभागाने रु ३८३६.८६ लक्ष इतका खर्च केला आहे. त्यामुहे महालेखापालांनी नोंदविलेल्या व विभागाने केलेल्या खर्चामध्ये रु.८४.४७ लक्षची तफावर दिसून येते. (रु.३७५१.८६-रु.३८३६.८६ = रु.८४.४७) सदर तफावतीचे निराकरण करण्यासाठी शासन पत्र क्र. विनियो२७०१/२००६-०७/(४२/२००७)/लेखा, दिनांक ३१/३/२००८ अन्वये चुकची दुरुस्ती नोंद प्रस्ताव सादर केला आहे.

| ७.९ | **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| **२७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे** | | | | |
| ८० सर्वसाधारण | | | | |
| (००५) सवेक्षण व अन्वेषण | | | | |
| ०२ यंत्रासामुग्री व साधानसामुग्री | | | | |
| (०२) (०८) अधीक्षक अभियंता, | | | | |
| पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण मंडळ, पुणे | | | | |
| मूळ | १६.०० | ७.७३ | ०.९८ | -६.७५ |
| पुनर्वियोजन | -८.२७ | | | |

**ज्ञापन :**

७.१० महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रु ७.७३ लक्षच्या तरतुदीच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. ०.९८ लक्ष झाला आहे. परिणामी रु.६.७५ लक्षची बचत दिसून येते. सदर बचत ही प्रामुख्याने नवीन वाहने खरेदी करण्याच्या तांत्रिक अडचणीमुळे दिसून येते.

महालेखापालांनी या उपशिर्षावर रू.०.९८ लक्ष इतकाच खर्च केला आहे. त्यामुळे विभागाच्या खर्चामध्ये व महालेखपालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये तफावत दिसून येत नाही.

(रु.हजारात)

| ७.११ | शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|---|
| **२७०७ मोठे व मध्यम पाटबंधारे** | | | | | |
| ८० सर्वसाधारण | | | | | |
| ८०० इतर खर्च | | | | | |
| (११) महाराष्ट्र जलक्षेत्र सुधारणा प्रकल्प (योजनेअंतर्गत) | | | | | |
| (११) (१०) जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र जलक्षेत्र सुधारणा प्रकल्प | | | | | |
| मूळ | | ३,८९.६३.०० | | | |
| पूरक | | ०.०१ | १४,२५.३६ | १४,२५.३९ | -२९.९७ |
| पुनर्वियोजन | | -३७५,०७.६५ | | | |

रु. २९.९७ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता, निविदेला अंतिम रुप न दिल्यामुळे मार्च, २००७ मध्ये प्रत्यर्पण / पुर्नविनियोजन याद्वारे वरील उपशिर्षातून काढलेला रु. ३,७५.०७.६५ लाखांचा निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले.

रु. २९.९७ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

७.१२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रु.१४५५.३६ लक्ष तरतुदीच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१४२५.३८ लक्ष झाला आहे. परिणामी रु.२९.९८ लक्षची बचत दिसून येते सदर बचत प्रामुख्याने कोषागाराने देयके पारित न केल्यामुळे दिसून येते.

महालेखाकारांनी सदर उपशिर्षाखाली रु.१४२५.३९ लक्ष खर्च नोंदविला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या व विभागाने केलेल्या खर्चामध्ये रु. ०.०१ लक्षची तफावत दिसून येते. (रु.१४२५.३९-रु.१४२५.३८ = रु.०.०१) सदर तफावत नगण्य आहे.

| ७.१३ | **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **(रु.हजारात) अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| **२७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे** | | | | |
| ८० सर्वसाधारण | | | | |
| (००१) संचालन व प्रशासन | | | | |
| (०१) परिरक्षण आस्थापना | | | | |
| मूळ | ३,२७,३४.६५ | २,९३,४७.३७ | २,९०,०३.०२ | -३,४४.३५ |
| पूरक | -३३,८७.२८ | | | |

**ज्ञापन :**

७.१४ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रु.२९३४७.३७ लक्ष तरतुदीच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२९२७५.४२ लक्ष झाला आहे. परिणामी रु.७१.९५ लक्षची बचत दिसून येते. सदर बचत ही प्रामुख्याने कोषागाराने देयके पारित न केलयाने दिसून येते.

महालेखापालांनी सदर उपशिर्षाखाली रु.२९००३.०२ लक्ष खच्र नोंदविला आहे व विभागाने रु.२९२७५.४२ लक्ष इतका खर्च केला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेलया व विभागाने केलेल्या खर्चामध्ये रु.२७२.४० लक्षची तफावत दिसून येते. (रु.२९२७५.४२-रु.२९००३.०२ = रु.२७२.४०) सदर तफावतीपैकी रु.२५१.९२ लक्ष तफावतीचा विहीत कलावधीत शोध लागू शकला नाही.

याबाबत असे नमूद करण्यात येते की, खर्चमेळाचे काम व्यवस्थितरित्या करण्यासाठी शासन परिपत्रक क्र.संकीर्ण १००९/(३२/२००९)/लेखा, दिनांक १३/७/२००९ व विनियो २७०१/२००५-०६/(५०/२००६)/लेखा दिनांक ७/११/२००९ सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.

**(रु.लाखात)**

| ७.१५ | **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| **२७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे**<br>०३ मध्यम पाटबंधारे (वाणिज्यिक)<br>(०२) पुस्तक समायोजनेद्वारे रुपांतरीत नियमित अस्थायी/स्थायी आस्थापनेसाठी हस्तांतरित होणारा खर्च<br>(०२) (०८) प्रशासक, कडा, औरंगाबाद | | | | |
| मूळ | २,११.३४ | १,००.०० | १,९७.७२ | +९७.७२ |
| पूरक | -१,११.३४ | | | |

**ज्ञापन :**

७.१६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रु.१००.०० लक्ष तरतुदीच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.१९७.७२ लक्ष झाला आहे. परिणामी रु.९७.७२ लक्षचे अधिक्य दिसून येते. सदर अधिक्य प्रामुख्याने वित्त व नियोजन विभागाने आठमाही सुधारीत अंदाजात कपात केल्यामुळे दिसून येते.

महालेखापालांनी सदर उपशिर्षाखाली रु. १९७.७२ लक्ष खर्च नोंदविला आहे व विभागाने रु. १९७.७२ लक्ष इतका खर्च केला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात तफावत दिसून येत नाही.

(रु. हजारात)

| ७.१७ शीर्ष | | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे | | | | |
| ८० सर्वासाधारण | | | | |
| ८०० इतर खर्च | | | | |
| (०२) पाणीपट्टीवरील स्थानिक उपकरामुळे मिळालेल्या व जिल्हा परिषदांना द्यावयाच्या वसुलीच्या रकमा | | | | |
| मूळ | ७२,२१.१३ | | | |
| पुरक | २६.८९.०९ | ६४,८२.८७ | ७१,५४.५२ | +६,७१.६५ |
| पुनर्विनियोजन | -३४,२७.३५ | | | |
| ८० सर्वासाधारण | | | | |
| (००३) प्राशिक्षण | | | | |
| (०१) आस्थापना (योजनांतर्गत व योजनेतर) | | | | |
| मुळ | २,८०.२९ | २,४४.०० | २,४४.७५ | +०.७५ |
| पुनर्विनियोजन | -३६.२९ | | | |

रु. ०.७५ लाखाचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, प्रत्यक्ष गरजेच्या आधारावर मार्च, २००७ मध्ये प्रत्यपर्ण/पुनर्विनियोजन याद्वारे वरील उपशीर्षामधुन काढलेला रुपये ३६.२९ लाखांचा निधी अत्यधिक असल्याचे सिध्द झाले.

रु. ०.७५ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

७.१८ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की,रु. ६४८२.८७ लक्ष तरतुदीच्या अनुषंगान विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.७१५४.५२ लक्ष झाला आहे. परिणामी रु.६७१.६५ लक्षाचे अधिक्य दिसून येते. सदर अधिक्य हे प्रामूख्याने नियोजन व वित्त विभागाने आठमाही सुधारित अंदाजात कपात केल्यामुळे दिसून येते.

महालेखापालांनी या उपशीर्षावर रु.७१५४.५२ लक्ष इतका खर्च आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत दिसून येत नाही.

लेखा परिक्षणात दर्शविलेली वस्तुस्थिती बरोबर आहे.

(रु. हजारात)

| ७.१९ | **शीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|---|
| | २७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे<br>०१ मोठे पाटबंधारे<br>(०१) मोठे प्रकल्प- परिक्षण व दुरुस्ती.<br>(०१)(१९) भातासा प्रकल्प | | | | |
| | मूळ | ४६.०० | १,१२.०० | ५१.७३ | -६०.२७ |
| | पुरक | २१.०० | | | |
| | पुनर्विनियोजन | ४५.०० | | | |

वरील उपशीर्षाखालील रुपये ५१.७३ लाख इतक्या खार्चाचा विचार करता, मुळ व पुरक अर्थसंकल्पीय तरतुद अपुरी पडली तसेच मार्च, २००७ मध्ये रुपये ४५ लाख इतक्या रकमेची निधीत झालेली वाढ अनावश्यक असल्याचे सिध्द झाले.

मोठया पाटबंधारे प्रकल्पाच्या परिक्षण व दुरस्ती यांवरील खर्चात वाढ झाल्यामुळे पाणी वाटप संस्थाना ताबा देण्यापूर्वी केलेल्या परिरक्षण व दुरुस्तीच्या आणि विशेष दुरुस्तीच्या कामांसाठी आवश्यक असलेल्या साहित्याच्या व साधनसामग्रीच्या खर्चात झालेली वाढ आणि मुसळधार पावसामुळे वाटप यंत्राणेचे नुकसान झाल्याने करावी लागलेली दुरुस्तीची कामे आणि तसेच प्रलंबित देयके यांमुळे निधीत भर पडली होती.

रुपये ६.२७ लाखांच्या अंतिम बचतीची करणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २००७)

**ज्ञापन :**

७.२० महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रु. ११२.०० लक्ष तरतुदीच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. ५१.७३ लक्ष झालेला आहे. परिणामी रु. ६०.२७ लक्षची बचत दिसून येते. सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात धानादेश पारित झाले नाहीत. तथापि, खर्च करण्यात आला आहे व सदर खर्च सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात मिळालेल्या अनुदानातून भागविण्यात आला. परंतू प्रत्यक्ष बांधकामावर खर्च पडलेला नाही. त्यामुळे बचत दिसून येते.

महालेखापालांनी या उपशिर्षावर रु.५१.७३ लक्ष खर्च नोंदविलेला आहे व विभागाने रु.५१.७३ ला इतका खर्च केला आहे. त्यमुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या तफावत दिसून येते नाही.

**(रु.हजारात)**

| ७.२१ **शीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| २७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे | | | | |
| ०१ मोठे पाटबंधारे | | | | |
| (०१) मोठे प्रकल्प- परिक्षण व दुरुस्ती. | | | | |
| (०१)(३५) हतनूर प्रकल्प | | | | |
| मूळ | ७५.६८ | | | |
| पुरक | २,४९.८४ | ३,३०.५२ | २,४०.५२ | -९०.०० |
| पुनर्विनियोजन | ५.०० | | | |

रु.९० लाख इतक्या रकमेची तरतूद वापर न करता तशीच शिल्लक राहिली आणि रुपये २,५४.८४ लाख इतक्या पूरक तरतूदीचा व विनियोजनाचा भाग अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.

अधिक तरतूदीची / अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २००७)

**ज्ञापन :**

७.२२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रु. ३३०.५२ लक्ष तरतूदीच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. २४०.५२ लक्ष झाला आहे. परिणामी रु.९०.०० लक्षची बचत दिसून येते. सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात धानादेश पारित झाले नाहीत. तथापि, खर्च करण्यात आला आहे व सदर खर्च सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात मिळालेल्या अनुदानातून भागविण्यात आला. परंतु प्रत्यक्ष बांधकामावर खर्च पडलेला नाही. त्यामुळे सदर बचत दिसून येते.

महालेखापालांनी या उपशिर्षावर रु.२४०.५२ लक्ष खर्च नोंदविला आहे व विभागाने रु.२४०.५२ लक्ष इतका खर्च केला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभागाच्या खर्चामध्ये तफावत दिसून येत नाही.

**(रु. हजारात)**

| ७.२३ **शीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| २७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे | | | | |
| ०१ मोठे पाटबंधारे | | | | |
| (०१) मोठे प्रकल्प- परिक्षण व दुरुस्ती. | | | | |
| (०१)(२५) मुळा प्रकल्प | | | | |
| मूळ | १,६१.६२ | | | |
| पुरक | ३०.०० | २,२०.६२ | ३,४२.२९ | +२१.६७ |

पुनर्विनियोजन १,२९.००

**ज्ञापन :**

७.२४ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रु.३२०.६२ लक्ष तरतूदीच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.३४२.२९ लक्ष झाला आहे. परिणामी रु.२१.६७ लक्षचे अधिक्य दिसून येते. मुळा प्रकल्पावर मुळा धरणातील पोलिस बंदोबस्ताचा खर्च समायोजित केल्यामुळे अधिक्य दिसून येते.

महालेखापालांनी या उपशिर्षावर रु. ३४९.२९ लक्ष खर्च नोंदविला आहे व विभागाने रु.३४२.२९ लक्ष इतका खर्च केला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये व विभगाच्या खर्चामध्ये तफावत दिसून येत नाही.

(रु. लाखात)

| ७.२६ **शीर्ष** | | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण (७९९) निलंबन (खर्च रकमा) | | | | |
| मूळ | ०.७३ | ०.६९ | २३.९९ | +२३.३० |
| पुर्नविनियोजन | -०.०४ | | | |

**ज्ञापन :**

७.२७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रुपये ०.६९ लक्षच्या तरतुदीपोटी विभागाने रु.२.५० लक्ष खर्च केला आहे. परिणामी रु१.८१ लक्षाचे अधिक्य दिसून येते.

महालेखापालांनी रु.२३.९९ लक्ष चार्च नोंदविला आहे. त्यामुळे रु२३.३० लक्षाची तफावत दिसून येते. सदर तफावतीचा शोध विहीत कालावधी लागू शकला नाही.

यासंदर्भात असे नमुद करण्यात येते की, निलंबन शीर्षाखाली अग्रीमासाठी संकीर्ण सार्वजनीक बांधकाम अग्रीम रकमाखाली तरतुद केली जाते. अग्रीमाखालील कमी किंवा अधिक खर्च लेख्यात प्रतिबिंबित होती. मागील वर्षाच्या येणे असलेल्य अग्रीमाच्या असुलीमुळे सदर अधिक्य दिसून येते.

(रु. हजारात)

| शीर्ष | | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २७०१ मोठे व माध्यम पाठबंधारे<br>३० मध्यम पाटबंधारे (वाणिज्यिक)<br>(०१) माध्यम प्रकल्प - परिरिक्षण व दुरुस्त्या<br>(०१) (१४) अधीक्षक अभियंता व प्रशासक<br>(लाभाक्षेत्र विकास प्राधिकारण) जळगाव | | | | |
| मूळ | १,२४.०० | | | |
| पूरक | २,८३.९४ | ४,८७.९४ | ४,६२.३६ | -२५.५८ |
| पुनर्विनियोजन | ८०.०० | | | |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रु. ४८७.९४ लक्ष तरतुदीक्ष्या अनुषंगाने विभागाच्या प्रत्यक्ष खर्च रु.४६२.३६ लक्ष झाला आहे. परिणामी रु.२५.५८ लक्ष बचत दिसून येते. सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात धनादेश पारित झाले नाहीत. तथापि, खर्च करण्यात आला आहे़ व सदर खर्च सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात मिळालेल्या अनुदानातुन भागविण्यात आला. परंतू प्रत्यक्ष बाधकामावर खर्च पडलेला नाही. त्यामुळै सदर बचत दिसून येते.

माहालेखापालांनी या उपशीर्षावर रु. ४६२.३६ लक्ष खर्च नोंदविला आहे. व विभागाने रु. ४६३.३६ लक्ष इतका खर्च केला आहे. त्यामुळे माहालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये विभागामध्ये खर्चामध्ये तफावत दिसून येत नाही.

(रु.लाखात)

| शीर्ष | | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २७०१ मोठे व माध्यम पाठबंधारे<br>८० सर्वसाधारण<br>००५ सर्वेक्षण व अन्वेषण<br>(०४) मोठे बांधकामे - सर्वेक्षण व अन्वेक्षण | | | | |
| मूळ | ५,००.०० | ५,४८.९४ | ५,२८.०६ | -२०.८८ |
| पुनर्विनियोजन | ४८.९४ | | | |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रु. ५४८.९४ लक्ष तरतुदीच्या अनुषंगाने विभागाचा प्रतयक्ष खर्च रु.५२८.०६ लक्ष झाला आहे. परिणामी रु.२०.८८ लक्षाची बचत दिसून येते. सदर बचत ही रिक्त पदे न भरल्यामुळे दिसून येते.

महालेखापालांपनी सदर उपशीर्षाखाली रु.५२८.०६ लक्ष ,खर्च नोंदविला आहे. व विभागाने रु. ५२८.०६ लक्ष इतका खर्च केला आहे. त्यामुळे विभागाच्या खर्चामध्ये व महालेखापालानी नोदविलेल्या खर्चात तफावत दिसून येत नाही.

(रु.लाखात)

| शीर्ष | | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २७०१ मोठे व माध्यम पाठबंधारे<br>८० सर्वसाधारण<br>८०० इतर खर्च<br>(०५) परिरक्षण व दुरुस्त्या निवासी इमारती | | | | |
| मूळ | ३,४७.९४ | ६,६१.९० | ६,३०.९४ | -३०.९६ |
| पुनर्विनियोजन | ३,१३.९६ | | | |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रु.६६१.९० लक्ष तरतुदीच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.६३१.०५ लक्ष झाला आहे. परिणामी रु.३०.८५ लक्षची बचत दिसून येते सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात धनादेश पारित झाले नाहीत. तथापि, खर्च करण्यात आला आहे. व सदर खर्च सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात मिळालेल्या अनुदानातून भागविण्यात आला . परंतू प्रत्यक्ष बांधकामावर खर्च पडलेला नाही. त्यामुळे सदर बचत दिसून येते.

महालेखापालांनी सदर उपशिर्षाखाली रु.६३०.९४ लक्ष खर्च नोंदविला आहे. त्यामुळे विभागाच्या खर्चामध्ये व महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात रु. ०.११ लक्षची तफावत दिसून येते (रु.६३१.०५-रु.६३०.९४=रु.०.११).

(रु.लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| ०१ भूपृष्ठ जल<br>८०० इतर खर्च<br>(१३) पाणीपट्टीवरील स्थानिक उपकरामुळे मिळालेल्या व जिल्हा परिषदांना द्यावयाच्या वसुलीच्या रकमा<br>मुळ ...... २,८४,.३० | २,८४,.३० | ३,३३१.०३ | + ४६.७३ |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, सदर उपशीर्षखाली एकूण अनुदान रु. २८४.३० लाखांच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु. ३३१..०३ इतका झाला आहे त्यामुळे रु. ४६.७३ लाख इतका अधिक खर्च झाला आहे. सदरचा अधिक खर्च व पाणीपट्टी वसुलीच्या महसूली जमा रकमेच्या समायोजनामुळे झाला आहे

महालेखापालांनी सदर उपशीर्षखालील रु. ३३१.०३ लाख इतका खर्च नोंदविला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात तफावत नाही.

( रु. लाखात)

| शीर्ष | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| २७०२ - लहान पाटबंधारे<br>०१ भूपृष्ठ जल<br>८०० इतर खर्च<br>(१५) विशेष दुरुस्ती बांधकामे (२५० हेक्टर खालील लहान पाटबंधारे योजना )<br>(१५) (०२) अधीक्षक अभियंता, कोकण पाटबंधारे मंडळ, रत्नागिरी<br>मूळ । २.०५<br>पुनर्विनियोजन ........५२.९२ | ५४.९७ | ५४.९७ | - |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, विशेष दुरुस्ती बांधकामे (२५० हेक्टर खालील लहान पाटबंधारे योजना ) या उपशीर्षाखाली अधीक्षक अभियंता, कोकण पाटबंधारे मंडळ, रत्नागिरी यांना रु ५४.९७ लाख इतके अनुदान प्राप्त झाले होते त्या अनुषंगाने त्यांचा प्रत्यक्ष खर्च रु. ५४.९७ लाख इतकाच झाला आहे त्यामुळे अधिक्य किंवा बचत दिसून येत नाही.

महालेखापालांनी सदर उपशीर्षाखालील रु. ५४.९७ लाख इतका खर्च नोदविला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात तफावत नाही

**( रु. लाखात)**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| **२७०२ - लहान पाटबंधारे**<br>०१ भूजल<br>८०० इतर खर्च<br>(०६) परिक्षण व दुरुस्त्या<br>(२५० हेक्टर वरील लहान<br>पाटबंधारे बांधकाम )<br>मूळ ..३,१८.२१<br>पूरक ..३२,०८.३९<br>पुनर्विनियोजन ..८,९३.४७ | ४४,२०.०७ | ४३,६५.१८ | -५४.८९ |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, सदर उपशीर्षाखाली एकूण अनुदान रु. ४४२०.०७ लाखांच्या अनुषंगाने विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.४४३७. ८७ लाख इतका झाला आहे त्यामुळे अर्थसंकल्पीय अनुदानाच्या तुलनेत रु. १७.८० लाखाचे अधिक्य दिसून येते. सदरअधिक्य नगण्य आहे. कृपया स्विकारण्यात यावे.

महालेखापालांनी सदर उपशीर्षाखाली रु ४३६५.१८ लाख इतका खर्च नोंदविला आहे. त्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या प्रत्यक्ष खर्चात रा ७२.६९ लाख इतकी तफावत दिसून येते.

याबाबत असे नमुद करण्यात येते की,अधीक्षक अभिंयता पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांचा सदर उपशीर्षाशी संबंधीत रु. ७६.३८ लाख इतका खर्च चुकीने (०७) परिरक्षण व दुरुस्ती (२५० हेक्टरखालील ) लखु पाटबंधारे योजना या उपशीर्षावर नोदविला गेला आहे. त्याचप्रमाणे अधीक्षक अभिंयता, सांगली

पाटबंधारे मंडळ, सांगल यांचा मुख्य लेखाशीर्ष २७०१-मोठे व मध्यम पाटबंधारे खालील (११) (०१) जागतिक बँक अर्थसहाय्य महाराष्ट्र जलसुधार प्रकल्प या उपशीर्षाशी संबंधीत रु. ३.५९ लाख इतका खर्च चुकीने या उपशीर्षाखाली नोंदविला गेला आहे.

आवश्यक चुकीची दुरुस्ती नोंद प्रस्ताव महालेखापाल, नगापूर कार्यालयास शासन पत्र क्र विनियो-२७०२/२००६-२००७/(३२/२००७) /लेखा, दिनांक ३/३२००८ व १०/३/ङ२००८ अन्वये पाठविण्यात आला आहे

**( रु. लाखात)**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| **२८०१ - वीज**<br>८० सर्वसाधारण<br>(००४) सर्वेक्षण व अन्वेषण<br>(०१) ४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च या शिर्षाखाली प्रथम योजनांतर्गत म्हणून नोंदविला आस्थापना खर्च योजनेतर क्षेत्र म्हणून हस्तातंरित केला.<br>मूळ ३,१४.१५ | २,७६.२७ | १,८३.४२ | -९२.८५ |
| पुनर्विनियोजन - ३७.८८ | | | |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांच्या संबंधात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, रू.२७६.२७ लाखाच्या तरतुदीपोटी विभागाने रु. २४१.५८लक्ष इतका खर्च केला आहे. परिणामी रु.३४.६९ लक्षची बचत दिसून येते. अधिक्षक अभियंता मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (वि.गृ.) नाशिक यांनी रु.३४.६९ लक्षचे अनुदान सदर बचत विहीत मुदतीत समिर्पित केल्यामुळे
बचम दिसून येते.

सदर उपशिर्षावर महालेखापालांनी रु.१८३.४२ लक्ष इतका खर्च नोंदविला आहे. त्यामुळे विभागाच्या प्रत्यक्ष खर्चामध्ये रू.९२.९० लक्षची तफावत दि ूसन येते.

याबाबत असे नमूद करण्यात येते की, मुख्य लेखाशिर्ष ४८०१ - वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च (००१) संचालन व प्रशासन या उपशिर्षावर झालेल्या खर्चाचे ५० टक्के रकमेचे मुख्य लेखाशिर्ष २८०१ (योजनेतर ) वीज व सेवाकडे हस्तातंरण या शिर्षावर खातेबदल नोंद आदेशाद्वारे समायोजन

करण्यात येते. रु. ५८.२० लक्ष या रकमेचे समायोजन न झाल्यामुळे महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात व विभागाच्या खर्चात तफात दिसून येते.

सदर तफावतीचे निराकरण करणेसाठी आवश्यक चुकीची दुरुस्ती नोंद प्रस्ताव शासन पत्र क्र. विनियो ४८०१/२००६-२००७/(४४/२००७)/लेखा दिनांक १८.३.२००८ अन्वये पाठविला.

**साक्ष :-**

लोकलेखा समितीने दिनांक २३ मे, २०१२ रोजी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखेअहवालातील परिच्छेद क्रमांक आय-३ "पाटबंधारे, विज व इतर आर्थिक सेवा" यासंदर्भात जलसंपदा विभागाच्या प्रतिनिधिची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी विनियोजन लेख्यामधील विभागाच्या मागणीवरील आक्षेपाच्या अनुषंगाने माहिती घेण्यासाठी समितीने अशी विचारणा केली की, रु. १५,६१,९८.५३ लाख इतकी मूळ तरतूद मंजूर असतानाही रु.१३,५५,०७.४८ लाख इतकी कमी रक्कम प्रत्यक्ष खर्च झाली असतानाही परत रु. २,०३,२८.३२ लाख इतकी अनावश्यक पूरक तरतूद करण्याची कारणे काय अशी विचारणा केली असता समितीला खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, १५६१.९८ कोटी रुपये मंजूर केलेली होती. सदर रक्कम २४०२, २७०१, २७०२, २७०५, २७११, २८०१, ३४०२, ३६०६, हे सर्व लेखाशीर्ष मिळून आय ३ अंतर्गत तरतूद केलेली होती. जुलै महिन्यामध्ये ५१.३७ कोटी रुपयांची पूरक तरतूद करण्यात आली तसेच डिसेंबर महिन्यामध्ये १५१.९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. अशा प्रकारे एकूण १७६९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. १५६१.९८ कोटी रुपयांपैकी ४२४ कोटी रुपये प्रत्यार्पित केले. मग पुन्हा २०३ कोटी रुपयांची पुरवणी तरतूद कशासाठी करण्यात आली असे समितीने अधिक माहिती घेताना विचारले असता सचिवांनी असे सांगितले की, निरनिराळी लेखाशीर्षे एकत्रित असल्यामुळे तरतूद करण्यात आलेली आहे. जागतिक बँकेच्या आर्थिक मदतीने महाराष्ट्र जिल्हा क्षेत्र सुधार प्रकल्प हाती घेण्यात आला होता. एमडब्ल्यूएसआयपी प्रकल्पाकरिता काढण्यात आलेली निविदा वेळेत पूर्ण न झाल्यामुळे ३७५ कोटी रुपये समर्पित करण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेला स्थानिक करापोटी काही रक्कम देय असते. प्रस्तुत बाबीमध्ये आठमाही सुधारित अंदाजपत्रकामध्ये ३४ कोटी रुपयांची बचत करण्यात आल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. जिल्हा परिषदेला स्थानिक करांची रक्कम कित्येक वर्षापासून दिलेली नाही. तसेच जिल्हा परिषदेला निधी देण्याकरिता तरतूद केली जाते. सदर तरतूद करताना ३४ कोटी रुपयांची कमी तरतूद केली होती. यामुळे रक्कम शिल्लक राहिली. त्यावर समितीने एका बाजूला रक्कम शिल्लक आहे तरी देखील जिल्हा परिषदेला दिली जात नाही तर दुसरीकडे ही रक्कम समर्पित केली जाते.

तसेच बजेटमधून काही मर्जीतील जिल्ह्यांनाच ही रक्कम दिली जाते, असा आक्षेप नोंदवून समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

यासंदर्भात पाणीपट्टीच्या रकमेमध्ये स्थानिक उपकर समाविष्ट असतो. ही रक्कम कोषागारामध्ये जमा केली जाते. सदर रक्कम बजेटमधून दिली जाते. यामुळे थोड्या रकमेचा फरक पडतो. वित्त विभागाने बचत केल्यामुळे खर्च कमी झाला असे विभागीय सचिवानी सांगितले. जिल्हा परिषदेला देय असलेली रक्कम अद्याप दिलेली नाही, अशी किती रक्कम अद्याप शिल्लक आहे अशी विचारणा समितीने केली यासंदर्भात विभागाकडून माहिती प्राप्त झाली आहे. **(विवरणपत्र क्र. )**

विभागाने ४३० कोटी रुपये समर्पित केली असून २३० कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आली असल्याची माहिती समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले असता सचिवांनी खुलासा केला की, त्यावर पूरक मागणी केलेली रक्कम वेगळया शीर्षामधील आहे व एमडब्ल्यूएसआयपी प्रकल्पाच्या रकमेची बचत झाली आहे. मुख्यतः योजनांतर्गत रकमेची बचत झाली आहे. एमएसडब्ल्यूआयपी मधील रक्कम योजनांतर्गत होती. उर्वरित रक्कम योजनेतर होती. योजनांतर्गत कामाकरिता तरतूद केलेली रक्कम योजनेतर कामाकरिता खर्च करता येत नाही. तसेच निरनिराळे शिर्ष असल्यामुळे योजनेची रक्कम समर्पित करण्यात आली असा खुलासा विभागीय सचिवांनी केला

त्यावर सचिवांनी अशी विचारणा केली की विभागाने २०० कोटी रुपयांच्या पुरवणी मागणीला मान्यता दिली व ४०० कोटी रुपये समर्पित करण्यात आले. ज्यावेळी पुनर्विनियोजन केले जाते त्यावेळी पुरवणी मागणीमधून निधी दिला जातो. निधी पूर्णपणे खर्च झालेला नाही. सदर विभाग एकच रक्कम खर्च करण्यासाठी वर्षभराचा कालावधी असताना देखील सदर रक्कम परत का करण्यात आली ? यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, १५१ कोटी रुपये डिसेंबरमध्ये घेण्यात आले होते. ही रक्कम योजनेतर मधील होती काय ? १५१ कोटी रुपये योजनेतरमधील होते. सदर प्रकल्पाला जागतिक बँकेकडून आर्थिक मदत दिली जाणार होती. या प्रकल्पाच्या कामासाठी निविदा काढण्यासाठी विशिष्ट कार्यपध्दती अवलंबावी लागते. याकरिता प्रत्येक बाब जागतिक बँकेकडे पाठवून त्यांची मंजुरी घ्यावी लागते. या प्रक्रियेस थोडा अधिक वेळ लागला, अशी माहिती दिली.

कामे पूर्ण करण्यासाठी साधारणपणे एक वर्षाचा कालावधी दिला जातो. वेळोवेळी ना हरकत प्रमाणपत्र आणणे, पाठपुरावा ठेवणे आवश्यक असते. अनेकदा प्रकल्पाकरिता पैसे मिळाल्यानंतर कामाचा पाठपुरावा न करता अधिकारी निवांत बसतात. ४०० कोटी रुपये जलसंपदा विभागाला मिळाले होते. प्रस्ताव तयार करणे, ठराव तयार करणे, जागतिक बँकेकडे जाऊन मान्यता घेणे, निविदा काढणे इ.

तांत्रिक बाबी योग्य प्रकारे पार न पाडल्यामुळे ही रक्कम परत गेली. ही कामे एक वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे आवश्यक होते. मात्र जे काम ८ दिवसात करावयास हवे होते, त्या कामाला २ महिन्याचा काळ लागला असेल तर या संदर्भात समितीने शिफारस केली पाहिजे, असे मत व्यक्त केले.

लघु पाटबंधाऱ्यांच्या कामाकरिता पैसे दिले जात नाही. कोकणामध्ये प्रामुख्याने ० ते १०० पर्यंतची मायनर लघु पाटबंधाऱ्यांची कामे हाती घेतली जातात. मात्र त्याकरिता पुरेशी रक्कम उपलब्ध होत नाही. "काळ प्रकल्पाच्या" दुरुस्तीचे काम ४ वर्षे सुरु होते, अशा शब्दात समितीने नाराजी व्यक्त केली त्यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, जागतिक बँकेकडून निविदा काढण्यास सुरुवातीला विलंब लागला. देखभालीचे काम असल्यामुळे त्या निविदेला पुरेसा प्रतिसाद मिळाला नव्हता. जागतिक बँकेच्या प्रकल्पाच्या संदर्भात ४०३ कोटी रुपये योजनांतर्गत होते. सदर रक्कम प्रत्यर्पित करण्यात आली. निविदा प्रक्रियेस वेळ का लागला याबाबत समितीने खुलासा मागितला त्याबाबतची माहिती प्राप्त झाली आहे. (परिशिष्ट-) निधी खर्च न झाल्याबाबत व ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी काम वेळेत पूर्ण केले नाही, कामास विलंब लावला त्यांच्यावर कारवाई करावी असे अभिप्राय समितीने व्यक्त केले.

काळ प्रकल्पामधील पाण्याचा उपयोग अलिबाग,रोहा, पेण या भागाकरिता केला जाणार होता. मात्र नंतर हे पाणी आरसीएफला दिले गेले. येथील शेतकऱ्यांना पाणी न मिळाल्यामुळे ते भाताचे पीक घेऊ शकत नाहीत. हजारो कोटी रुपयांची कॅनलच्या दुरुस्तीची कामे चालु असल्यामुळे रायगड मधील पाण्याची गरज पूर्ण होऊ शकली नाही. येथील शेतकरी आज त्रस्त झालेले आहेत. या संदर्भातील लेखी माहिती समितीला विभागाकडून प्राप्त झाली आहे. **(विवरणपत्र क्र. )**

मराठवाडयामध्ये लोकांची मागणी असूनही धरणातून पाणी सोडले जात नाही. अशा प्रकारे मराठवाडा व विदर्भावर सातत्याने अन्याय होत आहे. उन्हाळयाकरिता २२ एमएलडी पाणी देणे आवश्यक असताना ९ मे रोजी धरणातून पाणी सोडले व १५ मे रोजी पाणीपुरवठा बंद केला याबाबत विचारणा केली असता. याबाबतची माहिती समितीला देण्याचे आश्वासन विभागाने दिले. परंतु सदर माहिती मात्र समितीचा अहवाल तयार होईपर्यंतही समितीस प्राप्त झाली नाही त्याबद्दल समिती नाराजी व्यक्त करते.

जुलै,२००५ मधील अतिवृष्टी, पूर व समुद्राचे उधाण यामुळे खारभूमी योजनांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले होते. त्याच्या दुरुस्तीवर मोठया प्रमाणावर खर्च झाल्याचे लेखाशीर्षामध्ये दिसून आले. ही घटना जुलै, २००५ ची असल्यामुळे खर्चासाठी योग्य व नियोजित रकमेची तरतूद का करण्यात आली नाही अशी समितीने विचारणा केली असता खुलासा करताना सचिवांनी सगितले की, सन २००५-२००६

मध्ये १५६ लाख रुपयांची तरतूद केली होती. प्रतिवर्षी या खात्याच्या कामाकरिता साधारणपणे तेवढीच तरतूद असते. परंतु जुलै महिन्यामध्ये मोठया प्रमाणात नुकसान झाल्यामुळे जानेवारी, २००६ मध्ये विभागाने नुकसान भरपाईच्या कामाच्या अतिरिक्त खर्चाकरिता पुरवणी मागणीच्या माध्यमातून शासनाकडे पैशांची मागणी केली होती. सदर वाढीव मागणी ही ५६५.७३ लाख रुपयांची होती. यावर प्रतिवर्षी विभागाची मागणी फक्त १६५ लाख रुपयांपर्यंतचीच असते. मग अचानक या वर्षी चार पटीने पैशांची मागणी शासनाकडे का करण्यात आली ? समितीने अशी विचारणा केली त्यावर विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, जुलै, २००५ मध्ये पूर व अतिवृष्टीमुळे जास्त नुकसान झाल्यामुळे विभागाला उपरोल्लेखित रकमेची मागणी करण्यात आली. परंतु मार्च, २००६ मध्ये त्यापैकी फक्त २०० लाख रुपये मंजूर झाले. पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पीय मागण्यांच्या माध्यमातून शासनाकडे विभागाने पुन्हा तेवढयाच रकमेची मागणी केली असता, शासनाने ती मागणी मंजूर केली होती. पुरवणी मागणीच्या माध्यमातूनही शासनाने या विभागाला काही पैसे मंजूर केले होते असे एकूण मिळून ६९१ लाख रुपये विभागाला प्राप्त झाले. परंतु या कामाकरिता प्रत्यक्ष खर्च मात्र ६७६ लाख रुपये इतका आला. त्यानंतर वित्त विभागाने या रकमेलासुधारीत अंदाजपत्रात कपात केली म्हणून प्रत्यक्ष खर्च मूळ मागणीपेक्षा जास्त झाल्याचा खुलासा केला.

रायगड जिल्ह्यातील जमीन ही खारभूमी व खारपट्टया अंतर्गत येते. रेवस,रोहा व मुरुड हा भाग खार भूमिअंतर्गत येतो. या भूमीवर गेल्या २५ वर्षांपासून काही पिकलेले नाही. या भागामध्ये गेल्या पंचवीस वर्षांपासून लागवडच करण्यात आलेली नाही. तेथील हजारो हेक्टर जमीन गेल्या २५ वर्षांपासून नापिक म्हणून पडून राहिलेली आहे. या भागावर शासनाने जर ५०० लाख रुपये खर्च केले, तर तेथे मॅनग्रोव्हज का उगवले? शेतकरी या भागामधील मॅनग्रोव्हज काढण्याकरिता रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून कामे करतात. शेतक-याने या नापिक जमिनीवर काहीतरी पिकविण्याकरिता मॅनग्रोव्हज जर काढले, तर त्याला तुरुंगात जावे लागते. जर या भागामध्ये शासनाने लाखो रुपये खर्च केल्याचे कागदोपत्री दिसून येत आहे, तर मॅन्ग्रोव्हज का उगविले. तसेच, मॅनग्रोव्हज काढण्याच्या कामाकरिता नेमलेले ठेकेदार इतर ठिकाणाहून मजूर बोलावतात. स्थानिक मजूरांना काम देण्यात येत नाही. मॅनग्रोव्हज काढण्याचे ठेके हे निविदा न काढता दिले जाते. खारभूमीवरील कामांकरिता लाखो रुपये खर्च केल्याचा दावा असला तरी या भागामध्ये खर्च करण्यात आलेला नाही. जो काही खर्च करण्यात आला आहे, तो कागदावरच खर्च झालेला आहे. अशी स्पष्ट नाराजी समितीने व्यक्त केली त्यावर कामाचा तपशिल समितीला देण्याचे आश्वासन विभागीय सचिवांने दिले होते त्यानुसार प्राप्त झालेली अधिक माहिती **(विवरणपत्र क्र. )** येथे जोडली आहे.

स्थानिक ग्रामपंचायत व पंचायत समिती यांच्याकडून तेथे सन २००५ पासून आतापर्यंत जी जी कामे झालेली आहेत, त्या कामांचे प्रमाणपत्र मागविण्याचा समितीने निर्णय घेतला. या भागामध्ये शासनाने लाखो रुपये खर्च केलेले आहेत, परंतु प्रत्यक्ष काहीही काम झालेले नाही असे स्थानिक लोकप्रतिनिधीचे मत आहे. तसेच, या भागामध्ये बाहेरील मजूरांना बोलावून ही कामे केली जातात. त्यामुळे स्थानिक गरीब मजुरांवर अन्याय होत असल्याचे मत समितीने मांडले.

कार्यकारी अभियंता यांच्या कामाचा चार्ज उप अभियंता यांच्याकडे न देता, त्यांची स्वतंत्र नियुक्ती लवकरात लवकर करण्यात यावी. ही नियुक्ती विशिष्ट कालमर्यादेमध्ये नियमित करण्यात यावी. तसेच, खार व आंबोलीचे धरण लवकरात लवकर दुरुस्त करुन धरणाची नुकसान भरपाई व त्या परिसरातील झाडांची नुकसान भरपाई देण्यात यावी. यासंदर्भातील कामे शासकीय नियमानुसार व निविदा मागवून करण्यात यावी, असे आदेश समितीने विभागाला दिले. यासंदर्भात कार्यकारी अभियंता यांची नेमणूक ताबडतोब करण्यात यावी. या भागामध्ये प्रत्यक्ष पाहणी करणे. तसेच, या भागामध्ये प्रत्यक्ष झालेल्या व प्रस्तावित असलेल्या कामांची यादी समितीला सादर करण्यास सांगितले त्यानुसार कामांची प्राप्त झालेली अधिक माहिती अहवालाच्या शेवटी **(विवरणपत्र क्र. )** मध्ये जोडली आहे.

मोठे व मध्यम प्रकल्प या शिर्षाखाली विभागाने ४५,७२४.४४ लक्षाच्या तरतुदीपोटी ४५,७२४.४४ लक्ष इतका खर्च केल्याचे नमूद केले आहे. तथापि, महालेखापालांनी ४३,४०६.२४ लक्ष खर्च नोंदविला असल्यामुळे विभागाच्या खर्चामध्ये व महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चामध्ये रु.२३,१८.२० लक्ष इतकी तफावत दिसून येते. ही बाब महालेखापालांच्या निदर्शनास वेळीच का आणण्यात आली नाही ? तरतूद ज्या प्रकल्पासाठी केली आहे,त्या प्रकल्पांची नावे व त्यांची सद्य:स्थिती याबाबतची माहिती समितीने मागविली होती. परंतु ही माहिती अद्याप प्राप्त झाली नाही त्याबद्दल समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. विचारलेल्या प्रश्नाची माहिती देताना विभागीय प्रतिनिधीनी या प्रकल्पावरील जो खर्च आहे, त्याचे व्याज मोठया प्रमाणात प्रकल्पाच्या एकूण खर्चामध्ये मिळवले जाते. हा खर्च नोशनल आहे. प्रतिवर्षी खर्च झ ााल्यानंतर जो हिशोब येतो, तो अंतिम होईपर्यंत एक वर्षभर महालेखापाल तो त्याचप्रमाणे हिशोब करतात. प्रत्यक्ष खर्चावर व अंदाजित खर्चावर व्याजाचा हिशोब करण्याची पध्दत असल्यामुळे या रकमेमध्ये तफावत दिसून येते असे सांगितले. विभागाच्या माहितीवर महालेखांपालानी अभिप्राय देताना असे नमूद केले की, जब किसी रकम या ब्याज का कॅल्क्यूलेशन करते हैं तो डिपार्टमेंट के आदमी को बुलाते हैं और फिर उस फिगर का रिकन्सिलिएशन करते हैं महालेखाकार कार्यालय मे सितम्बर से पहले इसका कॅल्क्यूलेशन किया जाता है. ब्याज कॅल्क्यूलेशन में जो डिफरेंस है उसके संबंध में फिगर देख सकते हैं और विभाग की फिगर देख सकते हैं. इस प्रकार से फिगर में फर्क क्यों आया है,

वह देख सकते हैं. उसके बाद डिपार्टमेंट के आदमी को बुलाने पर भी वे आते नहीं हैं. महालेखाकारांच्या या आक्षेपाबाबत विभागीय सचिवांनी FMG मार्च मे हो जाता है और रिकन्सिलिएशन बाद में होता है इसलिए यह डिफरेंस दिखायी देता है अशी माहिती महालेखाकार यांनी दिली.

खर्चमेळ वेळेवर न होत नसल्यामुळे महालेखाकारांचे आक्षेपाचे परिच्छेद येतात. यावर समितीने नाराजी व्यक्त केली. महालेखाकार हे अंदाजित खर्चावर व्याज परिगणित करीत असतात. या कालावधीमध्ये रकमांमध्ये प्रत्यक्ष खर्च व अंदाजित खर्च यामध्ये तफावती येतात त्यामुळे व्याजात तफावत आढळते, अशी माहिती विभागाने समितीला दिली.

खर्चमेळाची बाब सन २००६ ची असून सन २०१२ पर्यंत एकूण पाच ते सहा वर्षाचा कालावधी असतांना विभागाने कोणत्याही दोन अधिका-यांना महालेखा कार्यालयाकडे पाठवून खर्चमेळ करुन घेणे आवश्यक होते. या कामाकरिता सर्वप्रथम प्राधान्य देणे आवश्यक आहे. खर्चमेळ करण्याकरिता विलंब लागला तरी चालेल परंतु ज्यावेळी वर्षभरामध्ये वेळ मिळतो,त्यावेळी विभागीय अधिका-यांनी महालेखाकार यांच्याकडे जाऊन आक्षेपार्ह परिच्छेदांचे व रकमांचे खर्चमेळ करुन घेणे अत्यंत आवश्यक असून ही विभागाची जबाबदारी असल्यामुळे महालेखाकार यांच्याकडे जाऊन विभागीय अधिका-यांनी सर्व रकमांचे ताळमेळ केले तर महालेखाकारांकडून आक्षेप येणार नाही असे समितीने सुचविले त्यावर प्रतीवर्षी हे आकडे महालेखापाल यांच्याशी सल्ला मसलत करुन अंतिम करण्याबाबतचे आश्वासन समितीने दिले.

विभागाने रुपये ६०७.७८ लक्ष इतका खर्च केला असून महालेखापालांनी रु.३६९.५८ लक्ष इतका खर्च नोंदविला आहे. त्यामुळे नोंदविलेल्या प्रत्यक्ष खर्चात २३८.२० लक्षाची तफावत दिसून आल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले. तसेच अशा तफावती ज्या लेखाशीषामध्ये झाल्या आहेत. त्याचे स्पष्टीकरण विभागाकडे मागितले. ४० टक्के खर्च आंतरलेखा हस्तांतरणांद्वारे मुख्य लेखा शीर्ष ३४५१ सचिवालयीन आर्थिक सेवांकडून मुख्य लेखा शीर्ष २७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे याकडे हस्तांतरित केला जातो, ही बाब नियमानुसार आहे काय ? उक्त आंतरलेखा हस्तांतरणाची नोंद लेखा व अनुज्ञ ेयता या कार्यालयाकडून झालेली नाही. सदर तफावतीचे निराकरण करण्यासाठी चुकीची दुरुस्ती नोंद प्रस्ताव महालेखापाल कार्यालयात विलंबाने का पाठविण्यात आला. त्याची कारणे काय आहेत. महालेखापालांनी त्यास मान्यता दिली आहे काय ? या रकमांमधील तफावत अंतर्लेखन हस्तांतरणादरम्यान अंतिम करण्यात येते, त्यावेळी निर्माण होते का ? नियमानुसार ही तफावत एकाच वेळी अंतिम करता येते का ? समितीच्या या प्रश्नांवर वित्त विभागाने सहमती दर्शवून नियमानुसार रकमांमधील तफावत अंतर्लेखन हस्तांतरणादरम्यान फायनल करण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच

या रकमांमध्ये तफावत  झालेली असून यासंदर्भात महालेखाकार यांच्याकडून आक्षेपार्ह परिच्छेद आलेले आहेत. अशीही माहिती दिली.

कोणत्या तांत्रिक अडचणीमुळे नवीन वाहने खरेदी करण्यात आली नाहीत. सदर वाहने खरेदी करण्यासाठी किती पैसा मिळाला होता. किती दिवसात वाहने खरेदी करावयाचे होती, तेवढ्या दिवसात वाहने खरेदी न करण्याची काय कारणे आहेत. समितीच्या या प्रश्नावर विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, वाहने खरेदी करण्यास त्यावेळी पुरेशी रक्कम मिळाली होती, तथापि, वाहने खरेदी करण्यात आली नसल्यामुळे सदर बचत दिसून येत आहे. वाहने खरेदी करण्यास त्यावेळी पुरेसी रक्कम मिळाली नसल्यामुळे वाहने खरेदी करण्यात आली नव्हती, त्यामुळे सदर बचत दिसून येत आहे. तसेच अहवाल वर्षात जुनी वाहने निर्लेखित करावयाची होती. अभिलेख्यावरुन असे दिसून येते की, जुन्या वाहनांचे निर्लेखिकरण करण्यासाठी विलंब झाल्यामुळे प्रत्यक्ष वाहन खरेदी करण्यास उशीर झालेला आहे. यावर समितीने वाहने खरेदी करण्यासाठी निधी मिळाला असताना विभागाने वाहने खरेदी करण्याची प्रक्रिया वेळत का केली नाही? संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेत कामे न केल्यामुळे तसेच मिळालेला पैसा अधिकाऱ्यांनी वेळेत खर्च न केल्यामुळे निधी परत गेला. यामध्ये जे अधिकारी दोषी आहेत, त्यांच्यावर जबाबदारी फिक्स करुन कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा लेखी अहवाल समितीला सादर करण्याचे आदेश विभागाला देण्यात आले.

महालेखापांलांनी बचत झाल्याची नोंद केली असून विभागाने वेतन व प्रवास भत्ता देयके अदा केल्यामुळे अधिक खर्च झाल्याचे नमूद केला आहे. या तफावतीची निश्चित कारणे काय आहेत? चुकिच्या नोंदीचे प्रस्ताव वेळेत महालेखाकार कार्यालयाकडे का पाठविण्यात आले नाही? याबाबत समितीने विचारणा केली असता चुकिच्या नोंदीचे प्रस्ताव वेगवेगळ्या तारखांना पाठविण्यात आले असल्यामुळे त्यामध्ये काही वेळेस विलंब झाला असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

पुण्याच्या हवामान खात्यासाठी उपकरणांच्या निविदा अंतिम न झाल्यामुळे व औरंगाबाद प्रयोग शाळेसाठी आवश्यक असलेल्या उपकरणांच्या किंमती वाजवी नसल्यामुळे खरेदी केली नाही, अशी माहिती समितीने दिली. यावर उपकरणांची खरेदी करण्यासाठी जे दर देण्यात आले होते ते उने १७ टक्के होते. त्यामुळे त्यांच्याकडील साहित्य गुणवत्तेवर टिकणार नसल्याचे नियुक्त केलेल्या समितीला वाटले होते, त्यामुळे त्यांनी त्याप्रमाणे कार्यवाही केली नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. उने १७ टक्के दर देऊन संबंधितांची काम करण्याची तयारी होती, परंतु विभागाने त्यांना संधी दिली नसल्याचे तसेच साहित्याच्या गुणवत्तेची तपासणी करण्याची यंत्रणा विभागाकडे असल्यामुळे साहित्य प्राप्त झ ााल्यानंतर विभागाला तपासणी करणे शक्य झाले असते, त्यानंतर निविदा रद्द करता आली असती,

कारण निविदा रद्द करण्याचे अधिकार विभागाला होते. यावर कमी रकमेची निविदा भरुन साहित्य चांगल्या गुणवत्तेचे मिळत नाही, त्यामुळे चुकीचे काम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या संदर्भात समिती नियुक्त करण्यात आली होती. त्या वेळच्या समितीने हा निर्णय घेतला होता. १० टक्के पेक्षा जास्त बिलो निविदा आली तर ती विचारात घेण्यात येऊ नये. १० टक्के बिलोपर्यंतच्या निविदा विचारात घेण्यात येतात. सदर साहित्याचे दर उने १७ टक्के असल्यामुळे त्या बाबत विचार करण्यात आला नव्हता. हा निर्णय त्यावेळच्या समितीने घेतला आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. या प्रकरणाच्या संदर्भात उशीर का झाला या बाबतची सविस्तर माहिती समितीला लेखी स्वरुपात देण्याचे आश्वासन विभागाने दिले. परंतु सदर माहिती अप्राप्त आहे.

तीन कोटी रुपयांचे चुकिच्या नोंदीची प्रस्ताव विभागाकडून येणे असताना फक्त तीन लाख रुपयांचे चुकिच्या नोंदीचे प्रस्ताव महालेखाकार कार्यालयास सादर करण्यात आले आहेत. इतर रकमेचे चुकिच्या नोंदीचे प्रस्ताव का पाठविण्यात आले नाहीत ? अशी विचारणा समितीने केली. त्यावर हा सर्व खर्च पगार व आस्थापना यावर झालेला असून एकूण २.९३ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. यामध्ये २ कोटी ५१ लाख ९२ हजार रुपयांची तफावत दिसून आली. वेगवेगळ्या ठिकाणचे चुकिच्या नोंदीचे प्रस्ताव पाठविण्यात आले नाहीत, ही वस्तुस्थिती विभागीने विशद केली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या विभागातीले खर्चमेळाची कामे वेळच्या वेळी करुन घेणे आवश्यक असून जो खर्च करण्यात आलेला आहे, त्या खर्चाचे खर्चमेळ वेळेत न केल्यामुळे तफावत आल्याचे समितीला आढळले. येथे ३ कोटी १५ लाख रुपयांच्या प्रश्न असला तरी या प्रकरणात बचत झाली असल्याचे तसेच सदर रकमेचे चुकिच्या नोंदीची प्रस्ताव वेळेत सादर न केल्यामुळे तफावत ही दिसून येत असल्याचे समितीने मान्य केले. सहा-सहा वर्षे खर्चमेळ न केल्यामुळे महालेखाकार कार्यालयाकडून परिच्छेद काढण्यात येत असल्यामुळे याबाबत अधिकाऱ्यांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक असल्याचे समितीने सांगितले. चुकिच्या नोंदीचे प्रस्ताव पुढील आर्थिक वर्षात ३१ मार्चपर्यंत सादर करावयाचे असतात त्या नंतर सादर करण्यात आलेले चुकिच्या नोंदीचे प्रस्ताव महालेखाकार कार्यालयाकडून स्वीकारण्यात येत नाहीत. आता बीडीएस पध्दत सुरु करण्यात आल्यामुळे असे प्रश्न निर्माण होत नसले तरीही नियमाप्रमाणे खर्चमेळ वेळेत न केल्यामुळे अशा अडचणी अनेक वेळा निर्माण होतात. त्यामुळे समितीचा वेळ वाया जात असून यासाठी जे अधिकारी जबाबदार आहेत, त्याच्यावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करणे आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला लेखी सादर करण्याचे आदेश समितीने दिले.

२.९१ लाख रुपयाचे खर्चमेळ त्यावेळी करण्यात आलेले नाही. आता तरी या रकमेच्या संदर्भातील माहिती विभागाकडे उपलब्ध झालेली आहे काय ? या रकमेचा शोध लागत नाही अशी नोंद

असणे अयोग्य असल्याचे मत समितीने व्यक्त केले. त्यावर गेल्या पाच वर्षातील या रकमा असल्यामुळे या संदर्भातील खर्चमेळ होणे आवश्यक होते. सन २००९ मधील २ कोटी ५१ लाख ९२ हजार रुपयांची ही रक्कम आहे. सचिवांनी अशी माहिती दिली की, या रकमेच्या संदर्भात विभागाने बराच प्रयत्न केला, परंतु या संदर्भातील रकमेचा शोध लागला नाही. ही रक्कम बऱ्याच कार्यालयामध्ये विभागण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष झालेला खर्च व महालेखाकार कार्यालय यांच्या हिशोबाचा हा विषय आहे. प्रत्यक्षात रक्कम खर्च झालेली असून सदर रकमेचे खर्चमेळ करण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या रकमेच्या तफावतीचा शोध संबंधित अधिकाऱ्यांनी का लावला नाही याची माहिती घेऊन रकमेच्या संदर्भातील व्हाऊचर उपलब्ध करुन या रकमेचा ताळमेळ विभागाला करता यावा तसेच एखादे वेळेस ही रक्कम दुसऱ्या विभागाच्या शीर्षाखाली दर्शविण्यात आलेली असेल तर ते सुध्दा तपासून पाहून, या रकमेचा शोध घेण्यात यावा, असे समितीने सुचविले. त्यावर विभागाचे अधिकारी संबंधित ठिकाणी पाठवून या रकमेचा शोध घेण्याचे विभागीय सचिवांनी मान्य केले.

वित्त व नियोजन विभागाने आठमाही सुधारित अंदाजात कपात केल्यामुळे रु.९७.७२ लक्ष इतक्या अधिक खर्चाबाबत खुलासा करताना वित्त विभागाने आता बीडीएस पध्दतीचा अवलंब करण्यात येत असल्यामुळे कपात करण्याचे प्रमाण कमी झाले आहे. रक्कम वेळच्या वेळी खर्च होते किंवा नाही याची माहिती मिळत असते, असा खुलासा केला.

अकोला पाटबंधारे मंडळाची मूळ रक्कम ९८.६४ लाख रुपये असून प्रत्यक्षात खर्च ६३.२० लाख रुपये झाला आहे. रुपये ५५.०० लाख इतका (FMG) मूळ अंतिम खर्च झाला आहे. प्रत्यक्षात खर्च ११९.९९ लाख रुपये इतका झाला आहे. रुपये ८७.५३ लाख इतका मूळ अंतिम खर्च झाला आहे. सांगली पाटबंधारे मंडळाची मूळ रक्कम १०८८.४० लाख रुपयांची होती. प्रत्यक्षात खर्च ८३१.९० लाख रुपये झाला असून रुपये ५४३.९८ लाख इतका मूळ अंतिम खर्च झाला आहे. सोलापूर मंडळाची मूळ रक्कम १५७.०५ लाख रुपये असून प्रत्यक्षात खर्च १४४.९२ रुपये इतका झाला असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

जेव्हा प्रत्यक्षात कपात लागली होती, तोपर्यंत संबंधितांनी सदरहू खर्च केला होता काय ५० लाखाला कपात लावावयाची होती, पण ८० लाखाला कपात लावली. मात्र त्या नंतर ३० लाख रुपये जादा खर्च केले आहेत. त्यामुळे समितीला या परिच्छेदाच्या संबंधातील तारखेसह सर्व माहिती देण्याचे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

मुळा प्रकल्प अहमदनगर जिल्ह्यातील असून कोणकोणत्या प्रकल्पांच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे? त्यासाठी काही खर्च करण्यात येत आहे काय ? यावर विभागीय सचिवांनी

सध्या मोठ्या प्रकल्पांच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त असून मूळ प्रकल्प शासनाच्या स्तरावर मंजूर करण्यात आला असून पोलीस बंदोबस्ताचा खर्च गृह विभागाने करावयाचा आहे आणि मग संबंधित विभागाकडून प्रतिपूर्ती घ्यावयाची आहे. मात्र तत्पूर्वी आपल्याकडून अगोदर निधी घेतला जातो. सध्या सर्व प्रकल्पाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे, अशी माहिती दिली. धरणाच्या ठिकाणी बंदोबस्त करण्याकरता किती खर्च होतो ? त्याठिकाणी एकंदर किती पोलीस असतात ? याबाबतची माहिती विभागाने समितीला अद्याप दिलेली नाही. राज्यातील १०-२० धरणांच्या ठिकाणी सुरक्षा ठेवण्याकरता जवळजवळ १०० ते २०० पोलीस कायमचे असल्याबाबत समितीला माहिती देतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्रारात जे सुरक्षा दल तयार केले आहे, त्यातील ८-१० पोलीस तेथे सुरक्षेसाठी कायम रहाणार आहेत. तसेच कोयना प्रकल्पाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नाही. पण भातसा प्रकल्पाच्या ठिकाणी खाजगी रक्षक ठेवण्यात आलेले आहेत. राज्यामध्ये प्रकल्पांच्या सुरक्षिततेसाठी एकूण किती पोलीसांची नियुक्ती करण्यात आलेली आहे याबाबतच माहिती देण्यात यावी तसेच ज्याप्रमाणे इतर ठिकाणी खाजगी सिक्युरिटी असते त्याप्रमाणे जलसंपदा विभागाने स्वत:ची सुरक्षा व्यवस्था तयार करावी असेही विभागाला समितीने सुचविले.

कुकडीचे जे पाणी येते ते कर्जतपासून वरच्या भागामध्ये सोडल्याने खालच्या भागावर अन्याय होतो. तसेच प्रचलित आवर्तनाच्या पध्दतीनुसार टेल टू हेड पाणी द्यावयास पाहिजे. त्याची सातत्याने पायमल्ली होत असल्यामुळे जळगांव भागातील शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. सन २००० मध्ये ४०० कोटी रुपये खर्च करुन मुख्य कालवे बांधण्यात आले आणि त्याची प्रशासकीय मान्यता प्रचलित कायद्यानूसार असल्यामुळे चाऱ्या आणि पोटचाऱ्या होत नाहीत. पण त्या झाल्या नाहीत, याची कारणे काय आहेत? कर्जत भागामध्ये २८ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणे आवश्यक असताना त्याठिकाणी ९० हजार पेक्षा कमी सिंचन होत असून तेथील शेतकऱ्यांचे नुकसान होत असून ज्या ठिकाणी जमीन संपादन करण्यात आली आहे ती कमांड एरियातील आहे. तेथे त्यांना अपूरे पाणी मिळते तर चोंडी केटी मध्ये पाणी ओव्हर फ्लो सोडण्याची योजना केली आहे. पण १५ ऑक्टोबर पूर्वी सातत्याने के.टी.वेअरचे पाणी बंद होते. अशा प्रकारे विसंगत स्वरुपाचे निर्णय घेण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले. तसेच ते नियमित करणे आवश्यक असून जर पाणी सोडवयाचे असेल तर १५ ऑक्टोबर नंतर त्यादृष्टीने तरतूद करावी. परंतु आजतागायत कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम झ ाालेले नाही आणि पल्पेटेशनचे प्रमाण वाढत आहे. कालव्याच्या अस्तरीकरणाच्या संबंधात कार्यक्रम आखण्यात आला आहे काय ? तसेच सर्व ठिकाणी अस्तरीकरण केलेच पाहिजे काय? या प्रश्नावर विभागीय सचिवांनी टेल टू हेड पाणी दिले जाऊन त्याचे पालन होणे गरजेचे असल्याचे सांगितले.

तसेच हे काम एम.डब्ल्यु.एस.आय.पी.मध्ये करीत आहे. मुख्य कालव्याच्या बाबतीत हे काम करणे खर्चिक असल्यामुळे ते सगळया ठिकाणी परवडत नसून केंद्र शासनाने अस्तरीकरणाच्या बाबतीत सूचना दिलेल्या आहेत. अस्तरीकरण करावयास पाहिजे पण त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये खूप वाढ होते.

अस्तरीकरणाची किंमत धरणाच्या कामामध्ये अंतर्भूत असेल. याठिकाणी पाण्याचा साठा करुन ठेवला आहे पण त्याचे वितरण केले नाही, अस्तरीकरण केले नाही. धरण बांधत असताना पोटचाऱ्या केल्या जातात आणि त्याचा खर्च या कामाच्या खर्चामध्ये समाविष्ट असावयास पाहिजे. मूळ प्रोजेक्टमध्ये सोडण्यात येणारे २०५० टीएमसी पाणी कुठपर्यंत द्यावयाचे आहे याचेही प्लॅनिंग केलेले असते आणि त्यासाठी येणारा खर्चही त्यामध्ये समाविष्ट असतो. तसेच पुनर्वसन करावयाचे असेल तर त्यासाठी जमीन संपादन करावी लागते. अस्तरीकरणासाठी जो खर्च येणार आहे तो मूळ प्रकल्पाच्या खर्चामध्ये समाविष्ट केलेला असतो काय ? अशी विचारणा समितीने केली. त्यावर जुन्या प्रकल्पांच्या ठिकाणी अस्तरीकरण करण्याचे ठरलेले नाही तर काही प्रकल्पांसाठीच तरतूद केलेली आहे. जेथे जास्त लांबीचे कालवे आहेत तेथे अस्तरीकरण करीत आहोत. काही कालवे जुन्या काळात ई.जी.एस.अंतर्गत करण्यात आले आहेत. तेथील पाणी निघून जाते, त्याठिकाणी अस्तरीकरणाचे काम करावे लागते. जुने जे प्रकल्प आहेत त्याबाबतीत केंद्र शासनाच्या आर.आर.आर किंवा ए.आय.बी.पी. योजने अतंर्गत काम पूर्ण करीत आहोत. परंतु या संबंधातील खर्चाला मर्यादा असून मात्र आता नवीन प्रकल्पांमध्ये देखील लायनिंगच्या बाबतीत काही प्रमाणात तरतूद केली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने रिक्त पदे न भरल्यामुळे रु.२०.८८ लाख रुपयांची बचत झाल्याचे दिसून येत आहे. सदरहू पदे न भरण्याची कारणे काय आहेत ? महाराष्ट्र राज्यामध्ये एकंदर इरिगेशन विभागामध्ये वर्गनिहाय एस.ई., एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर, इतर संबंधित अधिकारी, कर्मचारी अगदी शिपायापर्यंत मान्यताप्राप्त पदे किती आहेत या बाबातची माहिती देताना सचिवांनी सांगितले की, पुणे आणि नाशिक विभागात आता नव्याने मागणी करणार आहोत. सध्या नवीन कर्मचारी घेतलेले नाहीत. तसेच या संदर्भातील इतर माहिती पुढील बैठकीत सादर करण्याचे आश्वासन दिले परंतु अद्याप ही माहिती समितीला प्राप्त झाली नाही.

पाणीपट्टी वसुलीच्या महसूली रकमेचे समायोजन कसे केले ? पाणीपट्टीची वसुली ही जमेची बाजू आहे आणि ती नियोजित असते. त्याप्रमाणे ते व्हावयास पाहिजे. तसेच २००६-२००७ मध्ये ५३.८३ कोटी रुपये इतकी रक्कम जमा झाली. त्याच्या २० टक्के रक्कम जिल्हा परिषदेला का दिली व ही रक्कम जिल्हा परिषदेला स्थानिक उपकर म्हणून द्यावयाची आहे आणि त्याप्रमाणे ती रक्कम देण्यात आली आहे.मात्र ते करीत असताना ४६.७३ लाख रुपयांचा जादा खर्च झालेला आहे. यावर इतका

अधिक खर्च कसा झाला? परंतु जेवढी द्यावयाची असेल तेवढीच दिली पाहिजे. अधिक खर्च कसा झाला ? अशी समितीने विचारणा केली. याठिकाणी जेवढी रक्कम जमा झाली, त्याप्रमाणे अदा केली आहे. पण त्यासाठी असलेले बजेट कमी होते.त्यामुळे याठिकाणी जास्त खर्च झाल्याचे दिसत आहे. परंतु प्रत्यक्षात जो निधी प्राप्त झाला, तो देण्यात आला आहे. सुरुवातीला येणारा निधी आपण अंदाजित धरतो तसेच याठिकाणी संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी निधी दिला आहे की एका जिल्ह्यासाठी देण्यात आला आहे ? असे विभागीय सचिवांना विचारण्यात आले.

चुकीच्या नोंदीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव महालेखापाल, नागपूर कार्यालयास विलंबाने का पाठविण्यात आला आहे? ही चूक कोणी केलेली आहे ? यावर याठिकाणी अधीक्षक अभियंता पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांचा सदर उपशीर्षाशी संबंधित रु.७६.३८ लाख इतका खर्च चुकीने परिरक्षण व दुरुस्ती लघुपाबंधारे योजना या उपशीर्षावर नोंदविला गेला असून याबाबतीत नोट ऑफ एरर दिलेली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली. तसेच ती उशीरा का पाठविण्यात आली नसून चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव वेळेमध्ये पाठविलेली असून यासाठी एक वर्षाची मुदत असते. ३ मार्च २००८ रोजी पुणे पाटबंधारे मंडळाने आणि १० मार्च २००८ रोजी सांगली महामंडळाने नोट ऑफ एरर पाठविलेली आहे. अशा प्रकारे ३१ मार्च पूर्वी पाठविण्यात आली आहे, अशीही माहिती दिली.

**अभिप्राय व शिफारशी**

महालेखापालांनी नमूद केलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने समितीसमोर आलेल्या माहिती वरून असे दिसून येते की, अनुदान क्रमांक आय-३ अंतर्गत विभागाने रु. २०३ कोटी एवढया रकमेची पुरक मागणी केली होती. परंतु त्याचवेळी रु. ४३० कोटी प्रत्यार्पित केल्याचेही दिसत होते. त्यामुळे एकाच वर्षी पूरक मागणीही घेतली होती व रक्कम प्रत्यार्पित देखिल केली होती. यासंदर्भात विभागाने खुलासा देताना स्पष्ट केले की, वेगवेगळया शिर्षाखाली या रक्कमा असून त्या योजनांतर्गत (Plan) व योजनेत (Non-Plan) रकमा होत्या. असे असले तरी, विभागास अंदाजपत्रकात तरतुद उपलब्ध असताना हा निधी कामांकरीता खर्च न करता प्रत्यार्पित केला गेला. ज्यावेळी एखादया प्रकल्पातील निधी मंजुर केला जातो त्यावेळी सदर प्रकल्पाबाबत आराखडे व खर्चाचा प्रस्ताव तयार करणे, **निविदा प्रक्रिया पूर्ण करणे या ज्या तांत्रिक बाबी असतात त्यांचे सोपस्कार करुन घेणे आवश्यक असते. याबाबत कालबध्द कार्यक्रम तयार करुन त्या अनुषंगाने कार्यवाही करणे अपेक्षित असताना विभागाने यासंदर्भातील निष्काळजीपणा दर्शविला असल्याने समिती नापंसती व्यक्त करते. त्यामुळे आगामी कालावधीत एखादया प्रकल्पास अंदाजपत्रकात तरतूद उपलब्ध झाली असेल त्यावेळी सदर कामाचे योग्य नियोजन विहित वेळेमध्ये करुन**

**प्रकल्प पूर्ण करण्याच्यादृष्टीने विभागाने योग्य ती पाऊले उचलावीत अशी समितीची शिफारस आहे. तसेच विद्यमान प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे निधी खर्च न होता प्रत्यार्पित करण्यात आला त्यांची सखोल विभागीय चौकशी करण्याची कार्यवाही करण्यात यावी व याबाबतच्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी.**

लोकलेखा समितीपुढे येणारे काही आक्षेप हे संबंधित विभागांशी खर्चमेळयांची कामे न केल्यामुळे किंवा ती कामे विहित मुदतीत न केल्यामुळे लेख्यामध्ये आलेल्या तफावतीमुळे झाल्याचे वारंवार निदर्शनास आले आहे. जलसंपदा विभाग देखील अपवाद नाही. लेख्यांच्या खर्चाचा ताळमेळ घालण्याच्या सूचना शासन स्तरावर वारंवार देऊनही तसेच या संदर्भात मुख्य सचिवांनी निदेश दिल्यावरही खर्चमेळाच्या कामात विभागाचे अधिकारी व कर्मचारी दिरंगाई व निष्काळजीपणा करीत असतील तर ती गंभीर बाब आहे. लोकलेखा समितीने देखिल या संदर्भात त्यांच्या बैठकीत व अहवालांमध्ये वेळोवेळी नाराजी व्यक्त केली आहे. विभाग खर्चाचा ताळमेळ करीत नसल्याने खर्चाच्या आकडयांत तफावत आढळते व यावर महालेखापालांनी आक्षेप घेतल्यावर त्यांना स्पष्टीकरण देताना त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेटून त्यांचे निराकरण देखिल करण्याची दक्षता घेण्यात येत नाही. जलसंपदा विभागाने देखिल ६ वर्षे उलटून गेल्यावर देखिल महालेखापालांच्या कार्यालयाने घेतलेल्या आक्षेपांची परिपूर्ती करण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्यांची नियुक्ती केली वा सदर आक्षेपाचा निपटारा करण्यासाठी विशेष कार्यवाही केली समितीने तीव्र नापसंती याप्रकरणी नोंदविली असून यापुढील **जलसंपदा विभागाच्या लेख्यासंदर्भात विद्यमान कालावधीपर्यंत महालेखापालांनी घेतलेल्या इतर आक्षेपाची पूर्तता करण्यासाठी जलसंपदा विभागाने तात्काळ दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन त्यांचेवर प्रामुख्याने महालेखापाल कार्यालयाशी समन्वय साधण्याची जबाबदारी निश्चित करावी अशी समिती शिफारस करीत आहे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी.**

राज्यातील धरणांच्या सुरक्षेविषयीचा प्रश्न समितीपुढे विचारार्थ आला असता मोठया प्रकल्पांच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येतो अशी माहिती समितीस मिळाली परंतु कोयनेसारख्या महत्वाच्या प्रकल्पावर पोलीस बंदोबस्त नसून भातसा प्रकल्पावर देखिल खाजगी रक्षक नेमण्यात आले आहेत. महाराष्ट्रात तयार करण्यात आलेल्या सुरक्षा दलातील पोलीसांचा या बंदोबस्ताकामी उपयोग करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. जलसंपदा विभाग एवढे मोठे प्रकल्प उभारणे आणि त्यांच्या सुरक्षेविषयी त्यांची स्वत:ची सुरक्षा व्यवस्था नसणे याबाबत समितीने सखेद आश्चर्य व्यक्त केले. **राज्याची अमूल्य संपत्ती असलेल्या धरणाची व त्यातील पाणी साठयाच्या सुरक्षेवर विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याने व सदरहू सुरक्षा व्यवस्था खाजगी सुरक्षा यंत्रणा वा शासनाच्या एखाद्या संस्थेवर**

**सोपविन्याऐवजी जलसंपदा विभागाने स्वत:ची सुरक्षा व्यवस्था उभारण्याच्या शक्यता तपासून ते करणे व्यवहार्य असल्यास त्याबाबत साकल्याने विचार करावा व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी.**

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग

### ग्रामविकास कार्यक्रम

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करत असताना अनुदान क्र. एल-३ ग्रामविकास कार्यक्रम " मधिल प्रधान लेखा शिर्ष २२३५ " सामाजिक सुरक्षा व कल्याण " प्रधान शिर्ष २४०२ " मृद व जलसंधारण " प्रधान शिर्ष २४०६ " वनीकरण व वन्यजीवन " प्रधानशिर्ष २४१५ " कृषी विषयक संशोधन व शिक्षण " प्रधान शिर्ष २५०५ " ग्रामीण रोजगार " प्रधान शिर्ष २५११ " इतर ग्रामविकास कार्यक्रम " व " डोंगराळ क्षेत्रे " प्रधान शिर्ष २७०२ " लहान पाटबंधारे " प्रधान शिर्ष २८१० " अपारंपारिक उर्जा साधन " प्रधान शिर्ष ३४५४ " जनगणना, सर्वेक्षण व सांख्यिकी " प्रधान शिर्ष २६०६ " साहाय्यकारी साहित्य व साधन सामग्री " शिर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.

### अनुदान क्रमांक एल-३- ग्रामविकास कार्यक्रम

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| **२५१५- इतर ग्रामीण विकास कार्यक्रम** | | | | |
| १०१ पंचायत राज | | | | |
| (१०१) (०१) (१०) बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत राज संस्थांना विविध योजनांसाठी सहाय्यक अनुदान | | | | |
| मूळ | ३,९६,६०.०० | | | |
| पूरक | १,६६,७०.४३ | | | |
| पुनर्विनियोजन | १,६६,७०.४३ | ३,९६,६०.०० | ३,९६,०८.५८ | -५१.४२ |

प्रामुख्याने केंद्र सरकारने अनुदानाचा दुसरा हप्ता न दिल्यामुळे मार्च २००७ मध्ये प्रत्यपर्ण/पुनर्विनियोजनाव्दारे रु. १६६७०.४३ लाखाचा निधी काढण्यात आला. रु. ५१.४२ लाखाची अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (२५१५ ०४६५) या उप शिर्षाखाली महालेखापालांनी नोंदविलेला खर्च व विभागाचा प्रत्यक्ष खर्च यात तफावत नाही. अंतिम तरतुदीनुसार रु. ५१.४२ लाखाची बचत जिल्हा परिषद गडचिरोली यांना दि. ३०.३.२००७ चे अनुदानाचे आदेश रात्री अशीरा प्राप्त झाल्याने व दिनांक ३१.३.२००७ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने रक्कम कोषागारातून काढता आली नाही.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| २५१५ इतर ग्रामीण विकास कार्यकम<br>१०१ पंचायत राज<br>(००१) (०१) (०३) हिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी<br>जि.प.ना सहायक अनुदाने. | | | | |
| मूळ | २६,५०.०० | | | |
| पुनर्विनियोजन | -५,८३.३२ | २३,६६.६८ | २३,४४.७० | -२१.९८ |

जिल्हा परिषदांकडून कमी मागणी आल्यामुळे मार्च २००७ मध्ये रु. ५८३.३२ लाखांचा निधी परत करण्यात आला.

रु. २१.९८ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (२५१५००५३) या उपशिर्षाखाली महालेखापालांनी नोंदविलेला खर्च व विभागाचा प्रत्यक्ष खर्च यात तफावत नाही. विभागीय खर्चानुसार रु. २१.९८ लाखाची बचत जिल्हा परिषद यवतमाळ (पंचायत समिती, आर्णी) यांना बांधकामासाठी जागा उपलब्ध न झाल्याने झालेली आहे.

(रुपये लाखात)

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण दत्तमत..<br>(०२) समाज कल्याण,<br>२०० इतर, कार्यक्रम<br>२०० (००) (०१) दहन व दफन<br>भूमीसाठी इतर कार्यक्रम. | | | |
| मूळ .. ४६.०२ | | | |
| पूनर्विनियोजन .. -३४.०२ | १२.०० | १२.०० | ...... |

दहन व दफन भूमीच्या भूसंपादनाकरीता उप विभागीय अधिकाऱ्यांकडून प्रस्ताव न आल्यामुळे मार्च २००७ मध्ये रुपये ३४.०२ लाखाचा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे, की (२२३५१६६६) या उपशिर्षाअंतर्गत महालेखापालांनी नोदविलेला खर्च व विभागाचा प्रत्यक्ष खर्च यात तफावत नाही. विभागीय खर्चानुसार बचत वा अधिक खर्च "निरंक" आहे.

जिल्हाधिकारी सोलापूर, अमरावती, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, चंद्रपूर व लातूर या १३ जिल्ह्यांना स्मशानभूमीकरीता तरतूदीचे वाटप करण्यात आलेले होते.

जिल्हाधिकारी सोलापूर, अमरावती, यवतमाळ, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, चंद्रपूर व लातूर यांचेकडील स्मशानभूमीचे प्रस्ताव न आल्यामुळे व भूसुंपादनाचे अंतिम निवाडे न झाल्यामुळे रु. ३४.०२ लाखाची बचत माहे मार्च, २००७ मध्ये प्रत्यार्पित करण्यात आली.

| शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | (रुपये लाखात) अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २४१५-कृषिविषयक संशोधन व शिक्षण-<br>०१ पीक संवर्धन<br>१२०-इतर संस्थांना सहाय्य,<br>१२० (पी) (०३)<br>(०१) व (०३) यशवंतराव चव्हाण प्रशासन विकास प्रबोधनी (यशदा) पुणे यांस सहायक अनुदाने. | | | | |
| मूळ | ४,६१.०१ | | | |
| पुनर्विनियोजन | -३,४३.८५ | १,१७.१६ | १,१७.१६ | .... |

केंद्राचा हिस्सा न आल्यामुळे मार्च २००७ मध्ये रु. ३४३.८५ लाखाचा निधी परत करण्यात आला या बाबतची कारणे कळविण्यात आली नाही.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (२४१५०५१७) (२४१५०६१५) या उपशिर्षाखाली महालेखापालांनी नोंदविलेला खर्च व विभागाचा प्रत्यक्ष खर्च यात तफावत नसून बचत व अधिक खर्च निरंक.

| शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | (रुपये लाखात) अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २४१५- कृषिविषयक संशोधन व शिक्षण-<br>०१ पीक संवर्धन<br>१२०-इतर संस्थांना सहाय्य,<br>१२० (पी) (०३) (०२) ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र. | | | | |
| मूळ | १,४७.५६ | | | |
| पुनर्विनियोजन | -१५.२४ | १,३२,३२ | १,३२,३२ | ...... |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (२४१५०६२४) या उपशिर्षाखाली

महालेखापालांनी नोंदविलेला खर्च व विभागाचा प्रत्यक्ष खर्च यात तफावत नसून बचत व अधिक खर्च निरंक.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|---|
| २५०१-विशेष ग्राम विकास कार्यक्रम<br>०१, एकात्मीक ग्राम विकास कार्यक्रम,<br>००३ (०३) (०१) स्वयंरोजगारासाठी ट्रायसेम व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे ग्रामीण युवकांना प्रशिक्षण देणे. | | | | | |
| मूळ | २,८३.२६ | | | | |
| पुनर्विनियोजन | -६५.४० | | २,१७.८६ | २,१७.८६ | ..... |

जिल्हा परिषदांकडील कमी मागणीमुळे मार्च २००७ मध्ये रु. ६५.४० लाखाचा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (२५०१०४९६) उप लेखाशीर्षाखाली मूळ तरतूद रु. २,८३,२६,०००/- एवढी असून त्यापैकी रु. ६५,४०,०००/- इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली.

अंतिम सुधारीत अनुदान रु. २,१७,८६,०००/- एवढे असून विभगाचा खर्च सुध्दा तेवढाच आहे. महालेखापाल यांनी नोंदविलेला खर्च व विभागाचा खर्च यात कोणतीही तफावत नाही.

जिल्हा कार्यालयाकडून अनूदान रकमेची मागणी कमी करण्यात आल्याने रु. ६५,४०,०००/- इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आलेली आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| २५०१ ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम<br>०६ स्वयंरोजगार कार्यक्रम<br>१०१ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना<br>१०१ (०१) (०१) अनुसूचित जाती/जमाती व्यतिरिक्त लाभार्थ्यांना अर्थसहाय्य | | | |
| मूळ ... १४,२९.६३<br>पुनर्विनियोजन -१,७८.७३ | १२,५०.९० | १२,५०.९० | ...... |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (२५०१०५४९) या उप शिर्षाखाली मूळ तरतूद रु. १४,२९,६३,०००/- एवढी असून त्यापैकी रु. १,७८,७३.०००/- इतकी रक्कम प्रत्यार्पीत करण्यात आलेली आहे.

अंतिम सुधारीत अनुदान रु. १२,५०,९०,०००/- एवढे असून विभागाचा खर्च सुध्दा तेवढाच आहे. महालेखापाल यांनी नोंदविलेला खर्च व विभागाचा खर्च यात कोणतीही तफावत नाही.

या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून ७५ % व राज्य शासनाकडून २५ % खर्च करण्यात येतो. सबब या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून सर्व जिल्ह्यांना केंद्राचा हिस्सा प्राप्त असून केंद्राकडील मंजूर एकूण रकमेच्या २५ % इतका शासनाच्या समरुप हिस्सा मंजूर करुन वितरीत केल्यावर रककम रु. १,७८,७३,०००/- इतके अनुदान शिल्लक राहिल्याने ही सर्व रक्कम प्रत्यार्पिम करण्यात आली.

(रुपये लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| २५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रम<br>८०० इतर खर्च<br>८०० (०१) (०२)<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रशासन<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना सहाय्यक<br>अनुदान (योजनांतर्गत २५ % राज्य योजना) | | | |
| मूळ .... ५,५९.१५ | | | |
| पुनर्विनियोजन ... -१,५६.३० | ४,०२.८५ | ३,८८.८० | -१४.०५ |

काही जिल्ह्यांना केंद्राचा हिस्सा न मिळाल्यामुळे मार्च २००७ मध्ये रु. १५६.३० लाखाचा निधी परत करण्यात आला. रुपये १४.०५ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (२५१५०३७६) या उपशिर्षाखाली महालेखापालांनी नांदविलेला खर्च व विभागाचा प्रत्यक्ष खर्च यात तफावत नाही. अंतिम तरतूदीनुसार रु. १४.०५ लाखाची बचत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ठाणे यांना सदर रकमेचे आदेश दि. ३०.३.२००७ रोजी उशीरा निर्गमित झाले व दि. ३१.३.२००७ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने रककम कोषागारातून अहरित करता आली नाही.

प्रत्यक्ष निधीचे वाटप केंद्राकडून प्राप्त होणाऱ्या हिस्स्याचे समरुप २५ % करण्यात येते. केंद्राचा अनुज्ञेय हप्ता प्राप्त झाल्यानंतर वाटप करुन उर्वरित रक्कम रु. १५६.३० लाख माहे मार्च २००७ मध्ये प्रत्यार्पित केली आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष २७०२ लहान पाटबंधारे | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण<br>००१ संचालन व प्रशासन<br>००१(०१)(०४) जिल्हा परिषदेखालील लहान पाटबंधाऱ्यांच्या कामांसाठी उप अभियंत्यांची विशेष आस्थापना (२७०२ १४६१) | | | | |
| मूळ | ४७८.६० | ४२२.३५ | ३७९.२० | (-)४३.१५ |
| पुनर्विनियोजन (-) | - ५६.२५ | | | |

रु. ४३.१५ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता सुधारीत अंदाजाच्या आधारे मार्च २००७ मध्ये प्रत्यपर्ण/पुनर्विनियोजनाव्दारे काढण्यात आलेला रु. ५६.२५ लाखाचा निधी अपूरा असल्याचे सिध्द झाले. याबाबतची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या लेखाशिर्षाखाली विभागाने प्रत्यक्षात रुपये ३८७.४० लाख इतका खर्च केला आहे. तथापि या लेखाशिर्षाचा रुपये ८.२० लाख इतका खर्च ८० सर्वसाधारण १९१ (०१) (०२) नियमित आस्थापना (२७०२ २०९२) या लेखाशिर्षाखाली नोंद झाला आहे. सदर खर्च या लेखाशिर्षाच्या खर्चात अंतभूर्त केल्यास महालेखापालांचा खर्च (रुपये ३७९.२० लाख (+) रुपये ८.२० लाख) रुपये ३८७.४० लाख इतका होत असून त्याची तुलना रुपये ४२२.३५ लाखाच्या अंतिम सुधारीत अनुदानाशी करता प्रत्यक्षात रुपये ३४.९५ लाखाची बचत होत असून पदे रिक्त असल्यामुळे व पदांना मुदतवाढ न मिळाल्यामुळे सदरची बचत झाली आहे.

रुपये ८.२० लाखाच्या चुकीच्या दुरुस्त नोंदीचा प्रस्ताव महालेखापाल, नागपूर यांना शासन पत्र क्रमांक विनिले-२००८/प्र.क्र.१७८/जल-३, दिनांक २० एप्रिल, २००९ अन्वये पाठविला आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष २७०२ लहान पाटबंधारे | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| ८० सर्वसाधारण<br>००१ संचालन व प्रशासन<br>००१(०१)(०६) लहान पाटबंधारे योजनांचे परिरक्षण व दुरुस्ती (१०१ ते २५० हेक्टर्स) (२७०२ ४२४४) | | | | |
| मूळ | २०.९० | | | |
| पूरक | १७५.०० | १५९.०३ | ११६.९२ | (-)४२.११ |
| पुनर्विनियोजन (-) | -३६.८७ | | | |

रु. ४२.११ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता सुधारीत अंदाजाच्या आधारे मार्च २००७ मध्ये प्रत्यपर्ण/पुनर्विनियोजनाव्दारे काढण्यात आलेला रु. ३६.८७ लाखाचा निधी अपूरा असल्याचे सिध्द झाले. याबाबतची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या लेखाशिर्षाचा रुपये ४२.०० लाख इतका खर्च ८० सर्वसाधारण १९१ (०१)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदान अनुक्रमे (२७०२ १४७९) या लेखाशिर्षाखाली नोंद झाला आहे. सदरचा खर्च हा लेखाशिर्षाच्या खर्चात अंतर्भूत केल्यास या लेखाशिर्षाचा एकूण खर्च (रुपये ११६.९२ लाख (+) ४२.०० लाख) रुपये १५८.९२ लाख इतका होत असून त्याची तुलना रुपये १५९.०३ लाखाच्या अंतिम सुधारीत अनुदानाशी करता प्रत्यक्षात रुपये ११०००/- ची बचत होत असून ती अल्प आहे.

रुपये ४१.९९ लाखाच्या चुकीच्या दुरुस्त नोंदीचा प्रस्ताव शासन पत्र क्रमांक विनिले-२००८/प्र.क्र.१७८/जल-३, दिनांक २० एप्रिल, २००९ अन्वये महालेखापाल, नागपूर यांना पाठविला आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| **२७०२ लहान पाटबंधारे**<br>८० सर्वसाधारण<br>००१ संचालन व प्रशासन<br>००१ (०१) (०३) कार्यकारी व उप विभागीय अभियंता यांची आस्थापना<br>(२७०२ २७१५) | | | | |
| मूळ | ४९६९.३४ | ४८७६.८६ | ४८०२.१४ | (-) ७४.७२ |
| पुनर्विनियोजन (-) | ९२.४८ | | | |

रु. ७४.७२ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता प्रत्यक्ष गरजेच्या आधारे वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च २००७ मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे काढण्यात आलेला रु. ९२.४८ लाखाचा निधी अपूरा असल्याचे सिध्द झाले. याबाबतची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या लेखाशिर्षाखाली विभागाने प्रत्यक्षात रुपये ४८४६.६० लाख इतका खर्च केला आहे. परंतु महालेखापालांनी रुपये ४८०२.१४ लाख इतका खर्च नोंदविल्यामुळे दोन्ही खर्चाच्या आकड्यात रुपये ४४.४६ लाखाची तफावत दिसून येते. याबाबत नमूद करण्यात येते की, या लेखाशिर्षाचा रुपये ४४.४६ लाख इतका खर्च ८० सर्वसाधारण १९१ (०१) (०२) नियमित आस्थापना (२७०२ २०९२) या लेखाशिर्षाखाली नोंद झाला आहे. सदर खर्च या लेखाशिर्षाकडे वर्ग केल्यानंतर एकूण खर्च (रुपये ४८०२.१४ लाख (+) रुपये ४४.४६ लाख) रुपये ४८४६.६० लाख इतका होत असून रुपये ४८७६.८६ लाखाच्या अंतिम सुधारीत अनुदानाच्या तुलनेत प्रत्यक्षात रुपये ३०.२६ लाखाची बचत होत असून देयके पारीत न झाल्याने व कर्मचारी/अधिकारी यांचा बदल्यामुळे बचत झाली आहे.

रुपये ४४.४६ लाखाच्या चुकीच्या दुरुस्त नोंदीचा प्रस्ताव महालेखापल- २ नागपूर यांना शासन पत्र क्रमांक विनिले-२००८/प्र.क्र.१७८/जल-३, दिनांक २० एप्रिल, २००९ अन्वये पाठविला आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| **२४०६ वनीकरण व वन्यजीवन**<br>०१ वनीकरण<br>००१ (०१) (०२) सामाजिक वनीकरण विभाग<br>(२४०६ १६३७) दत्तमत | | | | |
| मूळ | ३१४१.०४ | | | |
| | | ३०६५.७३ | २९१५.०९ | (-) १५०.६४ |
| पुनर्विनियोजन (-) | ७५.३१ | | | |

रु. १५०.६४ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता सुधारीत अंदाजाच्या आधारे मार्च २००७ मध्ये प्रत्यपर्ण/पुनर्विनियोजनाव्दारे काढण्यात आलेला रु. ७५.३१ लाखाचा निधी अपूरा असल्याचे सिध्द झाले.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, मूळ तरतूद रु. ३१४१.०४ लाख एवढी असून पुनर्विनियोजनाव्दारे रु. ७५.३१ लाख एवढा निधी प्रत्यार्पित करण्यात आला आहे. अंतिम सुधारीत अनुदान रु. ३०६५.७३ लाख एवढे आहे. यापैकी विभागाने केलेला खर्च रु. २८९७.२२ लाख व बचत रु. १६८.५१ लाख (५.५० %) एवढी असून ती अल्प आहे.

सदर योजनेखालील खर्च हा प्रामुख्याने आस्थापनाविषयक बाबीवरील असून मंजूर असलेल्या वर्ग १ चे ७३, वर्ग २ चे २६१, वर्ग ३ चे १२७२ वर्ग ४ चे १५८ कर्मचारी वृदांपैकी प्रत्यक्षात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यावर खर्च केला असल्याने अल्प प्रमाणात बचत झाली आहे.

विभागाने केलेला खर्च रु. २८९७.२२ लाख असून महालेखापाल यांनी नोंदविलेला खर्च रु. २९१५.०९ लाख एवढा आहे. या दोघांमधील तफावत रु.१७.८७ लाख इतकी असून या तफावतीबाबत चुकीच्या दुरुस्त नोंदीचा प्रस्ताव शासनाच्या क्र. विनिले-२००८/प्र.क्र.३६/जल-१२, दि. ३१.३.०८ च्या पत्रान्वये महालेखापाल, (लेखा व हक्कदारी) महाराष्ट्र-१, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर केला आहे. प्रस्तावास मान्यता प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| **२७०२ लहान पाटबंधारे**<br>८० सर्वसाधारण<br>१९१ स्थानिक संस्थांना सहाय्य<br>१९१ (०२) (०१) लहान<br>पाटबंधाऱ्याची कामे सर्वसाधारण<br>योजना (२७०२ १४८८) | | | | |
| मूळ | ३८७९.२२ | | | |
| पूरक | २७१५.८१ | ६४५४.०४ | ६४९६.०२ | (+) ४१.९८ |
| पुनर्विनियोजन (-) | १४०.९९ | | | |

रु. ४१.९८लाखाचा अंतिम खर्च लक्षात घेता प्रत्यक्ष गरजेच्या आधारे मार्च, २००७ मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे काढण्यात आलेला रु. १४०.९९ लाखाचा निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले, याबाबतची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे, की रुपये ४१.९९ लाख इतका खर्च ८० सर्वसाधारण १९१ (०१) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (२७०२ १४९७) या लेखाशिर्षाचा असून तो या लेखाशिर्षाखाली नोंद झाला आहे. सदर खर्च या लेखाशिर्षाच्या खर्चातून वजा केल्यानंतर या लेखाशिर्षाचा प्रत्यक्ष खर्च (रु.६४९६.०२ लाख (-) रु. ४१.९९ लाख) रुपये ६४५४.०३ लाख इतका होतो.

रुपये ४१.९९ लाखाच्या चुकीची दुरुस्त नोंदीचा प्रस्ताव महालेखापल- २ नागपूर यांना शासन पत्र क्रमांक विनिले-२००८/प्र.क्र.१७८/जल-३, दिनांक २० एप्रिल, २००९ अन्वये पाठविला आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| **२७०२ लहान पाटबंधारे**<br>८० सर्वसाधारण<br>७९९ निलंबन<br>७९९ (००) (०१) निलंबन (ऋण)<br>संग्रह (२७०२ २९११) | | | |
| मूळ १७५.४० | १७५.४० | ८०.२६ | (-) ९५.१४ |

वर नमूद केलेल्या शिर्षाखाली रु. (-) ९५.१४ लाखाच्या अंतीम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, विभागाने या लेखाशिर्षाखाली प्रत्यक्षात रुपये १७६.६१ लाख इतका खर्च केला आहे. तथापि, महालेखापालांनी रुपये ८०.२६ लाख इतका खर्च नोंदविल्यामुळे दोन्ही खर्चाच्या आकडयात रुपये ९६.३५ लाखाची तफावत दिसून येते. याबाबत नमूद करण्यात येते की, कार्यकारी अभियंता (स्था.स्तर) विभाग, सोलापूर यांनी या लेखाशिर्षाखाली रुपये २६.६६लाख इतका खर्च केला आहे. तथापि, रु. २१.८२ लाख इतका खर्च संकीर्ण सा.बा.अग्रीम (२७०२ २९३१ )या बाबी खाली नोंद झाला आहे. सदर गैरवर्गीकृत खर्चाबाबत चुकीची दुरुस्त नोंद महालेखापाल, नागपूर यांनी त्यांचे दि. २१.१०.२००८ व २९.६.०९ च्या पत्रान्वये स्विकृत केली आहे. सदर गैरवर्गीकृत रु. २१.८२ लाख इतका खर्च महालेखापालांनी नोंदविलेल्या खर्चात अंतभूर्त केल्यास महालेखापालांचा खर्च रु. ८०.२६ +रु. २१.८२ लाख = १०२.०८ लाख इतका होईल.

यानंतर दोन्ही खर्चात रु. ७४.५३ लाखाची तफावत राहते. याबाबत नमूद करण्यात येते की, ० ते २५० हे. सिंचन क्षमतेच्या योजनांकरिता कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडून प्राप्त झालेली रु. ५९,६९,३३१/- इतकी रक्कम कार्यकारी अभियंता, लघु पाटबधारे (स्था.स्तर) विभाग, बुलढाणा यांनी योजनांवर खर्ची टाकून निलंबन शिर्षाखाली जमा दर्शविली आहे. त्याचप्रमाणे संकींण सार्वजनिक बांधकाम अग्रीमाअंतर्गत दिलेल्या अग्रीम व वसुलीच्या रकमाही या लेखाशिर्षाखाली दर्शविल्या आहेत. तसेच कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जळगाव यांनी सन

२००१ मध्ये इतर विभागासाठी खरेदी केलेल्या सिमेंटच्या रक्कमांची (रु.१५,२३,१२४/-) वसूली झाल्यामुळे इत्यादी कारणामुळे या लेखाशिर्षाखाली बचत दिसून येते.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| **२५०१ ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम**<br>०२ अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम<br>१०१ लहान पाटबंधारे<br>०१ (०१) (०१) अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम योजना (राज्य योजनांतर्गत योजना)<br>मूळ .. २९,५०.४१<br>पुनर्विनियोजन .. -२,७६.१९ | २६,७४.२२ | ३६,२४.१५ | +९,४९.९३ |

रुपये १४९.९३ लाखाचा अंतिम खर्च लक्षात घेता, केंद्र सरकारने निधी न दिल्यामुळे (रुपये १५०.८४ लाख) व सुधारीत अंदाजाच्या आधारे (रुपये १२५.३५ लाख) मार्च २००५ मध्ये काढण्यात आलेला रुपये २७६.१९ लाखाचा निधी आवश्यक असल्याचे सिध्द झाले याबाबतची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, सन २००६-०७ या वित्तीय वर्षात लेखाशिर्ष क्रमांक २५०१०१२८ या खाली रु. २९५०.४१ लाख मूळ अनुदान प्राप्त असून पुनर्विनियोजनाव्दारे रु (-) २७६.१९ लाख अनुदान कमी करण्यात आल्याने पुनर्विनियोजना नंतर या लेखा शिर्षाखाली अंतिम अनुदान रु. २६७४.२२ लाख प्राप्त झाले आहे.

विभागाने या लेखाशिर्षाखाली रु. २६२४.१५ लाख खर्च नोंदविला आहे व महालेखापाल यांनी रु. २६२४.१५ लाख खर्च नोंदविला आहे. म्हणजे विभागाच्या व महालेखापाल यांच्या खर्चात रु. १०००.०० लाखाचा तफावत आहे. तफावतीचा विचार करता रु. १०००.०० लाखची चूक दुरुस्ती नोद प्रस्ताव शासनाच्या पत्र क्र. विनिले/चदुप्र/०६-०७/२००८/प्र.क्र.१९/जल-१९, दि. ३१/३/२००८ अन्वये महालेखापाल नागपूर कार्यालयास पाठविण्यात आला आहे. सदरच्या प्रस्तावाचा विचार करता महालेखापाल व विभागाचा खर्च सरखाच म्हणजेच रु. २६२४.१५ लाख झाला आहे.

उपरोक्त लेखाशिर्षाखाली एकूण अनुदान रु. २६२४.१५ लाख झालेला आहे. हे विचारात घेता सदर लेखाशिर्षाखाली बचत रु. ५०.०७ लाखाची झाली आहे.

सदरची बचत खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| विभागीय आयुक्त, कोकण | (-) ३.७५ लाख |
| विभागीय आयुकत, पुणे | (-)१३.१३ लाख |
| विभागीय आयुकत, अमरावती | (-) २१.५२ लाख |
| विभागीय आयुक्त, नागपूर | (-) ११.६७ लाख |
| **एकूण** | (-) ५०.१७ लाख |

सदरची बचत ही अनुदानाचे आदेश दि. ३१ मार्च, २००७ पर्यत प्राप्त न झाल्याने झाली आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| २५१५- इतर ग्रामीण विकास कार्यक्रम<br>१०१ पंचायत राज<br>१०१ (०१) (०४) विशेष कार्यक्रम व ग्राम अभियान कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यामध्ये उत्कृष्ठ काम केल्याबद्दल जि.प.प प.स. यांना प्रोत्सहानपर अनुदाने | | | | |
| मूळ | ५०.०० | | | |
| पुनर्विनियोजन | ७.३९ | ५७.३९ | ५५.९९ | -१.४० |

पुस्तकाची छपाई करण्यावरील अपेक्षिम अधिक खर्च भागविण्यासाठी मार्च २००७ मध्ये रु. ७.३९ लाखांच्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (२५१५००६२) या उप शिर्षाअंतर्गत महालेखापालांनी नोंदविलेला खर्च व विभागाचा प्रत्यक्ष खर्च यात तफावत नाही.

अंतिम अनुदानानुसार रु. १.४० लाखाची बचत जिल्हा परिषद औरंगाबाद व नंदूरबार यांनी अनुदानाची रक्कम अहरित केली नाही.

(रुपये लाखात)

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| **२७०२ लहान पाटबंधारे**<br>१९१ स्थानिक संस्थांना सहाय्य<br>१९१ (०१) (०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (स्थानिक क्षेत्र)<br>(२७०२ १४७९) | | | | |
| मूळ | १८०२५ | | | |
| पूरक | १७४०.०० | १९२०.४६ | १९८५.८६ | (+) ६५.४० |
| पुनर्विनियोजन (-) | ०.२१ | | | |

रुपये ६५.४० लाखांच्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आली नाहीत (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या शिर्षाखाली महालेखापालांनी रुपये १९८५.८६ लाख इतका खर्च नोंदविला आहे. तथापि विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपयें १९०७.३३ लाख इतका झाला आहे.

खालील लेखाशिर्षाचा खर्च या लेखाशिर्षाखाली नोंद झाला आहे.

१. रु. ७८.५२ ८० सर्वसाधारण १९१ (०३) (०१) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे २. रु. ४२.०० ८० सर्वसाधारण ००१ (०१) (०६) लघुपाटबंधारे योजनांचे परिरक्षण व दुरुस्ती एकूण रु. १२०.५२ लाख वरील खर्च या लेखाशीर्षाच्या खर्चातून वजा करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे या लेखाशीर्षाचा रुपये ४१.९९ लाख इतका खर्च ८० सर्वसाधारण १९१ (०२) (०१) लहान पाटबंधाऱ्यांची कामे (२७०२ १४८८) या लेखाशिर्षाखाली नोंद झाला आहे. सदर खर्च या लेखाशीर्षाच्या खर्चात अंतभूत करणे आवश्यक आहे.

वरील समायोजने विचारात घेतल्यास या विभागाचा प्रत्यक्ष खर्च (रुपये १९८५.८६ लाख (-) रुपये १२०.५२ लाख (+) रुपये ४१.९९ लाख) रुपये १९०७.३३ लाख इतका होत असून रुपये १९२०.४६ लाखाच्या अंतिम सुधारीत अनुदानाच्या तुलनेत रुपये १३.१३ लाखाची बचत होते.

कंत्राटदारांनी विहित मुदतीत कामे केली नाहीत. त्याचप्रमाणे तांत्रिक बाबींची पूर्तता मार्च, २००७ अखेरपर्यंत पूर्ण न झाल्यामुळे बचत झाली आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| **२५१५-इतर ग्रामीणं विकास कार्यक्रम** | | | |
| १०१ पंचायतराज | | | |
| (१०१) (०१) (१०) बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत राज संस्थाना विविध योजनांनासाठी सहाय्यक अनुदान | | | |
| मुळ .. ३,९६,६०.०० | | | |
| पूरक .. १,६६,७०.४३ | | | |
| पुनर्वियोजन .. १,६६,७०.४३ | ३,९६,६०.०० | ३,९६,०८.५८ | -५१.४२ |

प्रामुख्याने केंद्र सरकारने अनुदानाच्या दुसरा हप्ता न दिल्यामुळे मार्च २००७ मध्ये प्रत्यर्पण/ पुनर्विनियोजनाद्वारे रु. १६६६७०.४३ लाखांचा निधी काढण्यात आला.

रु. ५१.४२ लाखांची अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (२५१५ ०४६५) या उपशीषाखाली महालेखापालांनी नोदविलेला खर्च व विभागाचा प्रत्यक्ष खर्च यात तफावत नाही. अंतिम तरतुदीनूसार रु.५१.४२ लाखाची बचत जिल्हा परिषद गडचिरोली यांना दि.३०.३.२००७ चे अनुदानाचे आदेश रात्री उशिरा प्राप्त झाल्याने व दि. ३१.३.२००७ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने रक्कम कोषागारातून काढता आली नाही

(रुपये लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| **२५१५- इतर ग्रामीण विकास कार्यक्रम-**<br>१०१-पंचायतराज<br>(१०१)(०१)(०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जि.प.ना सहाय्यक अनुदाने. | | | |
| मूळ .. २९,५०.०० | | | |
| पुनर्विनियोजन .. -५,८३.३२ | २३,६६.६८ | २३,४४.७० | -२१.९८ |

जिल्हा परिषदांकडून कमी मागणी आल्यामुळे मार्च २००७ मध्ये रु.५८३.३२ लाखांची निधी परत करण्यात आली.

रु२१.९८ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळवण्यिात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (२५१५००५३) या उपशिर्षाखाली महालेखापालांनी नोदविलेला खर्च व विभागाचा प्रत्यक्ष खर्चानुसार रु.२१.९८ लाखाची बचत जिल्हा परिषद यवतमाळ (पंचायत समिती, आर्णी) यांना बांधकामासाठी जागा उपलब्ध न झाल्याने झालेली आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| **२५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम**<br>८०० इतर खर्च<br>८०० (०१)(०२)<br>जिल्हा ग्रामीण् ٰ विकास यंत्रणा प्रशासन<br>जिल्हा ग्रामीण् विकास यंत्रणाना सहाय्यक अनुदान (योजनातंर्गत २५% राज्य येजना) | | | |
| मूळ .. ५,५९.१५ | | | |
| पुनर्विनियोजन .. -१,५६.३० | ४,०२.८५ | ३,८८.८० | -१४.०५ |

काही जिल्ह्यांना केंद्राचा हिस्सा न मिळाल्यामुळे मार्च २००७ मध्ये रु.१२६.३० लाखांचा निधी परत करण्यात आला. रुपये १४.०५ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (२५१५०३७६) या उपशिर्षाखाली महालेखापालांनी नोदविलेला खर्च व विभागाचा प्रत्यक्ष खर्च यात तफावत नाही. अंतिम तरतुदीनूसार रु.१४.०५ लाखाची बचत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ठाणे यांना सदर रकमेचे आदेश् दि.३१.३.२००७ रोजी उशिरा निर्गमित झाले व दि.३१.३.२००७ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने रक्कम कोषागारातून आहरित करता आली नाही.

प्रत्यक्ष निधीचे वाटप केंद्ररकडून प्राप्त होणाऱ्या हिस्स्याचे समरुप २५% करण्यात येते. केंद्राचा अनुज्ञेय हप्ता प्राप्त झाल्यांनतर वाटप करुन उर्वरित रक्कम रु.१५६.३० लाख माहे मार्च २००७ मध्ये प्रत्यार्पित केली आहे

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| **२५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम**<br>१०१ पंचायत राज<br>१०१(०१)(०४) विशेष कार्यक्रम व ग्राम अभियान कार्यक्रमाचीह अंमलबाजवणी करण्यामंध्ये उत्कृष्ठ काम केल्याबद्दल जि.प.व.पं.स. यांना प्रोत्साहनपर अनुदाने | | | |
| मूळ .. ५०.०० | | | |
| पुनर्विनियोजन .. ७.३९ | ५७.३९ | ५५.९९ | -१.४० |

पुस्तकाची छपाई करण्यावरील अपेक्षीत अधिक खर्च भागविण्यसाठी मार्च २००७ मध्ये रु.७.३९ लाखांच्या अतिरिक्त निधीची तरतुद करण्यात आली.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (२५१५००६०) सर उपशिर्षाअंतर्गत महालेखापालांनी नोंदविलेला खर्च व विभागाचा प्रत्यक्ष खर्च यात तफावत नाही.

अंतिम अनुदानानूसार रु.१.४० लाखांची बचत लिल्हा परिषद औरंगाबाद व नंदूरबार यांनी अनुदानाची रक्कम आहरित केली नाही.

**साक्ष :**

समितीने दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२ रोजी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या "विनियोजन लेखे" अहवालामधील परिच्छेद क्र. एल-३ "ग्रामविकास कार्यक्रम" या संदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, विनियोजन लेखा अहवाला मधील ४ बाबींपैकी २ बाबीतंर्गत अधिक खर्च गैरवर्गीकरणामुळे झाला आहे, त्या अनुषंगाने विभागाने महालेखाकार कार्यालयास यापूर्वीच स्पष्टीकरणात्मक ज्ञापन दिलेले आहे. तसेच, २४०२, २४०६ व २७०२ या मुख्य लेखा शीर्षा अंतर्गत अधिक खर्च तसेच बचती बाबत स्पष्टीकरणात्मक ज्ञापन या अगोदरच समितीस सादर करण्यात आलेले आहे. विभागाचा ८१६.६२ लाख रुपये एवढ्या मंजूर अनुदानापैकी १४ लाख रुपये म्हणजेच १.७४ टक्के इतका अधिक खर्च झालेला आहे.

महालेखाकार कार्यालयाकडून ज्या मुद्यांवर आक्षेप घेतले गेले त्या संदर्भात महालेखाकारांनी केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीला द्यावी. तसेच There are two different Departments in the A.G.'s Office looking after the work of Audit and Accounts respectively. The officials of the Accounts Department posted in the various Departments of the Government should take care while sanctioning the Invoices/Vouchers असेही समितीने सांगितले.

समितीस माहिती देताना महालेखाकार यांनी सांगीतले की, The A.G. (A&E) is concerned with the Accounts work. In the various Departments of the Government, they appoint the Divisional Accountants. We are concerned only with the work related to Audit.

महालेखापालांच्या माहितीच्या अनुषंगाने Do the work of Audit. point is, the concerned officials who are appointed by the A.G's Office in various Departments of the Government should check irregularities, if any, present in the Invoices/Vouchers at their level only. If they notice anything irregular then, they should raise objection at their level. As such, there will not be much burden over the Public Accounts Committee and thus, can save precious time of the Public Accounts Committee. यावर रिकन्सीलिएशन में डिफरन्स आ जाता है. This is due to late Reconciliation of Accounts, late submissions of Accounts.... अशी माहिती महालेखाकारांनी दिली.

मिसॲप्रोप्रिएशन फाईंड आऊट हो चुका है, विधानसभा के पटल पर अहवाल रखा गया है, इस-इस विभाग में इतने रुपये का घपला हो चुका है, इस तरह की बात छप चुकी है. समिती का कहना यह है कि महालेखाकार कार्यालय के अधिकारी संबंधित विभाग में बैठे है. याबाबत समितीने स्पष्टीकरण मागितले. जेव्हा महालेखाकार कार्यालयाकडून एखाद्या परिच्छेदावर आक्षेप घेण्यात येतो

तेव्हा समिती कडून संबंधित विभागाच्या सचिवांकडून त्याचे स्पष्टीकरण मागितले जाते. परंतु, मुळात विभागामध्ये महालेखाकार कार्यालयाकडून अकाऊंट्सच्या बाबी तपासण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. ते जर त्या देयकांवर तपासणी न करता स्वाक्षरी करत असतील, तर ते देखील या गोष्टींसाठी जबाबदार नाहीत का? ते संबंधित कर्मचारी तपासणीच्या वेळीच त्या बाबींवर सही करण्यास नकार का देत नाहीत. तसेच हा अतिशय गंभीर मुद्दा आहे. The Public Accounts Committee is regularly raising this point. The concerned officials from A.G.'s Office before sanctioning the Invoices/Vouchers should check it. I think, they are equally responsible. While taking evidence of the Secretaries, we ask them questions, as they are accountable. The officials from A.G.'s Office are also accountable. The A.G. should give us a Detailed Note regarding what action they have taken against the concerned officials. In the past, you have assured us that you will furnish us a Detailed Note regarding to how many officials you have served notices. However, still, we have not received any reply from you अशी विचारणा समितीने केली. यावर महालेखाकारांनी I will co-ordinate with the A.G. (A&E) and will furnish you the information. I will request the Public Accounts Committee to give me some time असे सांगितले. तसेच जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागाचे मोठे प्रकल्प वगळता स्थानिक क्षेत्र विभागासाठी महालेखाकार कार्यालयाकडून लेखापालांची नियुक्ती केली जात नाही, असे विभागाने सांगितले.

या गोष्टींना जबाबदार कोणाला धरावयाचे ? जे कोणी अशी देयके मंजूर करतात, त्यावेळेस त्यांना त्याची कल्पना नसते का, मंजुरी देताना ते डोळे बंद करुन मंजुरी देतात का आणि तसे असेल तर या गोष्टींना जबाबदार कोण ? तसेच महालेखाकार कार्यालयाने नियुक्त केलेल्या लेखापालांनी अधिक खर्चाच्या प्रस्तावावर तो जर अनधिकृत असेल किंवा योग्य नसेल तर सहीच करता कामा नये. विभागाकडून जरुर पडल्यास खर्च होत असेलही परंतु, तो खर्च जर योग्य नसेल तर महालेखाकार कार्यालयाने नियुक्त केलेल्या लेखापालांच्या लक्षात ही बाब का येत नाही ? या मुद्याच्या संदर्भात पुन्हा महालेखाकार कार्यालयाकडून त्या परिच्छेदाच्या संदर्भात अधिक खर्च झाला म्हणून आक्षेप घेण्यात येतो. लेखापाल त्यांचे काम व्यवस्थित केले नाही, तर त्याला जबाबदार कोण ? अशीही विचारणा समितीने केली. यावर विभागाने असा खुलासा केला की, सगळयाच विभागात महालेखाकार कार्यालयाकडून लेखापालांची नियुक्ती केली जात नाही. ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात कामे असतात तेथेच त्यांच्याकडून लेखापालांची नियुक्ती केली जाते. लेखापाल फक्त मोठया विभागामध्ये असतात आणि तेच अशा बाबी पडताळणी करतात, अशी माहिती विभागाने दिली. यावर I agree with the concern expressed by the

Public Accounts Committee. We will seek clarification from the Divisional Accountants, as they are accountable. अशाप्रकारे महालेखाकारांनी मत मांडले.

When we visited A.G.'s Office at Nagpur during the Winter Session, concerned officials of that Department assured us that they would give us a Detailed Note. However, till date, we have not received any Detailed Note from them. I think, this Detailed Note should be placed before the Public Accounts Committee. यावर महालेखाकारांनी असा खुलासा केला की, आज की बैठक में उपस्थित किए गए मुद्दों की हम दखल लेते है उसके अनुसार हम संबंधित अधिकारियों पर ॲक्शन लेंगे. तसेच याबाबतचा अहवाल एका महिन्यात सादर करण्याचे आश्वासन महालेखाकार यांनी दिली.

या संदर्भात विभागाच्या सचिवांकडे ज्या प्रकारे विचारणा केली जाते त्याच प्रकारे महालेखाकार कार्यालयाकडून नियुक्त केलेल्या महालेखापालांना देखील विचारणा करता येईल जेणेकरुन आक्षेप घेतल्या जाणाऱ्या परिच्छेदांची संख्या निश्चितच कमी होईल. कारण ते सुध्दा अशा बाबींच्या संदर्भात जबाबदार असतात, असे समितीने मत व्यक्त केले.

विभागाच्या विनियोजन लेख्याच्या साक्षीच्या अनुषंगाने जलसंधारण विभागात रिक्त असलेल्या पदांची माहिती तसेच काही कामे एनजीओज मार्फत केली जातात. त्यांच्याकडून ती कामे खरोखरच केली जातात की नाही ? एनजीओजच्या कामाबाबत विभागाचा काय अनुभव आहे? अशी विचारणा समितीने केली विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, विभागात १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेचे प्रकल्प व ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेचे प्रकल्प असे दोन भाग आहेत. ही बहुतेक कामे विभागामार्फतच केली जातात. एखादा प्रकल्प करताना स्थानिक स्तरावर लोकांना सहभागी करुन एनजीओज मार्फत काम करण्यात येते. परंतु, त्यांना कंत्राटदार म्हणून काम दिलेले नाही.

विभागातील रिक्त तसेच वर्ग १ व २ च्या रिक्त पदांबाबतची विभागाने पुढील माहिती सांगीतली.

जलसंपदा विभागामध्ये कार्यकारी अभियंत्यांची स्थानिक स्तरावरील मंजूर पदे २८ आहेत तर जिल्हापरिषदेमध्ये ३४ आहेत. त्यापैकी १ पद रिक्त आहे.उप अभियंत्यांची स्थानिक स्तरावरील मंजूर पदे १६३ असून त्यापैकी ६१ पदे रिक्त आहेत. तर जिल्हा परिषदेमध्ये उप अभियंत्यांची १८८ पदे मंजूर असून त्यापैकी ७३ पदे रिक्त आहेत. कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंत्यांची स्थानिक स्तरावरील मंजूर पदे ८८४ असून त्यापैकी १५९ पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याचे अधिकार जलसंपदा विभागाला आहेत.

वर्ग १ व २ ची मंजूर पदे ९ हजार इतकी असून त्यापैकी २ हजार पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांपैकी जास्त पदे ही गट शिक्षणाधिकाऱ्यांची आहेत. जिल्हापरिषदेत जवळपास १४ विभागात वर्ग-एक

व वर्ग-दोन ची पदे आहेत. यामध्ये समाजकल्याण विभाग, शिक्षण विभाग अशा अनेक विभागातील जागा रिक्त आहेत. जवळपास १९०० जागा रिक्त आहेत. त्या जागा भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अशी वर्ग एकची पदे आहेत. तसेच या संदर्भातील सविस्तर माहिती समितीला द्यावी असे आदेश समितीने दिले. सदर माहिती समितीला अद्याप प्राप्त झाली नाही.

देयके पारीत न होण्याची कारणे काय आहेत? बचत झाली असतांना संबंधित देयके पारीत न होण्याची कारणे काय आहेत. विकासाच्या कामाच्या संदर्भात काही बचत झाली आहे काय ? समितीच्या या प्रश्नावर बजेटचा विचार केला तर कर्मचाऱ्यांच्या पगारांची देयके पारीत झालेली नाही. कर्मचाऱ्याची देयकांमध्ये त्रुटी आढळून आल्यामुळे कोषागारांकडून देयके पारीत झाली नाहीत. विकासाच्या कामाच्या संदर्भात बचत झालेली नाही. सदर निधी त्या त्या कामावर खर्च करण्यात आलेला आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

काही पंचायत समितीमध्ये गट विकास अधिकारी वर्ग-एक चे आहेत तर काही पंचायत समितीमध्ये गट विकास अधिकारी वर्ग-२ चे आहेत. यामध्ये लोकसंख्येचा विचार करुन त्या त्या पंचायत समितीमध्ये वर्ग-१ व वर्ग-२ चे गट विकास अधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. आता सर्व पंचायत समित्यांची लोकसंख्या वाढलेली असल्यामुळे सर्वच पंचायत समितीमध्ये वर्ग-१ चे गट विकास अधिकारी नियुक्त करणे गरजेचे आहे असे समितीने सुचविले. यावर महाराष्ट्रात ३५१ पंचायत समित्या आहेत. यापैकी १६१ पंचायत समित्यांमध्ये वर्ग-१ चे गट विकास अधिकारी आहेत. गेल्या २० वर्षापासून लोकसंख्येच्या निकषानुसार वर्ग-१ व वर्ग-२ चे गट विकास अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. आता सर्वच पंचायत समित्यांची लोकसंख्या वाढलेली असल्यामुळे लोकसंख्येचा विचार न करता सर्वच पंचायत समितीमध्ये गट विकास अधिकारी वर्ग-१ चे नियुक्त करावेत असे शासनाच्या विचाराधीन आहे. त्यासंदर्भातील प्रस्ताव विभागाने वित्त विभागाकडे पाठविला असून याबाबत शासनाची भूमिका ही सकारात्मक असल्याचे विभागाने सांगीतले.

चुकीच्या नोटीचा प्रस्ताव अद्याप मान्य न होण्याची कारणे काय आहेत ? प्रस्ताव विलंबाने का पाठविण्यात आला आहे? वेळेमध्ये प्रस्ताव पाठविला नाही तर संबंधित अधिकाऱ्यावर काय कारवाई करण्यात आली आहे? याचा खुलासा समितीने मागितला. त्यावर प्रस्ताव पाठविण्यास विलंब झाला ही वस्तुस्थिती आहे. तरी यापुढे असे प्रकार होऊ नयेत यासंदर्भात सन २००८ मध्ये एक परिपत्रक काढण्यात आल्याचे विभागाने सांगितले. तसेच संबंधित कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई करुन समितीला सदर माहिती सादर करण्याचे आदेश विभागाला देण्यात आले.

विभागाच्या माहितीवर महालेखापालांनी नोट ऑफ एरर मंजूर नहीं हुआ है. इस बारे में कोई कम्युनिकेशन नहीं हुआ और न ही कोई जरुरी जानकारी दी गई अशी माहिती दिली त्यावर समितीने अशीही विचारणा केली की, What is your experience regarding reconciliation? यावर ८५-८६ प्रतिशत रिकन्सीलिएशन हुआ है. १०० प्रतिशत रिकन्सीलिएशन होना चाहिए. समय पर रिकन्सीलिएशन नहीं होता हे तो नोट ऑफ एरर भेजी जाती है. वह नोट ऑफ एरर समय पर भेजनी चाहिए असा खुलासा महालेखाकारांनी केला असता विभागाने फक्त १.१४ टक्के इतकीच बचत झाल्याचे सांगीतले.

खर्चमेळ वेळच्या वेळी होणे आवश्यक आहे. अधिकारी काम करीत नाही. त्यामुळे समितीचा वेळ विनाकारण खर्च होतो. जुने प्रश्न तसेच राहतात. जे अधिकारी कामामध्ये हलगर्जीपणा दाखवित असतील त्यांच्यावर कारवाई करुन संबंधित अहवाल समितीला देण्यास विभागाला सूचना देण्यात आल्या. सदर अहवाल समितीला प्राप्त झाला नाही.

इंडो-जर्मन बँकेकडून यवतमाळमध्ये प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी निधी देण्यात आला होता. परंतु ती कामे आता करण्यात येत नाहीत. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांसोबत बैठक घेतली आहे. इंडो-जर्मन बँकेकडून जो निधी येणार आहे तो लवकर मिळवून दिला पाहिजे असे मत समितीने मांडले. त्यावर सन २००१ मध्ये इंडो-जर्मन बँकेकडून प्रकल्पासाठी निधी देण्यात येत होता. आता हा निधी ३० जून, २०११ पासून बंद झाला आहे. या निधीतून अनेक प्रकल्पाची कामे झाली असून १० ते १२ प्रकल्पाची कामे शिल्लक आहेत. ही कामे करण्यासाठी शासनाकडून निधी देण्यात येणार आहे त्यामुळे यामध्ये कोणतीही अडचण निर्माण होणार नाही असा खुलासा विभागाने केला.

इंडो जर्मन बँकेकडून आलेला निधी वेळच्या वेळी खर्च का होत नाही? समितीच्या या प्रश्नावर इंडो जर्मन बँकेने जवळपास १०० कोटी रुपये दिले होते, त्यापैकी ९७ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. फक्त तीन कोटी रुपये खर्च करण्यात आले नाही. ९७ कोटी रुपयांमध्ये २८ प्रकल्प पूर्ण करण्यात आले आहेत अशी माहिती विभागाने दिली.

९७ टक्के रक्कम खर्च केली याबाबत समितीने समाधान व्यक्त केले. परंतु ३ कोटी रुपये विभागाने शिल्लक ठेवले आहेत, विभागाने तीन कोटी रुपये शिल्लक न ठेवता पाच कोटी रुपयांची कामे करुन त्यांच्याकडे दोन कोटी रुपयांची मागणी करावयास पाहिजे होती. अशा शब्दात समितीने आपली नाराजी व्यक्त केली. यावर इंडो जर्मन बँकेकडून ही रक्कम कर्ज रुपाने मिळालेली आहे. मदत म्हणून मिळालेली नाही. असे विभागाने सांगीतले त्यावर ही रक्कम कर्जाची असली तरी ती खर्च करावयास पाहिजे. शेवटी तो पैसा आपल्या राज्याला मिळालेला होता असे मत समितीने मांडले.

## ग्रामविकास विभाग

ग्रामविकास विभागाच्या मुद्दयासंदर्भात विभागीय सचिवांनी खालीलप्रमाणे माहिती दिली.

ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत पाच मुद्दे विचारण्यात आले होते. यामध्ये २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, २४१५-कृषि विषयक संशोधन व शिक्षण, २५०१-विशेष ग्राम विकास कार्यक्रम, २५०५-ग्रामीण रोजगार, २५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम या विकास योजनांबाबतची माहिती मागविण्यात आली होती. सामाजिक सुरक्षा व कल्याण या योजनेअंतर्गत दहन व दफन भूमीसाठी जमीन संपादीत करणे व त्यासाठी निधी देणे हा विषय होता. अहवाल वर्षात या कामासाठी ४६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. या योजनेत ग्रामीण भागात दहन व दफन भूमीसाठी जमीन संपादीत करुन या कामासाठी सदर वर्षामध्ये फक्त १२ लाख रुपये खर्च करण्यात आले असून ३४ लाख रुपये खर्च होऊ शकले नाही. यासाठी सोलापूर, अमरावती, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, चंद्रपूर व लातूर या १३ जिल्हयातील स्मशानभूमीकरीता तरतूद करण्यात आली होती. परंतु नागपूर, भंडारा, वर्धा या तीन जिल्हयातील प्रस्ताव आले व त्यासाठी निधी देण्यात आला त्यामुळे या तीन जिल्हयात निधी खर्च करण्यात आला आहे. सोलापूर, अमरावती, यवतमाळ, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, चंद्रपूर व लातूर या जिल्हयांतून प्रस्ताव न आल्यामुळे भूसंपादनाचे अंतिम निवाडे होऊ शकले नाहीत. त्यामुळे ३४ लाख रुपयांची बचत झाली आहे. अनेक ठिकाणी स्मशान भूमिसाठी जमीन देण्यास गावकरी तयार नसतात. ही योजना शासकीय जागा असेल तर कार्यान्वित होऊ शकते. परंतु या योजनेमध्ये फक्त भूसंपादनासाठी निधीची तरतूद असल्यामुळे अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे आता डीपीडीसीच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येत असून दहन भूमीच्या ठिकाणी चबुतरा,शेड,पाण्याची व्यवस्था,दहन भूमिसाठी कुंपन, नदीकाठी दहन भूमी असेल तर त्या ठिकाणी जमीन संपादन करुन तेथे बांधकाम करणे इत्यांदी कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

महाराष्ट्रात अनेक गावे आहेत ज्यामध्ये दोन तीन गावे मिळून तेथे एक दहन व दफन भूमी बांधली तरी चालू शकते. महाराष्ट्रात अशी किती गावे आहेत की, तेथे दफन व दहन भूमीची व्यवस्था नाही तसेच बृहत आराखडा तयार करतांना दहन व दफन भूमीसाठी जागा आरक्षित ठेवली पाहिजे असे मत समितीने मांडले. या संदर्भात माहिती देताना जवळपास ५ हजार गावांमध्ये दहन व दफन भूमीची व्यवस्था नाही. अनेक ठिकाणी जमीन मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. त्यावर परभणी जिल्ह्यात एका गावाच्या शेजारी दहन भूमीसाठी जागा निश्चित करण्यात आली होती. परंतु जिल्हाधिकारी

यांच्याकडे संबंधित लोकप्रतिनीधींना प्रस्ताव दिला असता निधी नाही म्हणून सांगण्यात आले अशा तीव्र शब्दात समितीने नाराजी व्यक्त केली.

सन २००६-२००७ मध्ये निधी परत आलेला आहे. सर्वच जिल्हयांसाठी निधी देण्याची तरतूद आहे. जागा मिळत नसल्यामुळे अनेक ठिकाणावरुन निधी परत आलेला आहे. जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येत आहे. सर्वच जिल्हयांना निधी देण्यात येणार असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. जे अधिकारी कामे करीत नाहीत त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे? तसेच जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येणार आहे. परंतु सर्व जिल्हयांना निधी सारखा देण्याची आवश्यकता असून जिल्हा नियोजन विकास समितीसाठी पुरेसा निधी देण्यात येत नाही. जिल्हा नियोजन विकास समितीच्या निधीला काही मर्यादा आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता निधीचे नियोजन करण्याचे काम नियोजन विभागाचे असल्याचे विभागाने सांगीतले.

जिल्हा विकासाचे नियोजन करतांना कचरा, मैदाने व दफन व दहन भूमी यासाठी जागा आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. कारण लोकवस्ती शेजारी दहन किंवा दफन भूमी, कचरा डेपो असावयास नको. डीपीडीसीच्या माध्यमातून पाच टक्के निधी वैशिष्टपूर्ण कामांसाठी ठेवावयास पाहिजे. परंतु या पाचटक्के निधीतून वैशिष्टपूर्ण कामे न होता नियमित कामे करण्यात येत आहेत. दहन व दफन भूमीची कामे एकदा केली की ती वर्षानुवर्षे करण्याची आवश्यकता नसते म्हणून ही कामे वैशिष्ट्यपूर्ण कामामध्ये घेण्यात यावी. यासाठी वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी एक वेगळा शीर्ष निश्चित करण्याचे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले. त्यावर प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून दफन व दहन भूमी करण्यात येणार असून यासंदर्भात जिल्हा नियोजन विकास समितीसाठी पुन्हा सूचना निर्गमित करण्यात येणार असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

ग्रामविकास विभाग व नगर विकास विभागाने गायरान जमीन राखून ठेवण्याबाबत तसेच गायरान जमीन देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना नाहीत म्हणून बलसा गावाला दहन व दफन भूमीसाठी जमीन देण्यासंदर्भात प्रस्ताव पाठविण्यात आला होता असे समितीने सांगितले. यावर परभणी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या सर्वसाधारण बैठकीमध्ये चर्चा होऊन स्मशानभूमी बांधण्यासाठी काही गावांची निवड करण्यात आली होती. त्यानुसार त्या गावांमध्ये स्मशानभूमी बांधावयाची होती. परंतु, सन २००९-२०१० या वर्षामध्ये कोणतीही कामे झाली नसल्याने तो निधी खर्च झाला नाही. सन २००९-२०१० व २०१०-२०११ या दोन्ही वर्षांच्या एकत्रित योजना तयार करण्यात आली. काही ठिकाणी स्मशानभूमी बांधण्याबाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले नव्हते म्हणून तो निधी पंचायत घरे बांधण्यासाठी खर्च करण्यात

आला. जिल्हा नियोजन विकास समितीने पंचायत घरे बांधण्यास मान्यता दिलेली असल्याने त्या एकत्रित योजनेत पंचायत घरे बांधण्याची कामे देखील होती असा खुलासा विभागाने केला.

कोणतीही योजना राबवण्यासाठी सुयोग्य असे नियोजन करण्याची आवश्यकता असते. तसेच आजही महाराष्ट्रातील ५ हजार गावे अशी आहेत की, ज्या गावांमध्ये स्मशानभूमीची व्यवस्था केलेली नाही. Disposal of human body ही जर स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी मानली, तर त्याची पूर्तता होणे देखील होणे तितकेच गरजेचे आहे असे मत समितीने मांडले.

माणूस जिवंत असताना त्याला कोणत्या सोई-सुविधा मिळाव्यात की मिळू नयेत या संबंधी समिती अधिक भाष्य न करता एवढीच अपेक्षा व्यक्त करते की, निदान मरणानंतर तरी माणसावर पुढील अत्यंसंस्कार व्यवस्थित झाले पाहिजेत. हा मुद्दा केवळ स्मशानभूमीचा नाही तर लिंगायत, ख्रिश्चन, मुस्लिम असे इतर अनेक समाज/धर्माचे लोक आहेत की, ज्यांच्यामध्ये मृत देहाचे दफन केले जाते. प्रत्येक धर्माच्या व्यक्तिकरिता त्या त्या धर्माप्रमाणे दहन व दफन दोन्हींची व्यवस्था करणे गरजेचे आहे. असे मत समितीने मांडले. तसेच यासाठी वेगवेगळया समाजाच्या लोकांची व त्यांना आवश्यक असलेल्या दहन वा दफन भूमीबाबतची जिल्हानिहाय माहिती समितीला द्यावी. शासकीय जागा स्मशान भूमीकरिता देण्याबाबत शासनाला काही शिफारसी करता येतील. या योजनेमध्ये दहन व दफन भूमीचा समावेश असून त्यासाठी बऱ्याच ठिकाणी शासकीय जागा उपलब्ध नसते. सर्वोच्च न्यायालयाने गायरान जमिनींच्या बाबतीत निर्णय दिलेला आहे की, या जमिनी गुरे चरणा व्यतिरिक्त कोणत्याही कारणाकरिता दिल्या जाऊ नयेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

पंचायती राज प्रशासन "यशदा" येथील प्रशिक्षणाबाबतच्या संदर्भात अशा प्रकारच्या योजनांमध्ये राज्य सरकारचा वाटा २५ टक्के तर केंद्र सरकारचा वाटा ७५ टक्के इतका असतो. त्या वर्षी जिल्हा परिषद, ग्रामपंचायतींच्या निवडणुका होणार होत्या, नव्याने निवडून आलेल्या प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्याकरिता थोडा अधिक खर्च येईल असा राज्य सरकारचा अंदाज होता. या प्रयोजनार्थ सुरुवातीला ४ कोटी ६१ लाख रुपये एवढा निधी लागेल असा अंदाज होता. परंतु, केंद्र सरकार कडून जो निधी आला त्याच्या प्रपोर्शनेटमध्ये १ कोटी १७ लाख रुपये इतका शेअर राज्य सरकारला द्यावा लागणार होता. त्यामुळे आपण सुरुवातीला जरी तरतूद करुन ठेवलेली असली तरी, केंद्र सरकारकडून त्या वर्षी प्राप्त झालेल्या निधीच्या २५ टक्के निधी आपल्याला द्यावा लागला.

राज्य सरकारला ही तरतूद अंदाजे करावी लागते. म्हणजे केंद्र सरकार आपल्याला अमूक इतकी रक्कम देईल असा अंदाज करुन त्याच्या २५ टक्के इतक्या रकमेची तरतूद राज्य सरकारला करावी लागते. केंद्र शासनाची रक्कम आल्यानंतरच राज्य सरकारला ही तरतूद वितरीत करता येते.

केंद्र सरकारकडून ही रक्कम कधी प्राप्त होईल हे निश्चित नसते. ती वर्षाच्या शेवटी म्हणजे मार्च महिन्यामध्ये सुध्दा प्राप्त होऊ शकते. त्यानंतरच राज्य सरकारला आपला भाग वितरीत करता येतो अशीही माहिती विभागाने समितीला दिली.

लोकप्रतिनिधींच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत एखाद्या कामास जिल्हाधिकाऱ्याची मान्यता मिळण्यास वेळ लागला तर, ते काम करण्याची मुदत लोकप्रतिनिधी ४-६ महिन्यांनी वाढवून घेतो पण तो निधी त्याच कामावर खर्च करतो. शिवाय जेव्हा कधी २०-८०, २५-७५ टक्के अशा प्रकारच्या शेअरच्या योजना तयार करतात तेव्हा त्या साठीचे पैसे काही ४-८ दिवसांत मिळत नाहीत. कारण त्या फाईलवर चर्चा होऊन सही होण्यास काही कालावधी लागतो. त्या नंतरही मिळालेले पैसे हे काही कुणाच्या नावाने मिळत नाहीत तर ते पैसे त्या योजनेसाठी असतात. परंतु, बजेटमध्ये एखाद्या योजने वरील खर्च मंजूर झाल्यानंतर ते पैसे त्या योजनेसाठी दिले गेल्या नंतर जर संबंधितांनी ते पैसे त्या योजनेसाठी खर्च केले नाहीत तर त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत का विचार केला जाऊ नये ? रु.३ कोटी अखर्चित राहिल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. प्रत्येक वेळेस निधी १०० टक्के खर्च होईलच असे नाही, परंतु खर्चाची अंमलबजावणी कमी आहे. जर असे पैसे ब्लॉक करुन संबंधितांना ती योजना राबविण्यासाठी दिले तर अंमलबजावणीची टक्केवारी वाढेल अशी सूचना समितीने केली.

यावर केंद्र व राज्य शासनाच्या हिश्यांचा समावेश असलेल्या योजनांबाबत जो पर्यंत केंद्र शासन स्वतःचा हिस्सा वितरीत करीत नाही तो पर्यंत राज्याचा हिस्सा वितरीत होत नाही. विभागाने सांगितल्या प्रमाणे त्या वर्षी केंद्र शासनाकडून कमी निधी प्राप्त झाल्यामुळे राज्य सरकारने जेवढी तरतूद केली होती, जो निधी नियोजित केला होता, त्याचा भागदेखील कमी करावा लागला असे अभिप्राय वित्त विभागाने दिले.

केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला नाही तर राज्य शासनाने आपल्या खर्चातून ती कामे केली पाहिजेत. एखाद्या योजनेसाठी बजेटमध्ये तरतूद केल्यानंतर ती तरतूद वितरीत केली पाहिजे. राज्य सरकारने आपल्या वाटयाचे पैसे दिल्यानंतर केंद्र शासनाकडे उर्वरित निधीची मागणी करणे शक्य होईल. समितीच्या या मतावर राज्य शासन आपल्या राज्यात राबवावयाच्या केंद्र पुरस्कृत योजनांचे प्रस्ताव तयार करुन केंद्र सरकारकडे पाठविते. परंतु, केंद्र सरकार नॅशनल बजेटचा विचार करुन निधीची उपलब्धता करुन देते. त्यांनी जर बजेटमध्ये त्यासाठी तरतूद केली नसेल तर, राज्य सरकारच्या प्रस्तावावर निधी प्राप्त होत नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून त्यांचा वाटा मिळत नाही म्हणून राज्य शासन आपला हिस्सा देत नाही, परिणामी त्या योजना राबविल्या जात नाहीत. अशी खंत समितीने

व्यक्त केली. त्यावर केंद्र सरकार अनपेक्षितपणे राज्य सरकारने अंदाज केलेल्या तरतुदीपेक्षा जास्त निधी देते मग अशा वेळी राज्य सरकारला पुरवणी मागण्यांद्वारे आपला शेअर वाढवावा लागतो. राज्य सरकारने केलेली तरतूद केंद्र सरकारने वितरीत केलेल्या भागापेक्षा कमी पडल्यास राज्य सरकार ती वाढवून देते. परंतु, केंद्र शासनाने त्यांचा भाग वितरीत केल्यानंतरच हे करता येते अशी माहिती विभागाने दिली.

एखादी योजना राबविण्याचे ठरविले तर त्याचे व्यवस्थित नियोजन करुन अर्थसंकल्पामध्ये त्या योजनेसाठी पैसे मंजूर झाल्यानंतर ती योजना राबविण्यामध्ये विभागाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. अनेकदा कार्पोरेशन किंवा इरिगेशनच्या कामाबाबत कंत्राटदार शासनाचे पैसे आहेत. २-३ महिने उशिराने का होईना पण मिळतील या भरवशावर काम करण्यास तयार असतात. परंतु, या बाबतीत पैशाची वाट पाहण्यामध्ये कामाची वाट लागते. "यशदा" सारख्या संस्थामार्फत लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यासाठी पुण्याला बोलावले जाते. नागपूर, औरंगाबाद या ठिकाणी देखील त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था असली पाहिजे. विभागाचा निधी अखर्चित राहत असेल तर, त्यातून हे काम करण्यास काय हरकत आहे ? पुरेसा निधी प्राप्त असताना केंद्र शासन, ग्राम विकास विभाग किंवा इतर एनजीओज मार्फत शासन स्तरावर यासाठी एखादी यंत्रणा का डेव्हलप केली जात नाही ? शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे या प्रतिनिधींचे सुध्दा काही ठराविक वर्षांनी अपग्रेडेशन केले पाहिजे अशा शब्दात समितीने नाराजी व्यक्त केली.

निधी प्राप्त झाला नाही म्हणून प्रशिक्षण थांबविले जात नाही तर ते सुरुच असते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामाबाबत असे होत नाही. "यशदा" केवळ पुणे येथेच प्रशिक्षण देत नाही. प्रशिक्षणाबाबत वेगळी व्यवस्था आहे, प्रत्येक जिल्हयाला ११ पंचायती राज ट्रेनिंग सेंटर्स आहेत. ९ ग्रामसेवकांसाठी वेगळी केंद्रे आहेत त्यापैकी ३ केंद्रे शासनातर्फे चालविली जातात व ३ केंद्रे मान्यताप्राप्त अशासकीय संस्थाकडून चालविली जातात. विस्तार अधिकारी यांच्यासाठी २१ प्रशिक्षण संस्था आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विभागाने वेगवेगळया प्रशिक्षण संस्थेबाबत सांगितले. परंतु, सदस्यांना आवश्यक प्रशिक्षण मिळणे गरजेचे आहे. कायद्यांमध्ये झालेले बदल, नवीन कायदे यांची माहिती तालुका पातळीवरील सदस्याला देखील असणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य शासन तसेच एनजीओजच्या माध्यमातून मागासलेले जिल्हे निश्चित करुन तेथील सदस्यांना प्रशिक्षण ४-५ वर्षांचा कालावधी निश्चित करुन दिले जाणे आवश्यक असल्याचे मत समितीने मांडले.

ई-लर्निंगमुळे राज्यातील १३८ बॅकवर्ड तालुक्यांमध्ये सॅटकॉममार्फत प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आल्याचे विभागाने सांगितले. त्यावर सध्या ॲपल ही सिस्टम अद्ययावत असून तिच्यासाठी येणारा खर्चही कमी आहे. बीएसएनएलचे ३-जी व वाय-फायचे जाळे ग्रामीण भागामध्ये गावागावात पसरलेले आहे. अशा प्रकारे प्रत्येक ग्राम पंचायतीतील क्लासरुममध्ये ॲपलसारख्या नामवंत कंपनीचा मोठया डिस्पलेचा संगणक उपलब्ध करुन देऊन त्याद्वारेही सदस्यांच्या प्रशिक्षणाची सोय होऊ शकते असे जिल्हा पातळीवर प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक असल्याचे मत समितीने मांडले. त्यावर २१ हजार ग्रामपंचायतीमध्ये प्रशिक्षण देण्यात आले असून अकाऊंटच्या संदर्भात पंचायत समितीमध्ये 'संग्राम' योजनेच्या माध्यमातून २१ हजार ग्रामपंचायतीतील सदस्य व पंचायत समिती सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. आठ हजार ठिकाणी रस्ते जोडणी निर्माण करण्यात आली असून काही ठिकाणी वायरलेस प्रशिक्षण आहे. केंद्र सरकारच्या स्तरावरुन प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये अशी सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न शासनाचा आहे. परंतु केंद्र सरकारकडून निधी न मिळाल्यामुळे मार्च २००७ मध्ये ५० लाख रुपयांचा निधी परत करण्यात आला आहे. केंद्र सरकारकडून परस्पर निधी जिल्हा परिषदेकडे जात असल्यामुळे ५० लाख रुपयांची तरतूद ही प्रतिबिंबित तरतूद आहे अशीही माहिती विभागाने दिली.

राज्य सरकारला केंद्र सरकार निधी देत नाही, तो निधी सरळ जिल्हा परिषदेकडे जातो. ज्याप्रमाणे केंद्र सरकारचा निधी १५ दिवसात संबंधित जिल्हा परिषदा व ग्रामपंचायतींना राज्य सरकारने दिला नाही तर व्याज आकारण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे संबंधित यंत्रणानी हा निधी खर्च केला नाही तर त्या यंत्रणांवर राज्य सरकारने व्याजाची आकारणी करावयास हवी. यावर विभागाने अशी माहिती दिली की या निधीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक झाली असून त्यामध्ये हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचा निधी याच पध्दतीने येतो. यासंदर्भात केंद्र सरकारकडे चर्चा करण्यात आली असून केंद्र सरकारचे असे म्हणणे आहे की, केंद्र शासनाकडून आलेला निधी १५ दिवसात संबंधित जिल्हा परिषदा व ग्रामपंचायतींना वितरीत झाला पाहिजे. १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागला तर त्यावर व्याज आकारण्यात येईल. काही राज्यात केंद्र सरकारकडून आलेला निधी संबंधित जिल्हा परिषदा व ग्रामपंचायतींना लवकर देण्यात येत नव्हता. आरोग्य व शिक्षण विभागात अशा अनेक योजना आहेत, यामध्ये सर्व शिक्षा अभियान, प्रधानमंत्री ग्राम सडक अशा अनेक योजनासाठी यापैकी काही वेगळी खाती उघडण्यात आली योजनांची अनुरुप तरतूद राज्य सरकारला द्यावी लागते. दरमहा १/१२ रक्कम दिली पाहिजे. परंतु पहिल्या चार-पाच महिन्यात कर रुपाने गोळा होणारा निधी जास्त प्रमाणात जमा होत नाही. तरी सुध्दा प्रशासकीय खर्च दरमहा १/२

प्रमाणात करावेच लागतात. केंद्र सरकारने योजनांचा निधी दिल्यानंतर राज्य सरकार अनुरुप तरतूदचा निधी वितरीत करते. केंद्र सरकारच्या योजना असल्यामुळे त्या राज्य सरकारच्या निधीतून चालविल्या तर पुढे अडचणी निर्माण होतात. महाराष्ट्रात बहुतांशी केंद्रीय अनुदानाचा निधी सर्व शिक्षा अभियान, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, इंदिरा आवास योजना या योजनांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून येत असतो. आपल्या राज्यातील ग्रामीण भागातील बरेचसे रस्ते रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून करण्यात आले आहेत. महाराष्ट्रात एक हजार लोकवस्ती असलेले रस्ते व ५०० लोक वस्ती असलेले रस्ते पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून अनुज्ञेय होते. या योजनेसाठी केंद्र सरकारचे निकष आहेत. पंतप्रधान ग्रामसडक योजनेवरील खर्च २००५ पासून वाढू लागला. केंद्र सरकारकडून येणारा निधी महाराष्ट्र राज्य खर्च करण्यामध्ये अग्रेसर आहे. नरेगामध्ये ५० टक्के कामे ही ग्रामपंचायतीकडून करण्यात यावी असा मापदंड आहे. तसेच पंतप्रधान ग्राम सडक योजनेचा १०० टक्के निधी दर वर्षी खर्च करण्यात आला अशीही माहिती विभागाने दिली.

केंद्र सरकारकडून येणारा निधी जलद गतीने खर्च व्हावा यासाठी राज्य शासनाकडून काय प्रयत्न करण्यात येत आहेत अशी विचारणा समितीने केली त्यावर महाराष्ट्र राज्याने मागील काळात पंतप्रधान ग्राम सडक योजनेचा १०० टक्के निधी खर्च केलेला आहे. रुपये १००० कोटी पहिल्या तीन वर्षात खर्च करण्यात आले. ५२०० कोटी रुपयांचे रस्ते तयार करण्यात आले. आता ६०० कोटी रुपयांची कामे सुरु असून पंतप्रधान ग्राम सडक योजनेची कामे महाराष्ट्रात संपलेली आहेत. त्यामुळे केंद्र सरकार आपल्या राज्याला या योजनेचा निधी देण्यास तयार नाही. केंद्र सरकारचे असे म्हणणे आहे की, महाराष्ट्रात रस्त्यांची जोडणी झालेली आहे. आपले पाणंद रस्ते दगडाचे असले तरी केंद्र सरकार म्हणते की, महाराष्ट्रात रस्त्यांची जोडणी आहे. त्यामुळे इतर राज्यात तसे रस्ते नसल्यामुळे त्या राज्यांना निधी देण्यामध्ये प्राधान्य देण्यात येते. केंद्र सरकारकडून ग्राम सडक योजनेसाठी जो निधी मिळतो व त्यामध्ये ज्या दर्जाचे रस्ते तयार करण्यात येतात त्या दर्जाचे महाराष्ट्रातील जुने रस्ते नाहीत. त्यासाठी राज्याला निधी देणे आवश्यक आहे. परंतु इतर राज्यात संपूर्ण रस्ते जोडणी झाल्याशिवाय आपल्या राज्याला निधी मिळणार नाही असे केंद्र सरकारचे म्हणणे आहे. यासंदर्भात विभागाने केंद्र सरकारकडे महाराष्ट्रात जे दगडी रस्ते आहेत ते चांगले करण्यासाठी निधी दिला पाहिजे, अशी मागणी केली होती. यासाठी पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे दोन भाग करावेत. समजा या योजनेसाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत असेल तर त्यांचे दोन भाग करुन ज्या राज्यात रस्ते जोडणी नाहीत अशा राज्यांना १५ हजार कोटी रुपये राखून ठेवावेत. त्याच प्रमाणे जे

राज्य प्रगत आहेत त्या राज्यांसाठी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी. असा प्रयत्न करण्यात आला होता. परंतु तो पूर्णात्वास जाऊ शकला नाही.

३६०४ या मुख्य लेखाशिर्षा अंतर्गत आपण स्पष्टीकरणात असे नमूद केले आहे की, विभागीय खर्चानुसार रुपये २,२३,९९,३०४/- ची बचत मुख्यत्वे काही तहसीलदारांनी रक्कमा आहरीत न केल्याने, जिल्हा परिषद कोल्हापूर व उस्मानाबाबद यांना अनुदानाचे आदेश उशिरा प्राप्त झाल्याने व जिल्हा परिषद परभणी यांना अनुदानाच्या आदेशाची शाईची प्रत प्राप्त न झाल्याने झालेली आहे. शाईची प्रत प्राप्त न होणे म्हणजे काय ? समितीच्या या प्रश्नावर विभागाने असा खुलासा केला की, तहसीलदार यांच्यामार्फत महसूली टॅक्स जमा केला जातो. वेगवगळ्या रकमा शासनाकडे जमा होत असतात. या सर्वांचा हिशोब ठेऊन हा पैसा त्या त्या ग्रामपंचायतीकडे वर्ग करावयाचा असतो. शक्यतोवर ३० तारखेला निधी मिळतो. त्यावेळी अशी अडचण निर्माण झाली की, कोषागार कार्यालय रात्री १२.०० वाजता बंद झाले. त्यामुळे संगणीकृत प्रत त्यांना देण्यात आली होती. परंतु हा सर्व निधी पुढील वर्षात देण्यात आला आहे.

प्रशिक्षणासाठी केंद्र सरकारकडून निधी कमी आला म्हणून आपली प्रतिबिंबित तरतूद परत करण्यात आली. परंतु हा प्रश्न फक्त यशदा या संस्थेपुरताच मर्यादित नसून इतर ठिकाणी सुध्दा अशाच प्रकारच्या अडचणी येतात. यामध्ये इंदिरा आवास योजना आहे. या योजनेसाठी निधी मिळत नाही. विशेष घटक योजनेच्या माध्यमातून निधी वेळेवर मिळावयास पाहिजे. यावर विभागाने सांगितले की, इंदिरा आवास योजनेचे दोन भाग आहेत. इंदिरा आवास योजनेचे लक्ष्य जिल्ह्यासाठी दिले जाते. यामध्ये १ लाख ५५ हजार घरे बांधण्यात आली आहेत. आता या योजनेचा निधी जिल्हा नियोजन विकास समिती मधून दिला जातो. यामध्ये काही योजना ७५-२५ अशा आहेत. तर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी ३० टक्के घरे राखून ठेवण्यात आली आहेत. पाच ते सहा जिल्ह्यातील अनुसूचित जाती/जमातीची यादी शिल्लक नाही. रत्नागिरीसारख्या ठिकाणी अनुसूचित जमातीचे लोक मिळत नाहीत. अनुसूचित जाती/जमातीसाठी विशेष घटक योजना राबविण्यात येत आहे.तसेच या सर्व बाबी आता जिल्हा नियोजन विकास समितीच्या अंतर्गत येत आहेत. त्यामुळे सर्व निधी जिल्हा नियोजन विकास समितीकडे देण्यात येतो. म्हणून या योजना राबविण्यात अडचणी येणार नाहीत. लोकसंख्येच्या आधारावर जिल्हा नियोजन विकास समितीला निधी दिला जातो की, आणखी कोणता आधार गृहित धरण्यात येतो. अशी विचारणा समितीने केली यावर राज्यात काही केंद्र सरकारच्या व काही राज्य सरकारच्या योजना आहेत या सर्व योजनांना लोकसंख्येच्या आधारावर जिल्हा नियोजन विकास समितीसाठी निधी दिला जातो. तसेच यासंदर्भातील कार्यवाही नियोजन विभाग करीत असते. लोकसंख्या

व भौगोलिक क्षेत्राच्या आधारावर जिल्हा नियोजन विकास समितीसाठी निधी दिला जातो असा खुलासा विभागाने केला. काही जिल्हयामध्ये जास्त निधी मिळतो तर काही जिल्ह्यांना कमी निधी मिळतो तेथे राजकीय वजन वापरले जाते काय ? अशी समितीने विचारणा केली यावर जिल्हा वर्षिक निधीसाठी ४० टक्के महत्त्व हे लोकसंख्येवर असते. अनुसूचित जाती/जमातीसाठी १० टक्के तसेच भौगोलिक क्षेत्रासाठी २० टक्के महत्त्व गृहित धरुन त्यानुसार हा निधी वाटप करण्यात येत असून त्यामध्ये राजकीय भाग नसतो. आमदारांची संख्या ही लोकसंख्येच्या प्रमाणात असते लोकसंख्येच्या आधारावर जिल्हा नियोजन विकास समितीसाठी निधी दिला जातो. तसेच जिल्हा परिषदांना अनेक योजनांचे अधिकार देण्यात आले आहेत असेही विभागाने सांगितले.

अनेक अधिकारी वेळेत कामे करीत नसल्यामुळे येथे लेखा परिक्षण आक्षेप येतो. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, त्यांची पदोन्नती रोखून धरावी, त्यांना पदावनत करावी. जे अधिकारी कामे करीत नसतील त्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करावी, असे समितीचे मत झाले. यावर जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्वसाधारण परिषद निर्णय घेत असते अशीही माहिती विभागाने दिली. अनेक योजनांवर खर्च न करण्याची प्रवृत्ती दिसून येत आहे व ते योग्य नसून जिल्हा नियोजन विकास समितीची अंमलबजावणी करण्यात येते असे विभागाने सांगीतले. जिल्हा परिषदेमध्ये सर्वसाधारण परिषदेने एखाद्या योजनेवर खर्च करण्याचा निर्णय घेतला तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून त्या निर्णयाची अंमलबजावणी का होत नाही? जिल्हा नियोजन विकास समितीच्या बाबत शासन स्तरावर काही निर्णय झाले असतील तर त्या बाबतच्या स्पष्ट सूचना जिल्हा परिषदांना का दिल्या जात नाहीत? अशीही विचारणा समितीने केली. यावर विभागाने असे सांगीतले की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्तांकडे ठराव पाठवावा लागतो. विभागीय आयुक्त तो प्रस्ताव चुकीचा आहे की बरोबर हे ठरवतात. त्यांना तो प्रस्ताव अयोग्य वाटला तर तो रद्द होतो. जिल्हा नियोजन विकास समितीच्या बाबतीत शासन स्तरावर सूचना त्याबाबतची माहिती समितीला देण्यात आली. (परिशिष्ट)

पैसे खर्च न होण्याबाबत कारणे सांगितली जातात. परंतु, तसे होऊ नये या करिताच जिल्हा नियोजन विकास समितीला निधी खर्च करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्याबाबत समितीने सांगितले. एखाद्या कामाच्या बाबतीत जिल्हा नियोजन विकास समितीमध्ये सदस्य सूचना करतात, त्या मंजूर देखील होतात परंतु, त्यावर पालक मंत्र्यांची स्वाक्षरी होत नाही, त्याबाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अधिकार नसतात. त्यामुळे कामे कशी करणार असा प्रश्न निर्माण होतो.

**अभिप्राय व शिफारशी**

समिती समोर आलेल्या उपरोक्त माहितीवरून असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्यात ३५१ पंचायत समित्या आहेत. यापैकी १६१ पंचायत समित्यांमध्ये वर्ग-१ चे गट विकास अधिकारी आहेत. गेल्या २० वर्षापासून लोकसंख्येच्या निकषानुसार वर्ग-१ व वर्ग-२ चे गट विकास अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. या पंचायत समित्यांच्या लोकसंख्येत वाढ झाल्यामुळे सर्वच पंचायत समित्यांमध्ये वर्ग-१ चे गट विकास अधिकारी नियुक्त करणे गरजेचे आहे असे समितीचे मत झाले. तसेच विभागात वर्ग-१ व २ च्या मंजूर ९ हजार पदांपैकी २ हजार पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले. या रिक्त पदांपैकी जास्त पदे गट विकास अधिकाऱ्यांची आहेत. जिल्हापरिषदेत देखील १४ विभागात वर्ग -१ व वर्ग-२ ची पदे असून समाजकल्याण व शिक्षण विभागातील १९०० पदे रिक्त आहे. **पंचायत समित्यांच्या लोकसंख्येत झालेल्या वाढीचा विचार करता सर्वच पंचायत समित्यांमध्ये वर्ग-१ चे गट विकास अधिकारी तातडीने नियुक्त करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी तसेच विभागात रिक्त असलेल्या जागा भरण्याची कार्यवाही तत्परतेने करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत द्यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

विभागीय लेख्यांमध्ये तफावत असल्याचे स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये समितीस आढळून आले.याबाबत विभागाकडे विचारणा केली असता सदर तफावत ही खर्चाच्या गैरवर्गीकरणामुळे झाली आहे अशी समितीस माहिती देण्यात आली. समितीने या संदर्भातील महालेखापालाचे अभिप्राय विचारले असता महालेखापालांना विभागाकडून चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव विहित मुदतीत प्राप्त न झाल्याची माहिती दिली. तसेच विभागाकडून खर्चमेळाचे काम देखील वेळच्या वेळी करण्यात येत नाही असे निदर्शनास आले. **विभागाच्या अधिकाऱ्यांनी कामात हलगर्जीपणा दर्शविल्यामुळे अशा प्रकारचे आक्षेप महालेखापालांच्या अहवालामध्ये आलेले आहेत. अधिकाऱ्यांनी वेळेमध्ये खर्चमेळ पूर्ण केला असता तर हे आक्षेप आले नसते. त्यामुळे ज्या अधिकारी व कर्मचारी यांनी खर्चमेळाच्या कामात कुचराई केली आहे, त्यांचेवर याबाबतची जबाबदारी निश्चित करण्यात येऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची शिफारस समिती करीत असून याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची समितीस ३ महिन्यांत माहिती देण्यात यावी.**

सामाजिक सुरक्षा व कल्याण या योजनेंतर्गत दहन व दफन भूमीसाठी जमीन संपादीत करणे व त्यासाठी निधी देणे हा विषय समितीसमोर चर्चेस होता, सोलापूर, अमरावती, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, चंद्रपूर व लातूर या १३ जिल्हयांमध्ये स्मशान भूमीकरीता तरतूद करण्यात आली होती. परंतु नागपूर, भंडारा व वर्धा या ३ जिल्हयांचे प्रस्ताव आले व त्यावर रु.४६ लक्ष पैकी रु.१२ लक्ष खर्च करण्यात आला अनेक ठिकाणी स्मशानभूमीसाठी जमीन देण्यास गावकरी तयार नसतात ही योजना फक्त शासकीय जागा असेल तर योग्यरित्या कार्यान्वित होते.

महाराष्ट्रामध्ये जवळपास ५ हजार गावांमध्ये दहन व दफनभूमीची व्यवस्था नाही. Disposal of human Body ही स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी मानण्यात आली तर त्याची पूर्तता होणे गरजेचे आहे असे समितीचे मत झाले. **दहन व दफन भूमी यासाठी जागा संपादीत करणे आवश्यक असल्याने किमान २-३ गावांमध्ये मिळून एक अशी व्यवस्था करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे गावांच्या व वाडयांच्या विकास आराखडयात दहन व दफन भूमीचे नियोजन करण्याची अट नमूद करण्यात यावी. दहन व दफन भूमी मिळविण्यासाठी प्रोत्साहनपर योजना आखावी, ज्यामध्ये या गावांना व वाडयांकरीता इतर सोयी सुविधा यांचा समावेश करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**दहन व दफन भूमीची कामे ही आवर्ती स्वरूपाची कामे नसून एकदा सदर कामे पूर्ण केल्यावर त्यावर प्रत्येक वर्षी खर्च करावयाची आवश्यकता रहात नाही.त्यामुळे ही कामे वैशिष्टपूर्ण स्वरूपात समाविष्ट होतात, या वैशिष्टयपूर्ण कामांसाठी विभागाच्या अंदाजपत्रकात स्वतंत्र शीर्ष उघडण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

महाराष्ट्रामध्ये बहुतांश केंद्रिय अनुदानाचा निधी सर्व शिक्षा अभियान, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, इंदिरा आवास योजना यांच्या माध्यमातून केंद्र शासनाकडून येत असतो. आपल्या राज्यात ग्रामीण भागातील बरेचशे रस्ते रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्रात १ हजार लोकवस्ती असलेले व ५०० लोकवस्ती असलेले रस्ते पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून होतात. या योजनेसाठी केंद्र शासनाचे निकष आहेत. राज्यात ५२०० कोटी रूपयांचे रस्ते तयार करण्यात आले असून ६०० कोटी रूपयांची कामे बाकी आहेत. पंतप्रधान ग्रामसडक योजनेची कामे महाराष्ट्रात संपलेली आहेत. केंद्र शासनाच्या म्हणण्याप्रमाणे राज्यात रस्ते जोडणी पूर्ण झालेली असल्याने ज्या राज्यांमध्ये रस्ते नाहीत त्या राज्यांना प्राधान्य देण्यात येत आहे. केंद्र शासनाकडून ग्रामसडक योजनेसाठी जो निधी मिळतो व त्यामध्ये ज्या दर्जाचे रस्ते तयार करण्यात येतात त्या दर्जाचे महाराष्ट्रातील जुने रस्ते नाहीत त्यामुळे या जुन्या रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी राज्याला निधी मिळणे आवश्यक आहे. परंतु इतर राज्यांमध्ये संपूर्ण रस्ते जोडणी झाल्याशिवाय राज्याला निधी मिळणार नाही असे केंद्राचे म्हणणे आहे. **विभागाने राज्यामध्ये जुने असलेले रस्ते चांगल्या दर्जाचे करण्यासाठी पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधून निधी मिळण्यासाठी ज्या राज्यांमध्ये रस्त्यांची जोडणी पूर्ण झालेली नाही, त्या राज्यांकडील ठराविक रक्कम राखून ठेवण्याबाबत व ज्या राज्यांनी यापूर्वीच रस्ते जोडणी पूर्ण केलेली आहे परंतु ते रस्ते फार पूर्वीचे आहेत त्या रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याने या राज्यांकरीता देखिल काही निधी राखून ठेवावा. अशारितीने पंतप्रधान ग्रामसडक योजनेचा निधी मिळण्यासाठी दोन भाग करावे असा केंद्र शासनास सादर केलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## राज्यातील ग्रामीण रुग्णालय बांधकामाचा दर्जा सुधारणे व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु करणे

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करत असताना अनुदान क्र. आर-१ मधील प्रधान लेखा शिर्ष २२१० "वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य" या शिर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेल आहे.

### अनुदान क्र. आर-१

| शीर्ष | | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रूपये लाखात<br>जादा (+)<br>बचत (-) |
|---|---|---|---|---|
| **२२१० वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य**<br>०१ नागरी आरोग्य सेवा<br>११० रुग्णालये व दवाखाने<br>११०-७(०६)(२१) महसूल विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी विभागीय संदर्भीय सेवा केंद्र स्थापन करणे<br>(२२१० ४२५९) | | | | |
| मूळ | १४५५.०० | १५५५.०० | १५४.६२ | (-) १४००.३८ |
| पुरवणी | (+)१००.०० | | | |

खर्च मूळ तरतूदी इतकाही झाला नाही. रु.१४००.३८ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता, राज्यातील ११ जिल्हे व उपजिल्हा रुग्णालयांतील सौर ऊर्जेवर पाणी तापविण्याच्या पध्दतीच्या पुरवठ्याकरिता जुलै, २००६ मध्ये मिळविण्यांत आलेले रु.१००.०० लाखाचे पूरक अनुदान अनावश्यक असल्याचे सिध्द झाले.

रु.१४००.३८ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यांत आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, या योजनेअंतर्गत महसूल विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी रुग्णांना विशेष संदर्भ सेवा उपलब्ध करुन देणे हा उद्देश आहे. रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम नव्याने सुरु असल्याने अपेक्षित कामे गतीने न झाल्यामुळे रुग्णालयाचे पूर्ण बांधकाम झाले नाही. बांधकाम आर्थिक वर्षात पूर्ण न झाल्यामुळे पदे भरण्याबाबत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली नाही. त्यामुळे नवीन पदे भरली नाहीत. तसेच हॉस्पिटलचे बांधकाम न झाल्यामुळे यंत्रसामग्री व साधनसामग्री खरेदी करण्यात आली नाही. त्यामुळे मंजूर अनुदान वेतन, कार्यालयीन खर्च व यंत्रसामग्री व साधन सामग्री या बाबीखाली खर्च झाले नाही.

बचतीबाबतचा बाबनिहाय तपशील पुढीलप्रमाणे :

| | बाब | अंतिम सु.अनुदान | प्रत्यक्ष खर्च | कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| १) | वेतन | १०० | - | (-) १००.०० |
| २) | कार्यालयीन खर्च | २०.०० | १५.३४ | (-) ४.८६ |
| ३) | सामग्री पुरवठा | - | ४९.९६ | (+) ४९.९६ |
| ४) | यंत्रसामग्री व सा.सा. | १४३५.०० | ८९.५२ | (-) १३४५.४८ |
| | एकूण | १५५५.०० | १५४.६२ | (-)१४००.३८ |

वरीलप्रमाणे रु.१४००.३८ लक्ष एवढी बचत झालेली असून ती क्षमापित व्हावी.

**रुपये लाखात**

| **शीर्ष** | | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **जादा (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| **२२१० वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य** | | | | |
| ०६ सार्वजनिक आरोग्य | | | | |
| १०१ रोग प्रतिबंध व नियंत्रण | | | | |
| (०१)(३६) बीसीजी लस टोचणी व क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (२२१० ०९३२) | | | | |
| मूळ | १०००.०० | १०००.०० | ५०७.६० | (-) ४९२.४० |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम ५० टक्के केंद्र पुरस्कृत आहे. त्यामुळे सामग्री व पुरवठा या बाबींवर ५० टक्के हिस्सा केंद्र शासन व ५०% राज्य शासनाचे हिश्श्यापोटी असतात. केंद्र शासन त्यांच्या ५०% हिश्श्यापोटी क्षयविरोधी औषधांचा पुरवठा करीत असते. राज्य शासनाचा प्रत्यक्ष खर्च रु.५०७.६० लाख झालेला आहे. केंद्र शासनाने सन २००६-०७ मध्ये सामग्री व पुरवठा या बाबींवर रु.६८६.०५ इतका खर्च केला असल्याचे त्यांचेकडील इंग्रजी पत्र दि.२५.३.०८ अन्वये कळविलेले आहे.

| | अनुदान हिस्सा | प्रत्यक्ष खर्च | कमी/जास्त |
|---|---|---|---|
| राज्य | ५००.०० | ५०७.६० | (+) ७.६० |
| केंद्र | ५००.०० | ६८६.०५ | (+) १८६.०५ |
| **एकूण** | **१०००.००** | **११९३.६५** | **(+) १९३.६५** |

प्रत्यक्षात एकूण अनुदानापेक्षा केंद्र व राज्य शासनाचे मिळून रु.१९३.६५ लाख एवढा खर्च जास्त झाला आहे. केंद्र शासनाने केलेल्या खर्चाची नोंद महालेखाकार कार्यालयात न झाल्यामुळे खर्च कमी दिसून येतो. महालेखापाल, मुंबई यांनी इंग्रजी पत्र क्र.DyDHS/TB&BCG/Appro A/C/२००४ to २००७/expbooked/३८३४-३५/२००८ dated २.४.०८ अन्वये सदरच्या खर्चाची नोंद त्यांचे लेखाशीर्षात घेण्याविषयी विनंती केली आहे

| शीर्ष | | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये लाखात जादा (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| **२२१० वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य** | | | | |
| ०१ सार्वजनिक आरोग्य | | | | |
| ००१ रोग प्रतिबंध व नियंत्रण | | | | |
| ००१ (०१)(०१) आरोग्य सेवा संचालनालय | | | | |
| मुंबई (२२१० ००९३) (२२१० ०११९) | | | | |
| मूळ | ८३९.७० | | | |
| पुरवणी | ११०४.०० | | | |
| पुर्नविनियोजित | (-)३५८.७३ | १५८४.९७ | १२४०.६८ | (-) ३४४.२९ |

मुख्यत्वेकरून अनुदान उशिरा प्राप्त होणे तसेच कोषागार कार्यालयांकडून संक्षिप्त आकस्मिक देयके पारित न झाल्यामुळे मार्च, २००७ मध्ये रु. ३५८.७३ लाखांचा निधी परत करण्यात आला.

रु. ३४४.२९ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

२२१० ००९३ मध्ये अंतिम सुधारीत अनुदान रु.३४०.९७ लाख

२२१० ०११९ मध्ये अंतिम सुधारीत अनुदान रु.१२४४.०० लाख

या योजनेमध्ये संचालनालयामधील अधिकारी/कर्मचारी यांचे आस्थापनेवरील खर्च केला जातो.

यामध्ये दोन उपशीर्षाचा समावेश आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे :

यांपैकी २२१० ००९३ या उपशीर्षाखाली रु. ३७६.४० लाख खर्च झाला असून जादा खर्च रु. ३५.४३ लाख इतका आहे. तसेच यापैकी २२१० ०११९ या उषाशीर्षाखाली रु.८६४.२८ लाख इतका खर्च झालेला आहे. त्यामध्ये रु.३७९.७२ लाख इतकी बचत झाली आहे. दोन्ही उपशीर्षाअंतर्गत एकूण कमी/जास्त लक्षात घेता रु.३४४.२९ एवढी (रु.३७९.७२-रु.३५.४३) बचत झाली आहे.

बचतीची कारणे खालीलप्रमाणे :-

१) निधीतून कमी झालेला खर्च हा प्रामुख्याने प्रा.आ.केंद्र/उपकेंद्र बांधकामासाठी कमी झालेला आहे, व तो सदर आरोग्य संस्थेस जागा प्राप्त न होणे किंवा बांधकामास जिल्हा प्रशासनाकडून वेळेवर प्रशासकीय मान्यता प्राप्त न झाल्यामुळे त्यासाठी असणारा निधी पुर्नविनियोजनाद्वारे समर्पित करण्यात आला होता. तथापि यापैकी हाती घेण्यात आलेली काही बांधकामे मार्च ०७ अखेर पूर्ण झाल्याने त्यासाठी देयके अदा करावी लागली आहेत. त्यामुळे यामध्ये शेवटी रु.१५.७१ लाखापर्यंत जास्त खर्च झाला आहे.

२) मराठवाडा विकास पॅकेज निधीतून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्णवाहिकांसाठी रु.३२८.०० लाख व ग्रामीण रुग्णवाहिकांसाठी रु.३२.०० लाख असा एकूण रु.३६०.०० लाख निधी मंजूर करण्यात आला होता. त्याप्रमाणे रुग्णवाहिका खरेदी करुन देयके उपसंचालक आरोग्य सेवा, परिवहन, पुणे कार्यालयाकडून जिल्हा कोषागारात सादर करण्यात आले, तथापि काही तांत्रिक मान्यतेअभावी सदर देयक दि.३१.३.०७ अखेर जिल्हा कोषागारात पारीत होऊ न शकल्याने त्यासाठीचा निधी शिल्लक राहिला, याप्रमाणे सदर शिल्लक निधी रु.३९५.४३ लाख व बांधकाम जास्तीचा झालेला खर्च रु.१५.७१ लाख वजा जाता एकूण ३७९.७२ लाख पर्यंत बचत झाली आहे. यामधून २२१० ००९३ या उपलेखाशीषांतर्गत वेतन व इतर अनुषंगिक बाबींवर झालेला जादा खर्च रु.३५.४३ लाख वजा जाता एकूण रु.३४४.२९ लाख झालेली आहे. तरी झालेली बचत क्षमापित करण्यात यावी, ही विनंती.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र.लेखापरीक्षा/ अेअेडब्ल्यू/अशासकीयसंदर्भ/आर-१/२२१०/२००६-०७/साआवि/ यूओआर-१३९/ओडब्ल्यू २३१, दि.१५.१२.०९ अन्वये तपासून देण्यात आले आहे.

**रुपये लाखात**

| **शीर्ष** | | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **जादा (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| **२२१० वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य** | | | | |
| ०६ सार्वजनिक आरोग्य | | | | |
| ००१ संचातन व प्रशासन | | | | |
| (०१)(०४) गट वैद्यकीय अधिकारी | | | | |
| (२२१० ०३७१) | | | | |
| मूळ | ८५८३.२९ | | | |
| पुर्नविनियोजित | (-) ७७.३४ | ८५०५.९५ | ७९४६.९६ | (-) ५५८.९९ |

(एक) जिल्हा आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे (रु.१३.१४ लाख) (दोन) कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देण्यात आले नाही. (कारणे देण्यात आली नाहीत) (रु.६४.२० लाख) यामुळे २००७ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रु.७७.३४ लाखांचा निधी काढण्यांत आला.

रु.५५८.९९ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, सदर योजनेमधून ८ परिमंडळांतर्गत गट वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन भत्ते, प्रवास इत्यादीचा खर्च केला जातो.

या उपशीर्षाखाली अंतिम सुधारीत अनुदान रु.८५०५.९५ लक्ष मंजूर असून प्रत्यक्ष खर्च रु.७९४६.९६ लक्ष इतका आहे.झालेली बचत रु.५५८.९९ लक्ष ही वेतन या बाबीवर झाली असून अस्थायी पदांचे आदेश उशीरा प्राप्त झाल्याने व वेतनाची वाढीव अनुदान उशीरा प्राप्त झाल्याने तसेच रिक्त पदे असल्यामुळे झाली आहे. झालेली बचत ही ६.५७% असून ती क्षमापित व्हावी ही विनंती.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र.लेखापरीक्षा/ अेअेडब्ल्यू/अशासकीयसंदर्भ/आर-१-३/२२१०-४२१०/२००६-०७/ साआवि/२१३, दि.१०.९.०८ अन्वये तपासून देण्यात आले आहे.

**रुपये लाखात**

| **शीर्ष** | | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **जादा (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| **२२१० वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य** | | | | |
| ०६ सार्वजनिक आरोग्य | | | | |
| ०१० किमान गरजा कार्यक्रम | | | | |
| राज्य योजनांतर्गत योजना | | | | |
| (०१)(०२) प्र.आ.केंद्राचा ग्रा.रु.इतका | | | | |
| दर्जा वाढविणे (२२१० ०५३१) | | | | |
| मूळ | १००.०० | | | |
| पुरवणी | ९४९.९९ | ८३५.९७ | ३७६.०१ | (-) ४५९.९६ |
| पुर्नविनियोजित | (-)२१४.०२ | | | |

फिरती आरोग्य पथके, ट्रामा केअर युनिट व मोटार वाहने यावरील कमी खर्च झाल्यामुळे मार्च २००७ मध्ये रु.२१४.०२ लाख इतका निधी परत करण्यात आला. रु.४५९.९६ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाही. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, या योजनेअंतर्गत राष्ट्रीय महामार्गावर होणाऱ्या अपघातग्रस्त रुग्णांवर तातडीने औषधोपचार करण्यासाठी ग्रामीण रुग्णालये, महाड, जिल्हा रायगड, चिपळूण जिल्हा रत्नागिरी व संगमेश्वर जि.रत्नागिरी या रुग्णालयाशी संलग्न ट्रामा केअर युनिट नव्याने स्थापन करणे हा उद्देश आहे.

या उपशीर्षाअंतर्गत रु.८३५.९७ लक्ष इतके अनुदान मंजूर असून प्रत्यक्ष खर्च रु.३७६.०१ लक्ष इतका खर्च झालेला आहे व रु.४५९.९६ लक्ष इतकी बचत झाली आहे. झालेली बचत ही पुढील बाबींवर आहे :

१) वेतन : नव्याने निर्माण केलेली ट्रामा केअर युनिटची पदे भरली न गेल्याने बचत झाली आहे.

२) कार्यालयीन खर्च संगमेश्वर, जि.रत्नागिरी प्रत्यक्षात स्वतंत्र इमारतीमध्ये कार्यान्वित न झाल्यामुळे तसेच तीनही रुग्णालयात खर्चामुळे बचत झाली आहे. तरी झालेली बचत क्षमापित करण्यात यावी.

| | बाब | अंसुअ | प्रत्यक्ष खर्च | कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| १) | वेतन | २४१.४३ | ७४.१८ | (-) १६७.२५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २) | कार्यालयीन खर्च | १.८८ | २४.७७ | (+) २२.८९ |
| ३) | प्रवास खर्च | - | ००.८७ | (+) ००.८७ |
| ४) | सामग्री पुरवठा | ३०.०० | २०७.८३ | (+) १७७.८३ |
| ५) | पे.ते.वंगण | - | १३.१५ | (+) १३.१५ |
| ६) | गौण बांधकामे | - | ००.२९ | (+) ००.२९ |
| ७) | यंत्र सा. व सा.सा. | २०.०० | ५४.९२ | (+) ३४.९२ |
| ८) | इतर खर्च | ५४२.६६ | - | (-) ५४२.६६ |
| | एकूण | ८३५.९७ | ३७६.०१ | (-)४५९.९६ |

वरील तपशीलावरुन असे दिसून येते की, झालेली बचत पदे न भरल्यामुळे वेतन या बाबीवर झाली आहे व रुग्णालय प्रत्यक्षात कार्यान्वित न झाल्यामुळे इतर खर्च या बाबीवर झाली आहे. तरी झालेली बचत क्षमापित करण्यात यावी.

**रूपये लाखात**

| **शीर्ष** | | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | जादा (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| **२२१० वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य** | | | | |
| ०६ सार्वजनिक आरोग्य | | | | |
| ०१० किमान गरज कार्यक्रम | | | | |
| (०१)(०६) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये योजनांकरिता अनुदान (२२१० ००५८) | | | | |
| मूळ | ३५४०.६६ | | | |
| पुरवणी | ५०.३८ | ३३१५.५५ | २४२५.७६ | (-) ८८९.७९ |
| पुर्नविनियोजित | (-) २७५.४९ | | | |

जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून कमी मागण्या आणि बोरगांव व चरण येथे प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम करण्यात आले नाही. यामुळे मार्च २००७ मध्ये रु.२७५.४९ लाख इतका निधी काढण्यात आला. रु.८८९.७९ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, या योजनेतून बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे यांच्या औषधी अनुदानात वाढ, उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्राची बांधकामे, आरोग्य संस्थांची देखभाल व दुरुस्ती, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे बळकटीकरण, आश्रमशाळेतील मुलांची वैद्यकीय तपासणी तसेच वर्ग-३ व वर्ग ४ कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यासाठी अनुदान वितरीत केले जाते.

या उपशीर्षात दिसून येणारी बचत सांगली, सिंधुदुर्ग व नाशिक विभागातील नियोजित बांधकामाची कामे वित्तीय वर्षात पूर्ण न झाल्याने झालेली आहे. तसेच झालेल्या बांधकामाची देयके वेळेत प्राप्त न

झाल्याने बचत झालेली आहे. तरी झालेली बचत क्षमापित व्हावी.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र.लेखापरीक्षा/ अेअेडब्ल्यू/अशासकीयसंदर्भ/आर-१-३/२२१०-४२१०/२००६-०७/ साआवि/२१३, दि.१०.९.०८ अन्वये तपासून देण्यात आले आहे.

| शीर्ष | | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये लाखात जादा (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २२१० वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य | | | | |
| ०६ सार्वजनिक आरोग्य | | | | |
| ०१० किमान गरज कार्यक्रम | | | | |
| (०१)(०७) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये योजनांकरिता अनुदान (२२१० ३०६५) | | | | |
| मूळ | ८६४५.०० | ४५००.०० | ४२६८.०९ | (-) २३१.९१ |
| पुरवणी | ०.०१ | | | |
| पुर्नविनियोजित | (-) ४१४५.०१ | | | |

बांधकामावर कमी खर्च झाल्यामुळे (रु.१५०० लाख) आणि कोणतेही विनिर्दिष्ट कारणे देण्यात आली नाहीत. (रु.२६४५.०१ लाख) त्यामुळे मार्च २००७ मध्ये रु.४१४५.०१ लाखांचा निधी काढण्यात आला.

रु.२३१.९१ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, अनुशेषांतर्गत मंजूर होणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या स्थापनेकरीता सदर लेखा शीर्षातंर्गत अनुदान मंजूर होते.

महालेखापाल यांचे पत्र क्र. लेखा परीक्षा/अेअेडडब्ल्यू/अशासकीय संदर्भ/आर-१-३/२२१०-४२१०/२००६-०७/साआवि/२१३, दि.१०.९.०८ अन्वये सादर करण्यात येते की, संचालनालयाने संबंधित जिल्ह्यांच्या मागणीनुसार अनुशेषांतर्गत स्थापन झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांच्या बांधकामासाठी अनुदान वितरीत केले होते. तथापि सदर प्रा.आ.केंद्र व उपकेंद्र यांच्या बांधकामासाठी आवश्यक असणारी पुरेशी जागा उपलब्ध न

झाल्याने काही ठिकाणी सदर प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा उपकेंद्राचे बांधकाम करता आले नाही. तसेच ज्या ठिकाणी बांधकाम सुरु होते. तेथील काही ठिकाणी बांधकाम पूर्ण न झाल्याने संबंधितांना देयके अदा करता येऊ शकली नाही. त्यामुळे ते अखर्चित राहिले आहे. त्यामुळे बचत दिसून येते. या

उपशीर्षातंर्गत विनियोजन लेख्यांत दर्शविलेली बचत रु.२३१.९१ लाख असून झालेली बचत क्षमापित करण्यात यावी.

स्पष्टीकरण महालेखाकार यांनी त्यांचे पत्र क्र.लेखापरीक्षा/अेअेडब्ल्यू/अशासकीय संदर्भ/आर-१/२२१०/२००६-०७/साआवि/यूओआर-१३९/ओडब्ल्यू-२३१, दि.१५.१२.०९ अन्वये तपासून दिले आहे.

**रुपये लाखात**

| **शीर्ष** | | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | जादा (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २२१० वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य | | | | |
| ०६ सार्वजनिक आरोग्य | | | | |
| १०१ रोग प्रतिबंध व नियंत्रण | | | | |
| (०१)(३३) मलेरिया निर्मुलन राष्ट्रीय कार्यक्रम (२२१० ०९०५) | | १६६८.३० | ७८८.४५ | (-) ८७९.८५ |
| मूळ | २३६२.३६ | | | |
| पुर्नविनियोजित | (-) ६९४.०६ | | | |

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, सदरहू योजना हिवताप रुग्ण कमी करणे, हिवतापाने होणारे मृत्यू टाळणे, औद्योगिक व शेतकी कार्यावर हिवतापाचा परिणाम होऊ न देणे ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राबविली जाते. ही राज्य योजनांतर्गत योजना आहे. सदर योजने अंतर्गत सन २००६-०७ या वर्षात अंतिम सुधारीत अनुदान रु.१६६८.३० लाख व प्रत्यक्ष खर्च रु.७८८.४५ लाख इतका झाला आहे. बचत रु.८७९.८५ लाख असून कारणे खालील प्रमाणे :-

१) दि.३१.३.०७ रोजी कोषागारांत संक्षिप्त देयके न स्विकारल्याने रु.३८६.१९ लाख एवढा निधी अखर्चित आहे.

२) राज्य खरेदी समिती सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार कायमस्वरुपी किटकनाशकभारीत मच्छरदाण्या, पॉलिस्टर सिंगल मच्छरदाण्या, धूरफवारणी यंत्र, स्टीरप स्प्रे पंपस् व मॅलेथॉन धुरळणी पावडर याबाबींची जाहिर निविदा प्रक्रिया रद्द झाल्याने सदरहू बाबींसाठी प्रस्तावित निधी रु.४९३.६६ लाख हा खर्च होऊ शकला नाही. त्यामुळे (रु.३८६.१९ + रु.४९३.६६) एकूण रु. ८८९.८५ लाख बचत झाली आहे. तरी झालेली बचत क्षमापित करण्यात यावी, ही विनंती.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र.लेखापरीक्षा/ अेअेडब्ल्यू/अशासकीयसंदर्भ/आर-१/२२१०/२००६-०७/साआवि/ /यूओआर-१३९/ओडब्ल्यू-२१३,दि.१५.१२.०९ अन्वये तपासून दिले आहे.

**रुपये लाखात**

| शीर्ष | | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | जादा (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| २२१० वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य<br>०६ सार्वजनिक आरोग्य<br>१०१ संचालन व प्रशासन<br>(०१)(०८) प्राथमिक आरोग्य केंद्राचा ग्रामीण रुग्णालयाइतका दर्जा वाढविणे (२२१० ०४१३) | | | | |
| मूळ | १०८७२.७ | ११२९७.६६ | १२८७४.२५ | (+) १६७६.५९ |
| पुरवणी | (+) ३२५.३९ | | | |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, या योजनेमधून ८ परिमंडळांतर्गत ग्रामीण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, सामग्री पुरवठा, आहार खर्च, कार्यालयीन खर्च, इंधन इत्यादी बाबींवर खर्च केला जातो.

या योजनेअंतर्गत अंतिम सुधारीत अनुदान रु.११७९७.६६ लाख इतके अंतिम सुधारीत अनुदान मंजूर झाले असून प्रत्यक्ष खर्च रु.१२८७४.२५ लाख इतका झालेला आहे. जादा झालेला खर्च हा प्रामुख्याने वेतन या बाबीवर झाला असून बाबनिहाय अनुदान व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | बाब | अंसुअ | प्रत्यक्ष खर्च | कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| १) | वेतन | ८९३७.५६ | १०९७३.४७ | (+) १६७४.५४ |
| २) | कार्यालयीन खर्च | - | ३.६० | (+) ३.६० |
| ३) | प्रवास खर्च | १८८.३९ | २१६.६६ | (+)२८.२७ |
| ४) | कार्यालयीन खर्च | २८७.७४ | ३३२.८१ | (+)४५.०७ |
| ५) | पेट्रोल, तेल, वंगण | ४८.२७ | ५२.९५ | (+)४.६८ |
| ६) | भाडेपट्टी व कर | ४९.६६ | ३९.८८ | (-)९.७८ |
| ७) | इतर प्रशासकीय खर्च | - | ०.६ | (+)०.६ |
| ८) | परिरक्षण कामे | २०.०० | ४८.३९ | (+)२८.३९ |
| ९) | मोटार वाहने | ३८.५५ | ३८.७३ | (+)०.१८ |
| १०) | यंत्रसामग्री व सा.सा. | ०.४३ | ०.३५ | (-)०.०८ |
| ११) | सामग्री पुरवठा | १२३१.२९ | ११३१.८५ | (-)९९.४४ |
| १२) | सहाय्यक अनुदाने | - | ०.१९ | (+)०.१९ |
| १३) | जाहिरात प्रसिध्दी | - | ०.४१ | (+)०.४१ |
| १४) | आहार खर्च | ३४.१० | ३४.२८ | (+)०.१८ |
| १५) | संगणक खर्च | ०.३० | ०.६२ | (+)०.३२ |
| | एकूण | १११९७.६६ | १२८७४.२५ | (+)१६७६.५९ |

सन २००६-०७ पासून नवीन पदे भरण्यात आली असून वेळोवेळी वाढणाऱ्या महागाई भत्यामुळेही वेतनावरील खर्च अपेक्षेपक्षा रु.१६७४.५४ लाख पर्यंत जास्त झाला असून इतर बाबींचा (कार्यालयीन खर्च व्यतिरिक्त) वाढीव खर्च अल्प आहे. योजनेतील इतर बाबींवरील खर्च मर्यादेत असून केवळ वेतनावरील खर्च जास्त झालेला असल्यान तो नियमानुकूल करण्यांत यावा, ही विनंती.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र.लेखापरीक्षा/ अेअेडब्ल्यू/ अशासकीयसंदर्भ/आर-१/२२१०/२००६-०७/साआवि/यूओआर-१३९/ओडब्ल्यू-२१३,दि.१५.१२.०९ अन्वये तपासून दिले आहे.

**रुपये लाखात**

| शीर्ष | | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | जादा (+) बचत (-) |
|---|---|---|---|---|
| **२२१० वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य** | | | | |
| ०६ सार्वजनिक आरोग्य | | | | |
| ००१ संचालन व प्रशासन | | | | |
| (०१)(०६) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (२२१० ०३९८) | | | | |
| मूळ | २७६५२.२२ | | | |
| पुरवणी | ५३७.३७ | २९२१५.१५ | २९६८४.७६ | (-) ४६९.६१ |
| पुर्नविनियोजित | (-)१०२५.५६ | | | |

कोणतीही विनिर्दिष्ट कारणे न देता मार्च २००७ मध्ये वरील शीर्षाखाली पुनर्विनियोजनाद्वारे रु.१४९०.२४ लाख इतक्या निधीची तरतूद करण्यात आली.

वरील शीर्षाखालील अंतिम अधिक खर्चाची/बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, या योजनेअंतर्गत जिल्हा स्तरावरील, प्राथमिक आरोग्य केंद्र, पथके लॉच द्वारे आरोग्य सुविधा देणे, भूतपूर्व आरोग्य शाळा, शालेय आरोग्य चिकित्सालय इत्यादी योजनेतून आरोग्य सुविधा पुरविली जाते. सदरचे अनुदान जिल्हा आरोग्य अधिकारी यांना उपसंचालक आरोग्य सेवा यांचेमार्फत वितरीत केले जाते.

या उपशीर्षाखाली अंतिम सुधारीत अनुदान रु.२९२१५.१५ लक्ष असून प्रत्यक्ष खर्च रु.२९६८४.७६ लक्ष इतका आहे. जादा झालेला खर्च रु.४६९.६१ लक्ष हा कोल्हापूर व अकोला मंडळांतर्गत वेतन या बाबीवर झालेला आहे. हा जादा झालेला खर्च १.६०% असून तो नियमानुकूल व्हावा, ही विनंती.

स्पष्टीकरण महालेखापाल यांचे पत्र क्र.लेखापरीक्षा/ ऐअेडब्ल्यू/अशासकीयसंदर्भ/आर-१-३/२२१०-४२१०/२००६-०७/ साआवि/२१३,दि.१०.९.०८ अन्वये तपासून देण्यांत आले आहे.

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष झालेला खर्च** | **खर्च जास्त (+) कमी (-)** |
|---|---|---|---|---|
| **२२११-कुटुंब कल्याण,**<br>००१-संचालन व प्रशासन,<br>१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना<br>(०१)(०९) पुर्नउत्पादित आरोग्य व बाल आरोग्य कार्यक्रम | | | | |
| मूळ - | ३४५०.०० | ३४५०.०० | २९९९.९५ | (-) ४५०.०५ |
| पूरक - | ०.०१ | ० | ० | ० |
| पुनर्विनियोजन- | (-) ०.०१ | ० | ० | ० |
| समर्पित | ० | ० | ० | ० |
| अंतिम अनुदान | ३४५०.०० | ३४५०.०० | २९९९.९५ | (-) ४५०.०५ |

अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आली नाहीत (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, प्रधानशिर्ष २२११-कुटूंब कल्याण, गौणशिर्ष-००१, संचालन व प्रशासन, उपशिर्ष-००१ (०१) (०९) पुर्नउत्पादित आरोग्य व बालआरोग्य कार्यक्रम या उपशिर्षाखाली वेतन, प्रवास, कार्यालयीन खर्च जिल्हापरिषदांना अनुदानाचे वाटप केले जाते. वरिल बाबींकरिता रु.४५०.०० लाख अनुदानाचे वाटप केले असता, सदर बाबीवरिल खर्च रु.३६५.३० लाख इतका झालेला आहे. तथापि, जिल्हास्तरावरील पदे रिक्त असल्याने कमी खर्च दिसून येत आहे. तसेच या उपशिर्षाखाली साधन सामुग्री

खाली रु.३०००.०० लाख इतके अनुदान श्वेत पुस्तिकेमध्ये दर्शविण्यात आले आहे. सदरची योजना बाह्यसहाय्यित असल्याने केंद्र शासनाकडून साधनसामुग्रीचे शासन निर्णय प्राप्त झाल्याने रु.२६३४.६५ लाख इतका खर्च पुस्तकी समायोजनाने महालेखाकार कार्यालय यांना कळविण्यात आला असून, सदरचा खर्च महालेखाकार मुंबई यांनी घेतलेला दिसून येत आहे. No.SFWB/Book-adj/२००६&२००७/३४८३९-४१/d-४/२००७ dated १५/६/२००७. या उपशिर्षाखालील इतर बाबीकरिता खालील प्रमाणे अनुदान दर्शविण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| वेतन, प्रवास, कार्यालयीन खर्च - | रु. ४५०.०० लक्ष |
| श्वेतपुस्तिकेमध्ये मंजूर अनुदान (पुस्तकी समायोजन) | रु.३०००.०० लक्ष |
| श्वेतपुस्तिकेत एकूण मंजुर अनुदान | रु. ३४५०.०० लक्ष |

केंद्र शासनाकडून साधन सामुग्री कमी प्रमाणात झाल्यामुळे बचत दिसून येत आहे. तरी सदरची बचत क्षमापित करण्यात यावी.

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष झालेला खर्च** | **खर्च जास्त (+) कमी (-)** |
|---|---|---|---|---|
| **२२११-कुटुंब कल्याण, १०३-माता व बाल आरोग्य,**<br>१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना<br>(०१)(०१) अर्भकांना व पूर्व शालेय मुलांना घटसर्प, डांग्या खोकला व धर्नुवात यापासून आणि गर्भवती स्त्रियांना धनुर्वातरोगापासून प्रतिक्षम करणे | | | | |
| मूळ - | १०००.०० | १०००.०० | २२०.९० | (-) ७७९.१० |
| पूरक - | ० | ० | ० | ० |
| पुनर्विनियोजन- | ० | ० | ० | ० |
| समर्पित | ० | ० | ० | ० |
| अंतिम अनुदान | १०००.०० | १०००.०० | २२०.९० | (-) ४५०.०५ |

अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आली नाहीत (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, या उपशिर्षाअंतर्गत केंद्रशासनाकडून कमी प्रमाणात लसीचा पुरवठा झाल्यामुळे रु.७७९.१० लक्ष बचत दिसून असून, कृपया ती क्षमापित करावी. या कार्यालयाचे इंग्रजी पत्र क्र.SFWB/Book-adj/२००६-०७/D-४/२००७/३४८३९-४१/Pune १, दि.१५/६/२००७ अन्वये रु.२२०.९० लक्ष रक्कमेचा पुस्तकी समायोजनाचा प्रस्ताव मा.महालेखापाल कार्यालय मुंबई यांना सादर करण्यात आलेला आहे.

श्वेतपुस्तिकेनुसार अंतिम अनुदान रु.१०००.०० लाख असून त्या अनुषंगाने झालेला प्रत्यक्ष खर्च रु.२२०.९० लाख आहे.

| शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष झालेला खर्च | खर्च जास्त (+) कमी (-) |
|---|---|---|---|---|
| **२२११-कुटुंब कल्याण,**<br>गौणशिर्ष-१०३-माता व बाल आरोग्य (०१)(०४) व (०१)(०९) प्रतिक्षमतेचा विस्तारीत कार्यक्रम | | | | |
| मूळ - | २६११.८७ | २५५४.६३ | २३८९.३४ | (-) १६५.२९ |
| पूरक - | ० | ० | ० | ० |
| पुनर्विनियोजन- | ० | ० | ० | ० |
| समर्पित | (-) ५७.२४ | ० | ० | ० |
| अंतिम अनुदान | २५५४.६३ | २५५४.६३ | २३८९.३४ | (-) १६५.२९ |

रु.५७.२४ लाख मार्च २००७ ला समर्पित केले. रु.५.८३ लाख जाहिरात खर्च कमी केला आहे. विशेष कारण नमुद केले नाही (५१.४१ लाख) अंतिम बचत रु.१६५.२९ लाखाचे कारण दर्शविलेले नाही. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, प्रधानशिर्ष-२२११-कुटुंब कल्याण, गौणशिर्ष-१०३-माता व बाल आरोग्य उपशिर्ष - (०१)(०४) प्रतिक्षमतेचा विस्तारीत कार्यक्रम या लेखाशिर्षाखाली जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी अनुदान मागणी केल्याप्रमाणे खर्च केलेला नाही. तसेच या उपशिर्षाखाली उपसंचालक आरोग्य सेवा, माहिती, शिक्षण व संपर्क विभाग, पुणे ६ यांना प्रसिध्दीकरीता दिलेल्या अनुदानातून वृत्तपत्र व जाहिरातीवरील खर्च कमी झाल्याने अंतिम अनुदानावर ६.४७% इतक्या प्रमाणांत बचत दिसून येत आहे. कृपया सदरची बचत क्षमापित करण्यात यावी.

| शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष झालेला खर्च | खर्च जास्त (+) कमी (-) |
|---|---|---|---|---|
| **२२११-कुटुंब कल्याण,** २०० इतर सेवा व पुरवठा, १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना (०१)(०३) पारंपारिक संतती प्रतिबंधक साधने | | | | |
| मूळ - | १०००.०० | १०००.०० | ७५०.८१ | (-) २४९.१९ |
| पूरक - | ० | ० | ० | ० |
| पुनर्विनियोजन- | ० | ० | ० | ० |
| समर्पित | ० | ० | ० | ० |
| अंतिम अनुदान | १०००.०० | १०००.०० | ७५०.८१ | (-) २४९.१९ |

अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आली नाहीत (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, प्रधानशिर्ष-२२११-कुटुंब कल्याण, गौणशिर्ष-२०० इतर सेवा व पुरवठा, १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना उपशिर्ष - (०१)(०३) पारंपारिक संतती प्रतिबंधक साधने उपशिर्षातर्गत केंद्र शासनाने पारंपारिक संतती प्रतिबंधक साधने इत्यादीचा कमी पूरवठा केल्यामुळे रु.२४९.१९ लक्ष बचत दिसून येत आहे, कृपया ती क्षमापित करावी.

सदरचा खर्च पुस्तकी समायोजनांतर्गत दिसून या कार्यालयाचे इंग्रजी पत्र क्र.SFWB/Book-adj/२००६-०७/D-४/२००७/३४८३९-४१/Pune १,दि.१५/६/२००७ अन्वये रु.७५०.८१ लक्ष पुस्तकी समायोजनाचा प्रस्ताव मा.महालेखापाल कार्यालय मुंबई यांना सादर करण्यात आलेला आहे.

श्वेतपुस्तिकेनुसार अंतिम अनुदान रु.१०००.०० लाख असून त्या अनुषंगाने झालेला प्रत्यक्ष खर्च रु.७५०.८१ लाख आहे.

**साक्ष**

लोकलेखा समितीने दिनांक २७ एप्रिल २०१२ रोजीच्या बैठकीत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-०७ या वर्षाच्या विनियोजन लेख्याच्या आर-१ या परिच्छेदा संदर्भात महालेखापालांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

महालेखापालांनी उपस्थित केलेल्या मुदयांच्या बाबत त्यांच्या कार्यालयासमवेत सार्वजनिक आरोग्य विभागाने केलेल्या चर्चेच्या सदर्भात समितीने विचारणी केली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सन २००७-२००८ मध्ये महालेखाकार कार्यालयाने ८१ परिच्छेद काढले होते ते विभागाने पूर्ण निकाली काढले असून त्याबाबतची माहिती कार्यालयाला पाठविली आहे. सन २००८-२००९ मध्ये १२ परिच्छेद होते त्यापैकी ९ परिच्छेद निकाली काढण्यात आले असून ३ परिच्छेद सादर करण्यात आले आहेत. सन २००९-२०१० मध्ये १०३ परिच्छेदांपैकी ३० निकाली काढले आहेत. ४० परिच्छेद महालेखापाल कार्यालयाकडे पाठविलेले असून ३३ परिच्छेद प्रलंबित आहेत व त्यावर कार्यवाही सुरु आहे. सन २००७-२००८ मधील पूर्ण परिच्छेद काढले असून उर्वरित देखील पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

समितीने यासंदर्भात समाधान व्यक्त केले. समितीला अधिक माहिती देताना विभागीय प्रतिनीधींनी असे सांगितले की, सार्वजनीक आरोग्याच्या दृष्टीने ग्रामीण भागात रूग्णालये, आरोग्य केंद्रे याबाबत दोन वर्षात बांधकामाच्या बाबतीत खूप प्रगती झालेली आहे. विभागासाठी तरतूद वाढविण्याच्या दृष्टीने, खर्च करणे तसेच केंद्र शासनाच्या ओ.टी.ए.सी.ए. च्या माध्यमातून सन २००९-२०१० मध्ये निधी मिळविण्याचा प्रयत्न केला. केंद्र शासनाकडून सन २०१०-२०११ मध्ये ७९ कोटी रुपये, सन २०११-२०१२ मध्ये ९० कोटी रुपये मिळाले आहेत. सन २०११-२०१२ मध्ये नाबार्ड मार्फत कर्ज घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

ग्रामीण भागात वैद्यकीय अधिकाऱ्यांची राहण्याची आवश्यक ती सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तरी देखिल समितीने अनेक ठिकाणी भेटी दिल्या असता वैद्यकीय अधिकारी ग्रामीण भागात राहातच नसल्याचे, समितीच्या निदर्शनास आले यावर विभागीय सचिव यांनी असे सांगितले की, मागील वर्षी सन २०११-२०१२ मध्ये नाबार्ड कडे कर्जासाठी विनंती केली होती तेव्हा ९४ कोटी रुपये मिळाले होते. सदरहू रक्कम प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयांचे बांधकाम करण्याच्या दृष्टीने तसेच कर्मचा-यांच्या निवासस्थानासाठी एनआरएचएम मधून ५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी मिळालेला आहे. एनआरएचएम अंतर्गत पूर्वी हा खर्च ७६ टक्के होत होता तो आता ९७ टक्क्यावर आलेला आहे. महाराष्ट्र शासनाने १०० कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविला होता त्यात ५४ कोटी रुपये अतिरिक्त रक्कम मिळाली आहे. नर्सिंग तसेच एएनएम च्या बांधकामावर खर्च करण्याचे प्रयत्न चालू

आहेत. इमारतींचे बांधकाम करण्यात ज्या अडचणी येत होत्या, त्यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाशी समन्वय करण्यात मुख्य अभियंता यांना अपयश येत होते परंतु आता कार्यकारी अभियंता व अधिक्षक अभियंता यांचेशी समन्वय करुन यश आलेले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडे इमारतींचे बांधकाम आहे, परंतु त्यावर सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत नियंत्रण ठेवण्यात येते का? अशी विचारणा समितीने केली असता त्यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत इमारती बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला जातो. शासनाचे मागील वर्षी बचत करावयाचे धोरण होते त्यामुळे अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांशी चर्चा करुन वेबसाईटवर बांधकामाबाबतची माहिती सादर करण्यात येणार आहे.

रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामासंदर्भात शासन निर्णयानुसार प्रशासकीय मंजुरी मिळण्यास विलंब होतो. इमारतीसाठी जागा मिळणे, त्याचे अंदाज, अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद करणे, त्याचा खर्च टप्प्या टप्प्याने होणे, अशा विविध कारणांमुळे इमारतींची बांधकामे पूर्ण झालेली नाहीत. इमारतीचे बांधकाम झाले असेल तर तेथे अधिकाऱ्यांची नियुक्ती होत नाही. विविध वर्गवारीतील कर्मचाऱ्यांची नोकरभरती वेळेवर होत नाही. अशा प्रकारे सर्व माहिती वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्याचा विभागाचा मानस आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने ७५ टक्के रक्कम खर्च केलेली असते परंतु निधीअभावी सदरचे बांधकाम पूर्ण होत नाही त्यामुळे संबंधित विभागाने केलेला खर्च वाया जातो. या सर्व बाबींची सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात येत असून यासाठी नव्याने तरतूद वाढवून घेतलेली आहे. सध्या ४५० कोटी रुपयांची कामे सुरु आहेत. एनआरएचएम, केंद्र शासनाची योजना तसेच नाबार्डच्या माध्यमातून सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत नियोजन करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे, याकडेही लक्ष देण्यात येईल. राज्य स्तरावर कामे सुरु केलेली असून ती या वर्षात रेंगाळत पडली आहेत. नाशिक येथे सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटलला सन १९९६ मध्ये प्रशासकीय मंजुरी मिळाली. परंतु सदरहू काम सन २००८ मध्ये पूर्ण झाले. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने योग्य तरतूद केली नाही, अशा रीतीने विविध प्रकारे सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात येत आहेत. हा सार्वजनिक आरोग्य विभागाचा नियमित कार्यक्रम नाही. अमरावती येथेही सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटल झालेले आहे, परंतु तेथे यंत्रसामुग्री उपलब्ध नाही.

अमरावती येथील सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटलच्या संदर्भात समितीने पृच्छा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अमरावती येथील सुपरस्पेशालिटी हॉस्पीटलसाठी मागील वर्षी २८ कोटी रुपयांची तरतूद केली होती ते ४०० बेडचे आहे. एखाद्या ठिकाणी सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटलला

प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर त्यासाठी निधीची तरतूद करणे, त्यानंतर निविदांची प्रक्रिया सुरु करणे यात बराच वेळ जातो. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर तेथे यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देणे, नियुक्ती करणे, अशा विविध प्रकारच्या अडचणी येतात म्हणून सदरहू हॉस्पिटल लवकर पूर्ण होत नाहीत. यासाठी आमच्या विभागामार्फत बांधकाम समन्वयासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. बांधकामाचा दर्जा तपासण्याची कोणतीही यंत्रणा आरोग्य विभागाकडे नाही. अशा हॉस्पिटलमध्ये कमीत कमी वेळात स्टाफ भरण्याबाबत विभागाला अद्यापही १०० टक्के यश आलेले नाही. यावर देखील नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

सन २००६ मध्ये मंजूर केलेल्या योजना का पूर्ण झाल्या नाहीत? प्राथमिक आरोग्य केंद्र, कुटीर रुग्णालय, सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटल इत्यादींचा बाकी अनुशेष यासंदर्भात विभागाने अशी माहिती दिली की, ग्रामीण रुग्णालयासाठी १४३ ठिकाणच्या जागा निश्चित केलेल्या आहेत. ८५ प्राथमिक आरोग्य केंद्रे त्यासाठी निर्धारित करण्यात आली आहेत. सन २००६-२००७ मध्ये १८१८ प्राथमिक आरोग्य केंद्रे मंजूर होती त्यापैकी १४८१ पूर्ण झाली आहेत. ९४१ प्रगतीपथावर असून २४३ रूग्णालयाचे बांधकाम अद्यापपर्यंत सुरु झालेले नाही. सन २०११-२०१२ मध्ये १४८१ रूग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाले. आजपर्यंत १५८३ पूर्ण झाले आहेत.

बांधकाम करणे ही बाब सार्वजनिक बांधकाम विभागाशी निगडित असल्याचे सार्वजनीक आरोग्य विभागाने सांगितले. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे विचारणा केली असता ही बाब त्यांच्या विभागाशी संबंधित नसल्याचे त्यांनी सांगितले म्हणून एखाद्या इमारतींचे बांधकाम करायचे असेल तर त्यासाठी दहा दहा वर्षाचा कालावधी लागतो. कामास विलंब झाला तर त्यासाठी दंड लावला जात नाही. बांधकाम विभागाच्या अशा तांत्रिक बाबी असल्यामुळे अशा कामांना विलंब होतो म्हणून दोन्ही विभागांचे समन्वय होणे महत्वाचे आहे असे मत समितीने व्यक्त केले असता यावर विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधकामे केली जातात. इमारतींचे बांधकाम झाल्यानंतर अशा इमारतींमधील गळतीचे प्रमाण देखील जास्त आहे. विक्रमगड येथे नवीन तसेच मोखाडा येथे कुटीर हॉस्पिटल बांधलेले आहे, परंतु या हॉस्पिटलमध्ये पावसाळ्यात दोन दोन फुट पाणी साचलेले असते, तेथे मोठया प्रमाणावर लिकेजेस होत असतात. बांधकामाची गुणवत्ता बरोबर नसल्यामुळे इमारतींची अशी अवस्था होते. तसेच ३३ टक्के बांधकाम सोसायट्यांना, ३३ टक्के कामे अभियंत्यांना, आणि ३३ टक्के कामे इतरांना अशी विभागणी केली जाते त्यामुळे कामाची गुणवत्ता रहात नाही. समितीच्या या वक्तव्यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, लहान लहान कामे ही

जिल्हा परिषदांमार्फत केली जातात. काही जिल्हा परिषदांमार्फत चांगली कामे केली जातात तर काही जिल्हा परिषदांमार्फत चांगली कामे केली जात नाहीत. जिल्हा परिषदेच्या यंत्रणेवर सार्वजनिक आरोग्य विभागाचे नियंत्रण नसते. जिल्हा परिषदेमध्ये अधिकाऱ्यांची नियुक्ती प्रतिनियुक्तीने केली जात असली तरी देखील त्यांच्यावर गुणवत्तेच्या बाबतीत नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. विक्रमगड तसेच मोखाडा येथील विभागामध्ये हॉस्पिटलचे जे बांधकाम झालेले आहे, त्या बांधकामाच्या गुणवत्तेचा दर्जा तपासणे आवश्यक आहे.

नवीन हॉस्पिटलमधील ऑपरेशन थिएटर सात सात वर्षे बंद राहणे हे संयुक्तिक आहे का? आरोग्य विभागातील दवाखान्याच्या इमारती बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खूप मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात आलेला आहे. अनेक रुग्णालयात आवश्यक ते साहित्य उपलब्ध करुन देण्यात येत नाही. डॉक्टर नाहीत, भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यात ग्रामीण रुग्णालय आहे. सदर ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम गेल्या सात वर्षापासून सुरु करण्यात आले असून सदर काम अजूनही पूर्ण झालेले नाही. सर्व ग्रामीण भागात जवळपास अशीच परिस्थिती आहे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हानिहाय माहिती मागवून प्रत्येक जिल्हयात जिल्हापरिषदेमार्फत आरोग्य विभागाच्या किती इमारती बांधण्यात आल्या आहेत? या इमारतींची कामे कोणत्या स्तरावर आहेत? त्यासाठी किती निधी देण्यात आला आहे? त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आलेला आहे? आता किती कामे प्रगती पथावर आहेत? अशा प्रकारे एकत्रित माहिती उपलब्ध झाल्यास समितीला पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल असे मत समितीने व्यक्त केले.

जिल्हापरिषदेतर्फे रुग्णालयांची बांधकामे करण्यात आली आहेत, तेथील कंत्राटदार दर्जेदार कामे करीत नाहीत. जनतेच्या पैशाची लूट जिल्हापरिषदेकडून करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागात असेच प्रकार सुरु असल्यामुळे मोठी कठीण परिस्थिती निर्माण झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. रुग्णालयाच्या इमारतींची कामे दर्जेदार होत नसल्यामुळे पावसाळ्यात त्या इमारती मोठ्या प्रमाणात गळतात. तसेच रुग्णालयांच्या इमारती बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला आरोग्य विभागाकडून निधी देण्यात येतो. त्यामुळे इमारतींबाबत आरोग्य विभाग कोणतीही काळजी घेत नाही. इमारतींचा प्रश्न उपस्थित झाला की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे बोट दाखविले जाते. आरोग्य विभागाची यात काही जबाबदारी नाही काय ? आरोग्य विभाग कामे करण्यामध्ये सातत्याने मागे पडत असल्यामुळे कामे करण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. समन्वयकाची नियुक्ती केव्हापासून करण्यात आलेली आहे. समन्वयकाची नियुक्ती केल्यामुळे कामामध्ये फरक पडला आहे काय ? याबाबत विभागीय सचिवांनी माहिती दिली की, समन्वयक म्हणून मुख्य अभियंता काम करतात. आरोग्य

विभागाची कामे वेळेत व्हावीत, असा त्या मागील उद्देश आहे.गेल्या दोन वर्षापासून समन्वयक काम करीत आहे. तसेच जी कामे अपूर्ण होती ती पूर्ण करण्यामध्ये समन्वयकाची मदत झालेली आहे. इतर कामे प्रगती पथावर आहेत. पूर्वी एखादे काम चार पाच वर्षापासून अपूर्ण असेल तर ते तसेच राहत होते, निधी मिळाला की, नवीन कामे घेण्यात येत होती. त्यामुळे अपूर्ण कामे पूर्ण करण्यास अडचणी निर्माण होत असत. आता समन्वयकामुळे या कामांमध्ये सुसूत्रता आलेली असून ही सर्व कामे वेबसाईटवर टाकण्यात आल्यामुळे ती कोणालाही पाहता येणार आहेत.

आरोग्य खात्यातील कार्यालये व रुग्णालयाच्या इमारतींची काय परिस्थिती आहे?. सार्वजनिक बांधकाम विभागाने करोडो रुपये खर्च करुन आरोग्य भवन बांधले तरी सुध्दा ती इमारत मोठ्या प्रमाणात गळते. मुंबईत जर असा प्रकार होत असेल तर ग्रामीण भागात काय परिस्थिती असेल. आरोग्य विभागातील अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार ती जबाबदारी त्यांच्या विभागाची नाही, आरोग्य भवन इमारतीच्या संदर्भात विधानपरिषदेमध्ये प्रश्न विचारला असता आरोग्य भवन इमारतीच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाची जबाबदारी नाही, असे उत्तर मिळाले. या इमारतीचे कंत्राट आरोग्य विभागाने दिले होते अशी माहिती समितीने दिली असता जागतिक बँकेच्या निधीतून आरोग्य भवन बांधण्यात आले आहे. हे बांधकाम करतांना सार्वजनिक बांधकाम विभागाचा सल्ला घेण्यात आला होता. कोणती कामे आरोग्य विभाग करतो व कोणती कामे सार्वजनिक बांधकाम विभाग करतो हे कळत नाही. या दोन विभागात समन्वय नसतो. काही ठिकाणी इमारती तयार असतात तर तेथे कर्मचारी नसतात, कर्मचारी असतात तर आवश्यक ते साहित्य उपलब्ध होत नाही. अशी परिस्थिती आरोग्य विभागाची झालेली आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता पूर्वी असे प्रकार होत होते, तथापि आता हे प्रमाण कमी झाल्याचे विभागीय सचिवांनी सांगीतले.

एखादी मशीन खरेदी करुन ती स्थापित करावयाची असेल तर तेथे वातानुकूलित यंत्रणा नसते, विजेची जोडणी करण्यात आलेली नसते. त्यामुळे मशीन खरेदी केल्यावर ती तशीच धुळ खात पडून राहते, त्यामुळे त्या मशीनचा गॅरंटी कालावधी संपून जातो. तरी सुध्दा सदर मशीन स्थापित केली जात नाही. अनेक रुग्णालयात अशी परिस्थिती पहावयास मिळते की, मशीन असेल तर टेक्निशियन नसतो. त्यामुळे त्या मशीनचा वापर केला जात नाही असे मत व्यक्त करून समितीने विचारणा केली की, औंध येथे एक्स रे मशीन बसविण्यात आली आहे काय ? तेथे एक्स रे मशीन नसल्याबाबत सभागृहात मुद्दा उपस्थित करावा लागला होता. निधी उपलब्ध असताना मशीन घेण्यात आली नव्हती. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी औंध येथे एक्स रे मशीन उपलब्ध करुन देण्यात आलेली असून ती येत्या आठ दिवसात बसवून कार्यरत करण्यात येईल असे सांगितले.

आरोग्य विभागाच्या अनेक जागा रिक्त आहेत, जागा रिक्त असल्यामुळे अनेक रुग्णालयातील रूग्णांना वेळेमध्ये उपचार मिळत नाहीत. ज्या ठिकाणी एक्स रे मशीन व इतर साहित्य उपलब्ध नाही तेथे टप्प्या टप्प्याने सदर साहित्य घेण्यात यावे. असे समितीने सुचविले असता याबाबत विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, लॅब टेक्निशियनच्या ४५० जागा भरण्यात आल्या आहेत. उर्वरित जागा भरण्यासाठी डिसेंबर महिन्यात जाहिरात देण्यात आलेली आहे. अशा प्रकारे टप्प्या टप्प्याने जागा भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच एक्स रे मशीन व इतर साहित्य घेण्याची कार्यवाही सुरु असून निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. काही ठिकाणी फेर निविदा काढण्यात आल्या आहेत.

स्थानिक पातळीवर शासकीय रुग्णालयात रूग्णांना सुविधा मिळत नसल्यामुळे जनतेकडून लोकप्रतिनिधींवर बऱ्याच प्रमाणावर टीका होत असल्यामुळे विभागाने रुग्णालयात सोईसुविधा व डॉक्टर उपलब्ध करुन देण्याबाबत समितीने सुचित केले असता ही बाब खरी आहे तथापि, त्यामध्ये बरीच सुधारणा झाली असून.आरोग्य विभागाने भरती प्रक्रिया सुरु केलेली आहे. १०५८ जागांसाठी जाहिरात देण्यात आली होती असे विभागीय सचिवांनी सांगितले. रू.१४ कोटी ३८ लाखांची बचत दर्शविण्यात आलेली आहे. याबाबत असे नमूद केले आहे की, रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम नव्याने सुरु असल्याने अपेक्षित कामे गतीने झाली नाहीत. पदे भरण्यात आली नाहीत. बांधकाम न झाल्यामुळे यंत्र व इतर साधन सामग्री खरेदी करता आली नाही. तरी ही सर्व कामे पूर्ण करण्यात आली आहेत काय ? रुग्णालयाची इमारत बांधण्यासाठी जवळपास १२ वर्षे लागली आहेत. याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगीतले की, नाशिक येथे संदर्भ सेवा रुग्णालयाचे बांधकाम १९९६ मध्ये सुरु करण्यात आले होते व ते सन २००७-२००८ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. महसूल विभाग व शिक्षण विभागाच्या संदर्भात सेवा केंद्रे सुरु करण्यासंदर्भात माहिती देतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, नाशिक येथे निवासी व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी १४ कोटी रुपये खर्चाचे आदेश देण्यात आले होते. यातील काही यंत्र सामुग्री आयात करावयाची होती. ती मागणी सन २००८ मध्ये पूर्ण करण्यात आलेली आहे. सदर रुग्णालय सन २००८-२००९ मध्ये सुरु झाले असून सन २००८-२००९ मध्ये बाहय रूग्ण ७९२२ इतकी होती. त्यामध्ये हृदय विकाराचे ३३५१ रुग्ण आढळून आले होते. १२०० रुग्णांची अँजिओग्राफी करण्यात आली असून २८२ रुग्णांवर अँजिओप्लॅस्टी करण्यात आलेली आहे. तसेच ८१० रुग्णांचे डायलेसिस करण्यात आले आहे. सन २००९-२०१० मध्ये २१०० रुग्णांचे डायलेसिस करण्यात आले असून सन २०१०-२०११ मध्ये २७०० रुग्णांचे डायलेसिस करण्यात आले आहे.

डायलेसिस रुग्णांची संख्या जास्त असल्यामुळे डायलेसिस सेंटर वाढविण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील एकूण डायलेसिस पेशंटची संख्या जास्त आहे. त्यामुळे नाशिक विभागात

डायलेसिस रुग्णांची संख्या जास्त असल्याची शक्यता आहे. यावर विभागाने असे सांगीतले की, नाशिक विभागात डायलेसिसचे रुग्ण जास्त असतील तर तेथे डायलेसिस सेंटर वाढविण्यात येतील. नाशिक येथे डायलेसिस सेंटर कमी होते ते वाढविण्याची गरज होती. नाशिक विभागात आता दोन युनिट सुरु करण्यात आले असून ते २४ तास सुरु असतात. त्यामुळे नाशिक विभागात डायलेसिसच्या प्रतिक्षा रुग्णांच्या संख्येत वाढ झालेली आहे. मागील वर्षात २७०० रुग्णांचे डायलेसिस करण्यात आले आहे. बायपास सर्जरी सुरु करण्यात आलेली आहे. बायपास सर्जरीचे ५० रूग्ण प्रतिक्षा यादीवर आहेत. खाजगी रुग्णालयापेक्षा शासकीय रुग्णालयात २० टक्के खर्च कमी येत असल्यामुळे प्रतिक्षा यादी वाढलेली आहे. ही सर्व प्रक्रिया सुरु करण्यास आरोग्य विभागास दहा वर्षे लागली याचे विभागालासुध्दा दु:ख आहे. नाशिक येथे ह्रदय रोगावर उपचार केले जात नव्हते. परंतु आता ह्रदय रोगावरील छोटे-मोठे सर्व उपचार येथे केले जात आहेत.

ह्रदय रोगाच्या संदर्भात चांगले काम सुरु करण्यात आले आहे. तथापि, नागपूर येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये यंत्र सामग्री नाही, स्टेण्ट नाहीत, रुग्णांसाठी कोणत्याही सोई सुविधा नाहीत, डॉक्टर नाहीत, सदर रुग्णालयात दर्जेदार सुविधा मिळण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, नागपूर येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारित आहे. अमरावती व नाशिक येथील शासकीय रुग्णालय आरोग्य विभागाच्या अखत्यारित आहे. नागपूर येथील रुग्णालयासाठी वैद्यकीय शिक्षण विभाग मदत करीत असतो.

वैद्यकीय शिक्षण विभाग व आरोग्य विभाग यांच्यामध्ये फुटबॉलचा खेळ सुरु असून कोणते हॉस्पीटल कोणाच्या अखत्यारित आहे याची योग्य माहिती मिळत नाही. आरोग्य विभागाला विचारले असते सांगतात की, हा विषय वैद्यकीय शिक्षण विभागाशी संबंधित आहे. विधानसभेत सुध्दा अनेक वेळा हा प्रश्न कोणत्या विभागाशी संबंधित आहे, याबाबत घोळ निर्माण होतो. यापूर्वी दोन तीन विभागांचे एक खाते होते व मा. मंत्री महोदय सुध्दा एकच होते. यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सन १९७० मध्ये वैद्यकीय शिक्षण, आरोग्य विभाग व नगर विकास विभाग या तिन्ही विभागांचे एकच खाते होते. त्यानंतर वैद्यकीय शिक्षण खाते स्वतंत्र करण्यात आले.१९८० मध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग वेगळा करण्यात आला. आघाडीची सरकारे सुरु झाल्यानंतर खाते वेगळे करण्याची प्रथा निर्माण झाली. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. वैद्यकीय शिक्षण, शालेय शिक्षण असे वेगवेगळे खाते निर्माण

झाल्यामुळे दोन्ही सचिवांमध्ये समन्वय राहत नाही. पाणीपुरवठा विभाग, आरोग्य विभाग अशा अनेक विभांगामध्ये समन्वय नसल्यामुळे अडचणी निर्माण होत आहेत, या विभागांमध्ये समन्वय असावयास पाहिजे. यावर विभागाने गंभीर विषयाकडे समितीचे लक्ष वेधले कुपोषणाने मृत्यू
झाला तर कोणता विभाग जबाबदार आहे. कुपोषित बालके असतील तर त्याची जबाबदारी महिला व बाल कल्याण विभागाकडे येते. कुपोषणाने मृत्यू झाला तर त्याची जबाबदारी आरोग्य विभागाकडे येते, असा या विभागांचा प्रकार आहे.

नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राना मंजुरी देण्याची आवश्यकता असताना जुन्या प्राथमिक आरोग्य केंद्राना सोई सुविधा व कर्मचारी उपलब्ध करुन देण्यासाठी काय कार्यवाही करण्यात येत आहे. यावर विभागाने अशी माहिती दिली की, एक वर्षापूर्वी १०२ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारती बांधून पूर्ण करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमही केंद्र पुरस्कृत योजना ६०:४०, ५०:५०, ७५:२५ अशा प्रकारच्या असतात, यामध्ये काही योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत असतात. राज्य शासनाकडून आवश्यक ती अनुरूप अनुदान तरतूद न केल्यामुळे योजना कार्यान्वित करण्यात अडचण निर्माण होते. या योजनांची कामे थांबू नयेत म्हणून राज्य शासनाने आपला हिस्सा अगोदर दिला पाहिजे. या संदर्भात महालेखाकार यांनी बैठक घेऊन अशा किती योजना अपूर्ण आहेत, कोणत्या योजनांसाठी राज्य शासनाने आपला हिस्सा वेळेत दिला नाही याची माहिती घेतली पाहिजे. केंद्र शासन पुरस्कृत योजनेसाठी पुढील वर्षात किती निधी लागेल, यांचे नियोजन करुन ५० टक्के निधीची तरतूद करावयास पाहिजे. मार्च महिन्याच्या अखेरीस निधीची जुळवाजुळव करुन निविदा काढल्या जातात, कामाचे आदेश दिले जातात. असे प्रकार होऊ नयेत म्हणून, केंद्र पुरस्कृत योजनांसाठी राज्य शासनाने अनुरूप तरतुद वेळेवर दिली पाहिजे. राज्य शासनाला मदत करणे हे केंद्र सरकारचे कर्तव्य आहे. आपण योजना राबविण्यामध्ये ५०:५० च्या हिश्श्यामुळे मागे राहतो. या संदर्भात विचार करणे गरजेचे असून योजनांचे पैसे ज्या त्या वर्षीच खर्च केले पाहिजेत. एखाद्या योजनेचे पैसे पुढील वर्षी घेण्याबाबत सांगितले जाते. राज्य शासनाकडून देखील बऱ्याच वेळा केंद्र शासनाकडे बोट दाखविले जाते यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमासाठी १० कोटी रुपयांची तरतूद केली होती, त्यातील ५० टक्के केंद्र शासनाने व ५० टक्के राज्य शासनाने द्यायचे होते. सन २००६-०७ मध्ये राज्य शासनाने हिश्श्याचे ५ कोटी रुपये खर्च केले आहेत. केंद्र शासनाकडून त्यांच्या हिश्श्याचे ५ कोटी रुपये मिळाले आहेत. केंद्र शासनाकडून औषधांसाठी ६ कोटी ८६ लाख रुपये मिळाले आहेत.

सदर योजनेचे मूल्यमापन कशा प्रकारे करण्यात येते याबाबत विभागीय सचिवांनी सांगीतले की, एमडीआरचा डिटेक्शन रेट वाढविण्याची गरज होती. परंतु, नंतर टीडीआर, एक्सडीआर मध्ये वाढ झ ााली. मुंबईसाठी पूर्वी या संदर्भात ६ टीबी ऑफिसर होते. टीडीआर व एक्सडीआर आल्यामुळे आपण ती संख्या २४ केली होती. विभागाने डॉट प्रोग्रॅम अंतर्गत डॉक्टरांना प्रशिक्षण दिले होते व सदर योजनेंतर्गत रुग्णांची वैद्यकीय तपासणी केली होती. जे.जे. रुग्णालयामध्ये या संदर्भात लॅब देखील स्थापन केली आहे. हा विभाग नागपूरला देखील आरएमसीबी अंतर्गत काम करीत आहे.

राज्यातील क्षयरोगाच्या रूग्णालयाबाबत माहिती देताना राज्यामध्ये बुलढाणा, पुणे-औंध, अमरावती, कोल्हापूर-जयसिंगपूर अशा ४ ठिकाणी क्षयरोगाची रुग्णालये आहेत. राज्यामध्ये डायग्नोज्ड रुग्ण एकूण १ लाख ३४ हजार आहेत सर्वच ठिकाणी सारख्या प्रमाणात क्षयरोगाचे रुग्ण आहेत. पूर्वी गोंदिया जिल्ह्यात तसेच सर्व महसूल विभागांमध्ये देखील क्षयरोगाची रुग्णालये होती. चंद्रपूर सारख्या दुर्गम भागात रुग्णालय नाही. विभागाने चंद्रपूर येथील रुग्णालय बंद केले आहे.

सर्व ठिकाणी सारख्या प्रमाणात क्षयरोगाचे रूग्ण असताना विदर्भातील ११ जिल्ह्यांसाठी नागपूरमध्येच फक्त क्षयरोगाचे रुग्णालय आहे. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, राज्यात क्षयरोगाची किती रुग्णालये असावीत, या संदर्भात केंद्र शासनाचे निदेश होते. केंद्र शासनाच्या निदेशानुसार क्षयरोगाची रुग्णालये सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मर्ज करुन तेथे क्षयरोगासाठी २० बेड देण्यात आले आहेत. तसेच काळाची गरज म्हणून काही रुग्णालये सुरू ठेवण्यात आली आहेत. या ठिकाणी आणखी बेड वाढविण्यात येतील. केंद्र शासनाच्या निदेशाप्रमाणे, क्षयरोगाच्या रुग्णांना आता आयसोलेशनमध्ये ठेवण्याची गरज नाही. संसर्गाचे प्रमाण कमी झाल्यामुळे असे ठरविण्यात आले आहे. मुंबई, नागपूरमध्ये काही रूग्ण आढळले.
झाल्या आहेत. शिवडीला ८०० बेडचे क्षयरोगाचे रुग्णालय आहे. तेथे ९० बेड वाढविणार असल्याची माहिती देखील विभागीय प्रतिनिधींनी दिली.

चंद्रपूर येथे डब्ल्यूसीएल सारख्या सिमेंटच्या फॅक्टरीज, कोळशाच्या कंपन्या मोठ्या प्रमाणात आहेत. चंद्रपूर येथे क्षयरोगाचे रुग्णालय नसल्यामुळे तेथील रुग्णांना नागपूरला जावे लागते. यावर विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, सिमेंटमुळे क्षयरोग होत नाही. सिमेंट किंवा कोळशाचे कण श्वासातून शरीरात गेल्यामुळे सिलिकॉसिस हा रोग होतो. त्या रोगामध्ये लंग्जची कपॅसिटी कमी होते. आपण त्याला क्षयरोग म्हणू शकत नाही. अशा प्रकारे किती लोकांना त्रास होत आहे, हे विभागाला शोधून काढावे लागेल. तसेच क्षयरोग झालेल्या रुग्णांना आयसोलेशनमध्ये ठेवण्याची पध्दत पूर्वी होती. आता त्यामध्ये फरक पडला आहे.

पुणे औंध येथील रुग्णालयाची परिस्थिती खूप खराब आहे. रुग्णालय चांगल्या स्थितीत ठेवण्याची गरज आहे. सदर ठिकाणी सोयीसुविधा देण्याची, बेड वाढविण्याची व स्वच्छता ठेवण्याची गरज आहे. पुणे औंध येथील रुग्णालयामध्ये लॅब देखील नाही. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केली की, सदर ठिकाणी सुसज्ज अशी लॅब आहे. सन २००३-०४ पासून सन २००८-०९ पर्यंतची क्षयरोग रुग्णालयांची माहिती समितीला देतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, चंद्रपूर येथील क्षयरोग रुग्णालयामध्ये एकूण ५० बेड होते. सन २००४-०५ मध्ये ३७५ आंतररुग्णांवर उपचार केले, ५१५३ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००५-०६ मध्ये २५८ आंतररुग्णांवर उपचार केले, २९४६ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००६-०७ मध्ये २६४ आंतररुग्णांवर उपचार केले, २३०४ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००७-०८ मध्ये २५० आंतररुग्णांवर उपचार केले, २३९० बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००८-०९ मध्ये ४७३ आंतररुग्णांवर उपचार केले, १४१० बाह्यरुग्णांवर उपचार केले.

बुलढाणा येथील रुग्णालयामध्ये, सन २००३-०४ मध्ये ३७४९ आंतररुग्णांवर उपचार केले, ११९४७ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००४-०५ मध्ये ३२२९ आंतररुग्णांवर उपचार केले, ७९९१ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००५-०६ मध्ये ३०६८ आंतररुग्णांवर उपचार केले, ७५२७ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००६-०७ मध्ये २९६७ आंतररुग्णांवर उपचार केले, ७५६० बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००७-०८ मध्ये २४६७ आंतररुग्णांवर उपचार केले, ६१३४ बाह्यरुग्णांवर उपचार केले.

यवतमाळ येथील रुग्णालयामध्ये, सन २००४-०५ मध्ये ७६७ आंतररुग्णांवर उपचार केले, ३४३१ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००५-०६ मध्ये ६२० आंतररुग्णांवर उपचार केले, २८२४ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००६-०७ मध्ये ५३५ आंतररुग्णांवर उपचार केले, २६८६ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००७-०८ मध्ये ४०६ आंतररुग्णांवर उपचार केले, २३२४ बाह्यरुग्णांवर उपचार केले.

पुणे येथील रुग्णालयामध्ये, सन २००५-०६ मध्ये ६४७९ आंतररुग्णांवर उपचार केले, ६४४११ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००६-०७ मध्ये ४१४० आंतररुग्णांवर उपचार केले, ६००४६ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००७-०८ मध्ये ४०६२ आंतररुग्णांवर उपचार केले, ७२१७६ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००८-०९ मध्ये ३९७३ आंतररुग्णांवर उपचार केले, ८७१३७ बाह्यरुग्णांवर उपचार केले. सन २००९-१० मध्ये ५३८७ आंतररुग्णांवर उपचार केले, ११८११५ बाह्यरुग्णांवर उपचार केले.

सर्व जिल्ह्यांत क्षयरोग रुग्णांचे प्रमाण सारखे असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी यापूर्वी सांगितले. परंतु, आता दिलेल्या माहितीनुसार रुग्ण संख्येमध्ये फार मोठा फरक आहे. ही आकडेवारी केंद्र

शासनाच्या सर्वेक्षणानुसार आहे. क्षयरोग रुग्ण संख्या काढताना १ लाख लोकसंख्येचा निकष लावला जातो. याबाबत केंद्र शासनाच्या तज्ज्ञ समितीने येऊन या संदर्भातील नॅशनल सॅम्पल सर्व्हे केला आहे आणि त्यानुसार ही आकडेवारी काढण्यात आली आहे. १ लाख लोकसंख्येमध्ये १५२ क्षयरोगी असू शकतात, असा रेशो पकडून ही आकडेवारी काढण्यात आली आहे. अशी माहिती समितीस दिली.

पुणे औंध येथे क्षयरोगाचे जुने रुग्णालय आहे. महसुली भागात व्यवस्थित सेवा दिली जात नसल्यामुळे तेथे रूग्णांचे प्रमाण जास्त आहे. एक्सडीआर रुग्णाच्या उपचाराकरिता काही लाख रुपये खर्च होतात. नवीन टीडीआर टीबी नुसार खर्च जास्त होतो असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, राज्य शासनाकडून या संदर्भात सव्वा दोन कोटी रुपयांचे अनुदान मिळाले आहे. औषध खरेदीची प्रक्रिया सुरू आहे. एक्सडीआर संदर्भात केस टू केस तपासणी करुन लोकल मार्केटमधून औषध खरेदी करण्यात येते यासाठी केंद्र शासनाकडून देखील अनुदान मिळाले आहे.

महानगरपालिकेला ४ कोटी रुपये दिले असल्याचे माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले होते. ते ४ कोटी रुपये कोणत्या कारणासाठी दिले? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सन २००६ पासून मोठ्या प्रमाणात औषध खरेदी केली आहेत. राज्यात केंद्र शासनाची देखील टीम आली होती. मुंबईत लागण झालेल्या टीडीआर, एक्सडीआर संदर्भात केंद्र शासनाकडून अनुदान मिळणार आहे. या संदर्भातील उपाययोजना महानगरपालिकेमार्फत करणार आहोत. मुंबईतील, स्लम एरियातील खाजगी डॉक्टरांना देखील डॉट प्रोग्रॅममध्ये सामील करुन घेतले आहे. राज्यातील ४ क्षयरोग रुग्णालयांच्या संदर्भातील अहवाल समितीला देण्यात यावा असे समितीने सूचित केले. तथापि, विभागाकडून यासंदर्भातील अहवाल अद्यापही समितीला देण्यात आला नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांच्या रिक्त पदांबाबत माहिती देतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हा आरोग्य अधिकारी या संवर्गाची मंजूर पदे २७६ होती, त्यातील १३८ नामनिर्देशनाची, ७० पदोन्नतीची व ६८ एमबीबीएसची होती. एकूण भरलेली पदे १२२ होती, त्यातील ७२ पदे नामनिर्देशनाने, ४८ पदे पदोन्नतीने व २ पदे एमबीबीएसची भरलेली होती. एकूण रिक्त पदे १५४ होती, त्यातील नामनिर्देशनाने भरावयाची ६६ पदे, पदोन्नतीने भरावयाची २२ पदे व एमबीबीएसची ६६ पदे रिक्त होती. संबंधित उमेदवारांकडे पदवी नसल्यामुळे पदोन्नतीने पदे भरता येत नाहीत. विभागाने या संदर्भात १० टक्क्यांची तरतुद केली आहे व तत्संदर्भात मंत्रिमंडळाची देखील मान्यता मिळाली आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून या संदर्भात आदेश काढण्यात येणार आहे. वैद्यकीय

संवर्गासदर्भातील विभागाचा प्रस्ताव तयार आहे. सदर ६६ पदे भरण्यास काहीही अडचण येणार नाही. नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पाठपुरावा सुरू आहे. जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गाची ६१९ पदे मंजूर असून एकूण रिक्त पदे २९५ आहेत, त्यापैकी १२२ पदे नामनिर्देशनाने, १३१ पदे पदोन्नतीने तर ४२ पदे एमएमबीबीएसची भरावयाची आहेत. पदोन्नतीच्या पदासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन १९८० पासून सेवाज्येष्ठता यादी केलेली नव्हती. जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या सेवाज्येष्ठतेची प्रक्रिया आता पूर्ण केली आहे. विभागाने ॲडहॉक पध्दतीची भरती पूर्णपणे थांबवून सेवाज्येष्ठता यादी तयार केली असल्यामुळे पुढील भरतीमध्ये अडचण येणार नाही. तसेच येत्या २-३ महिन्यांत पदोन्नतीची पदे भरण्यात येतील. सरळसेवेने भरावयाच्या पदांसंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला १९ संवर्गातील ३०२ पदांसंदर्भात मागणी पत्र दिले आहे. त्याचप्रमाणे २३१ पदांसंदर्भातील जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. विभागातील रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यासाठी विभागाचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगा सोबत पाठपुरावा सुरु आहे.

वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून काढून घेण्याचे ठरले होते. परंतु या संदर्भातील कार्यवाही तेवढ्यापुरतीच केली गेली. नंतर पुन्हा ती पदे पूर्वीप्रमाणेच त्यांच्या कडून भरली जात आहेत अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, याबाबत शासनाने आदेश दिले होते की, ग्रामीण रुग्णालयांत भूलतज्ज्ञ, फिजिशियन, गायनाकॉलॉजीस्ट, सर्जन ही पदे भरावीत. विभागात उक्त २१७ पदे आहेत. परंतु ग्रामीण रुग्णालयांमध्ये एम.बी.बी.एस. डॉक्टर नियुक्त केल्यामुळे त्या ठिकाणी उपरोक्त पदांचे काम करता येत नाही. मुळात विभागाला एम.बी.बी.एस. डॉक्टर्स नको असून अनेकांची अशी तक्रार असते की, ग्रामीण रुग्णालयात शस्त्रक्रिया होत नाहीत. आज राज्यामध्ये ६०० भूलतज्ज्ञांची आवश्यकता आहे. विभागाकडे केवळ १०० भूलतज्ज्ञ आहेत. तथापि, विभागात पदोन्नतीने भरावयाची पदे ३ महिन्यात भरली जातील.

पुरवणी मागण्यांमध्ये पुणे, ठाणे, रत्नागिरी, नागपूर या मनोरुग्णालयांना दिलेल्या अनुदानापैकी १ कोटी १० लाख रुपये शिल्लक राहिलेले आहेत. पुणे येथील मनोरुग्णालयामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचे आढळून आले आहे. मनोरुग्णांना रुग्णालयात प्रवेश देताना त्या व्यक्तीच्या कुटुंबीयांकडून पैसे किंवा वस्तू घेतल्या जातात. अशा गैरप्रकारांवर वेळीच नियंत्रण आणण्याबाबतची सूचना समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, समितीने निदर्शनास आणून दिलेल्या प्रकरणी निश्चितच चौकशी करण्यात येईल. मनोरुग्णालयात रुग्णाला प्रवेश देताना प्रती दिन २२ रुपये प्रमाणे प्रवेश शुल्क आकारले जाते. मनोरुग्णालयात न्यायालयामार्फत आणि हॉलिएंटरी असे

दोन प्रकारचे रुग्ण येतात. जर रुग्ण बी.पी.एल. असेल तर त्याच्याकडून प्रवेश शुल्क घेतले जात नाही. ए.पी.एल.चा रुग्ण असेल तर त्याच्याकडून नियमाप्रमाणे प्रवेश शुल्क घेतले जाते. रुग्णाकडून प्रती दिन २२ रुपये प्रमाणे जे शुल्क घेतले जाते त्या मध्येच जेवणाचा खर्च समाविष्ट असतो. असेही सांगीतले.

अनेकदा घरगुती भांडणे किंवा मारहाण झाली तर त्या व्यक्तीला वेड लागले असे सांगितले जाते. त्या व्यक्तिचे कुटुंबीय त्या व्यक्तीला वेड लागल्याचे सांगण्यासाठी पोलिसांकडे गेले तर पोलीस त्यांना कोर्टात जाण्याचा सल्ला देतात. कोर्टाने त्या व्यक्तिला मनोरुग्ण ठरविले तरच त्याला मनोरुग्णालयात पाठविले जाते. याबाबत विभागीय सचिवांनी माहिती दिली की, आपल्याकडे मनोरुग्णालयाच्या बाबतीत जुना कायदा आहे. त्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करण्याची प्रक्रिया शासनाकडून सुरु आहे. (Mental Health Act, १९८७, मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७ ) यासाठी राज्य सरकारकडून माहिती घेणेही सुरु आहे. हे खरे आहे की, मनोरुग्णालयांसाठी ३४ कोटी २७ लाख रुपयांची ग्रँट होती. त्यापैकी ३३ कोटी १६ लाख रुपये खर्च झाले आहेत. प्राप्त अनुदानापैकी १ कोटी १० लाख रुपये अखर्चित राहिले. मनोरुग्णालयांमध्ये जी पदे भरावयाची होती त्यापैकी २०१९ पदे भरण्यात आली व ६८६ पदे रिक्त राहिली. त्यामुळेच उर्वरित रक्कम खर्च झाली नाही. पदे मोठ्या प्रमाणात रिक्त राहिल्याने त्यांच्या वेतनाची ९६.६५ लाख रुपये बचत झाली आहे. प्राप्त अनुदानाच्या ९७ टक्के खर्च झाला असून, केवळ ३ टक्के रक्कम अखर्चित राहिलेली आहे.

मनोरुग्णालयांना इमारत बांधकाम, फर्निचर, देखभाल, दुरुस्ती इत्यादी कामांसाठी निधी मिळतो. याविषयी माहिती देतांना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, राज्यामध्ये ठाणे, नागपूर, पुणे व रत्नागिरी या चार ठिकाणी मनोरुग्णालय आहे. या रुग्णालयांतील बेडची क्षमता ५५५५ आहे. ५५५५ बेडस्पैकी केवळ ६० टक्के बेडस् रुग्णांनी व्यापलेले असतात. मागील वर्षी १ कोटी ३१ लाख रुपये योजनेतर आणि ४.९९ कोटी रुपये योजने अंतर्गत मिळाले होते. हा निधी विशेषत: औषधी आणि प्रयोगशाळेच्या कामासाठी लागणार होता. मागील दोन वर्षात मनोरुग्णालयांना मिळणाऱ्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. दोन वर्षांपूर्वी संपूर्ण मनोरुग्णालयांसाठी १ कोटी ३२ लाख रुपयांचे बजेट होते. परंतु आता मनोरुग्णालयांना दोन वर्षापूर्वीच्या बजेटपेक्षा चार ते साडेचार कोटी रुपये अतिरिक्त अंदाजपत्रक मिळाले आहे. त्यामुळेच विभागाकडून औषधी आणि प्रयोगशाळांच्या बाबतीत चांगल्या प्रकारचे काम केले

गेले. मनोरुग्णालयाला प्राप्त होणारा निधी कसा खर्च केला जातो याची सविस्तर टिप्पणी समितीला सादर करण्याचे आश्वासन विभागीय प्रतिनिधींनी दिले.

बाहय समुपदेशन केंद्राद्वारे जसे समुपदेशन केले जाते तसे राज्याच्या मनोरुग्णालयांतून करण्यात येते किंवा कसे तसेच मनोरुग्णालयांमध्ये मनोरुग्णांसाठी अ, ब, क दर्जाचे वॉर्ड आहेत काय ? तसेच सध्या हिंसक रुग्णावर उपचार करण्यासाठी खाजगी रुग्णालये सुरु

झालेली आहेत. अशा रुग्णांवर उपचार करण्यासाठी त्यांना खाजगी रुग्णालयात नेले जाते. आपल्याकडे अशी व्यवस्था आहे काय ? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की,मनोरुग्णालयात मानसोपचार तज्ज्ञ असून गुन्हेगारी स्वरुपाचा पेशंट आणि इतर पेशंटसाठी वेगळी व्यवस्था केलेली असते. या वॉर्डमध्ये सुपरव्हीजन आणि इतर व्यवस्था सुध्दा वेगळी असते. काही रुग्ण अंमली पदार्थ सेवन करणारे असतात. अशा रुग्णांसाठी ड्रग डी ॲडीक्शन सेंटर उघडण्यात आले आहे. बैंगलोर येथील सेंटरला सुध्दा भेटी देण्यात आल्या आहेत. राज्यात ज्या मनोरुग्णालयात डे केअर सेंटर नाहीत त्या ठिकाणी डे केअर सेंटर सुरु करणे आवश्यक आहे. जो रुग्ण खरोखर मनोरुग्ण झालेला आहे त्या रुग्णाला मनोरुग्णालयात पाठवावयास पाहिजे. परंतु ज्यांच्यावर तात्पुरते उपचार करणे आवश्यक आहेत त्यांना डे केअर सेंटरमध्ये तात्पुरते उपचार करुन सोडून देणे योग्य आहे. अनेकदा मनोरुग्णालयात दाखल केलेल्या रुग्णाला त्याचे कुटुंब तेथेच सोडून जातात. आपल्यावर बोजा नको म्हणून अशा रुग्णांना कोणीही घेऊन जात नाही. मनोरुग्ण बरा झाल्यानंतर त्याला त्याच्या मूळ पत्त्यावर पाठविले जाते. परंतु त्या व्यक्तीच्या कुटुंबीयांनी चुकीचा पत्ता दिल्यामुळे त्या व्यक्तीला रूग्णालयाचे कर्मचारी पुन्हा मनोरुग्णालयात घेऊन येतात. त्यामुळे त्यांचे उर्वरित आयुष्य मनोरुग्णालयात जाते. त्यांचे निधन झाल्यानंतर त्यांचा अंत्यविधी सुध्दा केला जातो. जे रुग्ण बरे होतात, त्यांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. त्यांना समाजासमोर परत जाण्यासाठी प्लॅटफॉर्म उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मध्यंतरी विभागाने एक चांगला कार्यक्रम हाती घेतला होता. शासनाने चार रुग्णालयांना ४ कोटी ९५ लाख रुपयांचे बजेट दिले होते. जे मनोरुग्ण बरे होतात त्यांच्या पुनर्वसनाच्या बळकटीकरणाचे काम विभाग करीत आहेत. शिवाय डे केअर सेंटर स्थापन करण्यात येत आहेत.

अनेकदा मनोरुग्ण चांगला झाला की नाही हे ठरविण्यासाठी सुध्दा पैसे घेतले जातात अशी समितीने माहिती दिली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, प्रत्येक रुग्णालयात एक अभ्यागत समिती स्थापन केलेली आहे. जिल्हा न्यायाधीश समितीचे अध्यक्ष असतात. ते मनोरुग्णालयाला भेटी देतात. जो मनोरुग्ण पूर्णतः बरा होतो त्याला समितीसमोर आणले जाते. त्या समितीसमोर त्या रुग्णाचे ॲसेसमेंट होऊन डिस्चार्ज दिला जातो. परंतु ज्या रुग्णांच्या नातेवाईकांनी

चुकीचा पत्ता दिलेला असतो त्या पेशंटला नाईलाजाने पुन्हा रुग्णालयात यावे लागते विभागाने असा खेद व्यक्त करुन जे मनोरुग्ण बरे झालेले असतात त्यांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता असल्याचे मत विभागीय प्रतिनिधींनी व्यक्त केले यासंदर्भात समितीने मनोरुग्णालयाच्या संदर्भातील सविस्तर अहवाल सादर करण्याची सूचना केली होती त्याअनुषंगाने विभागातून माहिती प्राप्त झाली आहे. (परिशिष्ट ४)

मुर्तिजापूर येथील भ्रष्टाचाराचे प्रकरण उघडकीस आले होते. शिवाय विधानसभेत सुध्दा हा प्रश्न उपस्थित झाला होता. या प्रकरणाच्या अनुषंगाचे काय कार्यवाही करण्यात आली ? याबाबत समितीने विचारणा केली असता या प्रकरणी संबंधितांवर प्रथम खबरी अहवाल दाखल केला आहे. त्या ठिकाणी दोन केसेस झाल्या होत्या. विभागाने जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जी प्रशासकीय कारवाई करावयाची होती ती केलेली आहे. डॉ.धोत्रे यांच्या बाबतचा तो विषय होता. तीन स्तरावर खर्चमेळ व्यवस्थित होत नव्हते, म्हणून हे प्रकरण उघडकीस आले होते. महालेखापाल कार्यालय, संचालक कार्यालय आणि उप संचालक कार्यालय स्तरावर खर्चमेळ होत नव्हते. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर राज्य शासनाने बी.डी.एस.पध्दत अंमलात आणली. या भ्रष्टाचार प्रकरणी अजून रक्कम वसूली झालेली नाही या प्रकरणी प्रथम खबरी अहवाल दाखल झाला असून, फौजदारी केसेस देखील दाख्ल केल्या आहेत. के.एल.शर्मा यांना सेवेतून बडतर्फ करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस इश्यू केली आहे, एम.ए.शेख हे सेवानिवृत्त झाले असून त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून २५ टक्के रक्कम कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, शिवाय त्यांना निलंबित केले होते. एन.जी.भलवने, यांच्या सेवानिवृत्त वेतनातून २५ टक्के आणि पुन्हा ५० टक्के कायमस्वरुपी, अशाप्रकारे ७५ टक्के रक्कम वसूल करण्यासाठी त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे. भारवे यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून ७५ टक्के रक्कम वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे. पी.एन.ताबोले यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून २५ टक्के रक्कम कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. पी.आर.कुंदे यांच्या वेतनवाढीत ५ वर्षे वाढ होणार नाही आणि त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून ५ हजार रुपये वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात सर्वसंबंधितांना कारणे दाखवा नोटीस दिल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

या प्रकरणातील दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल केल्यानंतर पुढे काय कारवाई केली तसेच ज्यांना कारणे दाखवा नोटीस इश्यू केली आहे ते सेवेत आहेत काय याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विभागाकडून जी प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक होते ती कारवाई केलेली आहे. विभागाबरोबरच इतर यंत्रणेकडून सुध्दा कारवाई करणे सुरु आहे. परंतु या प्रकरणातील अपहारीत रक्कम अद्याप वसूल झालेली नाही. तसेच बहुतेक व्यक्ती सेवानिवृत्त झालेल्या आहेत. जे

सेवेत नाहीत त्यांना त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून अपहारीत रक्कम वसूल करण्यासंदर्भात नोटीस दिली आहे. या प्रकरणास सहा वर्षे झालेली आहेत. विभागाने संबंधितांची विभागीय चौकशी करण्यास जाणूनबुजून उशीर केलेला आहे. संबंधितांकडून वसुली होणे आवश्यक असताना त्यास उशीर करण्या मागचा उद्देश काय आहे ? अपहाराची रक्कम २१ कोटी आहे. तेव्हा विभागाने संबंधितांच्या पेन्शनमधून सदर रक्कम वसूल करण्याचे ठरविले तरी ती रक्कम वसूल होणार नाही. त्यामुळे ही रक्कम बुडीत खात्यात जमा होण्या सारखी आहे, असे समितीने मत प्रकट केले असता संबंधितांची विभागीय चौकशी चालू असूनही मागील सहा वर्षात संबंधितांकडून अजून रक्कम वसूल झालेली नाही. आरोग्यसारख्या महत्वाच्या विभागात इतक्या मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होतो ही राज्याला लांच्छनास्पद बाब आहे. तेव्हा या संदर्भात विभागाने पाठपुरावा करुन संबंधितांवर कडक कारवाई करावी असे समितीने सुचविले.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, संबंधितांवर गुन्हे दाखल झालेले असून त्यांची सी.आय.डी.चौकशी सुरु आहे तसेच हे प्रकरण सी.आय.डी.कडे आहे. सी.आय.डी.ने कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांची हस्ताक्षरे सुध्दा घेतली आहेत. या प्रकरणी तीन-चार जणांसह डॉ.धोत्रे यांना अटक करण्यात आली. डॉ.धोत्रे यांना पाच आठवड्यांची कोठडी सुध्दा झाली होती. श्री.छामरे, हे मूर्तीजापूरचे होते, त्यांची सुध्दा विभागीय चौकशी झाली होती. परंतु त्यांचे निधन झालेले आहे. संबंधितांवर चार्जशीट दाखल करण्यात आली आहे. अपहारित रक्कम किती होती हे समजण्यासाठी जवळपास तीन वर्षे लागली. त्यासाठी विशेष लेखापरिक्षण करण्यात आले होते. विभागाने विशेष लेखापरिक्षण केले होते. या प्रकरणामध्ये महालेखापाल कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा देखील समावेश आहे. त्या कर्मचाऱ्यांवर महालेखापाल कार्यालयाने कारवाई केलेली आहे. ही सर्व माहिती माहालेखापाल आहे या प्रकरणी कोषागार आणि उप कोषागार कार्यालयातील ११ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. या प्रकरणातील संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ.धोत्रे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. दिनांक ४.१.२०१० रोजी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. श्री.मुंडे यांच्यावर सुध्दा अमरावती येथे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांना दिनांक ४.१.२०१० रोजी अटक करण्यात आली. त्याप्रमाणे पुढील कारवाई सुरु आहे. विभागीय चौकशी करण्यासाठी उशीर झाल्याप्रकरणी विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागीय चौकशीसाठी दोन वर्षे लागली. आता नियमाप्रमाणे त्यांना शेवटची नोटीस दिलेली आहे. या संदर्भातील सविस्तर लेखी माहिती विभागाने समितीला द्यावी अशी सूचना समितीने केली. याबाबत माहिती प्राप्त झाली असून परिशिष्ट मध्ये समाविष्ट आहे.

मलेरिया निर्मूलन राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत हिवताप रुग्ण कमी करणे

हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत समितीने विचारणा केली यावर विभागीय प्रतिनिधींनी माहिती देतांना सांगितले की, राज्यात एकूण १२ हजार हंगामी फवारणी कामगार आहेत. जेव्हा जेव्हा भरती करण्यात येईल त्यावेळी ५० टक्के जागा हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांसाठी राखून ठेवाव्यात असा शासनाने सन २००३ मध्ये जी.आर.काढलेला आहे. आतापर्यंत किती हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यात आले या संदर्भातील माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल. सदर माहिती प्राप्त झाली असून ती  परिशिष्ट मध्ये समाविष्ट आहे.

विभागाला प्लान मधून ३ कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. तर ट्रायबलसाठी १३ कोटी २५ लाख रुपये मंजूर झालेले आहेत. तसेच मलेरियाचा प्रादूर्भाव खास करुन मुंबई, ठाणे, रायगड, नाशिक आणि विदर्भामध्ये आहे. मलेरिया निर्मूलनासाठी केंद्र सरकारकडून राज्य शासनाला निधी मिळतो.  सन २००५-२००६ आणि २००६-२००७ या वर्षात राज्याला केंद्र शासनाकडून किती निधी प्राप्त झाला समितीच्या माहिती प्रमाणे राज्य सरकारने निधी खर्च केला नाही म्हणून केंद्र सरकारने सन २००७-०८ पासून निधी पाठविणे बंद केले आणि त्याऐवजी वस्तू पाठविण्यास सुरुवात केली. तसेच सन २००६-२००७ मध्ये काय खरेदी करण्यात आले असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगीतले की, मलेरिया निर्मूलनासाठी केंद्र सरकारकडून ५० टक्के निधी मिळतो आणि त्यामध्ये राज्य सरकार ५० टक्के हिस्सा देते. आता केंद्र सरकारकडून वस्तू स्वरुपात मदत मिळते. स्टीरप स्प्रे पंपस्,पॉलिस्टर सिंगल मच्छरदाण्या व किटकनाशकभारीत मच्छरदाण्या, मॅलेथॉन धुरळणी पावडर इत्यादी बाबी खरेदी करावयाच्या होत्या. या वस्तू तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्याल आल्या. प्रयोगशाळेकडून अहवाल येण्यास विलंब झाला. मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर इमारतींचे बांधकाम सुरु असल्यामुळे त्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना मलेरियाची लागण होते.सन २०१० मध्ये मलेरियाचा प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला होता. तेव्हा शासनाने आणि महानगरपालिकेने बांधकाम व्यवसायिकांना आणि ठेकेदारांना मलेरियाचा प्रादूर्भाव होऊ नये म्हणून काही सूचना करुन काही बंधने घालण्यात आली होती. काही बांधकाम व्यवसायिकांना सूचनांचे पालन केले. ज्यांनी पालन केले नाही त्यांच्यावर महानगरपालिकेने कारवाई केली होती.

मलेरियाच्या निर्मूलनासाठी ऑईल स्प्रे खरेदी तसेच मलेरियाच्या निर्मूलनासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांचा पगार याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवानी असे सांगीतले की, प्रामुख्याने लारव्हानाशक ऑईलचा उपयोग डासांच्या निर्मुलनासाठी केला जातो. तसेच मलेरियाच्या निर्मुलनासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांचा पगार महानगरपालिकेमार्फत दिला जातो. पुणे येथे मलेरिया निर्मूलनासाठी जे कर्मचारी काम करतात त्यांचा पगार महानगरपालिका देते.  परंतु नंतर

महानगरपालिका ते पैसे राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती करुन घेते तसेच हे कर्मचारी कोणाच्या पे-रोलवर काम करीत नाहीत तर अशा कामांचा ठेका दिलेला असतो. ठेकेदारामार्फत ते काम करण्यात येते. अशी माहिती समितीने दिली असता विभागीय सचिवांनी सांगीतले की, लहान नगरपालिकांना केंद्र आणि राज्य शासनामार्फत मलेरिया निर्मूलनासाठी निधी मिळतो. मुंबई शहराबाबत सांगावयाचे झाले तर आपणास केंद्र शासनाकडून निधी मिळत नाही.

मलेरिया निर्मूलनासाठी राज्य शासनामार्फत नगरपालिका, महानगरपालिकांना मदत करण्यात येते काय ? व विभागाकडून वर्षाला किती रक्कम देण्यात येते.यावर विभागाने असा खुलासा केला की, लहान नगरपालिकांना मदत करण्यात येते. परंतु मुंबई महानगरपालिकेला अशी मदत करण्यात येत नाही. महाराष्ट्रात जवळपास १५ फायलेरिया युनिटस् आहेत. त्यांच्या पगारावरील खर्च विभागाकडून केला जातो. परंतु इतर लॅबिलीटीज महानगरपालिका देते. ठाणे आणि नागपूर या दोन ठिकाणी विभाग पगार देतो परंतु बाकीच्या लॅबिलीटीज महानगरपालिका देते. वर्षाला जवळपास १० कोटी रुपये देण्यात येतात. मलेरियाच्या निर्मूलनासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार आणि महानगरपालिका किती खर्च करते याबाबतची माहिती समितीला सादर करण्याची सूचना समितीने केली. सदर माहिती समितीस प्राप्त झ ाली असून ती परिशिष्ट - मध्ये समाविष्ट आहे.

याबाबत अधिक माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मलेरियाच्या निर्मूलनासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात विभागाने एक आढावा घेतला होता. त्या कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी नोकरीत ठेवणे हा प्रश्न आहेच. उदा. २० वर्षापूर्वी बीड शहरामध्ये मलेरियाचा प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे मलेरियाच्या निर्मूलनासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु कालांतराने तेथील मलेरियाचा प्रादूर्भाव कमी झाला. परंतु त्या वेळी नेमण्यात आलेले कर्मचारी अजून कायम आहेत. त्यांना आता कोणत्याही प्रकारचे काम नाही. याबाबतची अशी आणखी किती उदाहरणे आहेत त्याची यादी समितीला देण्याची सूचना समितीने केली. तथापि, सदर माहिती समितीला अद्याप प्राप्त झालेली नाही.

मलेरियाचे निर्मूलन करणे आवश्यक असताना जो कर्मचारीवर्ग नेमला होता परंतु आता मलेरियाचे निर्मूलन झालेले आहे, परंतु कर्मचारी कार्यरत आहेत व त्यांना आता कोणत्याही प्रकारचे काम नाही त्यामुळे त्यांना काम देणे आवश्यक आहे.

किमान गरजा कार्यक्रमासाठी ८६ कोटी रुपयांची तरतूद असताना ४१ कोटी रुपये वर्ग करण्यात आले. निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत ? ते पैसे मूळ बाबीवर खर्च न करता दुसऱ्या बाबीवर खर्च करण्याकरिता वळते करण्यात आलेले आहेत काय, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय

सचिवांनी खुलासा केला की, बांधकामाबाबत वेगवेगळे शीर्ष होती. ८ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी ४ कोटी ५९ लाख रुपये प्रत्यार्पित करण्यात आले. त्यावर्षी तेवढया रकमेची बचत झालेली आहे ट्रॉमाकेअर युनिटच्या बाबतीतला हा विषय आहे. त्याठिकाणी ऑर्थोपेडिक सर्जन व ॲनेस्थेटिस्ट सर्जन आहेत. तर न्युरोसर्जन नाही. काही ठिकाणी इमारती बांधून झालेल्या आहेत बांधकाम होईपर्यंत काही गोष्टींची खरेदी झालेली नव्हती. इक्विपमेंटसाठी जे बजेट होते. ट्रॉमाकेअर युनिटसाठी ८ कोटी ३५ लाख रुपयांची तरतूद केली होती. मिनिमम रिक्वायरमेंट प्रोग्रॅम अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांना ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देणे असे त्यामध्ये समाविष्ट होते. त्यावेळी किती रक्कम सरेंडर झाली होती? महालेखाकारांच्या अहवालात रिॲप्रोप्रिएशन असा शब्दप्रयोग केलेला आहे. याचा अर्थ ती रक्कम वर्ग केली आहे असा होतो. यावर विभागाने असे स्पष्टीकरण दिले की हे पैसे वित्त विभागाच्या स्तरावर सरेंडर झाले आहेत. त्या वर्षासाठी ८६.८५ कोटींची मूळ तरतूद केली होती. या रकमेपैकी ४१.४५ कोटी रुपयांचे रिॲप्रोप्रिएशन झाले. त्यामुळे ४५ कोटी रुपये खर्च करण्यासाठी शिल्लक राहिले होते. त्यापैकी ४२ कोटी ६८ लाख रुपये खर्च झाले. त्यामुळे २ कोटी ३१ लाख रुपयांची बचत झाली आहे.याबाबत ए.जी.कार्यालयाला विभागाने दिनांक १५.१२.२००९ रोजी स्पष्टीकरण दिले होते. मुदतीमध्ये स्पष्टीकरण न दिल्यामुळे हा मुद्दा आलेला आहे. विभागाने वेळेवर स्पष्टीकरण देणे आवश्यक होते. असे मत प्रदर्शित करून समितीने विचारणा केली केली की,सन२०११-२०१२ अखेरपर्यंत ७८ हजार ८०० रुग्णांना हिवतापाची लागण झाली होती.. त्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे त्याची माहिती तसेच या प्लॅनची, डी.पी.डी.सी. अंतर्गत १३ कोटी रुपये उपलब्ध झाले त्या रकमेच्या खर्चाची व मलेरीया निर्मूलनाच्या कार्यक्रमासाठी विभागाचे वार्षिक बजेट किती आहे. याबाबत विभागीय प्रतिनिधींची माहिती देतांना सांगितले की, मलेरियासाठी १२४ कोटी २७ लाख रुपयांचे वार्षिक बजेट आहे. योजनेतर मध्ये वेतन, साधन सामग्री व इतर बाबींचा समावेश आहे. २ कोटी रुपयांची तरतूद मलेरियासाठी व १ कोटी रुपयांची तरतूद फायलेरियासाठी केलेली आहे. डी.पी.डी.सी.चे १३ कोटी २५ लाख रुपये जिल्हाधिकाऱ्यांकडे जातात.

१२४ कोटींपैकी फक्त १६ कोटी रुपये योजनांतर्गत खर्च होतात आणि ११० कोटी रुपये योजनेतर खर्च होतात काय, विभागाकडे एकूण किती कर्मचारी आहेत ? तसेच दर वर्षी या कामासाठी कंत्राटी पध्दतीवर कर्मचारी घेतले जातात काय ? यावर विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, वर्ग-१ ते ४ च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या २० हजार १६६ इतकी आहे. त्या त्या जिल्ह्यातील हे नियमित कर्मचारी आहेत. कंत्राटी पध्दतीचे १००-२०० कर्मचारी वर्षानुवर्षे फवारणीचे काम करीत

आहेत. त्यापैकी काही कर्मचाऱ्यांना ठराविक दिवस काम दिलेले आहे. अशा पध्दतीने १० हजार मनुष्य दिवसांचे काम कंत्राटी कामगारांकडून करुन घेतले जाते.

काही वर्षांपूर्वी एका जिल्ह्यात मलेरिया किंवा फायलेरिया या रोगांच्या निर्मूलनासाठी काही पदांची निर्मिती करण्यात आली होती. परंतु आता या रोगांचा तितका प्रादुर्भाव नसल्यामुळे त्या कर्मचाऱ्यांना काहीच काम उरलेले नाही. त्यामुळे ते कर्मचारी बसून पगार घेत आहेत. टी.बी., मलेरिया, हत्ती रोग या रोगांच्या निर्मूलनाच्या कामासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये बसून पगार घेण्याची प्रवृत्ती जास्त आहे. त्यावर विभागाचे कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही.हत्ती रोग केवळ विदर्भामध्ये आहे तसेच हत्ती रोगावर वर्षभरात किती खर्च केला जातो ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांकडे याबाबतची माहिती उपलब्ध नव्हती यासंदर्भत विभागीय सचिवांची यावर सन २००६-०७ मध्ये योजनेतर ११२ कोटी रुपयांची व योजनेअंतर्गत २४ कोटी रुपयांची तरतूद केली होती. एवढीच माहिती दिली. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

धूर फवारणी यंत्रामध्ये आता तेल वापरले जाते काय, सध्या कशा प्रकारे फवारणी केली जाते, जिल्हानिहाय कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे, त्यामध्ये कायम स्वरुपी व हंगामी स्वरुपी किती आहेत, १० दिवस किती कर्मचाऱ्यांना काम दिले, केंद्र सरकारची योजना कशी आहे? केंद्र सरकारच्या आरोग्य योजनेमधून काही फंड मिळतो काय? स्वाईन फ्ल्यू सारख्या रोगाचे रुग्ण असल्याची माहिती सातत्याने वाचनामध्ये येत असते. या रोगावर किती खर्च केला जात आहे? व्हेंटिलेटर्सची सोय किती ठिकाणी आहे? या सर्व बाबींची माहिती समितीला देण्याची सूचना समितीने केली. सदर माहिती प्राप्त असून ती **(विविरणत्र क्र. )** मध्ये समाविष्ट आहे.

विभागाच्या अधिकाऱ्यांनी ससून रुग्णालयाला भेट दिलेली असून ससून रुग्णालयात ४ व्हेंटिलेटर्सची सोय केलेली असल्याचे त्यांनी सांगीतले. त्यावर समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनात आणून देतांना सांगितले की, १५ व्हेंटिलेटर्स दुरुस्तीअभावी पडून राहिले होते. समितीने पाठपुरावा केल्यानंतर त्या व्हेंटिलेटर्सची दुरुस्ती करण्यात आली आहे. विभागाच्या विभाजनामुळे हे सर्व प्रश्न निर्माण झालेले आहेत.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी सुचना खुलासा केली की, पूर्वीपेक्षा आता स्वाईन फ्ल्यूमुळे मृत्यू होण्याचे प्रमाण घटलेले आहे. सायन रुग्णालयात १ रुग्ण, जे.जे.रुग्णालयात १ रुग्ण या आजाराचा दाखल झाला होता. परंतु आता खाजगी रुग्णालयांत पाठपुरावा केला जातो किंवा नाही हे पाहिले जाते. यासंदर्भात विभागाने तज्ज्ञांची बैठक बोलविली आहे. तसेच विभागाने केंद्र सरकारला विनंती केलेली आहे. जून-जुलै-ऑगस्ट या तीन महिन्यामध्ये कठीण परिस्थिती निर्माण होणार आहे असे त्यांना

कळविले आहे. व्हेंटिलेटरच्या बाबतीत मागील वर्षी प्रशिक्षण देण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे मे व जून या महिन्यांमध्ये प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखलेला आहे. त्या शिवाय फिजिशियन्सची यादी तयार केलेली आहे. खाजगी रुग्णालयाच्या माध्यमातून स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांवर उपचार करण्याची व्यवस्था केलेली आहे.

अर्भकांना व पूर्व शालेय मुलांना घटसर्प, डांग्या खोकला व धनुर्वात यापासून आणि गर्भवती स्त्रियांना धनुर्वात रोगापासून प्रतिक्षम करणे. या योजनेसाठी १० कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यापैकी ७ कोटी ७९ लाख १० हजार रुपये परत करण्यात आले आहेत. अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आली नाहीत असा शेरा लिहिण्यात आलेला आहे. याबाबतची अधिक माहिती समितीला देताना विभागीय सचिवांनी खुलासा केला की, माता व बाल आरोग्य ही १०० टक्के केंद्र सरकार पुरस्कृत योजना आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासनाने राज्याला विविध लसींचा पुरवठा केला जात होता. सन २००६-०७ या वर्षामध्ये या योजनेसाठी १० कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्या वर्षात १० कोटी २६ लाख रुपये खर्च झालेले आहेत. त्यापूर्वीच्या वर्षात म्हणजे २००५-२००६ या वर्षात देखील तेवढीच तरतूद केली होती. त्यावेळी ७ कोटी ८० लाख रुपयांची बचत झाल्याचे दिसून येत आहे. सन २००७-०८ या वर्षासाठी १० कोटींची तरतूद केली होती. त्यापैकी ६ कोटी ९९ लाख रुपये खर्च झालेले आहेत. या संदर्भात विभागीय स्तरावरुन या लसींची कमी मागणी करण्यात आली होती काय, केंद्र सरकारकडून मागणीनुसार पुरवठा झाला की नाही, याबाबत चौकशी करुन माहिती घेतली असता टी.टी.ची लस कमी पुरवण्यात आली होती. परंतु उर्वरित सर्व आजारांवरील लसींचा पुरवठा ९० टक्के झाला होता अशी माहिती समोर आली. तसेच जेवढी तरतूद करण्यात आली त्यापेक्षा कमी खर्च का झाला याची कारणे शोधली असता केंद्र सरकारनेच त्या लसींची किंमत कमी ठरविली होती आणि त्याप्रमाणे राज्य सरकारला खर्च झाल्याचे दाखवावे लागले. राज्याकडून लसींची कमी मागणी करण्यात आली नव्हती.

यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी अधिक माहिती देताना सांगितले की, सन २००६-०७ या वर्षात टी.टी.च्या लसचा अपवाद वगळता बाकीच्या आजारावरील लसींचा पुरवठा मागणीप्रमाणे केंद्र सरकारकडून करण्यात आला होता. तसेच त्यापूर्वीच्या वर्षातील लस मिळणे शिल्लक राहिले होते. त्या लसींचाही पुरवठा झाला होता. सन २००६-०७ मध्ये मागील व पुढील वर्षाचा विचार करुन तसेच २५ टक्के टाकाऊ गृहित धरुन लसींची मागणी करण्यात आली होती. त्यामुळे लसींच्या किंमतीवर परिणाम झ ालेला आहे. परंतु लसी कमी पडलेल्या नाहीत. केंद्र शासनाने त्यावेळी २,२०,९०,०००/- रुपये इतकी किंमत कळविली होती. यात थोडा गोंधळ झाला असावा. तथापि, विभागीय प्रतिनिधींनी दिलेल्या माहितीच्या संदर्भात समितीचे समाधान झाले नाही.

माता व बाल आरोग्य या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी १० कोटी रुपयांची तरतूद होती. त्यापैकी ७७९ लक्ष रुपयांची तरतूद शिल्लक राहिली. लेखी स्पष्टीकरणांच्या शेवटी तळ टिपमध्ये ऑगस्ट, २००७ मध्ये अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. १० कोटी रुपये तरतूदी संदर्भात समायोजन केल्यानंतर सुध्दा ७७९ लक्ष रुपये शिल्लक राहत असतील व या परिच्छेदाबाबत महालेखाकार यांचे समाधान विभागाला करता आले नाही. स्पष्टीकरणाच्या सर्वात शेवटी तळ टिपमध्ये ऑगस्ट, २००७ मध्ये अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत असे नमूद करणे, ही बाब अतिशय गंभीर आहे. या संदर्भात विभागाने महालेखाकार यांच्यासमवेत चर्चा करुन समितीच्या पुढील बैठकीत सविस्तर अहवाल सादर करण्यास समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगीतले की, दरवर्षी नुसार १० कोटी रुपयाची लसींची मागणी केली होती. परंतु केंद्र शासनाकडून कमी प्रमाणात पुरवठा झालेला आहे. त्यामुळे यात आकारणी चुकीची झालेली असावे .

कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत राज्यात ५२ एनजीओ काम करीत होते. आता त्यांची संख्या १५ पर्यंत आली आहे. या अंतर्गत एकूण ४०० कर्मचारी काम करीत होते. त्यांना अनेक महिन्यापासून महागाई भत्याची रक्कम मिळालेली नाही. काही कर्मचाऱ्यांचा लसीकरणासाठी आणि कुटुंब कल्याणाच्या कार्यक्रमासाठी फार उपयोग होत असतो. सदर कर्मचाऱ्यांना ६-६ महिन्यापासून पगार मिळालेला नाही. या संदर्भात राज्य शासनाच्या स्तरावर माननीय मंत्री महोदयांसमवेत बैठका झाल्या आहेत. याबाबत विभागाने जातीने लक्ष घालून एनजीओना प्रोत्साहित करणे गरजेचे आहे असे मत समितीने व्यक्त केले. तसेच राज्यात आरोग्याची स्थिती चांगली नसून शासनाकडून आरोग्यावर खर्च करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो. परंतु प्राप्त झालेला निधी पूर्णपणे खर्च होत नाही या संदर्भात विभाग १०० टक्के दोषी नाही.विभागाने कार्यपध्दतीमध्ये बदल करुन, शासनाकडून प्राप्त झालेला निधी पूर्णपणे खर्च करता येऊ शकतो. शासनाकडून राज्याला आरोग्याच्या संदर्भात प्राप्त झालेला सर्व निधी पूर्णपणे खर्च करुन चांगल्या सुविधा निर्माण करुन द्याव्यात असा समितीचा मूळ उद्देश आहे.

मलेरिया निर्मूलन राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत हिवताप रुग्ण कमी करणे या योजनेंतर्गत सन २००६-०७ मध्ये फायलेरियासाठी १४.५१ कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले होते. सन २००६-०७ मध्ये मलेरियासाठी नॉन प्लॅनमध्ये १०७.३० कोटी रुपये मिळाले होते. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली असता नॉन प्लॅनमध्ये १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी खर्च होतो. परंतु प्लॅनमध्ये एक ते दीड कोटी रुपयांची रक्कम खर्च केली जाते. या बाबत समितीला सविस्तर माहिती देणे आवश्यक असल्याचे मत समितीने प्रदर्शित केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की.या संदर्भात ॲनालेसिस करुन पाहणी केली होती. आदिवासी भागांसाठी १३ कोटी रुपये तसेच योजनेतर पूर्ण राज्यासाठी २

कोटी रुपयांचा निधी देण्यात आला होता. तथापि, केंद्र शासनाकडून येणाऱ्या लसी किंवा औषधांच्या रकमेचा समावेश योजनेतर खर्चात येऊ शकत नाही. ही सर्व रक्कम योजनेअंतर्गत जाणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे वस्तुंचा सर्व खर्च योजनेअंतर्गत जाणे आवश्यक आहे, असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या संदर्भात नियोजन आयोगासमवेत चर्चा झाली होती. या संदर्भात दोन प्रकार आहेत. ते म्हणजे भांडवली खर्च व महसुली खर्च योजनेतर सर्व खर्चाचा समावेश महसुली खर्चामध्ये होतो. त्यामुळे भांडवली खर्चामध्ये अशा प्रकारे खर्च झालेली रक्कम दिसून येत नाही. ज्या प्रमाणे आस्थापनेचा खर्च महसुली खर्चामध्येच दर्शविला जातो त्याच प्रमाणे ही पध्दत आहे. आपण एखाद्या नवीन रुग्णालयाचे बांधकाम केल्यास ५ वर्षापर्यंत तेथील आस्थापनेचा खर्च योजनेअंतर्गत दर्शविला जातो व नंतर तो खर्च योजनेतर मध्ये दर्शविला जातो. केंद्र शासनाकडून एनआरएचएमसाठी सर्व राज्यांना निधी प्राप्त होत असतो. त्यातून फायलेरिया प्रतिबंधासाठी वापर केला जातो. तसेच विभागीय सचिवांनी बैठकीत समितीने काही मुद्दांच्या संदर्भात मागितलेली सर्व माहिती नंतर समितीला सादर करण्याचे आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

सचिवांनी समितीला साक्षीच्या वेळी दिलेल्या माहिती वरून व नंतर विभागाकडून प्राप्त झालेल्या आश्वासित माहितीवरून असे दिसून येते की, सार्वजनीक आरोग्य विभागांतर्गत महसूल विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी विभागीय संदर्भीय सेवा केंद्रे स्थापन करणे व रुग्णांना विशेष संदभीय सेवा उपलब्ध करुन देणे हा उद्देश आहे. रुग्णालयांच्या इमारतींची बांधकामे वेळेवर पूर्ण होत नसल्याने समितीने मुद्दा उपस्थित केला होता. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामिण रुग्णालयांचे बांधकाम करण्याच्यादृष्टीने एनआरएचएम मधून निधी प्राप्त होतो. रुग्णालये हा विषय जरी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत येत असला तरी त्यांचे बांधकाम हे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येते. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत इमारती बांधकामाबाबत प्रस्ताव सादर केला जातो. रुग्णालयांच्या इमारती बांधकामाकरीता निधी सार्वजनिक आरोग्य विभाग देते. परंतु इमारतींचा दर्जा तपासण्याची कोणतीही योजना आरोग्य विभागाकडे नाही. या इमारती पहिल्याच पावसाळयात गळण्यास सुरुवात होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाने मुंबई येथे आरोग्य संचालनालयासाठी "आरोग्य भवन" या इमारतीचे बांधकाम केले आहे. परंतु सदर इमारतीला सध्या मोठया प्रमाणात गळती लागली आहे. यावरुन या इमारतीचे बांधकाम हे सदोष पध्दतीने झाले आहे असा निकर्ष काढल्यास तो चुकीचा होवू

नये. राज्याच्या राजधानीत असलेल्या आरोग्य विभागाच्या इमारतीची अशी अवस्था असेल तर जिल्हास्तरावरील आरोग्य विभागाची प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र व ग्रामिण रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामाच्या दर्जा बाबत समितीला साशंकता वाटते. इमारतीच्या बांधकाम दर्जाबाबत एकूणच दोन्ही विभागांकडून एकमेकांवर आक्षेप करण्यात येतात. कोणताही विभाग बांधकामाची जबाबदारी घेत नाही. इमारत बांधकामासाठी दोन्ही विभागाचा समन्वय असणे आवश्यक आहे. असे समितीचे मत झाले. **राज्यामध्ये ग्रामीण रुग्णालयांची बांधकामे मोठया प्रमाणात करण्याची आवश्यकता असल्याने या इमारतीचा दर्जा अतिशय चांगला राहण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दोन्ही विभागात आवश्यक तो समन्वय साधण्यासाठी समन्वयक नियुक्त करावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

वास्तविक पाहता सार्वजनिक बांधकाम विभागाने इमारतीचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर त्याच्या बांधकामाच्या दर्जाची तपासणी दक्षता व गुणनियंत्रण मंडळाकडून तपासणी करुन घेवून मगच इमारत पुर्णत्वाच्या व इमरतीच्या बांधकामाच्या दर्जाबाबत दक्षता व गुणनियंत्रण मंडळाने दिलेल्या दाखल्यासह इमारतीचा ताबा सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सुपूर्त करणे आवश्यक असते असे असतानाही आरोग्य भवनाच्या इमारतीमध्ये जे दोष राहून गेलेले आहेत त्यामुळे इमारतीमध्ये गळती निर्माण झाली आहे असे समितीला वाटते.

अमरावती येथे सुध्दा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल बांधण्यात येत असून सदर हॉस्पिटल ४०० बेडचे आहे. याकरिता सन २०११-१२ करीता रुपये २८ कोटी एवढी तरतूद करुनही सदर हॉस्पिटल बांधण्यास प्रशासकीय मंजूरी मिळाल्यावर निधीची पूर्ण तरतूद करणे, त्यांची निविदा प्रक्रिया सुरु करणे यात बराच वेळ होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदर हॉस्पिटल बांधून पूर्ण झाल्यावर तेथे यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देणे, वैद्यकिय व परावैद्यकिय अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्त्या करणे, या कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था करणे, अशा अनेक बाबी यानंतर करावयाच्या असतात. **अमरावती येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याचा घेतलेला निर्णय योग्य आहे तथापि, सदर हॉस्पिटल लवकरात लवकर उभारुन या हॉस्पिटलला यंत्रासामुग्री, वैद्यकिय व परावैद्यकिय कर्मचारी तातडीने उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी, ज्यायोगे अमरावती येथील जनतेस दर्जेदार वैद्यकिय सुविधेचा लाभ घेता येईल अशी समितीची शिफारस आहे तसेच या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी.**

विभागात जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, लॅब सहायक इत्यादी बरीच पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्याची समितीस माहिती मिळाली. समाजाचे आरोग्य

सांभाळण्याची जबाबदारी असणाऱ्या विभागामध्ये वैद्यकिय क्षेत्रातील अधिकाऱ्यांची पदे वर्षानुवर्षे रिक्त रहात असतील तर आरोग्य सेवा कशा पुरविण्यात येतात असा समितीसमोर प्रश्न आला. एकीकडे ग्रामीण व जिल्हा स्तरावर रुग्णालये बांधण्याची कार्यवाही केली जाते परंतु, मंजुर असलेली पदे, अस्तित्वात असलेली पदे रिक्त राहत असतील तर नवीन बांधण्यात आलेल्या रूग्णालयांमध्ये आरोग्य सेवा पुरविण्याकरीता पुरेसे कर्मचारीच उपलब्ध नसतील तर या सेवा कशा पुरविणार व त्याची ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे असे समितीने विभागास सुचविले. विभागाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून रिक्त पदे व निर्माण केलेली वैद्यकीय व परावैद्यकीय पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे अशी माहिती दिली. सर्व सामान्य जनतेच्या आरोग्याचा प्रश्न असल्यामुळे या प्रकरणी कोणतीही हलगर्जीपणा करण्यात येवू नये व विभागीय सर्व वैद्यकीय व परावैद्यकीय पदे तसेच नवीन बांधकाम करण्याचे प्रसारित असलेल्या रूग्णालयांमध्ये आवश्यक असणाऱ्या पदासंबधी तात्काळ आढावा घेवून ती सर्व पदे तातडीने भरण्यात यावीत अशी समिती आग्रहाची शिफारस करीत आहे. सदरहू पदे कार्यरत असल्याने रुग्णालयामध्ये असलेली वैद्यकीय यंत्रसामग्री योग्यरित्या वापरात येवून त्यांच्या सुविधा या सामान्य जनतेस मिळतील हा उद्देश देखिल सद्य रिक्त असण्यासंदर्भात आहे असे सामितीचे मत आहे. आरोग्य सेवा प्रदान प्रणालीत सुधारणा करणे व त्याद्वारे प्रभावी आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात व त्याचा वापर वाढावा या उद्देशाने राष्ट्रीय स्तरावर भारत सरकारने एप्रिल, २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची सुरुवात केली. या अभियानांतर्गत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम हा एक आहे. केंद्र पुरस्कृत योजना असल्यामुळे यामध्ये केंद्र शासनाचा ५०% व राज्य शसनाचा ५०% वाटा असतो. **राज्यामध्ये बुलढाणा, पुणे, औंध, अमरावती व कोल्हापूर- जयसिंगपूर या ४ ठिकाणी क्षयरोगाची रुग्णालये आहेत. राज्यामध्ये क्षयरोगाची लागण झालेल्या रुग्णाची संख्या जास्त असून त्यांना योग्य पध्दतीने उपचार मिळण्यासाठी रुग्णालये चांगल्या स्थितीत ठेवणे, सोयी सुविधा वाढविणे, बेड वाढविणे व स्वच्छता ठेवण्याची गरज आहे असे मत समितीने व्यक्त केले. क्षयरोग रुगणलयाची संख्या पहाता त्यात आणखी वाढ होणे आवश्यक आहे. अतिदुर्गम भागातील जनतेला या सुविधेचा लाभ होण्यासाठी विभागीय स्तरावर क्षयरोग रुग्णालये उभारण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी तसेच क्षयरोग रुग्ण शोधून काढण्याची दरवर्षी विशेष मोहिम हाती घेण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

दैनंदिन जीवनात उद्‌भवणाऱ्या ताण-तणावामुळे सामाजिक, आर्थिक कारणामुळे तसेच अतिशय धकाधकीच्या जीवनशैलीमुळे राज्यामध्ये मनोरुग्णांच्या सख्येत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे मनोरुग्ण हे देखील नागरिक असल्याने त्याच्यांकडे दुर्लक्ष होणे योग्य नाही. समितीपुढे सादर झालेल्या माहितीमध्ये **मनोरुग्णालयांमधील भरावयाच्या २०१९ पदांपैकी ६८६ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले.**

**१/३ पदे रिक्त ठेवून मनोरुग्णालयामध्ये कामे कशी करतात, कोणत्या पध्दतीची सेवा देण्यात येते याबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे राज्यातील मनोरुग्णालयांमध्ये रिक्त असलेली सर्व पदे आगामी ३ महिन्यांत भरण्याची कार्यवाही विभागाने करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करण्यात यावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

**राज्यातील मनोरुग्णालयांमध्ये डे-केअर केंद्रे नाहीत सदर केंद्रे देखील प्राधान्याने सुरू करण्यात यावीत व मनोरुग्णांच्याबाबतीत अस्तित्वात असलेल्या अधिनियमात देखील कालानुरुप बदल करणे आवश्यक असल्याने त्यादृष्टीने विभागाने सत्वर कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

मलेरिया निर्मूलन राष्ट्रीय कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून राज्य शासनास निधी प्राप्त होतो. केंद्र व राज्य शासनाचा ५०% वाटा असतो. राज्यामध्ये १२ हजार हंगामी फवारणी कामगार आहेत. **भरती करताना या हंगामी कामगारांना सेवेत सामावून घेतले जाते. मलेरियाचा प्रादुर्भाव असताना हंगामी सेवेत असलेले कर्मचारी हे कालांतराने सेवेत सामावून घेतले जात असल्याने ज्या-ज्या ठिकाणी मलेरियाचे निमुर्लन झाले आहे त्या त्या ठिकाणी प्रथम हंगामी म्हणून व नंतर कायम सेवेत समावून घेतलेले कर्मचारी त्यांना कोणत्याही प्रकारची कामे रहात नसल्याने कामगार बसून राहतात. या कर्मचाऱ्यांना काहीही काम न करता वेतन मिळत असल्याने अशा कर्मचाऱ्यांची यादी तयार करण्यात यावी व इतर विभागांमध्ये जेथे कर्मचारी वर्ग कमी आहे व आवश्यकता आहे त्यांच्या सेवेत हे कर्मचारी वर्ग करण्यात यावेत अशी समिती शिफारस करीत आहे.**

मुर्तिजापूर येथे सन २००६ मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागांतील भ्रष्टाचाराचे प्रकरण उघडकीस आले होते. यामध्ये एकूण २१ कोटी रुपयांचा अपहार झाला होता. याप्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणास ६ वर्षे होवून देखिल अपहारीत रक्कम अद्याप वसूल झालेली नाही. या अपहारप्रकरणी ज्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई केली आहे त्यातील बहुतांश अधिकारी सेवानिवृत्त झाले असून संपूर्ण रक्कम वसूल झालेली नाही. **सार्वजनिक आरोग्यासारख्या महत्वाच्या विभागात एवढया मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो व अद्यापपर्यंत ठोस अशी कारवाई होत नाही ही अतिशय लांछनास्पद बाब आहे. या प्रकरणी विभागाने पाठपुरावा करुन दोषींना अत्यंत कडक शिक्षा होईल तसेच सर्व अपहारातील रक्कम शासना खाती जमा होईल याकरीता विभागाने सर्व उपाययोजना करण्यात अशी समिती शिफारस करीत आहे.**

## महिला व बालविकास विभाग

**भिक्षेकरी गृह व महिला वसतीगृहाबाबत**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र. एक्स-१ मधील प्रधान शीर्ष **"२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, २२३६ पोषण आहार, २०१५ इतर ग्राम विकास कार्यक्रम"** या शिर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेल आहे.

**मागणी क्रमांक - एक्स - १**
**सामाजिक सुरक्षा व पोषण आहार**

**(रुपये हजारात)**

| **प्रधान शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण<br>२२३६ पोषण आहार<br>२०१५ इतर ग्राम विकास कार्यक्रम | ८५००६२८ | ७१८८०४९ | (-) १३१२५७९ |

| | |
|---|---|
| मूळ तरतूद | ७६४०१६६ |
| पूरक | ८६०४६२ |

या वर्षात प्रत्यार्पित तरतूद (मार्च २००७) ७९०२८१

**टिपा व भाष्ये -**

मूळ तरतूदी इतका देखील खर्च झाला नाही आणि डिसेंबर २००६ मध्ये मिळालेली रु.८६०४.६२ लाखांची पूरक तरतूद अनावश्यक असल्याचे सिध्द झाले व ती तरतूद लाक्षणिक मागणी करुन निर्बंधीत करता येऊ शकली असती.

२) रु.१३१२५.७९ लाखांची अंतिम बचत असताना वर्षभरात परत करण्यासाठी फक्त रु.७९०२.८१ लाखांचा निधी अपेक्षित होता.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या मागणीखाली एकुण मंजूर तरतुदीपेक्षा

कमी खर्च झालेला आहे. या मागणीखालील मुख्यलेखाशीर्षाखालील काही उपशिर्षामध्ये कमी/अधिक खर्च झालेला आहे. त्याबाबतची कारणे सोबतच्या विवरणपत्रात नमूद केली आहेत.

या विभागाच्या सर्व योजना आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून राबविण्यात येतात व या सर्व योजनांचा निधी त्यांचेकडून क्षेत्रिय अधिकारी व संस्था यांना वितरीत केला जातो व त्यावर नियंत्रण ठेवले जाते.

वर्षामध्येच जादा तरतूदीची आवश्यकता भासल्यास संबंधित उपशिर्षाखालील तरतूदीचा विचार करुन पुरवणी मागणीद्वारे निधी उपलब्ध करुन घेण्यात येतो. डिसेंबरमधील पूरक मागणी एकुण तरतूद व खर्च खालीलप्रमाणे आहे. त्यावरुन पूरक मागण्या योग्य वाटतात.

| उपशिर्ष | मूळ तरतूद | पुरक मागणी | एकूण | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|
| २२३५२१३४ | ६०५४ | ८६८५ | १४७३९ | १४५१८ |
| २२३५२१६१ | ५०६६ | ३६९४ | ८७६० | ८७६० |
| २२३५२५०१ | १३००० | ९४८१ | २२४८१ | २१९४४ |
| २२३५३२०१ | ६०००० | ५१३०० | १११३०० | ११०७०७ |
| २२३६०५४६ | २६३६६६ | १००००० | ३६३६६६ | ३४५८२४ |
| २२३६००६३ | ७०५२३४ | ६८७३०० | १३९२५३४ | ९३६०२४ |
| | | ८६०४६० | | |

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **रुपये हजारात<br>कमी (-)<br>जादा (+)** |
|---|---|---|---|

०२-समाज कल्याण
१०४-वृध्दविकलांग व निराश्रित व्यक्तीचे कल्याण
(०१)(०१) भिक्षेकरी गृहे
(२२३५-२८७८)

मूळ तरतूद - ५६८०९

| | | | |
|---|---|---|---|
| | ५४०२५ | ४३४५० | १०५७५ (-) |

पुनर्वि (-) २७८४

रिक्त पदे भरली नसल्यामुळे मार्च २००७ मध्ये प्रत्यार्पित करण्यात आलेला रु.२७.८४ लाखाचा निधी हा रु.१०५.७५ लाखांची अंतीम बचत लक्षात घेता अपूरा असल्याचे सिध्द झाले आहे. त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, सदर योजनेमध्ये शासकीय भिक्षेकरि गृहातील कर्मचारी वेतन, प्रवासखर्च, इतरखर्च तसेच भिक्षेकरी प्रवेशितांना आहार, कपडे, औषधोपचार व इतर खर्च केला जातो. कर्मचारी पदे रिक्त असल्याने खर्चात बचत झाली.

बचतीची टक्केवारी १९.५७% इतकी येते.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| ०२-समाज कल्याण<br>१०३-महिला कल्याण<br>(०६)(०२) विविध व्यवसायभिमुख प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतन विशेष घटक योजना<br>(२२३५-३२३९)<br><br>मूळ तरतूद - २४६२<br>पुनर्वि (-) १०६५ | १३९७ | ११८२ | २१५ (-) |

प्रशिक्षण संस्थांकडून वेळेत प्रस्ताव न मिळाल्यामुळे मार्च २००७ मध्ये रु.१०६५ लाखांचा निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, मान्यता प्राप्त संस्थेमधून ब्युटी पार्लर, शिवण प्रशिक्षण, टायपिंग या सारखे व्यवसाय प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना दरमहा रु.१००/- प्रमाणे दहा महिन्यांसाठी रु.१०००/- च्या मर्यादेत अनुदान जि.म.बा.अ.मार्फत लाभार्थिंना देण्यात येते. ही योजना वैयक्ति लाभाची असून या योजनेअंतर्गत लाभार्थी कमी प्राप्त झाल्याने बचत झाली आहे. रु.१०६५ हजार २००७ मध्ये प्रशिक्षण संस्थांकडून वेळेत प्रस्ताव प्राप्त न झाल्याने समर्पित करणेत आली. बचतिची टक्केवारी १५.३९% इतकी येते.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| ०२-समाज कल्याण | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १०३-(०१)(०१) महिला व बाल कल्याण संचालनालय (२२३५-२०७२)<br>मूळ तरतूद - ७७४९१<br>पुनर्वि (-) ९३० | ७६५६१ | ७२६०५ | ३९५६ (-) |

प्रामुख्याने रिक्त पदे भरली न भरल्यामुळे मार्च २००७ मध्ये रु.९.३० लाखाचा निधी प्रत्यार्पणाद्वारे काढण्यात आला. रु.३९.५६ लाखांच्या अंतीम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, योजनेखाली आस्थापना व तत्सम बाबींवर ३५ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे व महात्मा गांधी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्या आस्थापनेवरील एकूण ४५६ अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी व कार्यालयासाठी खर्च करण्यात येतो. परंतु पदे रिक्त असल्यामुळे खर्च कमी झाला आहे. बचतिची टक्केवारी ५.१६% इतकी येते.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| ०२-समाज कल्याण<br>१०२-बाल कल्याण<br>(०१)(०४) बाल न्याय अधिनियमाखाली शासन प्रमाणित गृहे व सुधारगृहे सुरु करणे व त्याचे परिक्षण<br>(२२३५-३०३२)<br>मूळ तरतूद - १०४७९६<br>पुनर्वि (-) ७४८ | १०४०४८ | ९४७८९ | ९२५९ (-) |

प्रामुख्याने रिक्त पदे भरली न भरल्यामुळे तसेच प्रवेशार्थीची कमी संख्या यामुळे मार्च २००७ मध्ये प्रत्यार्पणद्वारे काढण्यात आलेला रु.७.४८ लाखांचा निधी रु.९२.५९ लाखांची अंतीम बचत विचारात घेता अपुरा असल्याचे सिध्द झाले आहे. त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००७).

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, सदर शीर्षाखाली शासकिय बालगृहे, निरिक्षणगृहे, अनुरक्षणगृहे (राज्यगृह) अशा एकूण ४६ शासकिय संस्था आहेत. सदर संस्थांमधील कर्मचाऱ्यांना वेतनावर १००% व वेतनेतर करीता (सामुग्री पुरवठा, इतर खर्च, आहार, कार्या. भाडपट्टी इ. बाबींवर) तरतूद उपलब्ध करुन देण्यात येते. रिक्त पदे असल्यामुळे वेतनावरील खर्चात बचत झाली आहे.

बचतिची टक्केवारी ८.८९% इतकी येते.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| ०२-समाज कल्याण<br>१०३-महिला कल्याण<br>(१४)(०२) बहुउद्देशिय महिला केंद्राकरिता स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान<br>४१ सहाय्यक अनुदान<br>(२२३५-२५७३)<br>मूळ तरतूद - ५०००<br>पुनर्वि (-) ३५१६ | १४८४ | १४८४ | ०० |

(एक) स्वयंसेवी संस्थांनी कमी मागणी केल्यामुळे (रु.२२.६ लाख) आणि

(दोन) कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता (रु.१३ लाख) मार्च २००७ मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यर्पणाद्वारे रु.३५.१६ लाखांचा निधी काढण्यात आला.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यांमध्ये भुकंपामूळे निर्माण झालेल्या परिस्थीतीमध्ये संकटग्रस्त महिलांना व्यवसाय, प्रशिक्षण, पुनर्वसन, कायदेविषयक सहाय्य, तात्पुरती निवास व्यवस्था या सारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामीण भागात एकूण ५२ बहुउद्देशीय महिला केंद्र स्थापन करण्यात आली असून ती जिल्हा परिषदेस हस्तांतरीत करण्यात आली आहेत त्यासाठी ही तरतुद आहे. स्वयंसेवी संस्थांकडून कमी मागणी झाल्यामुळे रु.३५१६ हजार इतके अनुदान मार्च २००७ मध्ये समर्पित करणेत आले.

| शीर्ष | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये हजारात कमी (-) जादा (+) |
|---|---|---|---|
| ०२-समाज कल्याण<br>१०३-महिला कल्याण<br>(१५)(०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदान<br>(२२३५-२३६८)<br>मूळ तरतूद १०६३९<br>पुनर्वि (-) ४२३१ | ६४०८ | ६९३९ | ५३१ (+) |

प्रामुख्याने जिल्हा परिषदांकडून अपेक्षित खर्चाहून कमी खर्च झाल्यामुळे रु.४२.३१ लाखांचा निधी पुनर्विनियोजन/प्रत्यार्पणाद्वारे काढण्यात आला.

रु.५.३१ लाखांच्या अंतीम बचतीची कारणे प्रतीक्षित (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, जिल्हा परिषदेमधील महिला व बाल कल्याण समितीच्या शासनाने ठरवून दिलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रती प्रवेशिता रु.२५००/- च्या मर्यादेत जि.प.ला अनुदान देण्यात येते. लाभार्थी संख्येत वाढ झाल्यामुळे खर्च जास्त झाला आहे.

अधिक खर्चाची टक्केवारी ८.२८% इतकी येते. अपेक्षित खर्च विचारात घेता रु.४२३१ समर्पित करण्यात आले.

| शीर्ष | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये हजारात कमी (-) जादा (+) |
|---|---|---|---|
| ०२-समाज कल्याण<br>१०३-महिला कल्याण<br>(२१)(०१) महिलांसाठी समुपदेशन केंद्र (२२३५-३१७-७)<br>मूळ तरतूद ६१५०<br>पुनर्वि (-) ३२८९ | २८६१ | २९०० | ३९ (+) |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, समुपदेशन केंद्रासाठी जमीन उपलब्ध नसल्यामुळे मार्च २००७ मध्ये रु.३२.८९ लाखाचा निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

शासनाने पोलीस स्टेशनच्या आवारात महिलांसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत समुपदेशन केंद्र सुरु केली आहेत. ह्या केंद्रांमध्ये संकटग्रस्त महिलांना समुपदेशन कायदेविषयक सहाय्य अशा प्रकारच्या सुविधा देण्यात येतात. यामध्ये केंद्रातील कर्मचाऱ्यांना मानधन व कार्यालयीन तसेच इतर खर्च या करीता वार्षिक रु.२३१ इतकी तरतूद देण्यात येते. अधिक खर्चाची टक्केवारी १.३६% इतकी येते. समुपदेशन केंद्रासाठी जागा उपलब्ध न झाल्याने त्या केंद्राना अनुदान देण्यात आले नाही पर्यायाने समर्पित करणेत आली.

| शीर्ष | | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये हजारात<br>कमी (-)<br>जादा (+) |
|---|---|---|---|---|
| ०२-समाज कल्याण<br>१०३-महिला कल्याण<br>(०३)(०७) महिला आर्थिक विकास<br>महामंडळ (महिला सक्षमीकरण)<br>(विशेष घटक योजना)<br>(२२३५-३२१२) | | | | |
| मूळ तरतूद | ६२७९९ | ६२७९९ | ४५७४८ | १७०५१ (-) |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या योजनेखाली रु.६२७.९९ लाख इतकी तरतूद प्राप्त झाली होती. वित्त विभागाची मान्यता न मिळाल्यामुहे बचत तरतूद शासन स्तरावर समर्पित करण्यात आलेली आहे.

| शीर्ष | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये हजारात<br>कमी (-)<br>जादा (+) |
|---|---|---|---|
| ०२-समाज कल्याण<br>१०३-महिला कल्याण<br>(१५)(०३) म.जि.व.पं. समिती<br>अधिनियम १९६१ च्या कलम १८७<br>अन्वये जि.प. योजनांतर्गत विशेष | | | |

घटक योजना
(२२३५-३२६६)
मूळ तरतूद ४४६१९

| | | | |
|---|---|---|---|
| | ३९७४३ | ४८१२५ | ८३८२ (+) |

पुनर्वि (-) ४८७६

जिल्हा परिषदांकडून अपेक्षित खर्चाहून कमी खर्च झाल्यामुळे मार्च २००७ प्रत्यार्पित केलेला रु.४८.७६ लाखांचा निधी हा रु.८३.८२ लाखांचा अंतिम अधिक खर्च विचारात घेता अवास्तववादी असल्याचे सिध्द झाले. त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, जिल्हा परिषदेमधील महिला व बाल कल्याण समितीच्या शासनाने ठरवून दिलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रती प्रवेशिता रु.२५००/- च्या मर्यादेत अनुदान देण्यात येते. सदरची योजना अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत सुरु आहे. लाभार्थी जास्त मिळाल्यामुळे जादा खर्च झाला आहे. अधिक खर्चाची टक्केवारी २१.०९% इतकी येते. काही जिल्हा परिषदांनी मागणी न केल्याने ४८७६ हजार समर्पित करणेत आली.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| ०२-समाज कल्याण<br>१०३-महिला कल्याण<br>(०१(०३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने<br>(२२३५-२३२१)<br>मूळ तरतूद १५५४२<br>पुनर्वि (-) १४७ | १५३९५ | १६३४९ | ९५४ (+) |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या लेखा शीर्षाखाली योजनेखाली ३३ जिल्हा परिषदांमधील महिला व बाल विकास समितीच्या १३२ (९९ तृतीय श्रेणी व ३३ चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांचे (वेतन) व कार्यालयीन आकस्मिक खर्चासाठी (प्रवास खर्च, वीज, फोन बील, लेखन साहित्य) केला जातो. जि.प.अ.ला. सहाय्यक अनुदान म्हणुन देणेत येते. वेतनवाढ व महागाई भत्ता वाढ व फरकाच्या रकमांमुळे खर्च जास्त झाला आहे.

अधिक खर्चाची टक्केवारी ६.१९% इतकी येते.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| (०१)(०४) महिला व बाल कल्याण संचालनालय<br>५४-संगणक<br>(२२३५-२५९१)<br>मूळ तरतूद २७६०<br>पुनर्वि (-) ९ | २७५१ | ३७६२ | १०११ (+) |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या लेखाशीर्षाखाली योजनांतर्गत योजनेवर आयुक्तालय पुणे, ३५ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, कार्यालये व ८१ शासकीय संस्था यांच्यासाठी संगणकीय व तत्सम आवश्यक मान्य बाबींवर खर्च केला जातो. याबाबीवर खर्च जास्त झाला आहे.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| (०५)(०२) पंचवार्षिक योजनांतर्गत<br>योजना निराश्रीत बालकांसाठी | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| संस्थेत्तर सेवा ४१-सहाय्यक अनुदान (२२३५-११४७) मूळ तरतूद ७०६८१ पुनर्वि (-) ९६ | ७०५८५ | ८१७४६ | १११६१ (+) |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, योजनांतर्गत लेखाशिर्षाखाली या योजनाखाली बालसदन, बालकाश्रम, अनाथालये या योजना कार्यरत आहेत अशा निवासी सर्वसाधारण प्रवेशितांच्या संस्थांना माहे जाने, २००७ पर्यंत दरमहा दरडोई रु.७५०/- प्रमाणे अनुदान दिले जात होते व १ फेब्रु २००७ पासून रु.९५० या सुधारीत दराने सहाय्यक अनुदान दिले जाते. अनुदानात वाढ व संस्थांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे प्रवेशितांची संख्या वाढली आहे. पर्यायाने खर्च जादा झाला आहे. अधिक खर्चाची टक्केवारी १५.८१% इतकी येते.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| (०६)(०१) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना विविध व्यवसायभिमूख प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतन ४०-शिष्यवृत्या विद्यावेतन (२२३५-१३६१) मूळ तरतूद २७७६ पुनर्वि (+) १६८ | २६०८ | ३७३५ | ११२७ (+) |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, मान्यता प्राप्त संस्थेमधून ब्युटी पार्लर, शिवण प्रशिक्षण, टायपिंग या सारखे व्यवसाय प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना दरमहा रु.१००/- प्रमाणे दहा

महिन्यांसाठी रु.१०००/- च्या मर्यादेत अनुदान जि.म.बा.अ.मार्फत लाभार्थिंना देण्यात येते. ही रक्कम लाभार्थीना जि.म.बा.अ. मार्फत देणेत येते. लाभार्थी संख्या जास्त असल्यामुळे जादा खर्च झाला आहे.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| (०७)(०१) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना स्वयंरोजगार योजनेखाली महिलांना वैयक्तिक व्यवसायिक आर्थिक सहाय्य<br>४१-सहाय्यक अनुदान<br>(२२३५-१३७२)<br>मूळ तरतूद ३२८९<br>पुनर्वि (+) १२४ | ३१६५ | ४१३७ | ९७२ (+) |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, निराधार निराश्रित महिलांना बांगड्या, भाजी विक्री या सारखा स्वतःचा छोटा व्यवसाय सुरु करण्यासाठी रु.५००/- अनुदान एकदाच देण्यात येते. लाभार्थी जासत असल्यामुळे खर्च जास्त झाला आहे.

| शीर्ष | | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये हजारात<br>कमी (-)<br>जादा (+) |
|---|---|---|---|---|
| (१०)(०२) बाल न्याय कार्यक्रम<br>(२२३५-३१०३) | | | | |
| मूळ तरतूद | ५०००० | ५०००० | ५६२५९ | ६२५९ (+) |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेअंतर्गत बालगृहे, अनुरक्षणगृहे या निवासी संस्था असून अशा निवासी सर्वसाधारण प्रवेशितांच्या संस्थांना माहे जाने. २००७ पर्यंत रु.७५०/- प्रमाणे व १ फेब्रुवारी २००७ पासून रु.९५० या सुधारीत दराने दरमहा दरडोई सहय्यक अनुदान दिले जाते. एडसग्रस्त व मतीमंदासाठीच्या संस्थाना जाने. २००७ पर्यंत रु.९००/- प्रमाणे व १ फेब्रुवारी, २००७ पासून रु.११४० या सुधारीत दराने दरमहा सहाय्यक अनुदान दिले जाते व अनिवासी बाल संगोपन योजनेमध्ये रु.४२५/- परिरक्षण अनुदान व रु.७५/- प्रशासकिय अनुदान असे एकूण रु.५००/- दरमहा दरडोई दिले जाते. लाभार्थी संख्येत वाढ झाल्यामुळे खर्च जास्त झाला आहे. अधिक खर्चाची टक्केवारी १२.५१% इतकी येते.

| शीर्ष | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये हजारात<br>कमी (-)<br>जादा (+) |
|---|---|---|---|
| ०२ - समाज कल्याण<br>१०२ - बाल कल्याण<br>(१०)(०३) महिला व बाल विकासासाठी तरतुद बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार कार्यक्रम<br>(२२३५-३३१९) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मूळ तरतूद | १ | १ | ८२०९३ | ८२०९२ (+) |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या शीर्षाखाली १२ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीप्रमाणे मूलभूत पायाभूत सुविधासाठी रु.१२,५०,०० तरतूद करण्यात आली होती. २००६-०७ च्या अर्थसंकल्पात चुकीने ती तरतूद २२३५३२७५ या शीर्षाखाली योजनेतर म्हणून दर्शविण्यात आली. डिसेंबर २००६ च्या अधिवेशनात अर्थसंकल्पीय कार्यपध्दतीनुसार रु.१ ची लाक्षणिक पुरवणी मागणीद्वारे सदर तरतुद योजनांतर्गत म्हणून या शीर्षाखाली दर्शविण्यात आली. सुधारित अंदाजात ती अर्थसंकल्प पुस्तकात (White book) समाविष्ट आहे. त्यापैकी रु.८२०९३ इतके खर्च झाले. उर्वरित अनुदान पुढील वर्षी अर्थसंकल्पीत करण्यात आले.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|---|
| ०२ - समाज कल्याण<br>१०३ -महिला कल्याण<br>(०३)(०१) महिला आर्थिक विकास महामंडळ (महिला सक्षमीकरण)<br>(२२३५-१३१६) | | | | |
| मूळ तरतूद | १०० | १०० | १०००० | ९९०० (+) |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, मूळ तरतूद रु.१०० इतकी होती. याबाबतची नस्ती विभागात मिळाली नाही. महालेखापालांनी रु.१०००० इतका खर्च दर्शविला आहे. तो बरोबर दिसतो. हा निधी महिला आर्थिक विकास महामंडळास देण्यात येतो. त्यांचेकडे याबाबत चौकशी केली असता त्यांना २००६-२००७ मध्ये या लेखाशीर्षाखाली रु.१०००० (१ कोटी) प्राप्त झाले असे लेखी दिले आहे. पुर्नविनियोजनाद्वारे ही तरतूद उपलब्ध करुन दिली असावी. त्याशिवाय कोषागारात देयके पारित होत नाही.

रुपये हजारात

| शीर्ष | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | कमी (-) जादा (+) |
|---|---|---|---|
| राज्य योजनांतर्गत योजना, (०५)(०२) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (२२३६००६३)<br>मूळ तरतूद ७०५२३४<br>पुरक ६८७३,००<br>पुनर्वि (-) ६५९५ | १३८५९३९ | ९३६०९४ | (-) ४४९८४५ |

आहार भत्ता व इंधन भत्ता यांची देयके काही प्रकल्पांकडून स्विकारण्यात आली नाहीत म्हणून मार्च २००७ मध्ये प्रत्यर्पित करण्यात आलेली रु.६५.९५ लाखाचा निधी रु.४४९८.४५ लाखांची अवाढव्य अंतीम बचत लक्षात घेता अपूरा असल्याचे सिध्द झाले आहे. रु.४४९८.४५ लाखांच्या अवाढव्य अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या उप लेखाशिर्षाखाली रु.७०,५२,३४ इतकी मुळ तरतुद होती. केंद्र शासनाने रु.७८७३०० निधी मुक्त केल्याने त्यापैकी रु.६८७३०० पुरक मागणी द्वारे अर्थसंकल्पित करणे आवश्यक होते. या शिर्षाखाली आठमाही खर्च व ३१ मार्च पर्यंतचा अपेक्षित खर्च विचारात घेऊन रु.९६१४०१ इतके सुधारित अंदाज वित्त विभागाच्या मान्यतेने निश्चित करण्यात आले होते. प्रत्यक्ष खर्च रु.९३६०९४ इतका असून फरक २५३०७ इतका येतो. ही टक्केवारी २.६% इतकी येते.

रुपये हजारात

| शीर्ष | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | कमी (-) जादा (+) |
|---|---|---|---|
| केंद्र पुरस्कृत योजना - ग्रामीण (०४)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १२३ व २६१ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान (पोषण व मानधन) (२२३६००६३)<br>मूळ तरतूद २४५७९७२<br>पुनर्वि (-) ६२३८६७ | १८३४१०५ | १७९३०२४ | (-) ४१०८१ |

योजनेअंतर्गत केंद्र सरकारकडून आवश्यक निधी न मिळाल्यामुळे मार्च २००७ मध्ये रु.६२३८.६७ लाखांचा निधी प्रत्यर्पित करण्यात आला. रु.४१०.८१ लाखांचा अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या उप लेखाशिर्षाखाली ग्रामीण व आदिवासी प्रकल्पातील अधिकारी व कर्मचारी यांचे आस्थापनेवरील खर्चात मार्च अखेर रु.४१०८१ इतकी बचत झाली आहे. बचतीची टक्केवारी २% इतकी येते.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| जागतिक बँक सहाय्यीत प्रकल्प (०४)(०३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (२२३६०५५५) मूळ तरतूद ५०००० | ४४६८६ | ४३७६६ | (-) ९२० |
| पुनर्वि (-) ५३१४ | | | |

प्रशिक्षणावर कमी खर्च केल्यामुळे मार्च २००७ मध्ये रु.५३.१४ लाखांचा निधी प्रत्यर्पित करण्यात आला.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या योजनेखाली अंगणवाडी सेविका/मदतीनस यांच्या प्रशिक्षणासाठी खर्च करण्यात येतो. प्रशिक्षण खर्चीत रु.९२० बचत झाली. बचतीची टक्केवारी २% इतकी येते.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| राज्य योजनांतर्गत योजना ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, (०१)(०२) किशोरवयीन मुलींसाठी आहार कार्यक्रम (२२३६०५९१) मूळ तरतूद ५०००० | | | |
| पुनर्वि (-) ५३१४ | ६४५२८ | ६५०६६ | (-) ५३८ |

अपेक्षित लाभार्थ्यींच्या संखेहून लाभार्थीची कमी संख्या असल्यामुळे मार्च २००७ मध्ये रु.१७८.७२ लाखांचा निधी प्रत्यर्पित करण्यात आला. रु.५.३८ लाखांच्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, किशोरवयीन मुलींसाठी आहार कार्यक्रमासाठी ही तरतुद आहे. मुळ मंजुर तरतुदीपेक्षा जास्त खर्च झालेला नाही. नांदेड व नागपूर जिल्ह्यातील ११ ते १९ वयोगटातील ३५ किलोपेक्षा कमी वजन असलेल्या मुलींसाठी केंद्र शासनाची विशेष पोषण आहार योजना आहे. अधिक खर्चाची टक्केवारी १% पेक्षा कमी आहे. ४/८ माही प्रत्यक्ष खर्च व आवश्यकता विचारात घेऊन रु.१७८७२ प्रत्यार्पीत करण्यात आले. मूळ मंजूर तरतुदीपेक्षा अधिक खर्च झालेला नाही.

| **शीर्ष** | | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **रुपये हजारात**<br>**कमी (-)**<br>**जादा (+)** |
|---|---|---|---|---|
| राज्य योजनांतर्गत योजना (०५)(०३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (राज्य आरोग्य पोषण निधीकडून मागविलेली विशेष घटक योजना) (२२३६०६०८) | | | | |
| मूळ तरतूद | १२४०५ | ३१३० | ९५११ | (-) ६३८१ |
| पुनर्वि (-) | ९२७५ | | | |

अपेक्षित लाभार्थ्यींच्या संखेहून लाभार्थीची कमी संख्या असल्यामुळे मार्च २००७ मध्ये प्रत्यर्पित करण्यात आलेला रु.९२.७५ लाखांचा निधी हा रु.६३.८१ लाखांच्या अंतिम अधिक खर्च विचारात घेता, अत्याधिक असल्याचे सिध्द झाले. त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या उपशिर्षाखालील तरतुदीमधून विशेष घटक योजनेखाली एकात्मिक बाल सेवा योजने अंतर्गत पोषण आहारासाठी खर्च केला जातो. मुळ

तरतूद रु.१२४०५ मधुन रु.९२७५ प्रत्यार्पित करण्यात आले होते व प्रत्यक्ष खर्च रु.९५११ झालेला आहे. परंतु एकुण तरतुद रु.१२४०५ पेक्षा जास्त खर्च झाला नाही. ४/८ माही प्रत्यक्ष खर्च व आवश्यकता विचारात घेऊन रु.९२७५ प्रत्यार्पीत करण्यात आले. मूळ मंजूर तरतुदीपेक्षा अधिक खर्च झालेला नाही.

| शीर्ष | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये हजारात कमी (-) जादा (+) |
|---|---|---|---|
| केंद्र पुरस्कृत योजना (०१)(०३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (२२३६०५९१) मूळ तरतूद २७५५१३ | | | |
| | २०२५०५ | २०६७४२ | (+)४२३७ |
| पुनर्वि (-) ७३००८ | | | |

अधिकारी अधिक्षक, अंगणवाडी संविकास आणि सहायक यांची पदे रिक्त राहिली त्यामुळे त्याचबरोबर योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्र उघडण्यात न आल्यामुळे प्रत्यर्पित केलेली रु.७३०.०८ लाखांचा निधी हा रु.४२.३७ लाखांचा अंतिम अधिक खर्च विचारात घेता, अत्याधिक असल्याचे सिध्द झाले. त्याची कारणे प्रतिक्षित आहेत (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या लेखाशिर्षाखाली शहरी प्रकल्पातील आस्थापनेच्या खर्चात वाढ झाल्याने रु.४२३७ जादा खर्च झाला. यामध्ये नागरी प्रकल्पावरील आस्थापना खर्च (वेतन अंगणवाडी सेविका / मदतनिस मानधन, प्रवास खर्च सामुग्री व पुरवठा, इंधन इ.खर्च यांचा समावेश आहे. या खर्चाची केंद्राकडुन प्रतिपुर्ती होते. ही खर्च वाढ २% इतकी आहे. ४/८ माही प्रत्यक्ष खर्च व आवश्यकता विचारात घेऊन रु.७३००८ प्रत्यार्पीत करण्यात आले. मूळ मंजूर तरतुदीपेक्षा अधिक खर्च झालेला नाही.

| शीर्ष | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | रुपये हजारात कमी (-) जादा (+) |
|---|---|---|---|
| जागतिक बँक सहाय्यित प्रकल्प - (नागरी) (०१)(०५) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (२२३६०५७३) मूळ तरतूद १८०६६५ | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | १६१८०१ | १६४३१९ | (-) २५१८ |
| पुनर्वि (-) १८८६४ | | | |

जागतिक बँक सहायित नागरी प्रकल्पांतर्गत काही पदे रिक्त राहिली त्यामुळे मार्च २००७ मध्ये रु.१८८.६४ लाख इतका निधी प्रत्यर्पित करण्यात आला. रु.२५.१८ लाखांच्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, जागतिक बँक सहाय्यित नागरी प्रकल्पाचया आस्थापनेवरील मार्च अखेरपर्यंतचा जादा खर्च रु.२५१८ आहेत. अधिक खर्चाची टक्केवारी रु. १.५% इतकी आहे. ४/८ माही प्रत्यक्ष खर्च व आवश्यकता विचारात घेऊन रु.१८८६४ प्रत्यार्पीत करण्यात आले. मूळ मंजूर तरतुदीपेक्षा अधिक खर्च झालेला नाही.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-) जादा (+)** |
|---|---|---|---|
| पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०१)(०४) एकात्मिक बाल विकास योजना (२२३६०५४६) | | | |
| मूळ तरतूद २६३६६६ | | | |
| | ३६३६६६ | ३४५८२३ | (-) १७८४३ |
| पुनर्वि (-) १००००० | | | |

वर नमूद केलेल्या शीर्षाखालील रु.१६०८.९४ लाखांची अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, सदर योजनेखाली मानधन व आहार या बाबींवर खर्च होतो. मानधन व आहार खर्चात बचत झाल्याने रु.१७८४३ खर्च कमी झाला. बचतीची टक्केवारी ४.९% इतकी आहे.

**रुपये हजारात**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **कमी (-)** |
|---|---|---|---|

| | | | जादा (+) |
|---|---|---|---|
| ग्रामीण<br>(०३) (०१) महाराष्ट्र जिल्हा<br>परिषद व पंचायत समिती<br>अधिनियम १९६१ च्या कलम १२३<br>व २६१ अन्वये जिल्हा परिषदांना<br>अनुदान (पोषण व मानधन)<br>(२२३६००२७) | | | |
| मूळ तरतूद २१७२५३७ | २१७२५३७ | २१७५००६ | (-) २४६९ |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, ए.बा.वि.से.यो. अंतर्गत ग्रामीण प्रकल्पातील लाभार्थ्यांना पोषण आहार, तसेच अंगणवाडी सेविका/मदतनीस यांना मानधन देण्यासाठी तसेच पोषण आहार यासाठी खर्च झाला. बचतीची टक्केवारी १% इतकी आहे.

**रुपये हजारात**

| शीर्ष | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | कमी (-) जादा (+) |
|---|---|---|---|
| ०२, पोषक अन्न व<br>पेये यांचे वितरण<br>१०१, विशेष पोषण आहार<br>कार्यक्रम नागरी<br>(०१) (०१) पोषण आहार कार्यक्रम<br>(२२३६०१८१) | | | |
| मूळ तरतूद १३६१४४ | १३६१४४ | १३७४७३ | (-) १३२९ |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, या योजनेतंर्गत वेतन अंगणवाडी सेविका/मदतीनस यांचे मानधन व नागरी विशेष पोषण आहार कार्यक्रमासाठी ही तरतुद आहे. अधिक खर्चाची टक्केवारी ०.९% इतकी आहे.

**रुपये हजारात**

| शीर्ष | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | कमी (-) जादा (+) |
|---|---|---|---|

जागतिक बँक सहाय्यीत प्रकल्प-
ग्रामीण,
(०४)(०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद
या पंचायत समिती अधिनियम
१९६१ च्या कलम १२३ व २६१
अन्वये जिल्हा परिषदांना
आस्थापना अनुदाने (२२३६०५२८)
(स्थानिक क्षेत्र)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मूळ तरतूद | ३०९६५४ | ३०९६५४ | ३१४१७७ | (+) ४५२३ |

वर नमूद केलेल्या शीर्षाखालील रु.१२४०.०८ लाखांची अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००७)

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, सदर योजनेखाली जिल्हा परिषद अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व अंगणवाडी मदतनिस यांच्या नियमित मानधनाकरिता खर्च केला जातो. बचतीची टक्केवारी १.४% इतकी आहे.

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **रुपये हजारात**<br>**कमी (-)**<br>**जादा (+)** |
|---|---|---|---|
| केंद्र पुरस्कृत योजना<br>(०१) (०१) एकात्मिक बाल विकास सेवा योजना संचालनालय<br>(२२३६०३७७)<br>मूळ तरतूद ८६९१<br>पुनर्वि ६६२ | ८०२९ | ८५२५ | (-) ४९६ |

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, आयुक्त कार्यालयातील आस्थापना खर्च (वेतन, प्रवास, कार्यालयीन खर्च) यामध्ये आहे. मुळ तरतूद रु.८६९१ इतकी होती. त्यापेक्षा जास्त खर्च झालेला नाही.

**साक्ष :**

विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे समितीने दिनांक ९ मे, २०१२ रोजी अपर मुख्य सचिव, गृह विभाग व प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी शासकीय भिक्षेकरी गृहातील पदे रिक्त असल्यामुळे खर्चात बचत झालेली आहे, असे लेखी माहितीमध्ये नमूद केलेले आहे. शासकीय भिक्षेकरी गृहातील किती पदे रिक्त आहेत ? भिक्षेकरी गृह याचा अर्थ भिक्षेकरुंना पकडून भिक्षेकरी गृहात ठेवले जाते काय ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यात एकूण १३ भिक्षेकरी गृह आहेत. मुंबईत चेंबूर येथे एक भिक्षेकरी गृह आहे. नगर भागात काही भिक्षेकरी गृह आहेत. पोलिसांमार्फत भिक्षेकरुंना पकडून कोर्टात हजर केले जाते आणि त्यानंतर भिक्षेकरुंना भिक्षेकरी गृहात दाखल करुन घेतले जाते. भिक्षेकरी गृहातील कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च, भिक्षेकऱ्यांच्या आहारावरील खर्च व इतर खर्चाचे एका वर्षाचे बजेट चार-पाच कोटी रुपये आहे. पोलिसांमार्फत कमी भिक्षेकरुंना पकडण्यात आले किंवा कोर्टात कमी भिक्षेकरुंना हजर करण्यात आले तर खर्चात बचत होते. भिक्षेकरी गृहातील पदे अनेक वर्षापासून रिक्त आहेत. मध्यंतरी शासनाने पदांच्या भरतीवर निर्बंध घातले होते. भिक्षेकरी गृहातील पदे भरण्याची तातडी नसल्यामुळे किंवा पदे भरण्यास परवानगी न मिळाल्यामुळे पदे रिक्त राहतात. भिक्षेकरी गृहातील काही पदे आवश्यकतेनुसार भरली जातात.

पोलिसांमार्फत भिक्षेकरुंना पकडले जाते काय ? आणीबाणीच्या काळात या कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली होती. सन १९८० मध्ये बॅ.अंतुले साहेब मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी या कायद्याची अंमलबजावणी केली. आता या कायद्याची अंमलबजावणी होते काय ? असे समितीने विचारले असता आता सुध्दा या कायद्याची अंमलबजावणी होते. पोलिसांमार्फत भिक्षेकरुंना पकडून कोर्टात हजर केले जाते. भिक्षेकरुंना पकडायचे किंवा नाही हे पोलिसांवर अवलंबून आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कोणत्या भागात भिक्षेकरुंची संख्या वाढत आहे याचा पोलिसांनी आढावा घेतलेला आहे काय ? सिग्नल जवळ उभे राहून अनेक भिक्षेकरु भीक मागत असतात. काही भिक्षेकरु सिग्नल जवळ मृत व्यक्ती दाखवून भीक मागत असतात. परंतु ती व्यक्ती मृत झालेली नसते. कोणत्या भागात भिक्षेकरुंची संख्या वाढत आहे याचा आढावा घेतला जातो काय यावर अशी समितीने विचारणा केली असता पोलिसांमार्फत भिक्षेकरुंना पकडण्याची मोहीम हाती घेण्यात आली होती. त्यावेळी अनेक बाल भिक्षेकरुंना बालगृहात दाखल करुन घेण्यात आले होते. पोलिसांची कार्यवाही सुरु असते. पोलिसांमार्फत भिक्षेकरुंना

पकडून कोर्टात हजर केले जाते आणि त्यानंतर भिक्षेकरुंना भिक्षेकरी गृहात दाखल करुन घेतले जाते. पोलीस वेळोवेळी याबाबतचा आढावा घेत असतात. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सर्वात जास्त भिक्षेकरु मुंबई शहरात आहेत. चेंबूर येथे भिक्षेकरी गृह आहे. तेथील जागा बांधकामासाठी बीओटी तत्वावर देण्यात आलेली आहे. याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, महिला व बालविकास विभागाने भिक्षेकरी गृहाची जागा बीओटी तत्वावर देण्यासाठी आक्षेप घेतला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने ती जागा बीओटी तत्वावर दिलेली आहे. चेंबूर येथील भिक्षेकरी गृहाची जागा कमीत कमी २ हजार कोटी रुपये किंमतीची आहे. महिला व बाल विकास विभागाचा प्रस्ताव नसताना सार्वजनिक बांधकाम विभागाला ती जागा बीओटी तत्वावर कशी काय देता येईल ? तीन-चार वर्षापूर्वी ही जागा बीओटी तत्वावर देण्यात आलेली आहे. या जागेच्या चेंज ऑफ युझ ारसाठी मुंबई महानगरपालिकेकडे अर्ज करण्यात आलेला आहे. अशी माहिती समितीने विभागीय सचिवांना दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हा प्रस्ताव महिला व बालविकास विभागाने दिलेला नाही. तसेच भिक्षेकरी गृहाची जागा बोओटी तत्वार देण्याची फाईल सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असून याबाबतची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु आहे. फाईलवरुन असे दिसते की, त्यावेळी मंत्री गटाच्या समितीने हा निर्णय घेतलेला आहे. असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

पोलीस भिक्षेकरुंना पकडत नाहीत. पोलिसांमार्फत भिक्षेकरुंना पकडून कोर्टात हजर करुन भिक्षेकरी गृहात दाखल करुन घेतले जात नाही. कायद्याची अंमलबजावणी केली जात नाही. शासकीय भिक्षेकरी गृहासाठी असलेल्या जागा विकासकांना विकल्या जात आहेत. याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, कायद्याची अंमलबजावणी होत नाही असे नाही. आजही पोलीस धाडी टाकून भिक्षेकरुंना पकडतात. शासकीय भिक्षेकरी गृहातील पदे रिक्त आहेत. महिला व बाल विकास विभागाची भिक्षेकरी गृहातील पदे भरण्याची व कायद्याची अंमलबजावणी करावयाची नाही अशी महिला व बाल विकास विभागाची मानसिकता असल्याचे दिसते. शासकीय भिक्षेकरी गृहाच्या जागा विकण्याचे काम सुरु आहे. अशी समितीने नापसंती व्यक्त केले असता शासकीय भिक्षेकरी गृहांची जेवढी क्षमता आहे तेवढी क्षमता पूर्णपणे वापरण्यात यावी, अशी विभागाच्या इच्छा आहे. रस्त्यावर भीक मागणारे जे भिक्षेकरु असतात त्यांना थेट भिक्षेकरी गृहात दाखल करुन घेता येत नाही. कोर्टाच्या आदेशानूसार भिक्षेकरुंना भिक्षेकरी गृहात दाखल करुन घेतो. पोलीस भिक्षेकरुंना पकडून कोर्टात हजर करतात आणि त्यानंतर त्या भिक्षेकरुंना भिक्षेकरी गृहात दाखल करुन घेतले जाते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कायद्याची अंमलबजावणी करणे पोलीस विभागाच्या हाती आहे. राज्यातील अनेक कायदे असे आहेत की, त्या कायद्यांची अंमलबजावणी संबंधित विभागाने न करता पोलीस किंवा इतर यंत्रणेमार्फत करावयाची असते.असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सिग्नल जवळ भीक मागणाऱ्या भिक्षेकरुंना पोलिसांमार्फत पकडून कोर्टात हजर केले जाते आणि त्यानंतर त्या भिक्षेकरुंना बालगृहात दाखल करुन घेतले जाते. याबाबत मागील ५ वर्षात आढावा बैठक घेण्यात आली आहे का तसेच महिला व बाल विकास विभागाचे मंत्री जागा हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला त्यावेळी मंत्री गटाच्या समितीमध्ये होते काय यासंदर्भात माहिती देताना विभागीय समितीने सांगितले की, विभागाने आढावा बैठक घेतलेली आहे. शासकीय भिक्षेकरी गृहात जास्तीत जास्त भिक्षकरुंना कसे दाखल करुन घेता येईल, यासाठी विभाग प्रयत्नशील आहोत. महिला व बाल विकास विभागाचे मंत्री त्या समितीवर नव्हते.

चेंबूर येथील भिक्षेकरी गृहाच्या जागेबाबत महिला व बालहक्क आयोगामार्फत याची चौकशी करावी. कारण विभागाला न विचारता परस्पर चेंबूर येथील भिक्षेकरी गृहाची जागा बीओटी तत्वावर विकसित करण्यासाठी बिल्डरला देण्यात आलेली आहे. हा निर्णय कोणी घेतला, का घेतला, कोणी परवानगी दिली याची चौकशी करण्यात यावी. असे निदेश समितीने विभागाला दिले तसेच महालेखाकारांनी यासंदर्भात चौकशी करुन समितीला अहवाल द्यावा. असे ही निदेश समितीने महालेखाकरांना दिले. याबाबत महालेखाकार कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली आहे **(विवरणपत्र क्र. )** चेंबूर येथील भिक्षेकरी गृहाबाबत मा.महिला व बालविकास मंत्री व विभागाचे सचिव यांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांची अपॉईंटमेंट घेऊन ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. महिला व बाल विकास विभागाची परवानगी न घेता हे सर्व झालेले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्रौढ भिक्षेकरूंच्या प्रश्नासंबंधी बाल हक्क आयोगाला चौकशी करण्याचा अधिकार नाही. १८ वर्षाच्या आतील भिक्षेकरी असतील तर त्यांच्या प्रश्नासंबंधी चौकशी महिला बाल आयोगाला करता येईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता विभागाने या मध्ये सकारात्मक रहावे. Let the Government say that you don't have authority for inquiring the matter. असे मत समितीने व्यक्त केले व समितीने चेंबुर येथील भिक्षेकरी गृहाला भेट देण्याचे ठरविले.

पंच वर्षिक योजना अंतर्गत योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदाला योजनाअंतर्गत अनुदान अंतर्गत महालेखापालांनी अंतिम बचतीची कारणे विचारली आहेत व विभागाने अधिक खर्चाचे स्पष्टीकरण दिलेले आहे. बचत झाली आहे की अधिक खर्च याची माहिती समितीला देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, रूपये ४२.००

लाख समर्पित करण्यात आले आहेत. रुपये पाच लाख खर्च अधिकचा झालेला आहे. रूपये ४२.०० लाखा ऐवजी रूपये ३७.०० लाख इतकी तरतूद करायला पाहिजे होती. विभागास निधी दिल्यानंतर तो खर्च न घेण्याचा कारणाबाबत समितने खर्च करण्यात आलेला नाही ? विचारणा समितीने केली असता खर्च होणार नाही असे लक्षात आल्यानंतर आपण सुधारित अंदाजपत्रक करतो. सुरूवातीला एक वर्षाचा अंदाज घेऊन अंदापत्रक बनविण्यात येते. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

वर्षभर किती निधी पुरेल याचा विभागाला अंदाज असतो. त्याप्रमाणाचे विभाग मागणी करीत असतात. निधीची तरतूद करून देखील आपण योजना नीट राबवित नाही. याचे कारण विभागाला कोणीही विचारणारा नाही असा विभागाचा समज असतो. निधी उरला की तो परत करायचा ही वृत्ती सर्वांचीच झाली आहे. तेव्हा विभागाने विचार करून निधी मागितला नव्हता काय अशी समितीने पृच्छा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत विचार करूनच निधी वापरला होता. जर योजनांचा विचार केला होता तर मग योजनांची अंमलबजावणी नाही असा त्यातून अर्थ निघतो. सरकारने दिलेला निधी विभागाने परत केला आहे. जो सगळा निधी खर्च करतो ते आदर्श सरकार, आदर्श मंत्री, आदर्श अधिकारी आहे असे समितीने मत व्यक्त केले.

विभाग परिपूर्ण अभ्यास करून अंदाजपत्रक बनविते. किती योजना कार्यान्वित होतील, मानधनावर किती खर्च होईल याचा अंदाज घेण्यात येतो. पण तो कधी कधी चुकतो. तसेच काही योजना जिल्हा परिषदे मार्फत राबविल्या जातात. जिल्हा परिषद किती लाभार्थींना लाभ दिला या संबंधातील माहिती आम्हाला वेळेवर कधीच देत नाही. ते फक्त अमूक एक योजना राबवित आहोत एवढेच विभागाला कळवितात. जिल्हा परिषदे मार्फत आर्थिक वर्षा अखेर लाभार्थींना अनुदानाचे वाटप केले जाते. जानेवारी, फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस जिल्हा परिषद योजना मंजूर करते. योजना मंजूर करताना लाभार्थींची निवड कशी केली हे आम्हाला कळवत नाही. त्यामुळे आम्ही आता दिर्घ कालीन उपाययोजना करण्याची तरतूद करीत आहोत. विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

समुपदेशन केंद्रासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे काम कोणी केले पाहिजे ? तसेच महिला कारागृहे येथे समुपदेशन केंद्र सुरू केले पाहिजे व प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी महिला सुधारगृहे आहेत. तेथील जागेचा वापर समुपदेशन केंद्रासाठी करावा असे समितीने सुचविले असता विभागीय सचिवांनी पोलीस ठाण्याच्या आवारात समुपदेशन केंद्र असते. ज्या महिलेला संसार करताना पती किंवा तिच्या सासरच्या माणसांकडून त्रास दिला जातो अशा पीडित महिलांसाठी समुपदेशन करण्यात येते. ज्या महिलांना पतीकडून मारहाण होते किंवा घरगुती भांडण होते अशा पीडित महिलांना समुपदेशन करण्यासाठी या केंद्राचा उपयोग करण्यात येतो. सुरूवातीला महिला पोलीस ठाण्यामध्ये जाते. फौजदारी

खटला न होता काही मार्ग काढता येईल काय यासाठी समुपदेशनाचा उपयोग केला जातो. सध्या ४० पोलीस ठाण्यांच्या आवारात समुपदेशन केंद्र स्थापन केली आहेत. त्यात वाढ करण्यात येणार आहे. जिल्हा पोलीस मुख्यालयात समुपदेशन केंद्र सुरू आहेत. यासाठी आपण एनजीओंची मदत घेतली असून ते पीडित महिलांना समुपदेशनाचे काम करतात.

पीडित महिलांना समुपदेशन करण्याचे काम एनजीओ करतात. परंतु, कलम ४९८ खाली गुन्हा दाखल करून घटस्फोट घ्यावा अशा प्रकारचेच मार्गदर्शन ते करतात. त्यामुळेच आज घटस्फोट दाव्यांची संख्या वाढत चालली आहे. पीडित महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशन करण्यात येते हे चांगले आहे. हा प्रयोग कोर्टातील केसेस काढण्या करिता सुरू करण्यात आला. कोर्टाने शहरातील मंगल कार्यालये भाड्याने घेतली व तेथे पोलीस अधिकाऱ्यांना बोलावितात व पुढची कार्यवाही करतात. त्याप्रमाणे विभागाने देखील जागा भाड्याने घेऊन समुपदेशनाचा कार्यक्रम राबविला पाहिजे. अशी सूचना समितीने केली असता यामध्ये रूपये ३९.०० लाख इतका जादा खर्च झाला आहे. एनजीओंना रूपये ८०००/- इतके मानधन देतो. एका समुपदेशन केंद्रामध्ये २ एनजीओ असतात. महाराष्ट्र राज्यात एकूण ४० समुपदेशन केंद्र आहेत. सदर केंद्राची संख्या वाढविण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले आज कुटुंब न्यायालयामध्ये घटस्फोटाच्या दाव्यांची संख्या वाढत आहे ही वस्तुस्थिती आहे. समुपदेशन करून जुळवाजुळवी करण्याचे काम केले पाहिजे. त्याकरीता शासनाची यंत्रणा तेवढी प्रभावी आहे काय ? आज घटस्फोटाचे प्रमाण वाढत चालले आहे. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, यंत्रणा प्रभावी करण्यासाठी समुपदेशन केंद्राची संख्या वाढवत आहोत. आता नवीन ६४ समुपदेशन केंद्र होणार आहेत. त्या संबंधीचा जी.आर.लवकरच निर्गमित होईल. महिला व बालविकास विभागाचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर झाला आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी समुपदेशन सुरू करण्यासाठी आपण निधी वाढवून द्यावा. तसेच, ए.सी.पी., डी.सी.पी. यांच्या कार्यालयाच्या आवारात समुपदेशन केंद्र उभारण्यास हरकत नसावी. अशी सूचना विभागास केली.

समुपदेशन केल्यामुळे दोघांमध्ये समझोता झाल्याचे प्रमाण ९५ टक्के आहे. क्वचित प्रकरणांमध्ये क्रीमिनल केस किंवा एफआयआर दाखल करावा लागतो. तसेच मुंबई सारख्या ठिकाणी रूपये आठ हजार इतक्या कमी मानधनामध्ये काम करणे एनजीओना शक्यता होत नाही. त्यामुळे त्यांचे मानधन रूपये पंधरा ते वीस हजार इतके केले पाहिजे पोलीस ठाण्याच्या आवारात, जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या कार्यालयाच्या आवारात समुपदेशन केंद्र सुरू आहेत. असे विभागाने समितीस सांगितले असता एनजीओंच्या मानधनामध्ये वाढ करण्यासंबंधी व पंचायत समिती व जिल्हा परिषदांमध्ये समूपदेशन केंद्र स्थापन करण्याबाबत समिती शिफारस करेल. तसेच विविध समाजामध्ये वेगवेगळ्या अडचणी

असतात. अल्पसंख्याकांच्या अडचणी वेगळ्या असतात त्यामुळे त्यांच्यासाठी वेगळे एनजीओ शोधले पाहिजेत. वडार समाजाची पंचायत बसते. सदर पंचायत कौटुंबिक वाद चांगल्या पद्धतीने सोडविते. तशी कॅटेगिरी आपण शोधली पाहिजे. अशी सूचना समितीने विभागाला केली.

बालिका समृद्धी योजना केंद्राची योजना होती. योजनेवर तरतूद खर्च न होण्याचे कारण काय आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी माहिती देताना असे सांगितले की, बालिका समृद्धी योजना केंद्र शासनाची होती. सदर योजना केंद्र शासनाने राज्य शासनाने काहीही न कळविता बंद केली आहे. सदर योजना देश पातळीवर लागू करण्यात आली होती. केंद्र शासनाने स्वत:च निर्णय घेऊन देशभर लागू केलेली योजना बंद केली. देशाची परिस्थिती बघून त्यांनी सदर योजना बंद करण्याचा निर्णय घेतला असावा. महिला आर्थिक विकास महामंडळाची रक्कम समर्पित करण्याचे कारण देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, वित्त विभागाची मान्यता घेऊन ग्रँट देतो. महिला आर्थिक विकास महामंडळाला सहज निधी प्राप्त होत नाही. निधी मिळण्यासाठी भरपूर पाठपुरावा करावा लागतो. महिला व बाल विकास विभागाने मागितलेली निधी वित्त विभागाकडून का नाकारण्यात आला. त्याचे कारण वित्त विभागाकडून देण्यात आलेले नाही. वित्त विभागाची मान्यता न मिळण्याची कारणे काय आहेत. याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाकडून मान्यता न मिळण्याची कारणे विभागाला सांगितली जात नाहीत. यासंदर्भात वित्त सचिवांनी सांगितले की, या संदर्भातील फाईल संबंधित विभागाकडे देण्यात आलेली आहे.

महिला आर्थिक विकास महामंडळाची वार्षिक उलाढाल किती आहे. यावर महिला आर्थिक विकास महामंडळाने ६० हजार बचत गट निर्माण केले आहेत, त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात येते. बचत गट बँकांशी लिंकअप करुन त्यांना कर्जाची सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही महामंडळामार्फत करण्यात येते. महिला बचत गटांना ४५ कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले. महिला बचत गटांद्वारे महिलांचे सक्षमीकरण, सबलीकरण करण्यात येत आहे, त्यातून त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी, त्यांना प्रशिक्षण देऊन उद्यांगधंदे वाढवावेत यासाठी बचत गटांना जास्त निधीची गरज लागली तर त्यांना निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. अनेक ठिकाणी असे दिसून येते की, बचत गटांतील महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी जो निधी देण्यात येतो त्यामध्ये गैरव्यवहार होत आहेत. कंत्राटदारांमार्फत सर्व कार्यवाही करण्यात येत आहे, ही बाब योग्य नाही. बचत गट तयार केल्यानंतर त्यांचे अनेक प्रश्न निर्माण होतात. बचत गटांनी उद्योग उभारले पाहिजेत. त्यासाठी त्यांना पुरेसा निधी दिला नाही तर त्या बचत गटातील महिलांचा फायदा

होणार नाही. त्यामुळे महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत सर्व बचत गटांचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

महिला बचत गटाची माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, दोन विभागांमार्फत बचत गट निर्माण करण्यात आले आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत ६० हजार बचत गट तयार करण्यात आले असून ग्रामविकास विभागामार्फत चार लाख बचत गट तयार करण्यात आले आहेत. या सर्वच बचत गटांचा आढावा घेण्याची गरज निर्माण झालेली आहे. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत बचत गटांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो, महिलांना प्रशिक्षण देण्यात येते. महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी त्यांचे आरोग्य, आहार या सर्व बाबींचा आढावा घेण्यात येतो. महिला बचत गटांचा हिशोब ठेवण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यात येते, या प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी व्याज कसे आकारावे, बँकेची कामे कशी करावीत यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण देण्यात येते.

महिला आर्थिक विकास महामंडळाने महिला बचत गटांसाठी फक्त ४५ कोटी रुपये दिले आहेत. महिला बचत गटांनी व्यवसाय करावा यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यात येते. महिला बचत गटांना आर्थिक सक्षम करण्यासाठी वित्त विभागाकडून निधी वाढवून घेणे गरजेचे आहे. विदर्भात महिला बचत गटांची स्थापना झाल्यामुळे त्या भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या करण्याचे प्रमाण कमी झाले आहेत. बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण झाल्यामुळे अनेक महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळाने महिला बचत गटांना जास्तीत जास्त सक्षम करण्यासाठी वित्त विभागाने निधी वाढवून दिला पाहिजे. महिला बचत गटांना चांगले प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळेल या दृष्टीने विभागाने प्रयत्न करावेत अशी सूचना समितीने विभागास दिली.

महिला आर्थिक विकास महामंडळाचे ५०० ते ६०० कॅपेसिटी असणारे महिलांचे वसतिगृह मुंबईतील जुहू येथे आहे, ते वापराविना तसेच पडून आहे. त्या इमारतीची दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण मुंबईत महिलांच्या वसतिगृहासाठी जागा नसताना हे वसतिगृह तसेच पडून आहे, हे योग्य नाही,या बाबत विभागाने योग्य ती कार्यवाही लवकरात लवकर करावी. यावर सदर वसतिगृहाची दुरुस्ती करण्यासंदर्भात माहिती मागविण्यात आलेली आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर वसतिगृहाची दुरुस्ती करण्यात येत आहे. त्या संदर्भातील प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

३० ते ३५ वर्षापूर्वी म्हाडाने जूहू येथील महिला वसतीगृहाची इमारत बांधलेली आहे. त्यावेळी एफएसआय कमी होता. आता मुंबईत एफएसआय वाढलेला असल्यामुळे येथे सुसज्ज व मोठी इमारत बांधता येईल. ही इमारत बांधण्यासाठी महिला व बाल विकास विभागाने निधीची तरतूद करावी. याबाबत

खूलसा करताना.या वसतिगृहाचे काम टप्प्या टप्प्याने पूर्ण करण्यात येणार आहे. आता पहिला टप्पा मंजूर झालेला आहे.

बीओटी तत्वावर इमारतीचे बांधकाम करण्यास हरकत आहे काय ? यासंदर्भातील निविदा प्रक्रिया महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत सुरु करण्यात यावी. बीओटी तत्वावर निविदा मागविण्यात याव्यात. या ठिकाणी महिलांच्या बचत गटांना उद्योग व्यवसाय करण्यासाठी गाळे तयार करावेत. अशी कार्यवाही प्रत्येक जिल्ह्याची ठिकाणी करण्याची आवश्यकता आहे. तळ मजल्यावर दुकाने काढून ४०० ते ५०० मुलींची व्यवस्था होईल असे वसतिगृह बांधले तर त्याचा फायदा होईल.याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की,  महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत तीन चार योजना सादर करण्यात येत आहेत. यामध्ये मार्केटिंगसाठी मोबाईल व्हॅन, मार्केटसाठी गाळे निर्माण करणे, मोबाईल रेस्टॉरंट, वेगवेगळे खाऊचे पदार्थ तयार करणे या सर्व योजना सादर करण्यात येत आहेत.परंतू यासाठी बजेट प्रोव्हीजन वाढवून घेण्याची आवश्यकता आहे.असे मत समितीने व्यक्त केले असता आता विभागाने तीन चार योजना सुचविलेल्या आहेत त्याबाबात वित्त विभाग सकारात्मक भूमिका घेईल अशी विभागाला अपेक्षा आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जी. प. योजनेअंतर्गत, विशेष घटक योजना अंतर्गत जिल्हापरिषदांनी रकमेची मागणी न केल्यामुळे रक्कम सपर्मित करण्यात आली आहे. याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हा परिषदेमधील महिला व बाल कल्याण समितीच्या शासनाने ठरवून दिलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रती प्रवेशिता रुपये २५००/- च्या मर्यादेत अनुदान देण्यात येते. सदरची योजना अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत सुरु आहे. लाभार्थी जास्त मिळाल्यामुळे जादा खर्च झाला आहे. अधिक खर्चाची टक्केवारी २१.०९ टक्के इतकी येते. काही जिल्हा परिषदांनी मागणी न केल्याने ४८.७६ लाख रुपये परत केले आहेत. यासंदर्भात जिल्हा परिषदांकडून अंतिम माहिती विभागाकडे पाठविण्यात आलेली नाही. मार्च अखरे पैसा मिळत असल्यामुळे तो खर्च होत नाही असे उत्तर अनेक वेळा देण्यात येते. या निधीची मागणी अगोदर का करण्यात येत नाही. काही जिल्हा परिषदांमध्ये अधिक खर्च झाला तर काही जिल्हा परिषदांनी मागणी केलेली नाही. मागणी न करण्याची कारणे काय आहेत ? यावर वित्त विभागाकडून निधी मिळण्यास विलंब होतो. त्यामुळे पुढील अनेक प्रश्न निर्माण होतात. असे विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले.

निराधार निराश्रित महिलांना बांगड्या,भाजी विक्री या सारखा स्वतःचा छोटा व्यवसाय सुरु करण्यासाठी रुपये ५००/-अनुदान एकदाच देण्यात येते. हा व्यवसाय करण्यासाठी ५०० रुपये अनुदान

अत्यंत कमी आहे. ५०० रुपयात आता कोणतेही साहित्य मिळत नाही. त्यामुळे ५०० रुपयांवरुन ही रक्कम पाच हजार रुपये करावी असे समितीने सूचित केले असता सचिवांनी समितीला सांगितले की, यासंदर्भातील योजनांचा अभ्यास करण्यासाठी यशदा संस्थेला सांगण्यात आले आहे. ही योजना यशदा या संस्थेकडे अभ्यास करण्यासाठी सोपविण्यात आलेली असल्यामुळे यशदा ही संस्था अभ्यास करुन त्यासंदर्भातील अहवाल विभागाला सादर करणार आहे. असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले असता या योजनेमध्ये सुधारणा करण्यसाठी समिती शासनाला करेल अशी सूचना समितीने विभागाला केली.

भिक्षेकरु यांना पोलिसांनी पकडून आणल्यानंतर त्यांना कोर्टासमारे उभे केले जाते. त्यानंतर त्यांना भिक्षेकरी गृहात ठेवण्यात येते. त्याच प्रमाणे शासनाने पोलीस स्टेशनच्या आवारात महिलांसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत समुपदेशन केंद्र सुरु केली आहेत. या केंद्रांमध्ये संकटग्रस्त महिलांना समुपदेशन व कायदेविषयक सहाय्य अशा प्रकारच्या सुविधा देण्यात येतात. या दोन विषयांचा संबंध पोलीस विभागाशी येत आहे. हे दोन प्रश्न पोलीस खाते व महिला व बाल विकास विभाग या दोन्ही खात्यांशी संबंधित आहेत, त्यामुळे या दोन खात्यामध्ये समन्वय असल्याशिवाय हे प्रश्न सुटू शकत नाहीत. पोलीस विभागाने अनेक ठिकाणी महिला विभाग सुरु केलेला आहे. पुणे येथे पोलीस महिला विभाग काम करीत आहे, त्यांचे काम समाधानकारक आहे. पोलीस महिला विभाग कुटुंबाचे प्रश्न सोडवितात. पोलीस महिला विभाग सुरु केल्यामुळे तक्रार करण्यास महिला पुढे येत आहेत. यासंदर्भातील विषय महिला व बालविकास सचिवांनी गृह विभागांच्या सचिवांना सांगावा. असे समितीने सांगितले असता मुंबईतील रस्त्यावर जे भिक्षेकरु असतात त्यांना पोलीसानी पकडल्यानंतर कोर्टापुढे उभे केले जाते. त्यानंतर त्यांना भिक्षेकरीगृहात ठेवण्यात येते. चेंबूर येथील इमारतीचे काम बीओटी तत्वावर देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे ज्या महिला संकटग्रस्त असतात त्यांचे समुपदेशन करण्यासाठी पोलीस स्टेशनच्या आवारात समुदेशन केंद्र सुरु करण्यात आली आहे या दोन्ही विभागामध्ये समन्वय असावयास पाहिजे. या महिलांना चांगली वागणूक दिली गेली पाहिजे. असे सचिव, महिला व बालविकास यांनी सांगितले. भिक्षेकरी गृहाचा विषय हा गृह विभागाशी देखिल संबंधित असल्याने त्या विभागाच्या प्रतिनिधींना मुंबई शहरामध्ये एकूण किती भिकारी पकडले गेले त्यापैकी किती भिका-यांना कोर्टासमोर उभे करुन भिक्षागारामध्ये पाठविण्याच्या एकूण किती केसेस झालेल्या आहेत ? तसेच, भिक्षागारातील भिका-यांचे समुपदेशन करुन त्यांना पुन्हा सुखाने संसार करण्याकरिता सहाय्य केलेले आहे ? शहरी भागामध्ये भिका-यांना कौन्सेलिंग करण्याकरिता एखादा हॉल भाडयाने घेऊन आवश्यक स्टाफ व पोलीस कर्मचारी घेऊन भिका-यांचे कौन्सेलिंग करणे आवश्यक आहे. याबाबत विचारणा केली असता गृह सचिवांनी

समितीस सांगितले की, भिका-यांना पकडून कोर्टासमोर उभे करुन भिक्षागारामध्ये पाठविण्याची जी योजना आहे, त्याची अंमलबजावणी पोलीस खात्याकडून करण्यात येत आहे. या योजनेमध्ये कोणत्याही प्रकारची त्रूटी नाही. या योजनेची अंमलबजावणी प्रभावी त-हेने सुरु आहे. उपरोक्त योजना राबविण्यात आल्यापासून एकूण किती भिका-यांच्या कोर्ट केसेस होऊन त्यांना भिक्षगारामध्ये पाठविलेले आहे. याबाबतची महिती लेखी स्वरुपात सादर करण्याचे निदेश विभागास दिले.

पोलीस खात्याकडे विविध कामांचा ताण असतो. परंतु तरीही हे काम वर्षातून तीन ते चार वेळा, तीन - तीन महिन्यांच्या अंतराने भिका-यांना पकडण्याची मोहीम पोलिसांनी राबवावी. यामुळे प्रत्येक ठिकाणी भिका-यांचा सुळसुळाट कमी होऊन भिका-यांमुळे जी गुन्हेगारी प्रवृत्ती व गुन्हेगारी वाढलेली आहे, त्याला आळा बसेल. अशी सूचना समितीने विभागास केली. काही काही भिकारी पथके हे वेल - ऑर्गनाईज्ड असतात. परराज्यातून मुले आणून त्यांना अपंग करुन त्यांच्याकडून दिवसा भिक व रात्री गुन्हेगारी करुन घेणारे गॅंगस्टर सुध्दा मुंबईमध्ये अस्तित्वात आहेत. अशी माहिती समितीने विभागाला दिली.

पर्यटनस्थळी व तीर्थक्षेत्री भिका-यांची संख्या जास्त प्रमाणात असते. कोल्हापूर, तुळजापूर, शिर्डी, शेगांव, अजिंठा - वेरुळ यासारख्या अनेक तीर्थक्षेत्री व पर्यटनस्थळी भिका-यांची संख्या वाढलेली असून येणा-या जाणा-या भाविकास व पर्यटकास त्यांचा फार त्रास होत आहे. तीर्थक्षेत्री व पर्यटनस्थळी भिका-यांची संख्या जास्तीत जास्त वाढल्यामुळे त्या त्या ठिकाणी गुन्हेगारी प्रवृत्ती व गुन्हेगारीही वाढीस लागलेली दिसून येत आहे. भिका-यांना पकडून कोर्टासमोर उभे करुन पुढील कार्यवाहीकरिता सादर करण्याचे काम होमगार्ड यांच्याकडे सोपविले पाहिजे, होमगार्डकडे हे काम सोपवितांना त्यांना देण्यात येणा-या मानधनाबाबतही शासनाने विचार करणे आवश्यक आहे. होमगार्डला देण्यात येणारे मानधन अतिशय कमी असून ते वाढविले पाहिजे. होमगार्डची एक सक्षम यंत्रणा बनवून त्यांना प्रशिक्षण व लक्ष नेमून देणे आवश्यक आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता भिका-यांना पकडून कोर्टासमोर उभे करणे आवश्यक आहे. कोर्टाच्या माध्यमातून त्यांना भिक्षागारामध्ये पाठवून त्यांचे प्रश्न सोडविणेही अत्यंत आवश्यक आहे. याकरिता शासनाने विभगानिहाय सुसंबध असा कार्यकृत आखून त्यावर अंमलबजावणी करण्याचे आमचे प्रयत्न सुरु आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. चेंबूर येथील भिक्षागार व त्याची जागा परस्पर विकून गैरव्यवहार करण्यात आलेला आहे, या प्रकरणाची चौकशी करुन त्याचा अहवाल शासनाला सादर करण्यात यावा. भिक्षागारातील भिका-यांना समुपदेशन करुन त्यांचे उच्चाटन करण्याचे काम पोलीस खाते, होमगार्ड आणि राज्य सुरक्षा रक्षक महामंडळ यांनी संयुक्त विद्यमाने किंवा एकमेकांची मदत घेऊन करणे आवश्यक आहे. तसेच गणेश चतुर्थी, मोहरम

यासारख्या सणांच्या दिवशी पोलीस खाते सार्वजनिक उत्सवामध्ये गुन्हेगारी होऊन नये म्हणून अतुलनीय अशा प्रकारचे सहकार्य करते. त्याचप्रमाणे पोलीस खात्याने भिका-यांची संख्या कमी करुन मुंबईला आणखी एका विळख्यातून सोडविले तर मुंबईतील जनता नेहमीच त्यांची ऋणी राहील. असे समितीने विभागास सूचविले. यावर महिला व बालविकास सचिवांनी अधिक खूलास करताना असे सांगितले की, भिक्षागारातील भिका-यांना समुपदेशन करुन चांगल्या मार्गावर आणण्याकरिता विभागाकडे कर्मचारी व आवश्यक यंत्रणाही उपलब्ध आहे. पोलिसांनी भिका-यांना पकडून त्यांना कोर्टासमोर उभे करण्यापर्यंतची प्रक्रिया झाल्यानंतर ज्यावेळी भिका-यांना भिक्षागारात पाठविले जाते. त्यानंतरची जबाबदारी महिला व बालकल्याण विभागाची आहे.

या बैठकीचे चर्चे अंती महिला व बालविकास विभागाचे काम समाधानकारक नसल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले व मुंबईतील भिक्षेकरीगृहांना समितीने प्रत्यक्ष भेट देवून पाहणी करण्याचा निर्णय घेतला तसेच महिला व बालकल्याण विभागाने वित्त विभागाकडे पाठविलेल्या पदभरतीच्या प्रस्तावाबाबतही विभागाने वित्त विभागासोबत बसून टिप्पणी तयार करावी. महिला व बालकल्याण विभागाच्या कामामुळे समिती पूर्णपणे समाधानी नाही. या विभागाला कामामध्ये प्रगती करण्याकरिता भरपूर वाव आहे. समितीला या विभागाच्या लेखा परिक्षण आक्षेपाबाबत अहवाल सादर करावायचा आहे. यासंदर्भात समितीने विभागाकडे मागितलेली माहिती विनाविलंब समितीकडे पाठविणे आवश्यक असून पनवेल व शहापूर येथील प्रकरणांचा छडा लावणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रकरणासंबंधी स्वत:हून चौकशी अहवाल पूर्ण झाल्यानंतर आवश्यकता भासल्यास हायकोर्टातही जावे लागले तरी चालेल. महिला व बालकल्याण विभागाने अत्यंत चांगले काम करावे. केंद्र शासनाची योजना राबवित असतांना महिला व बालकल्याण विभागाकडे अकाऊंटसंबंधी आवश्यक स्टाफ तालुका पातळीवरच नव्हे तर राज्य पातळीवर देखील नाही. ही बाब गंभीर आहे. नॉन अकाऊंट क्षेत्रातील माणूस ११०० कोटी रुपयांच्या बजेटच्या व्यय व नियोजनाचे काम सांभाळतो. ही बाब त्यापेक्षाही गंभीर आहे. या बजेटपैकी किती पैसा कोठे व कसा खर्च होतो, त्याची नोंद व रजिस्टर एंट्री योग्य पध्दतीने झालेली आहे की नाही हे पाहण्याकरिता कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर सी.ए. यांची नियुक्ती करुन सर्व रेकॉर्ड पडताळणे अत्यंत आवश्यक आहे. असे समितीने विभागाला सूचविले.

**समितीने मागील बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार मंगळवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ रोजी भिक्षेकरी गृह, चेंबूर, मुंबई येथे सार्वजनिक बांधकाम, महिला व बालविकास विभाग, नगर विकास विभाग, गृह विभाग व सामाजिक न्याय विभागाच्या विभागीय सचिव/प्रतिनिधींसमवेत बैठक घेऊन भिक्षेकरी गृहाची पाहणी केली.** बैठकित भिक्षेकरी गृहाची जागेचे मूळ मालक, जागेचे क्षेत्र, सध्याच्या जागेवर काय सुरू

होते, भविष्य काळातील योजना बीओटीचे प्रपोजल केव्हा मान्य करण्यात आले व ते कोणत्या विकासकाबरोबर करण्यात आले आहे गृहातील भिक्षेकरूंची संख्या यासंदर्भात प्रथम महिला व बाल विकास विभागाच्या सचिवांना व इतर विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना समितीला माहिती देण्यास सांगितले. त्यावेळी भिक्षेकरी गृहाच्या जागेचे क्षेत्रफळ २७ एकर आहे. या जागेची मालकी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असून ही जागा महिला व बाल विकास विभागाच्या कब्जे वहिवाटीत आहे. भिक्षेकरी गृहाच्या जागेवर समाज कल्याण विभागाचे छोटे बांधकाम आहे.

भेटीचे वेळी या संदर्भात अधिक माहिती देताना महिला व बालकल्याण विभागाच्या सचिवांनी सांगितले की, भीक मागण्यास प्रतिबंध करणे अधिनियम, १९६० अन्वये भिक्षेकरी गृह चालविले जाते. चेंबूर येथील भिक्षेकरी गृह पुरुष आणि महिला भिक्षेकरुंसाठी आहे. इंग्रजांच्या काळापासून भीक मागण्याची प्रथा सुरु आहे. ही प्रथा वाईट असल्यामुळे पोलिसांमार्फत मुंबईतील भिक्षेकरुंना पकडून कोर्टासमोर हजर केले जाते. त्यानंतर त्यांना भिक्षेकरी गृहात ठेवले जाते. भिक्षेकरी गृहात दाखल झ ालेल्या भिक्षेकरुंना खराटा तयार करणे, सुतार काम, मेणबत्ती बनविणे इत्यादींचे प्रशिक्षण देऊन त्यांना भीक मागण्यापासून परावृत्त केले जाते. महाराष्ट्र राज्यात १३ भिक्षेकरी गृह आहेत. भिक्षेकरुंना येथून वेगवेगळ्या भिक्षेकरी गृहात पाठविले जाते. भिक्षेकरी गृहातील भिक्षेकरु आजारी पडले तर त्यांच्यावर औषधोपचार केला जातो. त्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. भिक्षेकरुंसाठी जेवणाची व्यवस्था केली जाते. त्यांच्यासाठी कपड्यांची व्यवस्था केली जाते. त्यांना राहण्यासाठी बॅरेक्स उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ओहत. भिक्षेकरी गृहातील भिक्षेकरुंना खराटा तयार करणे, सुतार काम, मेणबत्ती बनविणे इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच पुरुष भिक्षेकरी गृहात १२७ पुरुष आहेत आणि महिला भिक्षेकरी गृहात २२५ महिला आहेत. १ अधीक्षक, १ वैद्यकीय अधिकारी, ३ परिवेक्षा अधिकारी आणि २७ केअर टेकर असा एकूण ४४ अधिकारी/कर्मचाऱ्यांचा स्टाफ आहे. सुरुवातीला भिक्षेकरी गृहाच्या ताब्यात ४६ एकर ३६ गुंठे जागा होती. स्मशानभूमी, महिलांचे वसतिगृह इत्यादींसाठी जागेचे वाटप करुन आता भिक्षेकरी गृहाच्या ताब्यात २७ एकर जागा राहिलेली आहे. भिक्षेकरी गृहाच्या ताब्यात ४६ एकर ३६ गुंठे जागा होती. भिक्षेकरी गृहाच्या जागेचे वाटप करुन आता भिक्षेकरी गृहाच्या ताब्यात २७ एकर जागा राहिलेली आहे. येथे पुरुष आणि महिला भिक्षेकरुंसाठी भिक्षेकरी गृह आहे. महिला भिक्षेकरुंसाठी कस्तुरबा महिला वसतिगृह आहे. या वसतिगृहात १८ ते ६० वयोगटातील महिला भिक्षेकरुंना ठेवले जाते.

भिक्षेकरूंना भिक्षेकरी गृहात किती काळ ठेवले जाते ? असे विचारले असता महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, भिक्षेकरूंना बेगर्स होममध्ये ठेवण्याचे

न्यायालयाचे आदेश वेगवेगळे असतात. एका भिक्षेकरूला बेगर्स होममध्ये आजीवन ठेवण्याबाबत देखील न्यायालयाचे आदेश आहेत. राज्यात एकूण १३ बेगर्स होम असल्याने तिकडे देखील त्यांना पाठविले जाते.

भिक्षेकरूंच्या संदर्भात पोलिसांची नेमकी भुमिका काय आहे ? भीक मागणे हा कायद्याने गुन्हा आहे. मुंबईत भिक्षेकरुंवर कारवाई करण्याचे अधिकार पोलिसांना आहेत. सदर प्रकरणी पोलिसांची नेमकी भूमिका काय आहे, याची माहिती समितीला द्यावी अशी विचारणा गृह विभागाच्या सचिवांना केली असता सदर विषय अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अख्यत्यारीत येतो असे समितीला सांगितले. भिक्षेकरू पोलिसांच्या माध्यमातून येथे येतात. त्यामुळे दाखल करण्यात आलेल्या भिक्षेकरुंची संख्या व इतर बाबींसंदर्भातील संपूर्ण माहिती संबंधित खात्यामार्फत येणे आवश्यक आहे. संबंधित अधिकारी बैठकीसाठी गैरहजर राहणे, सदर बाब समितीने गांभिर्याने दखल घेतली.

प्रस्तावित नूतनीकरणामध्ये बालविकास खात्याला देखील अंतर्भूत केलेले आहे काय तसेच नगरविकास खात्याची यासंदर्भात नेमकी भुमिका काय आहे याबाबत माहिती देण्यास नगरविकास विभागाच्या प्रतिनिधींना समितीने सांगितले. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, यात नगरविकास विभागाची भूमिका दिसत नाही. प्रस्तावित इमारतीचा प्लॅन नगरविकास खात्याकडे मंजुरीसाठी गेला का ? तसेच मुंबई महागनरपालिकेने २ वेळा या संपूर्ण प्रस्तावाला मंजुरी दिल्याचे पत्र असल्याचे आमच्याकडे माहिती आहे. हे पत्र दिनांक ४ ऑक्टोबर, २००८ चे आहे. त्यामुळे आयओडी व सीसी दिली पाहिजे होती. अशी विचारणा समितीने केली असता नगरविकास विभागाच्या प्रतिनिधींना या प्रकरणी माहिती देता आली नाही.

मूळ उद्देशामध्ये बदल केल्याचा मुद्दा आहे. नकाशे मंजूर करणे हे महानगरपालिकेचे काम आहे. उद्देश बदलण्यासाठी नगरविकास खात्याची मान्यता लागते. शासकीय भूखंडाचा विकास खाजगी विकासकाच्या म्हणजेच बीओटीच्या माध्यमातून करणे, हा समितीच्या समोरील विषय आहे. समितीला बीओटी प्रकल्पाची माहिती घेणे आवश्यक असून सदर प्रकल्प नेमका काय आहे, किती जागेवर उभारण्यात येणार आहे, या संदर्भातील सविस्तर माहिती समितीला देण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना सांगितले असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, चेंबूर, मुंबई येथील २७ एकर जागेवर खाजगी विकासकाकडून बांधकाम करून घ्यावयाचे होते. सदर भूखंडाचा विकास खाजगी विकासकाच्या माध्यमातून करण्याबाबत पायाभूत सुविधा समितीने ऑगस्ट, २००७ मध्ये मंजुरी दिली होती. एकूण भूखंडाचे क्षेत्रफळ १,१३,९२४.२० चौ.मी. (२८.८० एकर) आहे, विकासकाला घ्यावयाचा भूखंड ४०,००० चौ.मी. आहे, तो सेलेबल लॅण्ड म्हणून देण्यात येत आहे, झोपडपट्टीमुळे

बाधित क्षेत्र १३२४ चौ.मी. आहे, माहिला व बालविकास विभागाने आयसीएसडब्ल्यू व ३ आर सोसायटी यांना दिलेली जागा २६७९.६६ चौ.मी. आहे. उर्वरित भूखंड शिल्लक आहे. शिलकी भूखंडाचे क्षेत्रफळ ६९,९१९ चौ.मी. आहे. येथे शासनाच्या इमारतीचे बांधकाम करून घ्यावयाचे आहे. एकूण बांधकामाचे क्षेत्रफळ १,४१,२४९.०८ चौ.मी. आहे. यामध्ये १३ प्रकारच्या वेगवेगळ्या इमारती आहे. प्रशासकीय इमारतीचे बांधकाम जी प्लस १४ राहणार आहे, त्याचे एकूण क्षेत्रफळ ७७८९२.०८ चौ.मी. आहे. पुरूष भिक्षेकरी स्वीकार केंद्राचे बांधकाम जी प्लस ३ राहणार आहे, त्याचे एकूण क्षेत्रफळ ६७०० चौ.मी. आहे. महिला भिक्षेकरी स्वीकार केंद्राचे बांधकाम जी प्लस २ राहणार आहे, त्याचे क्षेत्रफळ ४३४७ चौ.मी. आहे. कस्तुरबा महिला वसतिगृहाचे बांधकाम जी प्लस १ राहणार आहे, त्याचे क्षेत्रफळ १०७६ चौ.मी. आहे. अनाथ बालकांकरिता बाल संकुल बांधण्याचे क्षेत्रफळ १००० चौ.मी. आहे.

भिक्षेकरी गृहाच्या जागेचा खाजगीकरणाच्या माध्यमातून विकास करण्याचा प्रस्ताव आहे, यामागचा उद्देश काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, भिक्षेकरी गृहाच्या जागेवर सन १९४७ साली पुरुष व महिला भिक्षेकरुंसाठी बॅरेक्स बांधण्यात आलेल्या आहेत. या बॅरेक्सचे स्ट्रक्चर टेम्परररी स्वरुपाचे आहे. या बॅरेक्सचे स्ट्रक्चर परमनन्ट स्वरुपाचे करुन घ्यावयाचे आहे. या जागेचा विकास करुन शासकीय कार्यालयासाठी आवश्यक असलेली प्रशासकीय इमारत, अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थाने, समाज कल्याण विभागासाठी इमारतीचे बांधकाम शासनाला एकही पैसा खर्च न करता करुन मिळेल. या बदल्यात विकासकाला ४० हजार स्क्वेअर मीटर जागा मिळणार आहे. खाजगीकरणाच्या माध्यमातून भिक्षेकरी गृहाच्या जागेचा विकास करण्याबाबतचा मूळ प्रस्ताव कोणी सादर केला याबाबत मूळ प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केल्याची माहिती मिळाली.

या जागेचा ताबा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नाही. ही जागा महिला व बाल विकास विभागाच्या कब्जे वहिवाटीत आहे. प्रॉपर्टी कार्डवर सार्वजनिक बांधकाम विभागाचे नाव आहे. महिला व बाल विकास विभागाचा या प्रस्तावाला पाठिंबा आहे काय ? तसेच महिला व बाल विकास विभागाच्या तत्कालीन प्रधान सचिव यांचा या प्रस्तावाला विरोध आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने खाजगीकरणाच्या माध्यमातून या जागेचा विकास करण्याचा प्रयत्न केला असेल तर तो जोरजबरदस्तीने केलेला आहे. कब्जेदाराला कायद्याने संरक्षण दिलेले आहे. कब्जेदार यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे काय ? अशी विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, मुंबईमध्ये शासनाची बरीच कार्यालये भाड्याच्या जागेत आहेत व ही कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. त्यासाठी प्रशासकीय इमारत बांधावयाची आहे. ज्यावेळी हा प्रस्ताव तयार करण्यात

आला त्यावेळी महिला व बाल विकास विभागाने या जागेवर सध्या महिला व बाल विकास विभागाचे जे बांधकाम अस्तित्वात आहे त्यापेक्षा अधिक बांधकाम करुन मिळाले पाहिजे, असे अभिप्राय नमूद केले होते. सध्या महिला व बाल विकास विभागाशी संबंधित बांधकाम १५,४११ स्क्वेअर मीटर क्षेत्रफळाचे आहे. या बदल्यात महिला व बाल विकास विभागाला २५,४५० स्क्वेअर मीटर जागेचे बांधकाम करुन देण्याचे प्रस्तावित आहे. सुरुवातीला भिक्षेकरी गृहाची जागा ४६ एकर होती. जागेचे वाटप केल्यानंतर आता भिक्षेकरी गृहाच्या ताब्यात फक्त २७ एकर जागा राहिलेली आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून जागेचे वाटप केले जाते. सन २००४ नंतर प्रत्येक विभागाने आपली नोंदणी नोंदविण्यास सुरुवात केलेली आहे. सदर बांधकामास महिला व बाल विकास विभागाचा अद्यापही विरोध असल्याबाबत महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी समितीला सांगितले.

एखाद्या विभागाचा विरोध असेल आणि ते कब्जेदार असतील तर सार्वजनिक बांधकाम विभागाला त्या जागेवर बांधकाम करण्याचा अधिकार आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी असे सांगितले की, या जागेचा विकास करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करुन पायाभूत सुविधा समितीकडे पाठविण्यात आला होता. महिला व बाल विकास विभागाला सध्या त्यांच्याकडे असलेल्या जागेपेक्षा जास्त जागा पाहिजे, असे मत पायाभूत सुविधा समितीच्या टिप्पणीवर त्यांनी नोंदविलेले आहे. आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांनी मागणी केलेल्याप्रमाणे आपण त्यांना ३४ हजार स्क्वेअर मीटरचे बांधकाम करुन देणार आहोत आणि १० हजार स्क्वेअर मीटर मोकळी जागा देणार आहोत. भिक्षेकरुंना शेती करण्यासाठी १० हजार स्क्वेअर मीटर जागा ठेवण्यात आलेली आहे.

महिला व बाल विकास विभागाचा सदर जागेचा विकास करण्याबाबत विरोध करण्याचे कारण काय आहे ? अशी विचारणा समितीने केली. यावर महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, भिक्षेकरी गृहाची २७ एकर जागा आहे. माननीय महिला व बाल विकास मंत्री महोदयांचा असा विचार आहे की, या संपूर्ण जागेचे बांधकाम विभागाने करावे. तसेच विभागाचे हेच मत आहे. भिक्षेकरी गृहाची संपूर्ण जमीन महिला व बाल विकास विभागाच्या ताब्यात आहे. ती जागा कमी करुन शासनाला फक्त बांधकाम करुन मिळेल. सध्या येथे जसे मोकळे वातावरण आहे तसे वातावरण बांधकाम केल्यानंतर येथे राहणार नाही. रिहॅब्लीटेशन सेंटरमध्ये चांगले वातावरण असले पाहिजे.

सद्य:स्थितीत बांधकाम कोणत्या टप्प्यावर आहे ? एकूण किती निविदा आल्या होत्या, निविदा सादर करणाऱ्या कंपन्यांची नावे काय आहेत आणि त्यांचे प्रत्येकाचे प्रस्ताव काय होते? असे समितीने विचारले असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, दिनांक

२७.०६.२००८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. एजन्सीचे नाव मे.झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमीटेड, मुंबई असे आहे. मे.झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई या विकासकाची रु.११.१६ कोटी अधिमूल्य देऊ करणारी निविदा शासनाने मान्य केलेली आहे. इतर निविदा देणाऱ्या कंपन्यांनी कोणती ऑफर दिली होती ? अशी विचारणा केली समितीने केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी असे सांगितले की, एकूण ६ उद्योजकांनी निविदा सादर केल्या होत्या. त्यामध्ये मे.आस्था डेव्हलपर्स या विकासकाने ८ कोटी १० लाख रुपये अधिमूल्य देऊ करणारी निविदा सादर केली होती. अप-फ्रन्ट अमाऊंट बाबत समितीला माहिती द्यावी असे समितीने विभागाला सांगितले असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी असे सांगितले की, जागा घोषित केली जाते, सेलेबल लॅण्ड घोषित केली जाते, विभाग किती बांधकाम करणार आहे, ते घोषित केले जाते. अगोदर अशाप्रकारे पॅरामिटर्स ठरवून दिले जातात. यानुसार संबंधित कंपनी किती प्रिमिअम देऊ शकते, हे पाहिले जाते. प्रिमिअम क्रायटेरियावर बिडिंग केले जाते. जास्तीत जास्ती बिडिंग प्रिमिअम देणाऱ्या कंपनीला काम देण्यात येते. मंगलम बिल्डर्सने ३०० लाख रूपयांची प्रिमिअम ऑफर दिली होती, पीबीए इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने ८१ लाख रूपयांची प्रिमिअम ऑफर दिली होती, संगम इंडिया लिमिटेडने ६२० लाख रूपयांची प्रिमिअम ऑफर दिली होती, एसके जॉईंट व्हेंचरने १५१ लाख रूपयांची प्रिमिअम ऑफर दिली होती, मे. झील व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेडने १११६ लाख रूपयांची प्रिमिअम ऑफर दिली होती.

सदर प्रकल्पाच्या निविदेची जाहिरात कोणकोणत्या वर्तमानपत्रांत दिली होती ? असे समितीने विचारले असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, प्रकल्पाच्या संदर्भातील जाहिरात वेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. तसेच, दैनिक जागरण, नवी दिल्ली या वर्तमानपत्रात दिनांक २१.०९.२००७ रोजी ही जाहिरात दिली होती. दैनिक लोकमत, नवी मुंबई, दैनिक सामना, मुंबई, टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई, मुंबई संध्या, रत्नागिरी टाईम्स अशा ६ वर्तमानपत्रांमध्ये सदर कामाची जाहिरात देण्यात आली होती.

मे. झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून ११ कोटी प्रिमिअम मिळाला. निविदा भरताना मे. झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्याबरोबर दुसरे कोणी पार्टनर होते का ? तसेच विभाग सदर काम बीओटी तत्वावर करणार होते मग विभागाला या संदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावरून निविदा मागविणे शक्य होते का ? धारावीच्या विकासाच्या संदर्भात असे करण्यात आले होते. आपण या संदर्भात काही विचार केला होता का ? याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना खुलासा करावयास सांगितला असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, मे. झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेडची निविदा मंजूर झाली होती. त्यांच्या संयुक्त प्रकल्पात कोणीही आलेले नाही. निविदा भरताना कोण

पार्टनर्स होते, याची सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासित करण्यात आले परंतु अद्याप सदर माहिती समितीला अप्राप्त आहे. निविदा भरताना बिडिंग पार्टनर्स कोण होते, टेक्निकल पार्टनर्स कोण होते, सद्य:स्थितीत ते बदलले आहेत का, शेअर्सचे हस्तांतरण झाले होते का, झाले असेल तर ते कोणत्या भावात झाले, या सर्व बाबींच्या संदर्भातील माहिती देण्यात यावी. असे समितीने विभागाला सूचित केले परंतु अद्याप सदर माहिती समितीला अप्राप्त आहे.

सदर जागेच्या बांधकामाची सद्य:स्थितीबाबात तसेच निविदेला मंजुरी देताना कामासाठीचा कालावधी किती दिला होता ? याबाबत खुलासा करावयास सांगितला असता महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, १३ इमारतींपैकी पुरूष भिक्षेकरी गृहाचे काम ७५ टक्के पूर्ण झाले. इतर इमारतींचे नियोजन सुरू आहे. मूळ कालावधी ४२ महिन्यांचा होता. प्रकल्पामध्ये अडचणी आल्यामुळे विचार करून ३६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. डिसेंबर, २०१४ अखेर सर्व बांधकाम पूर्ण करण्यात येईल, या अटीवर मुदतवाढ दिली आहे.

विभाग एसआरएचे पुनर्वसन दाखवित आहे. पुनर्वसनाचे काम मे. झील व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेड करणार आहे का ? पुनर्वसन कोण करणार आहे ? विकासकाला घ्यावयाचा भूखंड, झोपडपट्टीमुळे बाधित क्षेत्र, महिला व बालविकास विभागाने आयसीएसडब्ल्यू व ३ आर सोसायटीला दिलेली जागा यातून वगळली आहे का ? यासंदर्भात विभागीय सचिवांना खुलासा करावयास सांगितला असता महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, पुनर्वसनासाठी येणारा खर्च विकासक शासनाकडे जमा करणार आहे. महिला व बालविकास विभागाने आयसीएसडब्ल्यू व ३ आर सोसायटीला जागा दिलेली आहे, ती विकास प्रकल्पातून वगळली आहे.

महिला व बालविकास विभागाचा याप्रकल्पास विरोध आहे. मग हा प्रकल्प सार्वजनिक बांधकाम खाते जबरदस्तीने करीत आहे का ? सदर कामाच्या संदर्भात महिला व बालविकास विभागांची एनओसी दाखविण्यात यावी. हा प्रकल्प पायाभूत सुविधा समितीने मंजूर केला आहे व यास आयुक्तांची मान्यता असल्याबाबत, सांगण्यात आले आहे. येथे ४००० चौ.मी. जागा कमी मिळाली आहे. अधिक जागेची मागणी करून प्रस्ताव द्यायचा होता. प्रकल्पासाठी वेगवगळ्या विभागाची एनओसी घ्यावी लागते. या प्रकल्पासाठी कोणकोणत्या विभागांची एनओसी घेतली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, प्रकल्पासाठीची एनओसी स्वतंत्र्य घेतली जात नाही. संबंधित विभागांकडे प्रकल्पाच्या संदर्भातील फाईल जाते.

महिला व बालविकास विभागाने मान्यता देताना फाईलवर कोणते अभिप्राय दिले होते ? याबाबत खुलासा करावा यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, महिला व

बालविकास विभागाचे अभिप्राय असे आहेत की, "भिक्षेकरी गृह, चेंबूरचा भूखंड सर्व्हे क्र.४६९(अ) या जागेचा खाजगीकरणाच्या माध्यमातून भूखंड विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. महिला व बालविकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय भिक्षेकरी स्वीकार केंद्र, चेंबूर या संस्थेच्या जागेवर महिला व बालविकास विभागाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या संस्थांकरिता आयुक्त कार्यालय, पुणे यांजकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार सुमारे ६९,००० चौ.मी. जागा प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाने पायाभूत सुविधा समितीसमोर सादर केलेल्या प्रस्तावात महिला व बालविकास विभागाकरिता फक्त २४,६८६ चौ.मी. एवढीच जागा प्रस्तावित केली आहे. तथापि, सदर जागा ही अत्यंत अपुरी आहे. यास्तव आता महिला व बालविकास विभागाला किमान खालीलप्रमाणे जागा उपलब्ध करून द्यावी. सार्वजनिक बांधकाम विभाग महिला व बाल विकास विभागाला ३४ हजार स्क्वेअर मीटरचे बांधकाम करुन देणार आहोत. तसेच, आपण त्यांना १० हजार स्क्वेअर मीटर मोकळी जागा देखील उपलब्ध करुन देणार आहोत.

समाजिक न्याय विभागाचे अभिप्राय काय आहेत ? असे समितीने विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य विभागाचे अभिप्राय असे आहेत की, "चेंबूर, मुंबई येथील सर्व्हे क्र.४६९-अ येथील शासकीय भूखंडाचा खाजगीकरणाच्या माध्यमातून विकास करणेबाबत सदरचा प्रस्ताव पायाभूत सुविधा समितीपुढे सादर करण्याबाबतची टिप्पणी विभागास पाठवून त्याबाबत अभिप्राय देण्याची सार्वजनिक बांधकाम विभागाने विनंती केलेली आहे. याबाबत नमूद करण्यात येते की, सामाजिक न्याय विभागास मुलामुलींचे वसतिगृह जिल्हा समाज कल्याण अधिकारी व विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालय तसेच निवासस्थानासाठी एकूण ५५१०.६८ चौरस मीटर एवढीच जागा दर्शविण्यात आलेली आहे. याबाबत माननीय मंत्री, सामाजिक न्याय विभाग यांनी त्यांच्या दिनांक ७.१२.२००५ च्या पत्रान्वये आवश्यक असलेल्या खालील जागेची मागणी माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे केलेली आहे." सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी विभागास आवश्यक असलेल्या जागेची मागणी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती, असे सार्वजनिक बांधाकाम विभागाने सांगितले असता हा प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाला मान्य आहे काय असे विचारले असता याबाबत विभागीय सचिवांना याबाबत खुलासा करता आला नाही.

भिक्षेकरी स्वीकार केंद्राबरोबर जो करार झालेला आहे तसेच समितीला बैठकीचे वेळी जी लेखी माहिती देण्यात आलेली आहे त्यामध्ये असे नमूद केलेले होते की, "सदर कराराची प्रत अधीक्षक, भिक्षेकरी स्वीकार केंद्र यांनी शासनास परस्पर सादर केलेली असल्यामुळे या प्रस्तावासोबत प्रत प्राप्त झ ालेली नसल्यामुळे जोडण्यात आली नाही." या संदर्भात खुलासा करावयास सांगितला असता

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, समाज कल्याण विभागाचे अभिप्राय घेण्यात आले होते.

भिक्षेकरी स्वीकार केंद्रामार्फत काय काम केले जाते आणि भिक्षेकरी स्वीकार केंद्राचे पदाधिकारी कोण आहेत ? याची समितीला माहिती देण्यास सांगितले. यावर महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, पुरुष भिक्षेकरी स्वीकार केंद्र शासकीय आहे. ही शासकीय यंत्रणा असल्यामुळे त्यांच्या बरोबर कोणताही करार करण्यात आला नव्हता. टेंडरची प्रत शासनास सादर केलेली आहे.

विकासकाने ४२ महिन्यात बांधकाम पूर्ण करुन द्यावयाचे होते. परंतु ४२ महिन्यात बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे विकासकाला ३६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. विकासकाने बांधकाम वेळेवर पूर्ण करुन दिले नाही तर त्यांची बँक गॅरंटी जप्त केली जाते. तसेच सदर प्रकरण मागील १० वर्षापूर्वीचे आहे. विकासकाने वेळेवर बांधकाम पूर्ण केले केले नाही तर त्यांची बँक गॅरंटी जप्त करण्याची तरतूद असते. सन २००४ मध्ये आपण निविदा काढली होती. विकासकाला सन २०११ पर्यंत बांधकाम पूर्ण करुन द्यावयाचे होते. परंतु विकासकाने वेळेवर बांधकाम पूर्ण न केल्यामुळे विकासकाला सन २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. विकासकाला जी ४० हजार स्क्वेअर मीटर जागा देण्यात आलेली आहे त्या जागेचा भाव सन २०१४ पर्यंत वाढणार आहे. त्यामुळे विकासकाचा फायदा होणार आहे. कारण मुंबई शहरातील जागांचे भाव दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे विकासकाकडून वाढीव अधिमूल्य घेण्याचा विभागाचा विचार आहे काय ? विकासकाकडून वाढीव अधिमूल्य घेतले तर शासनाचा फायदा होईल. असे समितीने विभागाला सूचित केले.

चेंबूर येथील जागेचे आरक्षण भिक्षेकरी गृहासाठी होते. नंतर या जागेच्या आरक्षणामध्ये बदल करुन या जागेवर बांधकाम करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. अशी माहिती समितीला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी दिली. जागेचे भाव वाढलेले आहेत हे विभागाला मान्य आहे काय ? विकासकाला ३६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. शासन जागेचे भाव विचारात घेऊन विकासकाकडून जास्त पैसे मिळविणार आहे काय किंवा त्यांची बँक गॅरंटी जप्त करणार आहे काय ? या जागेचे आरक्षण केव्हा बदलण्यात आले तसेच विकासक त्याच्या जागेचा वापर व्यापारी तत्वाने करणार आहे. मूळ लॅण्ड विकास आराखड्यामध्ये बेगर्स होम म्हणून आली आहे. विभागाने हा उद्देशच बदलला आहे. चेंज ऑफ युजरची माहिती नगरविकास विभागाकडे आहे. महानगरपालिका व नगरविकास विभागाने यास मंजुरी देताना याचा विचार केला असेलच. तांत्रिक गोष्टी पूर्ण झाल्या आहेत का ? अशी विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की,

डि-रिझर्व्हेशनची मंजुरी प्राप्त झाली आहे. नगरविकास विभागाने डि-रिझर्व्हेशन दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ व दिनांक ३० एप्रिल, २०१० अन्वये नियोजित केले आहे आणि त्याप्रमाणे डि-रिझर्व्हेशन झाले आहे. डि-रिझर्व्हेशनसाठी २२ महिन्यांच्या कालावधीचा विलंब झाला आहे. स्थानिकांचा या संदर्भात विरोध होता. स्थानिक लोकांना वहिवाटीसाठी रस्ता पाहिजे होता, खेळाचे मैदान पाहिजे होते, प्रसाधनगृह पाहिजे होते. त्या संदर्भात निर्णय होऊन या सर्व बाबी नियोजनात अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. उद्योजकाने स्वः खर्चाने ४ प्रसाधनगृहे, वहिवाटीचा रस्ता व खेळाचे मैदान करण्याचे मान्य केले आहे. या सर्व बाबी करण्यास १४ महिन्यांचा कालावधी लागेल. त्यामुळे प्रकल्पासाठी ३६ महिन्यांचे मुदतवाढ देणे अपरिहार्य असल्याने तसे दिले आहे.

बैठकीचे वेळी विभागाने दिलेल्या टिप्पणीनुसार "दि.२९.१२.२००४ रोजी मा. मंत्री, सा.बां. यांचे दालनात सदर प्रकल्पाबाबत चर्चा झाली. बैठकीला मा. मंत्री, महिला व बालविकास व मा. मंत्री, सामाजिक न्याय उपस्थित होते. बैठकीमध्ये सदर भूखंडाचा खाजगीकरणाच्या माध्यमातून विकास सार्वजनिक बांधकाम विभागाने करावा, असे ठरले." महिला व बालविकास विभागाचे प्रधान सचिव करीत असलेल्या वक्तव्यामुळे विरोधाभास होत आहे. याचे कारण काय आहे ? कार्यारंभ आदेश दिल्यानंतर डि-रिझर्व्हेशन झाले. डि-रिझर्व्हेशन करण्यापूर्वी कार्यारंभ आदेश देण्यात आला. आपण डि-रिझर्व्हेशन गृहीत धरूनच कार्यारंभ आदेश दिला का ? आपण दिलेल्या टिप्पणीनुसार "वरील प्रकल्प सुरू करण्यापूर्वी आवश्यक असलेले ना हरकत प्रमाणपत्र खालीलप्रमाणे संबंधित प्राधिकरणाकडून घेण्यात आले आहे." त्यामध्ये नगरविकास विभागाकडून भूखंड विकास मंजूर आराखड्याच्या प्रस्तावित फेरबदलाच्या संदर्भातील पत्र असल्याचे सांगितले आहे, महानगरपालिकेच्या पत्राबाबत सांगितले आहे, पर्यावरण खात्याच्या पत्राबाबत सांगितले आहे. मात्र महिला व बालविकास विभागाच्या पत्राबाबत तेथे उल्लेख नाही. याचे कारण काय आहे ? असे समितीने विचारणा केली. यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, कार्यारंभ आदेश दिल्यानंतर डि-रिझर्व्हेशनची प्रक्रिया सुरू करण्यात आली. डि-रिझर्व्हेशनला २२ महिन्यांचा कालावधी लागला. माननीय मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची बैठक दिनांक २९ डिसेंबर, २००४ ला झाली. पायाभूत सुविधा समितीची बैठक दिनांक ८ ऑगस्ट, २००७ ला होऊन सदर प्रकल्पास मान्यता प्राप्त झाली.

पुढे समितीने अशी विचारणा केली की, डि-रिझर्व्हेशनपूर्वी आपण कार्यारंभ आदेश कसा दिला ? व सदर कामासाठी ३६ महिने वाढवून दिल्यामुळे कामास विलंब झाला आहे. सदर निविदा भरताना कोण बिडिंग पार्टनर्स होते, कोण टेक्निकल पार्टनर्स होते, नंतर ते बदलले का, या संदर्भातील सविस्तर माहिती देण्यात यावी. परंतु सदर माहिती समितीला अद्याप अप्राप्त आहे. विभागाचे अधिकारी माहिती

देऊ शकत नाहीत. सदर प्रकरणी डि-रिझर्व्हेशन होण्याच्या अगोदर वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. तसेच विभागीय सचिवांनी केलेल्या खुलाश्यामध्ये व बैठकीच्या वेळी दिलेल्या माहितीमध्ये विरोधाभास आहे, हा विरोधाभास का आहे, त्याबाबत विभागाने सांगावे. विभागाकडून अशाप्रकारे असत्य टिप्पणी का देण्यात आली ? समितीची दिशाभूल करण्यात आली आहे, त्याबद्दल समितीने गांभीर्याने दखल घेतली.

आरक्षण बदलण्यापूर्वी वर्क ऑर्डर देण्याचे कारण काय आहे ? आरक्षणात बदल होणार आहे असे गृहीत धरुन तुम्ही वर्क ऑर्डर दिलेली आहे काय ? अशी विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, दिनांक २९ डिसेंबर, २००४ रोजी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांच्या दालनात झालेल्या बैठकीस महिला व बाल विकास विभागाचे प्रधान सचिव देखील उपस्थित होते. भिक्षेकरी गृहाच्या इमारतीचे बांधकाम करण्यास काही आक्षेप नव्हते. कार्यरंभ आदेश देऊन आरक्षण बदलण्याची प्रोसेस पूर्ण करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने जी कार्यवाही केलेली आहे ती योग्य आहे काय ? बेकायदेशीरपणे वर्क ऑर्डर दिलेली आहे का ? समितीने विचारलेल्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळत नाही. या संदर्भात समिती मुख्य सचिवासमवेत बैठक घेऊन याबाबत अधिक माहिती घेण्यात येईल असे समितीने सूचित केले.

भिक्षेकरी गृहाच्या जागेचे क्षेत्रफळ १,१३,९२४ चौरस मीटर आहे. या भूखंडाचा विकास केल्यानंतर बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ १,४१,२४९.०८ चौरस मीटर होणार आहे. यामध्ये टीडीआर किती आहे, एफएसआय किती वापरलेला आहे आणि मे.झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांना टीडीआर दिलेला आहे काय यासंदर्भात तसेच मे.झील व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई या विकासकाची रु.११.१६ कोटी अधिमूल्य देऊ करणारी निविदा मान्य करण्यात आलेली आहे. विकासकाला ४० हजार चौरस मीटर क्षेत्रफळ वापरावयास मिळणार आहे, ते क्षेत्रफळ निवासी वापरासाठी आहे का व्यावसायिक वापरासाठी आहे याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही. विकासकाकडून ११.१६ कोटी रुपये अधिमूल्य घेण्यात आलेले आहे. विकासकाला टीडीआर, एफएसआय वापरुन ६८ हजार चौरस मीटर क्षेत्रफळ वापरावयास मिळणार आहे. विकासकाला ६८ हजार चौरस मीटर बांधकामाचा फायदा होणार आहे. यामध्ये निवासी वापराचे क्षेत्रफळ किती आहे आणि व्यावसायिक वापराचे क्षेत्रफळ किती आहे ? जे ११.१६ कोटी रुपये अधिमूल्य आकारण्यात आलेले आहे ते ४० हजार चौरस मीटर क्षेत्रावर आकारण्यात आलेले आहे का ६८ हजार चौरस मीटर क्षेत्रावर आकारण्यात आलेले आहे ? व यामध्ये निवासी वापराचे क्षेत्रफळ किती आहे आणि व्यावसायिक वापराचे क्षेत्रफळ किती आहे ? याबाबत विभागाला खुलासा करावायास सांगितला असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की,

या क्षेत्राकरिता अनुज्ञेय एफएसआय १ आहे. शासकीय निवासी इमारतीकरिता १.५ एफएसआय आहे आणि अनिवासी इमारतीकरिता ४ एफएसआय आहे.

पुढे समितीने अशी विचारणा केली की, ६८ हजार चौरस मीटरमध्ये व्यावसायिक वापरासाठी असलेले क्षेत्रफळ किती आहे आणि निवासी वापरासाठी असलेले क्षेत्रफळ किती आहे ? विकासकाकडून ११.१६ कोटी रुपये अधिमूल्य घेण्यात आलेले आहे, ते ४० हजार चौरस मीटर क्षेत्रावर आकारण्यात आलेले आहे का ६८ हजार चौरस मीटर क्षेत्रावर आकारण्यात आलेले आहे ? यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, ४० हजार चौरस मीटर क्षेत्रामधून १५ टक्के मनोरंजन क्षेत्र वजा करुन ३४ हजार चौरस मीटर क्षेत्रफळ उपलब्ध झालेले आहे. यासाठी २ एफएसआय अनुज्ञेय आहे. त्यामुळे निव्वळ बांधकाम क्षेत्रफळ ६८ हजार चौरस मीटर असणार आहे.

६८ हजार चौरस मीटर क्षेत्रापैकी निवासी वापरासाठी किती क्षेत्रफळ आहे आणि व्यावसायिक वापरासाठी किती क्षेत्रफळ आहे ? अशी विचारणा समितीने सार्वजनिक बांधकाम विभागाला केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, विकास नियंत्रण नियमावलीनुसार ६८ हजार चौरस मीटर क्षेत्रापैकी ५० टक्के क्षेत्र व्यावसायिक वापरासाठी आहे आणि ५० टक्के क्षेत्र निवासी वापरासाठी अनुज्ञेय आहे.

३ लाख ४० हजार स्क्वेअर फूट क्षेत्राचा व्यावसायिक वापर होईल आणि उर्वरित ३ लाख ४० हजार स्क्वेअर फूट क्षेत्राचा निवासी वापर होईल. विकासकाने वेळेत बांधकाम पूर्ण न केल्यामुळे विकासकाला ३६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. या ३६ महिन्यांच्या काळात सिमेंट, रेती इत्यादींचे भाव वाढले तर हा खर्च कोण करणार आहे ? याबाबत समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सन २००८ मध्ये कार्यरंभ आदेश देण्यात आलेला आहे. शासनाला विकासकाडून १,४१,२४९.०८ चौरस मीटरचे बांधकाम विनामूल्य करुन मिळणार आहे आणि या बांधकामाची किंमत ३३४ कोटी रुपये आहे. शासकीय बांधकामाचा संपूर्ण खर्च विकासक करणार आहे. बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याच्या किंमतीमध्ये जी भाववाढ होईल त्याचा खर्च विकासकच करणार आहे. विकासकाकडून ११.१६ कोटी रुपये अधिमूल्य घेण्यात आलेले आहे आणि शासनाला विकासकाकडून मिळणाऱ्या बांधकामाची किंमत ३३४ कोटी रुपये आहे असा एकूण ३४५ कोटी रुपये शासनाचा फायदा होणार आहे.

दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींसाठी लहान सदनिका बनविण्याचे धोरण आखले आहे. आपण त्या धोरणाची निवासी प्रकल्पामध्ये अंमलबजावणी केली आहे का ? समितीने सदर मुद्दा देखील विचारात घेऊन हा करारनामा झाला, त्यावेळी कोणत्या अटी व शर्ती लागू होत्या, सदर करार किती वर्षांसाठी झ

ाला होता, संबंधितांचे या संदर्भात काय निदेश होते, या सर्व गोष्टी माहिती समितीला देण्यास सांगितले. यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी असे सांगितले की, कार्यालयीन आदेश दिनांक २७.६.२००८ ला दिला. कालावधी ४२ महिन्यांचा होता. डेट ऑफ कमेन्समेंट दिनाक २६.१२.२०११ होती. डि-रिझर्व्हेशनला २२ महिन्यांचा कालावधी लागला. कामाला ३६ महिन्यांचे एक्स्टेंशन देण्यात आले. शासनाने दिनांक २४.१२.२०१४ पर्यंत बांधकाम पूर्ण करण्याचे ठरविले आहे.

शासनाकडून एखादी जागा विकासकाला देण्यासंदर्भात न्यायालयाने काही निदेश दिलेले आहेत की, शासनाने विकासकाला ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता जागा देऊ नये. आपण न्यायालयाच्या निदेशांची अंमलबजावणी केली नसल्याचे दिसत आहे. न्यायालयाने असे आदेश कधी दिले, विभागाचा ९९ वर्षांचा करार झाला, तो कोणत्या नियमान्वये झाला ? शासनाने विकासकाला भूखंड देताना नेमका किती वर्षांचा करार केला होता ? विकासकाबरोबर केलेला करार ३० वर्षांचा आहे की ९९ वर्षांचा आहे ?याबाबत समितीने विचारणा केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, विकासकाबरोबर केलेला करार ९९ वर्षांकरिता आहे. आपण अगोदर ३० वर्षांचा करार करतो आणि नंतर ३० वर्षांनी ते पुन्हा ३० वर्षांसाठी रिन्यू करतो.

पुरूष भिक्षेकरी स्वीकार केंद्र जी प्लस ३ ची इमारत बांधणार आहात. सर्वच भिक्षेकरी हे शरीराने फिट असतात का ? कोणीही भिक्षेकरी अपंग नाही का ? अपंग भिक्षेकरींसाठी इमारती मध्ये लिफ्टची सोय असणार का ? अशी समितीने विचारणा केली असता महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, ५० मतिमंद, २५ अपंग व बाकीचे वृध्द भिक्षेकरी आहेत. समितीने विचारलेल्या प्रश्नांची सविस्तर माहिती व मे. झील व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेड या विकासकाबरोबर केलेल्या मूळ कराराची प्रत समितीला सादर करण्यात यावी. पंरतु सदर माहिती अद्याप समितीला अप्राप्त आहे. विकासकाबरोबर ९९ वर्षांचा करार केला आहे. आपण आता सांगत आहात की, ३० वर्षांनी ३० वर्षांचे एक्स्टेंशन करणार आहोत. आपण तेव्हाच्या बाजारभावानुसार अतिरिक्त मूल्य चार्ज करणार का ? याबाबत विचारणा केली असता अतिरिक्त मुल्य आकारले जाणार नाही.

न्यायालयाने दिलेले निदेश संपूर्ण राज्याला लागू आहेत. आपण त्याची अंमलबजावणी केली पाहिजे होती. ३० वर्षांचा कालावधी संपल्यानंतर शासनाच्या अटी व शर्ती वेगळ्या असतील. विकासकाबरोबर केलेला करार समोर आल्यानंतरच सर्व गोष्टी क्लिअर होतील. भिक्षेकरी गृहाचे बांधकाम मल्टीस्टोरी करण्यात येत आहे. मतिमंद, अपंग यांच्यासाठी मल्टीस्टोरी इमारत धोकादायक आहे. भिक्षेकरी गृहात ५०-५५ टक्के मुले मतिमंद आहेत. समाजकल्याण विभागाच्या प्रधान सचिवांनी

देखील सांगितले आहे की, या ठिकाणचे वातावरण मोकळे ठेवावे लागणार आहे. असे समितीने सूचित केले.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीस साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहिती वरून असे निदर्शनास आले की, राज्यात एकूण १३ भिक्षेकरी गृहे आहेत. मुंबईमध्ये चेंबुर येथे एक भिक्षेकरी गृह आहे. या भिक्षेकरी गृहामध्ये रस्त्यावर भीक मागणाऱ्या व्यक्तींना पोलीस पकडतात व त्यांना कोर्टात हजर केले जाते. त्यानंतर या व्यक्तींना भिक्षेकरी गृहात दाखल करण्यात येते. पोलीस वेळोवेळी याबाबत आढावा घेतात. या **भिक्षेकरी गृहात असणाऱ्या भिक्षेकरुंच्या संख्येत कर्मचारी नसून बरीच पदे वर्षानुवर्षे शासनाने भरलेली नाहीत व रिक्त असलेली पदे भरण्यासंदर्भात विभागाकडून ठोस अशी कार्यवाही देखिल होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे विभागाने भिक्षकरी गृहासंदर्भात असलेली त्यांची मानसिकता बदलावी व रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी व या संदर्भात समितीस ३ महिन्यांत अवगत करावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

अपुरे मनुष्यबळ उपलब्ध असताना भिक्षेकरी गृहाचा दैनंदीन कारभार कसा हाताळला जातो, सोयी-सुविधा कशा पुरविल्या जातात व पकडून आणलेल्या या भिक्षेकरींना पुन्हा त्यांच्या घरी पाठविण्याबाबत विहीत कालावधीत कार्यवाही कशी केली जाते याबाबत समितीने शंका व्यक्त केली तसेच **भिक्षेकरी हा विषय महिला व बालकल्याण विभाग, गृह विभाग व समाजकल्याण विभाग या तिन्ही विभागांशी संबधित आहे. या विभागाचा एकमेकांशी योग्य समन्वय असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने या तीन्ही विभागांनी वरीष्ठ पातळीवर किमान तीन महिन्यातून एकदा बैठक घेवून भिक्षकरी गृहातील भिक्षेकरींना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा तसेच त्यांच्या समस्यांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करावा व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीला पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

राज्यात प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी महिला सुधारगृहे आहेत तेथील जागेचा वापर समुपदेशन केंद्रासाठी करावा अशी समितीने सूचना केली. त्यावेळी पोलीस ठाण्याच्या आवारात समुपदेशन केंद्रे असून राज्यात एकूण ४० समुपदेशन केंद्रे आहेत. या समुपदेशन केंद्रामध्ये घरगुती कारणामुळे होणाऱ्या अत्याचारावर मार्ग काढण्यासाठी पीडीत महिलांचे समुपदेशन करण्यात येते. **सध्या अस्तित्वात असलेली ४० समुपदेशन केंद्रे ही फारच कमी असून त्यात वाढ होण्याची आवश्यकता आहे. समितीच्या मते प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी समुपदेशन केंद्रे सुरू करण्यात यावीत तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त व उपायुक्त यांच्या कार्यालयात देखिल ही केंद्रे स्थापन करावीत जेणेकरून पीडीत महिलांचे प्रश्न सुटण्यास मदत**

**होईल. ही केंद्रे उभारण्यास निधीची आवश्यकता असल्याने महिला व बाल विकास विभागाने समुपदेशन केंद्रे स्थापन करण्याबाबत संपूर्ण राज्यामध्ये आढावा घेवून त्याकरीता येणाऱ्या खर्चाची तरतूद विभागाच्या अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्याच्या दृष्टीने तातडीने कारवाई करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**समुपदेशनाच्या कामाकरीता अशासकीय संस्थांची मदत घेण्यात येते. सदर अशासकीय संस्थाना शासन मानधन देत असते परंतु त्यांना देण्यात येणारे मानधन अत्यंत तुटपुंजे असल्याने या संस्था समुपदेशानाचे काम करण्यास राजी नसतात. त्यामुळे शासनाने समुपदेशन करण्याऱ्या अशासकीय संस्थाना प्रोत्साहन मिळण्यासाठी त्यांच्या मानधनात वाढ करावी अशीही समिती शिफारस करीत आहे.**

केंद्र व राज्य पुरस्कृत विविध विकास योजना राबविण्याकरीता राज्य शासनाने महिला आर्थिक विकास महामंडळास (माविम) राज्यस्तरिय शिक्षण संस्था म्हणून घोषित केले आहे. माविम (स्वइच्छित) गट, स्वयंसेवी संस्था व शासनाचे संबंधित विभाग यामधील समन्वय संस्था म्हणूनही काम करते. आर्थिकदृष्टया सक्षमीकरणासाठी महिलांना उत्पादित (संस्थाची) उपलब्धता व त्यावर त्यांचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. तसेच त्यांना काही प्रमाणात आर्थिक स्वायत्ता असणे आवश्यक आहे. महिला सक्षमीकरणामध्ये महिलांनी एकत्र येणे याची महत्वाची भूमिका आहे. महिला बचत गटाद्वारे महिलांचे सक्षमीकरण, सबळीकरण करण्यात येत आहे. त्यातून त्यांची परिस्थिती सुधारावी, त्यांना प्रशिक्षण देवून उद्योगधंदे वाढावेत यासाठी बचत गटांना जास्त निधी लागतो. **महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत ६० हजार बचत गट तयार करण्यात आले आहेत व ग्राम विकास विभागामधील चार लाख बचत गट तयार करण्यात आले आहेत. या सर्व बचत गटांचा आढावा घेवून महिलांचे सक्षमीकरण करण्यासंबंधी या बचत गटांना त्यांच्या मागणी प्रमाणे आवश्यक त्या प्रमाणात निधी वाढवून द्यावा अशी समिती आग्रहाची शिफारस करीत आहे तसेच महिला बचत गटांना मार्गदर्शन करण्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण शिबीरे आयोजित करण्यात यावीत अशीही समिती शिफारस करीत आहे.**

गरीब, परितक्त्या, अविवाहीत माता, पीडित स्त्रिया यांना स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत लाभार्थ्याला रू. ५००/- एवढे अनुदान एकरकमी देण्यात येते. अनुदान म्हणून देण्यात आलेले रू. ५००/- अनुदान ही रक्कम सदर योजना जेव्हा सुरू झाली त्यावेळेच्या परिस्थितीनुसार योग्य होती परंतु आता परिस्थितीत बदल झालेला आहे. या तुटपुंज्या अनुदानात किती साहित्य बाजारात मिळते व त्यानुषंगाने व्यवसाय करावा ही अशक्य बाब आहे. या संदर्भात यशदा ही संस्था अभ्यास करीत असून त्यांचा अहवाल अपेक्षित आहे अशी समितीस माहिती मिळाली. **या योजनेचा तसेच महिलांच्या सक्षमीकरणाच्या इतर योजनांचा देखिल अभ्यास करून त्यावर**

**अहवाल देण्यास यशदा या संस्थेस सांगण्यात यावे व सदर अहवाल त्वरीत मिळण्यासाठी योग्य तो पाठपुरावा करावा अशी समिती शिफारस करीत आहे. तसेच निराधार, निराश्रीत महिलांसाठी अनुदान म्हणून किमान रू ५०००/- वाढवून द्यावेत व या योजनांचा दर तीन वर्षांनी आढावा घ्यावा अशीही समिती शिफारस करीत आहे.**

राज्य शासन महिलांच्या कल्याणासाठी अनेक महत्वाच्या योजनांची अंमलबजावणी करते. उदा. शासकीय वसतीगृहे/ आधारगृहे. (सुधारित माहेर योजना, संरक्षणगृहे), व्यावसायिक प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी महिला मंडळांना अर्थसहाय्य, आर्थिकदृष्टया मागास कुटुंबातील मुलींना प्रशिक्षण घेण्यासाठी योजना, शुभमंगल योजना इत्यादी तसेच राज्यात अनेक केंद्र पुरस्कृत योजना उदा. **नोकरदार महिलांना वसतीगृहे, स्वाधार, उज्वल या सारख्या योजना राबविण्यात येतात या योजनांशी राज्य शासन व केंद्र शासन यांचेकडून निधी प्राप्त होतो. सदर निधी प्रतिवर्षी रू १२०० - १३०० कोटी एवढा अवाढव्य असून त्यांच्या लेख्यांची जबाबदारी ही महिला व बालविकास विभागाची आहे. परंतु विभागात असलेल्या कर्मचारी/अधिकारी वर्गाचा तपशील अवलोकीला असता, या विभागात लेखा विषयक तज्ञ नसल्याचे समितीस निदर्शनास आले. विभाग हजारो कोटी रूपयांच्या निधीचे नियोजन, खर्च व लेख कशा प्रकारे ठेवते या बद्दल समितीने सांशकता व्यक्त केली. या सर्व योजनांवरील निधीचे योग्य मुल्यमापन करून त्याचे नियोजन करण्यासाठी व त्यांचा लेखा-जोखा चोख ठेवण्यासाठी वित्तीय सल्लागाराची या पदाची निर्मिती करून नियुक्ती करावी अशी समिती शिफारस करीत आहे व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी.**

मुंबई, चेंबुर येथील सर्वे क्र. ४६९ (अ) हा भूखंड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा असून तो भिक्षेकरी गृहासाठी वापरात आहे. सदर भूखंडाचे क्षेत्रफळ ११३९४.२० चौ.मी. इतके आहे. भूखंडावर सध्या महिला व बालविकास विभागाच्या बॅरेक्स असून त्या १९४७ साली बांधण्यात आल्या आहेत. सदर भूखंडाचा विकास खाजगीकरण्याच्या माध्यमातून करण्याच्या प्रकल्पास दिनांक ८ ऑगस्ट, २००७ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीमध्ये मंजूरी घेण्यात आली व खुल्या निविदेद्वारे विकासामार्फत देकार मागविण्यात आले. मे. झील व्हेंचर्स प्रा. लि. मुंबई या विकासकाची रू ११.१६ कोटी अधिमुल्य देऊ करणारी निविदा स्वीकृत करण्यात आली. एकूण बांधकामाचे क्षेत्रफळ १,४१,२४९.०८ चौ.मी. असून यामध्ये १३ प्रकारच्या वेगवेगळया इमारती आहेत. विकासकाला या बदल्यात ४०००० चौ. मी. भूखंड मिळणार आहे.

सदरहू भूखंडाच्या विकास कामास दिनांक २७ जून, २००८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. सदर बांधकामे ४२ महिन्यांत पूर्ण करणे अपेक्षित होते. परंतु नगरविकास विभागाकडून भूखंड

विकास मंजूर आराखडयातील आरक्षणात केलेले फेरबदल, भूखंड मांडणी आराखडयात बदल व स्थानिक लोकांकडून झालेला विरोध इत्यादी यामुळे काम सुरू होण्यास वेळ झाला. शासकीय बांधकामे पूर्ण करण्यासाठी ३६ महिने इतकी मुदतवाढ दिली असून ते पूर्ण करण्याची दिनांक २६ डिसेंबर, २०१४ आहे.

**सदरहू जागा महिला व बालविकास विभागाच्या कब्जे वहिवाटीत असून त्याची मालकी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. सदरहू जागेवर बांधकाम केल्यामुळे भिक्षेकरी गृह हे पुनर्वसन केंद्र असल्यामुळे सध्या येथे जे मोकळे वातावरण आहे ते संपेल आहे. तसेच विभागाला स्वत: येथे बांधकाम करावयाचे असल्याने त्यांचा यास विरोध आहे. सदर प्रकल्प हा बीओटी तत्वावर करण्यात येत असल्याने त्याच्या निविदा आंतरराष्ट्रीय स्वरूपात का मागविण्यात आल्या नाही. तसेच निविदा भरताना बिडींग पार्टनर्स, टेक्निकल पार्टनर्स कोण होते, शेअर्सचे हस्तांतरण झाले का याबाबत समितीस तात्काळ माहिती देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**विकासकाने ४२ महिन्यांत बांधकाम पूर्ण करावयाचे होते. परंतु बांधकाम पूर्ण होऊ न शकल्यामुळे सन २०१४ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे. परंतु तो पर्यंत जागेच्या भावात होणारी वाढ व विकासकाला ४०००० चौ.मी. देण्यात आलेली जागा याचा विचार करता विकासकाकडून वाढीव अधिमुल्य घेतल्यास शासनाचा फायदा होईल असे समितीने निदर्शनास आणले. तसेच जागेचे आरक्षण बदलण्यापूर्वी कार्यारंभ आदेश कसे देण्यात आले असाही प्रश्न उपस्थित झाला. विकासकाला ४०००० चौ.मी. या भूखंडावर टिडीआर वापरून बांधकाम करण्यास मिळणार असल्यामुळे त्याला फायदाच होणार आहे व अधिमुल्य कोणात्या क्षेत्रफळावर आकारले आहे तसेच करार ३० वर्षांचा झाला असून नंतर त्यात वाढ करण्यात येणार आहे व त्यावेळच्या बाजार भावानुसार अतिरिक्त मुल्य आकारण्यात येणार नसल्याने विकासाकाबरोबर झालेल्या करारामध्ये फारच विसंगती समितीस आढळून आल्या तसेच हा करार विकासकाचा लाभाचा हेतू ठेवून करण्यात आला असे समितीसमोर दिलेल्या महितीनुसार समितीच्या निदर्शनास आले त्यामुळे या भूखंडाच्या विकासासाठी निविदा प्रक्रिया करताना तिची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिध्दी न देणे केवळ सिमीत वृत्तपत्रांमध्ये त्याची जाहिरात देणे, जागेचे आरक्षण बदलण्यापूर्वी कार्यारंभ आदेश देणे, विकासककाला मिळणाऱ्या टिडीआर व अधिमुल्य कोणत्या क्षेफळावर आकारण्यात आले आहे याबाबत संग्धितता ठेवणे तसेच विकासककाबरोबर ३० वर्षे का ९९ वर्षे करार केला आहे यासंदर्भात स्पष्टता केली नसल्याने यासर्व बाबीसाठी जे संबंधित अधिकारी आहेत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

चेंबूर, भिक्षेकरी गृह येथे अस्तित्वात असलेल्या भूखंडाचे एकूण क्षेत्र १,१३,९२४.२० चौ.मी. (२८.८० एकर) असून यापैकी ४०,००० चौ.मी. विकासकाला क्षेत्र दिले आहे व झोपडपट्टी अन्य सोसायटयांना ४००३.६६ चौ.मी. क्षेत्र दिले आहे. शासनास शिल्लक भूखंड ६९,९१९.५४ चौ.मी. असून त्यावर १,४१,२४९.०८ चौ.मी. बांधकाम करावयाचे आहे. विकासक ४०,००० चौ.मी. वर किती बांधकाम करु शकतो यांची माहिती बांधकाम विभागाने दिलेली नाही. एकूण भूखंडापैकी ४० टक्के विकासकास व ६० टक्के शासनास अशा प्रमाणात भूखंडाचे वाटप करण्यात आल्याचे दिसून येत आहे. **चेंबूर येथील जागेचा बाजारभाव विचारात घेता विकासकास दिलेले क्षेत्र हे जास्त असल्याचे समितीचे मत आहे. त्यामुळे संपूर्ण बांधकामास येणाऱ्या खर्चाचे मुल्यांकन निश्चित करुन विकासकास देण्यात आलेल्या क्षेत्रातील काही हिस्सा शासकीय इमारतीच्या बांधकामासाठी देण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट - अ

# परिशिष्ट - ब

# मंगळवार, दिनांक १० जानेवारी, २०१२

# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १० जानेवारी, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.०५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(४) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(५) श्री.सूर्यकांत दळवी, वि.स.स.
(६) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
(७) डॉ.दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) श्री.सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग :**
श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**नगरविकास विभाग :**
(१) श्री.टी.सी. बेंजामीन, प्रधान सचिव (१)
(२) श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (२)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. एफ-२ संदर्भात प्रधान सचिव (१) व प्रधान सचिव (२) नगरविकास विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

## मंगळवार, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२

# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.३५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.

(३) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.

(४) श्री. नवाब मलिक, वि.स.स.

(५) श्री. विलास लांडे, वि.स.स.

(६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.

(७) श्री. नाना पटोले, वि.स.स.

(८) श्री. बाळा नांदगांवकर, वि.स.स.

(९) श्री. सुरेशदादा देशमुख, वि.प.स.

(१०) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) श्री.सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.

(२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

(३) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग :**

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

(१) श्री. जे.एस. सहारिया, अपर मुख्य सचिव, मदत कार्य व पुनर्वसन

(२) श्री. सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास व पंचायत राज

(३) श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, रो.ह.यो. व जलसंधारण

(४) श्री. जयराज फाटक, सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळ, (माजी सचिव - ग्रामविकास )

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. एल-३ संदर्भात प्रधान सचिव, जलसंधारण व सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

## मंगळवार, दिनांक ६ मार्च, २०१२

# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ६ मार्च, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.२० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.

(३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.

(५) श्री. बाळा नांदगांवकर, वि.स.स.

(६) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

(७) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

(२) श्री. दि.पु. येवला, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्री.यशवंत कुमार, महालेखाकार, नागपूर.

**वित्त विभाग :**

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**महसूल व वन (वने) विभाग :**

श्री.प्रविणी परदेशी, प्रधान सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. सी-७ संदर्भात प्रधान सचिव, महसूल व वन (वन) विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

# शुक्रवार, दिनांक २७ एप्रिल, २०१२

# लोकलेखा समिती

समितीची बैठक शुक्रवार, दिनांक २७ एप्रिल, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.४० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(३) श्री.नाना पटोले, वि.स.स.

(४) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

(५) श्री. बाळा नांदगांवकर, वि.स.स.

(६) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग :**

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**सार्वजनिक आरोग्य विभाग :**

श्री.जयंतकुमार बांठिया, अपर मुख्य सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. आर-१ संदर्भात अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

# बुधवार, दिनांक ९ मे, २०१२

# लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ९ मे, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.१० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(५) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(६) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.

(७) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.

(७) श्री.नवाब मलिक, वि.स.स.

(८) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(९) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(१०) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

(११) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

(१२) डॉ.दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

(२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

(३) श्री.दिलिप येवला, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग :**

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**१) गृह विभाग :**

१. श्री.अमिताभ राजन, अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.

२.श्री.के.सुब्रमण्यम, पोलीस महासंचालक, पोलीस महासंचालनालय,मुंबई.

३.श्री.अरुप पटनायक, पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्तालय,मुंबई.

४.श्री. राज सिलनानी, पोलीस महासंचालक, होमगार्ड व नागरी संरक्षण,मुंबई.

५.श्री.एस.पी.भाले,संचालक, अभियोग संचालनालय,

६.श्री.एस.पी.यादव, पोलीस सह आयुक्त, पोलीस आयुक्तालय, मुंबई.

७.श्री.के.के.पाठक, अप्पर पोलीस महानिरीक्षक, पोलीस आयुक्तालय, मुंबई.

८.श्री.हेमंत नगराळे, विशेष पोलीस महानिरीक्षक,पोलीस आयुक्तालय, मुंबई.

९.डॉ. प्रज्ञा सरवदे,विशेष पोलीस महानिरीक्षक,पोलीस आयुक्तालय, मुंबई.

**२) महिला व बालविकास विभाग :**

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. बी-१ संदर्भात अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांची साक्ष पूर्ण झाली व अनुदान क्र-एक्स-१ संदर्भात प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांची साक्ष अपूर्ण राहिली.

# बुधवार, दिनांक २३ मे, २०१२

# लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २३ मे, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १२.५५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) डॉ.नामदेव ऊसेंडी, वि.स.स

(३) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.

(४) श्री.ए.टी. पवार, वि.स.स.

(५) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(६) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(७) श्री.आर.एम. वाणी, वि.स.स.

(८) श्री. बाळा नांदगांवकर, वि.स.स.

(९) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

(१०) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्री.यशवंत कुमार, महालेखाकार, नागपूर.

**वित्त विभाग :**

श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**जलसंपदा विभाग :**

श्री.डी.पी. शिर्के, सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. आय -३ संदर्भात सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

## बुधवार, दिनांक ३० मे, २०१२

# लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ३० मे, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) डॉ.नामदेव ऊसेंडी, वि.स.स
(४) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
(५) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(६) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
(८) श्री.आर.एम. वाणी, वि.स.स.
(९) श्री.भाई जगताप, वि.प.स.
(१०) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
(११) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(३) श्री.दिलिप येवला, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**
श्री.यशवंत कुमार, महालेखाकार, नागपूर.

**वित्त विभाग :**
श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**कृषी विभाग :**
श्री.एस.के. गोयल, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. डी-२(अ) व डी-३ संदर्भात प्रधान सचिव, कृषी विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

## मंगळवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२

# लोकलेखा समिती

समितीने मंगळवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ रोजी भिक्षेकरी गृह, चेंबूर, मुंबई येथे दुपारी ३.३० वाजता भेट दिली व बैठक घेतली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.संजय सावकारे, वि.स.स

(३) श्री.विवेक पंडित, वि.स.स.

(४) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.

(५) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

**निमंत्रित**

(६) श्री.विनायक राऊत, वि.प.स.

(७) श्री.मनिष जैन, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

(२) श्री.दिलिप येवला, अवर सचिव (समिती)

**साक्षीदार :**

**(१) गृह विभाग**
श्रीमती मेधा गाडगीळ, प्रधान सचिव

**(२) सार्वजनिक बांधकाम विभाग**
श्री.श्यामलकुमार मुखर्जी, सचिव

**(४) महिला व बालविकास विभाग**
श्री.उज्वल ऊके, सचिव.

**(३) नगरविकास विभाग**
श्रीमती सीमा ढमढेरे, सह सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. एक्स -१ संदर्भात प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांची साक्ष पूर्ण झाली.

## बुधवार, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१२

# लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.०० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
(४) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(५) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(६) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(८) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(९) श्री.विवेक (भाऊ) पंडीत, वि.स.स.
(१०) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.
(११) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
(१२) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(१३) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

**निमंत्रित**

(१४) श्री.विनायक राऊत, वि.प.स.
(१५) श्री.मनिष जैन, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(३) श्री.दिलिप येवला, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार, मुंबई.

**वित्त विभाग :**
श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**१) महसूल व वन (मदत व पुर्नवसन) विभाग**
श्री.मिलींद म्हैसकर, सचिव.
**२) कृषी विभाग**
श्री.सुधीरकुमार गोयल, अपर मुख्य सचिव.
**३) अन्न व नागरीपुरवठा विभाग**
श्री.भगवान सहाय.
**४) श्री.विजयकुमार नहाटा, विभागीय आयुक्त.**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. सी-६ संदर्भात सचिव, महसूल व वन (मदत व पुर्नवसन) विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

## सोमवार, दिनांक १७ डिसेंबर, २०१२

# लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजी विधान भवन, नागपूर येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन दुपारी वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२)
(३)
(४)
(५)
(६)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(४) श्री.सोमनाथ सानप, कक्ष अधिकारी.

**समितीने दहावा प्रारुप अहवाल विचारात घेतला व संमत केला.**